जानेवारी - फेब्रुवारी २०१२ | किंमत : ₹२०

# लोकराज्य

## साहित्य संमेलन विशेष



साहित्य संस्कृती समृद्धी

# जय शारदे वागीश्वरी

जय शारदे वागीश्वरी
विधिकन्यके विद्याधरी ॥धृ॥

ज्योत्स्नेपरी कांती तुझी
मुख रम्य शारद चंद्रमा
उजळे तुझ्या हास्यातुनी
चारी युगांची पौर्णिमा
तुझीया कृपेचे चांदणे, नित वर्षु दे आमुच्या शिरी ॥१॥

विणेवरी फिरता तुझी
चतुरा कलामय अंगुली
संगीत जन्मा ये नवे
जडता मतिचि भंगली
उन्मेश कल्पतरुवरि, बहरून आल्या मंजिरी ॥२॥

– शांता शेळके

वर्ष ६३वे | अंक १०-११ | जाने-फेब्रुवारी २०१२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | प्रमोद नलावडे |
| व्यवस्थापकीय संपादक | प्रल्हाद जाधव |
| उपसंचालक (प्रकाशने) | एम. टी. गावीत |
| कार्यकारी संपादक | डॉ. संभाजी खराट |
| उपसंपादक | किरण केंद्रे |
| प्रशासन व वितरण अधिकारी | दिगंबर पालवे<br>विलास बोडके |
| संपादन सहाय्य | कीर्ती पांडे<br>क्रिती लाला |
| सहाय्य | दिनेश सुर्वे<br>प्रशांत जाधव |
| व्यंगचित्रे | अजय जाधव |
| मुखपृष्ठ | सतीश भावसार |
| मांडणी, सजावट | संदीप पवार |
| मुद्रण | एच. टी. मीडिया लि. दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई |

संपादकीय पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, रूम नं. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२
संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

e-mail : lokrajya2011@gmail.com

ई-लोकराज्यसाठी
Website : http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार, वितरण व तक्रार निवारणासाठी संपर्क
०२२-२२०२१५३०, २२०२३००६, २२०२३९५७.

e-mail : lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | | ५ |
| शुभेच्छा | मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री | ६ |
| संमेलनाचे वर्ष, ठिकाण आणि अध्यक्ष | | ७ |
| मराठी ग्रंथकारसभेस पत्र | | १२ |
| ढोबळ आकलनाचे थिटे विश्व... | वसंत आबाजी डहाके | १३ |
| साहित्यसोहळा आणि त्या पलीकडे... | डॉ. रमेश धोंगडे | २१ |
| मुस्लीम-मराठी एकरूपता | डॉ. यु. म. पठाण | २४ |
| तो सुंदर प्रवास... | उत्तम कांबळे | २७ |
| उत्सव नको... कृतीची गरज | डॉ. गंगाधर पानतावणे | २९ |
| उत्सवाकडून देखाव्याकडे... | दिनकर गांगल | ३० |
| साहित्यसंमेलनाचे औचित्य | प्रा. रा. ग. जाधव | ३२ |
| ह्याची गोष्ट करता आली असती तर... | श्याम मनोहर | ३४ |
| नव्या परिमाणाची अपेक्षा ... | डॉ. आनंद यादव | ३६ |
| साहित्य संमेलनाचा शीण | रंगनाथ पठारे | ३८ |
| संमेलनांचे फलित... | डॉ. जयंत मो. गाडगीळ | ४१ |
| तेव्हा आणि आता... | डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी | ४३ |
| 'इतनी बडी किताब' | फादर फ्रान्सिस दिब्रिटो | ४७ |
| नाकारलेल्या इतिहासाचे वर्तमान | वाहरू सोनवणे | ४८ |
| नवे विचार नव्या वाटा | संजय भास्कर जोशी | ५१ |
| मी संमेलनाला का जात नाही? | भालचंद्र नेमाडे | ५४ |
| वऱ्हाडी पाहुणचार | तंबी दुराई | ५५ |
| संतांची उच्छिष्ठे... | डॉ. सदानंद मोरे | ५७ |
| संमेलनात स्त्री कुठे? | प्रा. रूपाली शिंदे | ५९ |
| चौकटीत अडकलेले संमेलन | रमेश इंगळे -उत्रादकर | ६१ |
| साठोत्तरी ग्रामीण कादंबरी | डॉ. वासुदेव मुलाटे | ६३ |
| विश्व मराठी साहित्य संमेलन | कौतिकराव ठाले -पाटील | ६५ |
| भाषा सर्वेक्षण आणि सामंजस्य | अरुण जाखडे | ६८ |
| सृजन आणि शोषण | डॉ. गजानन नामदेव जाधव | ७० |
| गूढकथा-साहित्याच्या प्रवाहात? | प्रा. नवनीत देखमुख | ७२ |
| रेटन तं भेटन! | डॉ. मिर्झा रफी अहमद बेग | ७४ |
| सारेच दीप मंदावले आता... | नरेंद्र लांजेवार | ७६ |
| सर्व प्रवाहांना सामावून घेते का? | डॉ. नागनाथ कोतापल्ले | ७८ |
| उत्क्रांतीच्या उंबरठ्यावर | अभिषेक जाखडे | ७९ |
| मराठी अभिजात कशी? | हरी नरके | ८१ |
| ज्ञानपीठ त्रिवेणी | प्रा. डॉ. रेखा देशपांडे | ८४ |
| साहित्यपालखीचे भोई | प्रा. नरेंद्र पाठक | ८६ |
| 'ऐश्वर्या राय गर्भावस्थेत' | मुकुंद टाकसाळे | ८९ |
| संमेलनाला जाण्यात गैर काय? | सतीश काळसेकर | ९० |
| प्रतिभेचा तिसरा डोळा? | डॉ. किशोर सानप | ९१ |
| स्वागताध्यक्षपद | श्रीनिवास विनायक कुलकर्णी | ९८ |


**'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...**

वार्षिक वर्गणी - वरिष्ठ सहाय्यक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बँक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा.(प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.




### महाराष्ट्राला देणगी

'लोकराज्य'चा विदर्भ विशेषांक हाती पडला. अभिनंदन! अंक फारच सुंदर आहे. छपाई, मजकूर, छायाचित्रे सर्वच अप्रतिम. लेखकही नामवंत आहेत. विदर्भातील महान व्यक्तिमत्त्वे आणि महान संस्था ह्या अंकात भेटतील. आता 'लोकराज्य'चे पूर्वीचे स्वरूप बदलून आपण त्यात खूपच वाचनीयता आणि महितीपूर्णता आणली आहे. 'वैश्विक मराठी', 'वाचन-एक अमृतानुभव' हे अंकही सरस आहेत. 'लोकराज्य' ही महाराष्ट्राला मोठी देणगीच ठरली आहे. हल्ली चांगल्या मासिकांचा तुटवडा असल्याने या अंकाची कामगिरी बहुमोल ठरली आहे. पुनश्च अभिनंदन!

**– शिरीष पै,** मुंबई

### दर्जेदार अंक



लोकराज्यचे अंक मी आवर्जून वाचत असतो. त्याचा दर्जा हा कुठल्याही व्यावसायिक नियतकालिकापेक्षा तसूभरही कमी नाही. शासकीय पातळीवरून निघणारे पण सर्जनशील मूल्य जपणारे हे मासिक महाराष्ट्रात ज्ञानप्रसाराचे मोठे काम करीत आहे. भाषा, साहित्य, कला इ. विषयांतील मान्यवरांना एकत्र आणणे हे आव्हानात्मक काम आपण लीलया पार पाडत आहात. याबद्दल संपादक मंडळाचे कौतुक करावेसे वाटते. यापुढे आपले गुणवत्तापूर्ण अंक येत राहतील, या अपेक्षेसहित हार्दिक शुभेच्छा!

**– रा. ग. जाधव, ज्येष्ठ समीक्षक**

### निष्ठा, आशय आणि निर्मितीमूल्ये

आपले लोकराज्य नुसते डोळ्यात भरतच नाही तर ते, हृदयासकट मेंदुलाही आकर्षित करते. निर्मितीमूल्ये आणि आशय या गुणांकडे आपण अत्यंत नेकीने लक्ष देत आहात. याचा अलीकडचा पडताळा म्हणजे, वाचन संस्कृती विशेषांक, चित्र-शिल्प विशेषांक आणि विदर्भ विशेषांक होय ! आपल्या संपादन कौशल्याला आणि त्यात सहभागी असलेल्या सहकाऱ्यांना दृष्ट लागणार नाही याची काळजी घ्या !

**– ग्रेस**

### न्यायमूर्तींची शाबासकी!

लोकराज्य या मासिकाचे २०११ सालचे सर्व अंक अंतर्बाह्य सुरेख व सुंदर असे आहेत. वर्षभराच्या अंकासाठी आपण सुनियोजन करून जे वेगवेगळे विषय निवडलेत, ते मासिकाचे नियोजन कसे करावे व तो कसा सजवावा, याचा साहित्यपाठच आहे.

या अंकामागे ज्यांची योजकता, परिश्रम, समयसूचकता उभी राहिली असेल त्या सर्वांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

आजवर शासकीय मासिक म्हटले की ते सरकारी गॅझेटसारखे अथवा मंत्र्यांच्या फोटोने भरलेले व त्यामुळे 'बघणीय' असले तरी सहसा 'वाचनीय' नाही, अशीच वाचकांची वृत्ती असे. परंतु, 'लोकराज्य'चे २०११ सालचे सर्व अंक अंतर्भूत विषयाची संपूर्ण चर्चा करणारे व त्या संदर्भातील लेखकांशी सत्संग साधणारे असल्याने ते मी माझ्या संग्रही ठेवले आहेत. त्याचे मूल्य संदर्भग्रंथांसारखे आहे. हे सारे अंक बघितल्यावर आठवले की कोणे एके काळी 'लोकराज्य' मासिकाच्या १ ऑक्टोबर १९७९ च्या राजभाषा विशेषांकास भारतीय भाषांतील साप्ताहिके व मासिके यासाठीच्या प्रकाशनाचे व मुद्रणाचे प्रथम पारितोषिक राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आले होते. आता जर मासिकासाठी राष्ट्रीय स्तरावर पारितोषिक देण्याचे ठरविले गेले तर प्रथम पारितोषिक मिळविण्याचा मान लोकराज्य मासिकास हमखास प्राप्त होईल, अशी मला आशा आहे. महाराष्ट्र हा एकमेव प्रदेश आहे ज्याच्या नावात 'महा' व 'राष्ट्र' हे शब्द आहेत, त्यामुळे शासनातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकात दोन्ही भावनांचे प्रतिबिंब उमटावे अशी माझ्यासारख्यांची अपेक्षा आहे. मंदिराचे स्तंभ संपूर्ण मंदिर खांद्यावर तोलण्यासाठी असतात, तर राजमहलाचे स्तंभ केवळ शोभेसाठीच असतात. या दोहोंचा समन्वय व सामंजस्य 'लोकराज्य' मासिकाने व्रताच्या भावनेने साधण्याचा प्रयत्न करावा अशी अपेक्षा व्यक्त करतो व त्यासाठी शुभेच्छा देतो.

**– न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी,** मुंबई

### टीकेचे स्वागत

डिसेंबर-२०११ चा अंक हातात पडला. मुखपृष्ठावरच 'विदर्भ विशेष' हे शब्द वाचल्यामुळे व त्याचबरोबर संत श्रेष्ठ गजानन महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विनोबा भावे व संत गाडगेबाबा या विभूतींचे दर्शन झाल्यामुळे, हातातील सर्व कामे बाजूला ठेवून मी हा अंक पूर्ण वाचून काढला. खरोखरच शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, वैचारिक अशा अनेक बाबींवर या अंकात प्रकाश टाकला गेला आहे. सुंदर व आकर्षक अशा या अंकाबाबत मी आपले मनापासून अभिनंदन करतो. या अंकात लेखकांनी केलेले सडेतोड लिखाण, त्याचबरोबर सकारात्मक व टीकात्मक उल्लेख असलेले लिखाण असल्यामुळे त्यात कृत्रिमता आलेली नाही हे विशेष. यापुढेही अशाच सखोल माहितीपूर्ण व दर्जेदार लोकराज्य अंकाची निर्मिती आपणाकडून व्हावी ही अपेक्षा.

**– शिवाजीराव मोघे,** सामाजिक न्याय मंत्री

### लोकराज्यचा सांस्कृतिक कायापालट

आपण पाठविलेले लोकराज्याचे १. वाचन विशेषांक २. मराठी भाषा विशेषांक ३. चित्र शिल्प विशेषांक ४. विदर्भ विशेषांक अंक मिळाले, आभारी आहे. पण आभार तरी कसे म्हणू ? आहो, १९५५ ते १९५७ मी नागपूर आणि मुंबई येथे तुमच्या विभागात सहसंपादक होतो. 'प्रगती, ' 'फॉर्मर', 'लोकराज्य' इ.मराठी, हिंदी, इंग्रजी मासिकांच्या संपादनात सहभागी झालो होतो. परिहार, वाजपेयी, पिटके, भिसीकर, ताराबाई, सहस्त्रभोजने,शहा, विनोदराव इ. ज्येष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आम्हा युवकांना तेव्हां फार लाभप्रद ठरले, ते पाथेय अजून पुरते आहे.

हे चार विशेषांक पाहून मनात विचार आला 'काळ किती वेगाने बदलला!' तेंव्हा शासकीय नियतकालिके शासनाचे उपक्रम समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य करीत होती. आता समाजाचे स्पंदन शासनापर्यंत पोहचविण्याचे कार्य ही नियतकालिके करीत आहेत.

आता ती समाजाची सांस्कृतिक शक्ती केंद्रे झाली आहेत. सांप्रत मराठीत वैचारिक व वाड्.मयीन नियतकालिके अंतर्धान पावत असतांना लोकराज्यचा हा सांस्कृतिक कायापालट आणि उदय औचित्यपूर्ण आहे.

विदर्भ विशेषांकामध्ये तुम्ही अनुकूल - प्रतिकूल असे दोन्ही प्रकारचे लेख छापून जो विवेक दाखविला आहे, तो स्पृहणीय आहे.

विदर्भ म्हणजे पूर्व महाराष्ट्र. ती महाराष्ट्राची उगवती दिशा. उगवतीकडे दुर्लक्ष झाले तर मावळती लवकर येते, याचे भान आता सर्वानीच सांभाळायला हवे. लोकराज्यचा प्रस्तूत अंक असे आत्मभान जागृत करण्यास उपकारक ठरेल, असा मला विश्वास आहे.

**– डॉ. द.भि. कुलकर्णी,** पुणे

# साहित्य-संस्कृती-समृद्धी



'लोकराज्य'चा हा साहित्य संमेलन विशेषांक आपल्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे. १३४ वर्षांची दीर्घ परंपरा असलेला आणि ८५ अध्यक्षांच्या मार्गदर्शनाने साहित्य-विश्वाची समृद्धी वाढवणारा, चंद्रपूर येथे संपन्न होणारा हा साहित्य सोहळा, म्हणजे मराठी मनाची आणि साहित्याची श्रीमंती वाढविणारी एक महत्त्वपूर्ण घटना आहे.

भौतिक विकासाबरोबरच साहित्य, कला, संस्कृती, यांसारख्या क्षेत्रातही महाराष्ट्र अग्रेसर राहावा या दृष्टीने संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी दूरदर्शी नियोजन केले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारखे सुहृद सोबतीस घेऊन त्यांनी साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोष यांसारखे प्रकल्प निर्माण केले आणि त्यामागे शासनाचे पाठबळही उभे केले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाची ही जी पायाभरणी त्यांनी केली त्यावरच आपल्या साहित्य संस्कृतीचा आजचा हा समृद्ध प्रपंच उभा आहे.

जाती-पातीच्या, धर्म-पंथ व प्रांतांच्या कक्षा ओलांडून अवघ्या समाजघटकांना एकत्र आणण्याचे काम साहित्य करते. विश्वबंधुत्वाचा संदेश साऱ्या जगाला देणारे ज्ञानेश्वर असोत की आधुनिकांचा आधुनिकोत्तर ठरलेले संतश्रेष्ठ तुकाराम असोत, या साऱ्या दिग्गजांनी महाराष्ट्राचे नाव जगाच्या नकाशावर कायम तळपत ठेवले आहे.

आपल्याकडील राजकीय व्यवस्था आणि साहित्य-कला-संस्कृती यांमधील संबंध नेहेमीच परस्पर पूरक असल्याचे आढळून येते. आद्य मराठी काळातील 'सकल कलांचा विकास', मध्ययुगीन मराठीतील भक्ती संप्रदायाच्या मार्गाने झालेले लोकजागरण, आधुनिक मराठी काळातील-विद्रोहाच्या अंगाने बदलत्या काळाला स्पर्शू पाहणारे साहित्य आणि आधुनिकतेचा बाज लेऊन आपली कक्षा विश्वभर रुंदावणारी मराठी अस्मिता हा नेहमीच आपल्या अभिमानाचा विषय राहिला आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर यांनी साहित्य, संस्कृती आणि समृद्धी याचा मिलाफ पुढील शब्दांत व्यक्त केला आहे.

***तेथ यदुवंशविलासु । जो सकळकळानिवासु ।***
***न्याया ते पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्रु ॥***

साहित्य-कला-संस्कृतीच्या संवर्धनासाठी शासनातर्फे आजही अनेक आघाड्यांवर भरघोस स्वरूपाची कामगिरी केली जाते. वाङ्मय पुरस्कार, गौरववृत्त्या, ग्रंथव्यवहारासाठी दिले जाणारे प्रोत्साहन, नाट्य-चित्रपटांच्या विकासासाठी दिले जाणारे अनुदान, संमेलनांच्या आयोजनांसाठी केली जाणारी मदत अशा अनेक उपक्रमांचा उल्लेख करता येईल. शासनाने नुकतेच जाहीर केलेले सांस्कृतिक धोरण हे या पार्श्वभूमीवर एक बोलके उदाहरण ठरले आहे. स्वतंत्र मराठी भाषा-विभागाची स्थापना आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी केंद्राकडे केलेली मागणी हे राज्य शासनाच्या संपन्न अभिरूचीचे उदाहरण म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

'मराठी भाषा विभाग' आणि 'माहिती व जनसंपर्क विभाग' यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रभर नुकतेच ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. रसिकांचा त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला.

या आणि अशा प्रकारच्या उपक्रमांनी सारे वातावरण ढवळून निघत आहे. ठिकठिकाणी भरणारी संमेलने, चर्चासत्रे, कार्यशाळा आणि त्यांना होणारी गर्दी लक्षात घेता उत्तमोत्तम आणि दर्जेदार साहित्य लोकांना हवे आहे. बदलांसाठी, नव नवे प्रवाह जाणून घेण्यासाठी, प्रागतिक जगाबरोबर धावण्यासाठी लोक उत्सुक आहेत, हे स्पष्ट होते.... ही गरज पुरविण्यासाठी हा एक प्रयत्न आहे.


हा अंक म्हणजे एक छोटेखानी साहित्य संमेलनच झाले आहे. साहित्य हा विषय केंद्रस्थानी ठेवून त्याचा विविधांगी धांडोळा घेण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. विविध प्रकारचे मतप्रवाह या अंकात गुण्यागोविंदाने एकत्र नांदताना दिसतील, भिन्न अभिरूची असणाऱ्या रसिकांना आनंद देऊन जातील अशी खात्री आहे. कलेसाठी कला की जीवनासाठी कला, या सनातन वादापासून ते संमेलनाध्यक्षांची निवड, अशी संमेलने असावी की नसावी, सायबर विश्वातील आपले स्थान, भाषेचे प्रश्न अशा अनेक मुद्यांवरील विचारमंथन या अंकात पानोपानी आपल्याला आढळून येईल. ८५ व्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. वसंत आबाजी डहाके यांची मुलाखत हे या अंकाचे खास आकर्षण ठरले आहे. आजवरच्या संमेलनाध्यक्षांची यादी तसेच साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त मान्यवरांची यादी आम्ही त्यांच्या छायाचित्रांसह या निमित्ताने प्रसिद्ध केली आहे.

या साऱ्या प्रयत्नांमुळे आम्ही आणखी एक संग्राह्य आणि रसिकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील असा अंक आपल्यासमोर आणला आहे. मान्यवरांनी आपापल्या लेखात व्यक्त केलेली मते ही त्यांची स्वत:ची आहेत, हे येथे आम्ही स्पष्ट करत आहोत. अंक परिपूर्ण करण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न केला आहे. तरीही त्यात काही बाबी राहून गेल्याची खंत मनात आहे. उणिवांकडे दुर्लक्ष करून याही अंकाचे आपण भरघोस स्वागत कराल, असा विश्वास आहे. अंकासाठी लेखनसहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर लेखकांचे आम्ही आभारी आहोत.


**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dgiprpa@gmail.com

## शुभेच्छा!

# साहित्यातून व्हावे मूल्यांचे उद्गान...



**पृथ्वीराज चव्हाण**
मुख्यमंत्री

चंद्रपूर शहराच्या पंचशताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ८५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन चंद्रपुरात होत आहे, हे औचित्यपूर्ण आहे. साहित्य हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. साहित्य, कला, संगीत या विषयांपासून मनुष्य अलिप्त राहू शकत नाही. मराठी साहित्याचे दालन आणि प्रकाशन विश्व अतिशय समृद्ध आहे. मराठीबरोबरच अनेक बोलीभाषांमधूनही मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती होत आहे आणि वेगवेगळे प्रवाह मराठी साहित्य अधिकाधिक समृद्ध करीत आहेत.

जे प्रगतिपथावर घेऊन जाते ते साहित्य... विकासाचा आधार ठरते ते साहित्य... जगायला शिकवते, आदर्शांचे मानदंड समोर ठेवते, जे मनाला आनंद देते ते साहित्य! अशा या साहित्याच्या क्षेत्रातील मान्यवरांची मोठी प्रभावळ आपल्याला लाभलेली आहे. अनेक लेखक, कवी, कादंबरीकार, नाटककार, समीक्षक यांनी आपल्याला मार्ग दाखवला असून, त्यावरून आज आपली वाटचाल सुरू आहे. या प्रवासात सत्य, माणुसकी, निष्ठा, प्रेम, स्वातंत्र्य, बंधुभाव यांसारख्या मूलभूत मूल्यांचे उद्‌गान कलेच्या आविष्कारातून होतंय की नाही आणि या प्रक्रियेत आपले काही योगदान आहे की नाही हे साहित्यिकांनी पाहिले पाहिजे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे तर मराठी साहित्यसृष्टीचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. चंद्रपूर नगरीत होणाऱ्या ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

# सांस्कृतिक वैभव



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

'लोकराज्य'ने प्रसिद्ध केलेल्या 'चित्रशिल्प' आणि 'विदर्भ विशेषांका'ला वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर आता 'लोकराज'चा 'साहित्य संमेलन विशेषांक' प्रसिद्ध होत असल्याचे समजून आनंद झाला.

देशातील सर्वात प्रगतीशील आणि पुरोगामी राज्य म्हणून आज महाराष्ट्राचा लौकिक आहे. साहित्य, कला, क्रीडा, कृषी, शिक्षण, उद्योग, संशोधन अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्रानं नेत्रदीपक प्रगती केली आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी अनुकूल आणि पोषक वातावरण निर्माण करण्याचं महत्त्वाचं कार्य मराठी साहित्यानं केलं आहे. मराठी माणसाच्या मनात पुरोगामी विचारांचं बीज रुजविण्यापासून सातासमुद्रापार यशाची उत्तुंग भरारी घेण्याचं बळ मराठी साहित्यानं दिलं आहे. महाराष्ट्राचं सांस्कृतिक वैभव समृद्ध करण्यात मराठी साहित्य आणि साहित्यिकांची भूमिका सर्वांत महत्त्वाची आहे, असं माझं स्पष्ट मत आहे.

मराठी साहित्याच्या गेल्या अनेक वर्षांच्या वाटचालीत साहित्य संमेलनांचं एक आगळंवेगळं महत्त्व आणि स्थान आहे. 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' किंवा 'विश्व साहित्य संमेलनां'नी समग्र मराठी साहित्यिक आणि साहित्यप्रेमींना एका व्यासपीठावर आणण्यात यश मिळवलं आहे. साहित्य चळवळीला नवी दिशा आणि गती देण्याचं काम या संमेलनांनी केलं आहे. साहित्य संमेलनं म्हणजे आज एक स्वतंत्र चळवळ बनली आहे. या चळवळीचा इतिहास उद्‌बोधक आणि रंजक आहे. मराठी साहित्याची ही चळवळ 'लोकराज्य'च्या 'साहित्य संमेलन विशेषांका'च्या माध्यमातून सर्वांसमोर प्रभावीपणे येईल तसंच नवीन पिढीच्या मनात मराठी साहित्याबद्दल प्रेम, आस्था आणि आपुलकी निर्माण करण्यात हा विशेषांक महत्त्वाची भूमिका बजावेल, असा मला विश्वास आहे.

'लोकराज्य'च्या 'साहित्य संमेलन विशेषांका'साठी माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

# संमेलनाचे वर्ष, ठिकाण आणि अध्यक्ष


| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८७८ | पुणे | न्या. महादेव गोविंद रानडे | ४४ | १९६२ | सातारा | नरहर विष्णू गाडगीळ |
| २ | १८८५ | पुणे | कृष्णशास्त्री राजवाडे | ४५ | १९६४ | मडगाव | वि. वा. शिरवाडकर |
| ३ | १९०५ | सातारा | रघुनाथ पांडुरंग करंदीकर | ४६ | १९६५ | सातारा | वामन लक्ष्मण कुलकर्णी |
| ४ | १९०६ | पुणे | वासुदेव गोविंद कानिटकर | ४७ | १९६७ | भोपाळ | विष्णू भिकाजी कोलते |
| ५ | १९०७ | पुणे | विष्णू मोरेश्वर महाजनी | ४८ | १९६९ | वर्धा | पु. शि. रेगे |
| ६ | १९०८ | पुणे | चिंतामण विनायक वैद्य | ४९ | १९७३ | यवतमाळ | गजानन दिगंबर माडगूळकर |
| ७ | १९०९ | बडोदे | कान्होबा रामछोडदास कीर्तिकर | ५० | १९७४ | इचलकरंजी | पु. ल. देशपांडे |
| ८ | १९१२ | अकोला | हरी नारायण आपटे | ५१ | १९७५ | कराड | दुर्गा भागवत |
| ९ | १९१५ | मुंबई | गंगाधर पटवर्धन | ५२ | १९७७ | पुणे | पु. भा. भावे |
| १० | १९१७ | इंदूर | गणेश जनार्दन आगाशे | ५३ | १९७९ | चंद्रपूर | वामन कृष्ण चोरघडे |
| ११ | १९२१ | बडोदे | नरसिंह चिंतामण केळकर | ५४ | १९८० | बार्शी | गं. बा. सरदार |
| १२ | १९२६ | मुंबई | माधव विनायक किबे | ५५ | १९८१ फेब्रु. | अकोला | गो. नी. दांडेकर |
| १३ | १९२७ | पुणे | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर | ५६ | १९८१ डिसें. | रायपूर | गंगाधर गाडगीळ |
| १४ | १९२८ | ग्वाल्हेर | माधव श्रीहरी अणे | ५७ | १९८३ | अंबेजोगाई | व्यंकटेश दिगंबर माडगूळकर |
| १५ | १९२९ | बेळगाव | शिवराम महादेव परांजपे | ५८ | १९८४ | जळगाव | शंकर रामचंद्र खरात |
| १६ | १९३० | मडगाव | वामन मल्हार जोशी | ५९ | १९८५ | नांदेड | शंकर बाबाजी पाटील |
| १७ | १९३१ | हैदराबाद | श्रीधर वेंकटेश केतकर | ६० | १९८८ | मुंबई | विश्राम बेडेकर |
| १८ | १९३२ | कोल्हापूर | सयाजीराव गायकवाड | ६१ | १९८८ | ठाणे | वसंत कानेटकर |
| १९ | १९३३ | नागपूर | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर | ६२ | १९८९ | अमरावती | केशव जगन्नाथ पुरोहित |
| २० | १९३४ | बडोदे | नारायण गोविंद चापेकर | ६३ | १९९० जाने. | पुणे | यु. म. पठाण |
| २१ | १९३५ | इंदूर | भवानराव श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी | ६४ | १९९० डिसें. | रत्नागिरी | मधू मंगेश कर्णिक |
| २२ | १९३६ | जळगाव | माधव जुलियन | ६५ | १९९२ | कोल्हापूर | रमेश मंत्री |
| २३ | १९३८ | मुंबई | विनायक दामोदर सावरकर | ६६ | १९९३ | सातारा | विद्याधर गोखले |
| २४ | १९३९ | अहमदनगर | दत्तो वामन पोतदार | ६७ | १९९४ | पणजी | राम शेवाळकर |
| २५ | १९४० | रत्नागिरी | नारायण सीताराम फडके | ६८ | १९९५ | परभणी | नारायण सुर्वे |
| २६ | १९४१ | सोलापूर | विष्णू सखाराम खांडेकर | ६९ | १९९६ | आळंदी | शांता शेळके |
| २७ | १९४२ | नाशिक | प्रल्हाद केशव अत्रे | ७० | १९९७ | अहमदनगर | ना. स. इनामदार |
| २८ | १९४३ | सांगली | श्रीपाद महादेव माटे | ७१ | १९९८ | परळी-वैजनाथ | द. मा. मिरासदार |
| २९ | १९४४ | धुळे | भार्गवराम विठ्ठल वरेरकर | ७२ | १९९९ | मुंबई | वसंत बापट |
| ३० | १९४६ | बेळगाव | गजानन त्र्यंबक माडखोलकर | ७३ | २००० | बेळगाव | य. दि. फडके |
| ३१ | १९४७ | हैदराबाद | नरहर रघुनाथ फाटक | ७४ | २००१ | इंदूर | विजया राजाध्यक्ष |
| ३२ | १९४९ | पुणे | शंकर दत्तात्रय जावडेकर | ७५ | २००२ | पुणे | राजेन्द्र बनहट्टी |
| ३३ | १९५० | मुंबई | यशवंत दिनकर पेंढारकर | ७६ | २००३ | कराड | सुभाष भेंडे |
| ३४ | १९५१ | कारवार | अनंत काकबा प्रियोळकर | ७७ | २००४ | औरंगाबाद | रा. ग. जाधव |
| ३५ | १९५२ | अमळनेर | कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी | ७८ | २००५ | नाशिक | केशव मेश्राम |
| ३६ | १९५३ | अमदाबाद | विठ्ठल दत्तात्रय घाटे | ७९ | २००६ | सोलापूर | मारुती चितमपल्ली |
| ३७ | १९५४ | दिल्ली | लक्ष्मणशास्त्री बाळाजी जोशी | ८० | २००७ | नागपूर | अरुण साधू |
| ३८ | १९५५ | पंढरपूर | शंकर दामोदर पेंडसे | ८१ | २००८ | सांगली | म. द. हातकणंगलेकर |
| ३९ | १९५७ | औरंगाबाद | अनंत काणेकर | ८२ | २००९ | महाबळेश्वर | आनंद यादव |
| ४० | १९५८ | मालवण | अनिल | ८३ | २०१० | पुणे | द. भि. कुलकर्णी |
| ४१ | १९५९ | मिरज | श्रीकृष्ण केशव क्षीरसागर | ८४ | २०१० डिसें. | ठाणे | उत्तम कांबळे |
| ४२ | १९६० | ठाणे | रामचंद्र श्रीपाद जोग | ८५ | २०१२ | चंद्रपूर | वसंत आबाजी डहाके |
| ४३ | १९६१ | ग्वाल्हेर | कुसुमावती देशपांडे | | | | |

# संमेलनाध्यक्ष...



न्या.महादेव गोविंद रानडे
१८७८, पुणे


कृष्णशास्त्री राजवाडे
१८८५, पुणे


रघुनाथ पांडुरंग करंदीकर
१९०५, सातारा


गोविंद वासुदेव कानिटकर
१९०६, पुणे


विष्णू मोरेश्वर महाजनी
१९०७, पुणे


चिंतामण विनायक वैद्य
१९०८, पुणे


कान्होबा रामछोडदास कीर्तिकर
१९०९, बडोदे


हरी नारायण आपटे
१९१२, अकोला


गंगाधर पटवर्धन
१९१५, मुंबई


गणेश जनार्दन आगाशे
१९१७, इंदूर


नरसिंह चिंतामण केळकर
१९२१, बडोदे



माधव विनायक किबे
१९२६, मुंबई


श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
१९२७, पुणे


माधव श्रीहरी अणे
१९२८, ग्वाल्हेर


शिवराम महादेव परांजपे
१९२९, बेळगाव


वामन मल्हार जोशी
१९३०, मडगाव


श्रीधर वेंकटेश केतकर
१९३१, हैदराबाद


सयाजीराव गायकवाड
१९३२, कोल्हापूर


कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
१९३३, नागपूर


नारायण गोविंद चापेकर
१९३४, बडोदे



भवानराव श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी
१९३५, इंदूर




माधव जुलियन
१९३६, जळगाव




विनायक दामोदर सावरकर
१९३८, मुंबई



दत्तो वामन पोतदार
१९३९, अहमदनगर



नारायण सीताराम फडके
१९४०, रत्नागिरी



विष्णू सखाराम खांडेकर
१९४१, सोलापूर




प्रल्हाद केशव अत्रे
१९४२, नाशिक




श्रीपाद महादेव माटे
१९४३, सांगली




भार्गवराम विठ्ठल वरेरकर
१९४४, धुळे



गजानन त्र्यंबक माडखोलकर
१९४६, बेळगाव




नरहर रघुनाथ फाटक
१९४७, हैदराबाद




शंकर दत्तात्रय जावडेकर
१९४९, पुणे



यशवंत दिनकर पेंढारकर
१९५०, मुंबई



अनंत काकबा प्रियोळकर
१९५१, कारवार



कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी
१९५२, अमळनेर



विठ्ठल दत्तात्रय घाटे
१९५३, अमदाबाद




लक्ष्मणशास्त्री जोशी
१९५४, दिल्ली




शंकर दामोदर पेंडसे
१९५५, पंढरपूर



अनंत काणेकर
१९५७, औरंगाबाद



आ. रा. देशपांडे
१९५८, मालवण



श्रीकृष्ण केशव क्षीरसागर
१९५९, मिरज


रामचंद्र श्रीपाद जोग
१९६०, ठाणे


कुसुमावती देशपांडे
१९६१, ग्वाल्हेर



नरहर विष्णू गाडगीळ
१९६२, सातारा


वि. वा. शिरवाडकर
१९६४, मडगाव


वामन लक्ष्मण कुलकर्णी
१९६५, सातारा


विष्णू भिकाजी कोलते
१९६७, भोपाळ


पु. शि. रेगे
१९६९, वर्धा



गजानन दिगंबर माडगूळकर
१९७३, यवतमाळ



पु. ल. देशपांडे
१९७४, इचलकरंजी


दुर्गा भागवत
१९७५, कराड


पु. भा. भावे
१९७७, पुणे


वामन कृष्ण चोरघडे
१९७९, चंद्रपूर


गं. बा. सरदार
१९८०, बार्शी



गो. नी. दांडेकर
१९८१ फेब्रुवारी, अकोला


गंगाधर गाडगीळ
१९८१ डिसेंबर, रायपूर


व्यंकटेश दिगंबर माडगूळकर
१९८३, अंबेजोगाई



शंकर रामचंद्र खरात
१९८४, जळगाव


शंकर बाबाजी पाटील
१९८५, नांदेड


विश्राम बेडेकर
१९८८, मुंबई



वसंत कानेटकर
१९८८, ठाणे



केशव जगन्नाथ पुरोहित
१९८९, अमरावती




यु. म. पठाण
१९९०,(जाने.) पुणे



मधू मंगेश कर्णिक
१९९०, रत्नागिरी



रमेश मंत्री
१९९२, कोल्हापूर



विद्याधर गोखले
१९९३, सातारा




राम शेवाळकर
१९९४, पणजी




नारायण सुर्वे
१९९५, परभणी




शांता शेळके
१९९६, आळंदी



नागनाथ इनामदार
१९९७, अहमदनगर



द. मा. मिरासदार
१९९८, परळी-वैजनाथ



वसंत बापट
१९९९, मुंबई




य. दि. फडके
२०००, बेळगाव



विजया राजाध्यक्ष
२००१, इंदूर



राजेन्द्र बनहट्टी
२००२, पुणे




सुभाष भेंडे
२००३, कराड




रा. ग. जाधव
२००४, औरंगाबाद



केशव मेश्राम
२००५, नाशिक




मारुती चितमपल्ली
२००६, सोलापूर



अरुण साधू
२००७, नागपूर



मधुकर दत्तात्रेय हातकणंगलेकर
२००८, सांगली



आनंद यादव
२००९, महाबळेश्वर



द. भि. कुलकर्णी
२०१०, पुणे



उत्तम कांबळे
२०११, ठाणे



वसंत आबाजी डहाके
२०१२, चंद्रपूर


# मराठी ग्रंथकारसभेस पत्र

(मराठी ग्रंथकारसभेस न्या. म. गो. रानडे यांच्यामार्फत म. फुल्यांनी पाठविलेले पत्र)



वि. वि. आपलें ता. १३ माहे मजकूरचें कृपापत्रासोबतचें विनंतिपत्र पावलें. त्यावरून मोठा परमानंद झाला. परंतु माझ्या घालमोठ्या दादा, ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यांस ते हक्क त्यांच्यानें त्यांच्यानें खुषीनें व उघडपणें देववत नाहींत, व चालू वर्तनावरून अनुमान केलें असतां पुढेंही देववणार नाहींत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकांतील भावार्थाशीं आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही. कारण त्यांच्या पूर्वजांनीं आम्हांवर सूड उगविण्याच्या इराद्यानें, आम्हांस दास केल्याचें प्रकर्ण त्यांनी आपल्या बनावट धर्मपुस्तकांत कृत्रिमानें दडपलें. याविषयीं त्यांच्यांतील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहेत. त्यावरून आम्हां शूद्रादि अतिशूद्रांस काय काय विपत्ति व त्रास सोसावे लागतात, हें त्यांच्यांतील उंटावरून शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारांस व मोठमोठ्या सभास्थानीं आगांतूक भाषण करणारांस कोठून कळणार? हें सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकांस जरी पक्कें माहीत होतें, तरी त्यांनी फक्त त्यांच्या व आपल्या मुलाबाळांच्या क्षणिक हिताकरितां डोळ्यांवर कातडें ओढून त्याला इंग्रज सरकारांतून पेनशन मिळतांच तो पुन: अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोंवळा बनून आपल्या शूद्रादि अतिशूद्रांस नीच मानूं लागला, व आपल्या पेनशनदात्या सरकारनें बनविलेल्या कागदाच्या नोटीसुद्धां सोवळ्यानें बोट लावण्याच विटाळ मानूं लागला! अशीच कां शेवटीं ते सर्व आर्य ब्राह्मण या हातभाग्य देशाची उन्नति करणार! असो, आतां यापुढें आम्ही शूद्र लोक, आम्हांस फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुलणार नाहींत. सारांश, त्यांच्यांत मिसळल्यानें आम्हा शूद्रादि अतिशूद्रांचा कांहीं एक फायदा होणं नाहीं, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे. अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणें असेल, तर त्यांनी एकंदर सर्व मानवी प्राण्यांत परस्पर अक्षय बंधूप्रीति काय केल्यानें वाढेल, वाढेल, त्याचें बीज शोधून काढावें व तें पुस्तकद्वारें प्रसिद्ध करावें. अशा वेळीं डोळे झांकणें उपयोगाचें नाहीं. या उपर त्या सर्वांची मर्जी. हें माझें अभिप्रायादाखल छोटेखानी पत्र त्या मंडळीच्या विचाराकरितां तिजकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. साधे होके बुद्धेका येह पहिला सलाम लेव.

आपला दोस्त,
**जोतिराव गो. फुले**
(ज्ञानोदय, दि. ११ जून १८८५)



# ढोबळ आकलनाचे थिटे विश्व...

चंद्रपूर येथे होणाऱ्या ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी मराठी साहित्याच्या विविध प्रांतात स्वैर मुशाफिरी करणारे ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांची निवड झाली आहे. एक सहित्यिक म्हणून मराठी साहित्य व्यवहाराशी त्यांचा निकटचा संबंध आहे. साहित्य संमेलनाकडे ते कोणत्या दृष्टिकोनातून पाहतात, याविषयी त्यांच्याशी कवी मंगेश नारायणराव काळे आणि हेमंत दिवटे यांनी केलेली विशेष बातचित.

**काळे** : ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडीबद्दल सर, अगोदर आपलं अभिनंदन. त्या निवडीबद्दल आपली प्रतिक्रिया काय आहे?

**डहाके** : आनंद झाला. या साहित्य संमलेनांना सांस्कृतिक महत्त्व आहे. आतापर्यंत अनेक थोर साहित्यिक संमेलनाचे अध्यक्ष झालेले आहेत, तर अशा प्रकारच्या पदाविषयी आदर आहे आणि आकर्षणही आहे. फार त्रास न होता ते मिळाले याचा आनंद आहे.

**दिवटे** : तुम्ही त्रास न होता म्हणालात. अगोदरचा अनुभव मात्र त्रासदायकच होता.

**डहाके** : मतदारांना भेटायला जावे अशी अपेक्षा असते, परंतु आपला मतदारसंघ एकसंध नसतो. मतदार ठिकठिकाणी विखुरलेले असतात. महाराष्ट्रातच पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा हे प्रदेश किंवा बाहेरही इतर राज्यात... महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्र हा आपला मतदारसंघ आहे. अर्थात, लोकांना भेटण्यात आनंद असतो. प्रवासाचा थोडाफार त्रास होतो. अगोदरच्या पराभवाविषयी तर त्याचा काही त्रास झाला नाही. शेवटी ती एक निवडणूक प्रक्रिया आहे.

**दिवटे** : अखिल भारतीय साहित्य संमेलन मुख्यतः दुय्यम दर्जाच्या कवी-लेखकांचे व्यासपीठ म्हणूनच ओळखले जातेय. त्याला अति उत्साहाचे स्वरूप आलेय आणि हे असेच चालू राहणार असेल तर या संमेलनाला 'वार्षिक जत्रा' म्हणून चांगला कवी-लेखक-वाचकही येण्याचे थांबवेल असे मला वाटतेय. शिवाय लेखक, कवी हे आता लोकांचे 'हीरो' नाहीयेत. तुम्हाला काय वाटते? या साच्यात काय बदल केले जावेत?

**डहाके** : या संमेलनाचे असे स्वरूप झालेले आहे, हे खरे आहे. वेगवेगळ्या भागांत वास्तव्य करणाऱ्या लेखक-कवींना प्रतिनिधित्व मिळावे हा यामागे हेतू असावा. संमेलनामध्ये सहभागी होणे या कवी-लेखकांना अतिशय महत्त्वाचे वाटते आणि प्रथम दर्जाच्या कवी-लेखकांना या व्यासपीठाची फारशी गरज वाटत नसावी. अति उत्साहाचे, जत्रेचे स्वरूप दिसतेय. एक प्रकारे हा 'साहित्याचा उत्सव' म्हणून लोक साजरे करतात हे आपण पाहतो. कवी-लेखकांनी गंभीर साहित्य संमेलनासारख्या व्यापक स्वरूपाच्या सांस्कृतिक घटनेत सहभागी व्हायला पाहिजे. आता यात त्यांना निमंत्रित केले जाते की नाही, की ते निमंत्रण देऊनही उपस्थित राहत नाहीत, याची मला कल्पना नाही. मी स्वतः मात्र काही संमेलनात सहभागी झालो आहे. अन्य काही कारणांमुळे जेव्हा शक्य झाले नाही तेव्हा गेलो नाही; मात्र, काही कवी-लेखकांना या स्वरूपामुळे जावे वाटू नये हे योग्य वाटत नाही. कारण, आपण गेलो तर ते स्वरूप सुधारू शकेल आणि कवी-लेखक लोकांचे 'हीरो' झाले आहेत असे मला काही दिसत नाही. काही कवींना खूप लोक ओळखतात. उदा. नारायण सुर्वे. तर असे अपवाद असतात. साचा बदलण्याबद्दल तर संमेलनाचे कार्यक्रम, त्याचे स्वरूप, विषय ठरविण्यापासूनच गंभीर विचार केला पाहिजे. मराठीत ज्यांनी उत्तम प्रकारे लेखन केले आहे अशा कवी-लेखकांना, समीक्षकांना आवर्जून बोलावले पाहिजे. तरच हा साचा बदलू शकेल.

**दिवटे** : या संमेलनाच्या निवडणूक प्रक्रियेतही उणिवा दिसतात, त्यामुळे या फॉर्मेटमुळे कुणीही उभा राहतो.



बऱ्याचदा दुय्यम दर्जाचे कवी-लेखक निवडून येतात. १२ कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रात हजार-दोन हजार जणांनाही त्यांचे कार्य माहीत नसते तर कधी सवंग, लोकप्रिय कवी-लेखक एखाद्या गंभीर लेखकापेक्षा आपल्या लोकप्रियतेमुळे निवडून येतो. त्यामुळे ही निवडणूक पद्धत रद्द करून 'नवा फॉर्मेट' असावा, असे तुम्हाला वाटते का?

**डहाके** : असा प्रयत्न करून पाहता येईल. महामंडळाच्या घटनेत दुरुस्ती करून साहित्य संस्थांचे सभासद आणि सभासद नसलेले पण साहित्याशी ज्यांचा जवळचा संबंध आहे, असे मतदार झाल्यास अपेक्षित स्थिती निर्माण होऊ शकेल. अर्थात, मतदार कोणी ठरवायचा यावर मतभिन्नता होऊ शकेल. आतापर्यंत विविध अध्यक्षांनी आणि इतर लेखकांनी प्रचलित बदल व्हावा हे सुचवलेले आहे, परंतु योग्य तो मार्ग अजून सापडलेला नाही.

**काळे** : हे सगळे वास्तव आपण स्वीकारले तरी महत्त्वाचा प्रश्न तसाच राहतो. या संमेलनांनी मराठी साहित्याला काय दिले? मला तरी अशा संमेलनांच्या सर्जकतेसाठी काही उपयोग होतो, असे वाटत नाही. एक पुस्तकांची खरेदी-विक्री सोडली तर...

**डहाके** : मला साहित्य संमेलनाचे योगदान मोठे वाटते. आतापर्यंत झालेल्या संमेलनातून प्रत्येक वेळी कोणती न् कोणती साहित्यविषयक भूमिका समोर आलेली आहे. साहित्य व्यवहाराला चालना मिळाली आहे. ग्रंथ प्रदर्शनांमुळे ग्रंथ प्रसार झालेला आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे साहित्य संमेलनाला लोकांचा मिळणारा प्रतिसाद मोठा असतो. अजून तरी संमेलनासाठी गर्दी जमवावी लागत नाही. मराठी साहित्य व्यवहारात साहित्य संमेलनामुळे एक चैतन्याचे वातावरण तयार होते.

**काळे** : पण मला वाटते हे वरवरचे आहे. प्रत्यक्षात ज्याला आपण गंभीर साहित्य व्यवहार म्हणतो तो घडत नाही. तुम्ही ग्रंथ प्रसाराबद्दल म्हणालात तर विकली जाणारी पुस्तके कोणती असतात? यात गंभीर साहित्याचा खप किती? याचाही विचार करावा लागेल.

**डहाके** : हे खरेच आहे. मात्र, येणाऱ्या वाचकांमध्ये चांगले साहित्य घेणारेही वाचक असतातच आणि अशा वाचकांची संख्या नेहमीच कमी असते. एरव्ही ही पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचतही नसतात. ती संमेलनाच्या निमित्ताने त्यांच्यापर्यंत पोहोचतात. उदयोन्मुख कवी-लेखक संमेलनाच्या वातावरणातून घडण्यासाठी निश्चित मदत होते, असे मला वाटते. विशेषतः जेव्हा ही संमेलने महानगरापासून दूर छोट्या शहरांमध्ये होतात, तेव्हा त्याचा अशा नव्या कवी-लेखकांना अतिशय फायदा होतो. त्यामुळे संमेलनाला आलेले जत्रेचे, उत्सवाचे स्वरूप स्वीकारूनही काही तरी विधायक घडत असते हे आपण मान्य केले पाहिजे.

**काळे** : हे खरंय. पण, त्यासाठी संमेलनेच कशासाठी. दिल्ली, जयपूर, कलकत्ता येथे दरवर्षी होणाऱ्या बुक फेअरसारखा उपक्रम राबवूनही हे साध्य होऊ शकेल. दरवर्षीचा कोटींचा खर्च टाळून त्याचा विधायक उपयोग करता येईल.

**दिवटे** : सर, मीही बुक फेअर पाहिलीयेत. परदेशातही अशी 'बुक फेअर' होतात. मी दोन वर्षांपूर्वी फ्रॅन्कफर्ट (जर्मनी) येथील बुक फेअरला गेलोय. लेखक-वाचक-प्रकाशकांचा हा मेळा साहित्य व्यवहारासाठीच नाही, तर अनेक नव्या गोष्टी तिथे नव्या कवी-लेखकांना-वाचकांना मिळतात. लेखकांशी थेट संवाद साधता येतो.

**डहाके** : बुक फेअर ही कल्पना अतिशय चांगली आहे. तिथे केवळ पुस्तकांची खरेदी-विक्री होते असे नाही, तर वाङ्मयीन चर्चा, महत्त्वाच्या मुद्द्यांवर परिसंवाद होतात. लेखक-वाचकांच्या भेटीला येतात. पुस्तकांवर स्वाक्षरी द्यायला लेखक येतात. काही दिवसांपूर्वीच घाना या अफ्रिकन देशातल्या आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळ्यात मी सहभागी झालो होतो. तिथे आफ्रिकन लेखकांना भेटता आले. भारतीय लेखकांना तिथले वाचक भेटले इतकेच नव्हे, तर घाना देशाबाहेरील आफ्रिकन लेखकही तिथे मुद्दामहून आले होते. ही चांगलीच घटना होती, परंतु साहित्य संमेलन हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. भारतातल्या कोणत्याही भाषेत अशी संमेलने होत नाहीत. अखिल भारतीय स्तरावर संमेलन होऊनही आपल्या वाचकांना प्रादेशिक स्तरावर, जिल्हा पातळीवर साहित्य संमेलन व्हावीत असे वाटते. बुक फेअरमध्ये पुस्तक हे केंद्र असते तर या संमेलनात लेखक हा केंद्रस्थानी असतो. हा एक महत्त्वाचा फरक आहे. शिवाय आपण सगळे उत्सवप्रिय आहोतच...

**काळे** : तुम्ही आता या संमेलनाचे अध्यक्ष आहात. त्या अगोदर एक तीव्र सामाजिक भान असणारे कवी-अभ्यासक म्हणून आम्हाला परिचित आहात. तेव्हा या संमेलनासाठी होणारा कोट्यवधींचा खर्च. शासनाकडून किंवा इतर घटक संस्थांकडून केली जाणारी आर्थिक मदत त्यातून कुठेतरी येणारे वाद-विवाद या सगळ्याकडे तुम्ही कसे पाहता?

**डहाके** : नागरिकांनी एकत्रित येऊन संघटित रीतीने केलेली एक सांस्कृतिक घटना म्हणून मी साहित्य संमेलनाकडे पाहतो. अशा सांस्कृतिक घटनेसाठी शासनाने अर्थसाहाय्य केले तर त्यात काही गैर आहे असे मला काही वाटत नाही. राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींकडे साहित्य संमेलनाच्या संदर्भात रसिक-वाचक नागरिक म्हणूनच पाहावे असे मला वाटते. जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या नागरिकांना संमेलनात सहभागी व्हावे आणि राजकारणातल्या लोकांनी बाजूला राहावे असे मला वाटत नाही. राजकारणासारख्या धकाधकीच्या क्षेत्रात काम करत असूनही मराठी साहित्याचे चांगले वाचन करणारे राजकारणी मी पाहिलेले आहेत.

**काळे** : ते ठीकच आहे, पण बऱ्याचदा हा सहभाग हस्तक्षेपाचा भाग बनतो. आता उदाहरण म्हणून याच संमेलनाचे आयोजक जे एक राजकीय नेते आहेत त्यांनी आम्ही संमेलन घेतोय... अध्यक्षही आम्हीच ठरवू, अशी जी काय भूमिका घेतली होती. म्हणजे समोर येणाऱ्या बातम्यांमधून तरी असेच चित्र दिसत होते. हा हस्तक्षेप अयोग्यच म्हणायला लागेल. उद्या एखादा धनिक किंवा धनाढ्य संस्थाचालक किंवा राजकीय नेते त्यांना हवा असलेला कुणीही दुय्यम-तिय्यम लेखक आपल्या डोक्यावर बसवेल, म्हणेल याला अध्यक्ष करा. कार्यक्रमात यांनाच बोलवा... यात मराठी साहित्य... कवी-लेखक कुठे असेल?

**डहाके** : वर्तमानपत्रातल्या सगळ्याच बातम्यांवर किती विश्वास ठेवायचा हा प्रश्नच असतो. या संमेलनाच्या आयोजकांनी ते नाकारलेले आहे, परंतु असा प्रकार देखील घडू शकतो. याची आपल्याला माहिती आहे. स्वागत समितीने 'स्वागतशील' असले पाहिजे आणि लेखकांनी राजकीय आणि आर्थिक सत्तेच्या किती जवळ जावे, याचा निर्णय आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला विचारून घ्यावा; म्हणजे अन्य सत्तांना साहित्य क्षेत्रात हस्तक्षेप करता येणार नाही.

**दिवटे** : आपण शासकीय मदतीबद्दल बोलत होतो.



महाराष्ट्रात वेगवेगळ्या विचारधारेतून लहान-मोठी संमेलनं होतात. त्यांचाही उद्देश तोच असतो, मग त्यांनाही शासनाने मदत करायला हवी...

**डहाके :** काहीच हरकत नाही. इतकेच नाही तर सीमा भागांमध्ये कोणत्याही मदतीशिवाय होणाऱ्या संमेलनांनादेखील अशी मदत करायला हवी. शेवटी शासन म्हणजे आपणच.

**काळे :** शासन आणि समाज किंवा शासन आणि कला, साहित्य, संस्कृती यांचा संबंध जर दृढ असला तर त्या त्या काळात कला, साहित्य यांना उत्तेजन मिळतं. त्यांचा विकास होतो. म्हणजे इतिहासात सुद्धा हे पाहता येतं. माझं असं निरीक्षण आहे की इतर राज्याच्या तुलनेत मराठी साहित्य किंवा इतर ललित कलांच्या बाबतीत शासनाकडून तेवढे गांभीर्याने पाहिले जात नाही. आताची जी अनुदानं, पुरस्काराची पद्धत आहे ती ही बरीचशी एकारलेली किंवा गुंतागुंतीची आहे. त्यामुळे आहे ते साहाय्य, सुविधाही योग्य व्यक्ती, संस्थांपर्यंत पोहोचतात असं म्हणता येत नाही.

**डहाके :** कलाकारांना उत्तेजन मिळावे या हेतूने जे पुरस्कार किंवा अनुदान दिले जाते, ते त्या त्या कलाप्रकारांचा विकास होण्याच्या दृष्टीने काहीसे अपुरे आहे. त्या ऐवजी भारतभवनसारखी संस्था महाराष्ट्रात उभारली पाहिजे. विशेषतः महानगराऐवजी अशी संस्था चंद्रपूर, नागपूर, औरंगाबाद, नासिक यासारख्या ठिकाणी उभारली पाहिजे. म्हणजे त्या त्या भागातल्या कलावंतांना आपल्या कलेचा विकास करण्यासाठी ही व्यवस्था साहाय्यभूत ठरेल. हेच चित्रकलेच्या संदर्भात बोलता येईल. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ख्यातनाम असे चित्रकार महाराष्ट्राने दिलेले आहेत. परंतु, त्यांच्या चित्रांचे स्थायी संग्रहालय महाराष्ट्रात नाही. अशा प्रकारच्या संग्रहालयाने वेगवेगळ्या भागातल्या उदयोन्मुख आणि गुणी चित्रकारांना आपले काम दाखवण्यासाठी एक हक्काची जागा मिळू शकेल. कोणत्या एका शहरातच नव्हे, तर महाराष्ट्रातल्या चार-पाच शहरांत अशा साहित्य आणि इतर कलांना उत्तेजन देणाऱ्या संस्था उभारल्या पाहिजेत. शासनाने पुढाकार घेतला तर महाराष्ट्रातील नामवंत कलावंत, संस्था, उद्योजकसुद्धा या उपक्रमात सहभागी होऊ शकतील. एक उदाहरण सांगतो. सुधीर पटवर्धन या विख्यात चित्रकाराच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात अनेक ठिकाणी समकालीन चित्रकलेवर चित्रप्रदर्शने भरवली होती. चित्र साक्षरता वाढवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा होता. या प्रमाणेच अन्य कलांच्या संदर्भातही असे अनेक उपक्रम हाती घेता येतील आणि मला असेही वाटते की, साहित्य आणि इतर कलांना उत्तेजन देण्याच्या संदर्भात तांत्रिक अडवणूक न करता गुणवत्ता हा निकष ठेवावा.

**दिवटे :** तुमची ही सूचना खरंच महत्त्वाची आहे. भारतभवनमध्ये मागच्या वर्षी कविता वाचनासाठी गेलो होतो. तिथे एकाच वेळी साहित्य आणि इतर कलाविषयक उपक्रम सातत्याने होत असतात, त्यामुळे भारतभवनसारखी संस्था महाराष्ट्रात असणे खूप महत्त्वाचे आहे. नव्वदोत्तर कालखंडात साहित्य, चित्रकला, नाटक, चित्रपट अशा सगळ्याच स्तरावर खूप काही नवीन घडतेय, त्याला सध्याची स्पेस कमी पडतेय...

**डहाके :** निश्चितच नवे काही घडते आहे. साहित्यात ज्या प्रमाणे ज्यांच्या घरात कधीही लिहिणे, वाचणे नव्हते. अशा समाजातून, वर्गातून कितीतरी लोक लिहिते झाले. किंवा इतर कलांमध्येही नवीन लोक दिसताहेत. त्यांना हे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरतील.

**दिवटे :** संमेलनाध्यक्षाची कारकीर्द एक वर्षाची असते. या एका वर्षाच्या काळात तुमच्या काही योजना आहेत का?

**डहाके :** माझ्या व्यक्तिगत पातळीवर मी एवढे तर करू शकतो की, महाराष्ट्रात ठिकठिकाणी जाऊन लोकांना साहित्यसाक्षर, चित्रसाक्षर करू शकतो. म्हणजे साहित्य कसे वाचावे हे मी सांगू शकतो आणि हे काम मी अगोदरही करत आलोय. यापुढेही करत राहील.

**काळे :** साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवरच दोन-तीन वर्षांपूर्वी 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' हा विषय पुन्हा एकदा समोर आला होता. गेल्या दशकभरात साहित्य, चित्रकला, चित्रपट, नाटक अशा अनेक प्रवाहांत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा समोर आला. वैचारिक-सांस्कृतिक वारसा असणाऱ्या महाराष्ट्रात या घटना होतात. यात शासनाची भूमिका एकतर बघ्याची राहिली आहे. किंवा दबावाला बळी पडण्याची तरी. आपण आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य गमावून बसणार आहोत का?

**डहाके :** राजकीय किंवा सामाजिक संघटनांकडून जेव्हा कलावंतांची, विचारवंतांची, पत्रकारांची मुस्कटदाबी केली जाते. तेव्हा केवळ शासनानेच नव्हे तर साहित्य, कला क्षेत्रातील राजकीय, सामाजिक संघटनातील प्रतिनिधींनी एकत्र येऊन विचार केला पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य जपले पाहिजे. मूठभर लोकांनी एखादी गोष्ट आक्षेपार्ह ठरवून अघोषित बंदी आणावी, हे कुणीही स्वीकारता कामा नये. त्यासाठी विचारी लोकांनी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करावी. तरच हे झुंडशाहीचे प्रकार थांबतील. साहित्य आणि कलाविषयक या संदर्भात शासनाची काही भूमिका आहे का, हे नेमके उमगत नाही. त्या त्या कलावंतांनी त्या प्रसंगाचा सामना कसा करावा, हे ज्याने त्याने पाहून घ्यावे. असाच शासनाचा विचार आहे की काय असेही वाटते. अर्थात, मी शासनाला फार दोष देत नाही, याचे कारण असे की साहित्य क्षेत्रात एखादा प्रकार घडला तर त्याच्या विरोधात इतर कलाप्रकारातले लोक फारसे काही बोलल्याचे दिसत नाही. इतकेच काय जीवनाच्या इतर क्षेत्रात काम करणारे लोकही बोलत नाहीत, ही चिंतेची गोष्ट आहे. त्यामुळे मुस्कटदाबी करू पाहणाऱ्या संघटना शासनावर दबाव आणत आहेत, असेच दृश्य दिसते. समाजातल्या सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी संघटितपणे याचा विचार केला पाहिजे आणि 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' जपले पाहिजे.

**दिवटे :** 'अभिव्यक्ती स्वातंत्र्या'चा मुद्दा पूर्वीपासूनच येतोय. तो नवा नाही आणि आपली भूमिकाही फारशी बदललेली नाही, पण ज्या साहित्याबद्दल, भाषेबद्दल आपण बोलतोय ती भाषाच आज या कोलाहलात सापडलीय. जागतिकीकरणाच्या कालखंडात जग जवळ येत असताना जगभरातच भाषा मृत्यूचे प्रमाण वेगाने वाढतेय. या कोलाहलात मराठीचे स्थान काय असेल?

**डहाके :** मराठी भाषेची चिंता वसाहतकाळापासूनच केली जातेय. त्या काळात इंग्रजी भाषेचे जे स्थान होते तेच आज तिला पुन्हा प्राप्त झाले आहे. इंग्रजी भाषा आजच्या जगात अटळ असल्याचे दिसते, ते ती आजची 'ज्ञानभाषा' असल्यामुळे. तिचा स्वीकार करूनही मराठी भाषा टिकवणे शक्य आहे. त्यासाठी शासनाने आणि समाजाने



योग्य ती उपाययोजना केली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत असे दिसून येते की, आपणच आपल्या भाषेला दुय्यम स्थानावर ठेवतोय. मराठीला पर्याय म्हणून माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्सची निवड करण्याचा विकल्प स्वीकारतो. त्याऐवजी मराठी अनिवार्य ठेवून हे विषय आपण स्वीकारू शकतो. यासाठी शासनाने मराठी 'अनिवार्य' असलीच पाहिजे असे धोरण आखले पाहिजे आणि त्याची कडक अंमलबजावणी केली पाहिजे. आपल्याकडे मानव्यशाखा सोडली तर वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान या शाखांमध्ये मराठी साहित्य हा विषय नाही, आणि पुढे तर प्रश्नच नाही. त्यामुळे सर्वच विद्याशाखांमध्ये शिकणारे विद्यार्थी भाषेपासून आणि साहित्यापासून तोडले गेले आहेत. त्यामुळे सर्व विद्याशाखांमध्ये 'भाषा' आणि 'साहित्य' हे विषय अनिवार्य असण्याची गरज आहे. या संदर्भात कवी-लेखक, समीक्षक, अभ्यासकही महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. मराठीच्या अभ्यासकांसमोर मराठीची विविध रूपे आहेत. त्याचप्रमाणे बोली भाषेचीही आहेत. महाराष्ट्रातील विविध भागातील कवी-लेखकांनी त्या त्या प्रदेशातील बोलीभाषेचा उपयोग आपल्या लेखनातून जाणीवपूर्वक करायला हवा. संशोधक-अभ्यासकांनी त्या संदर्भात संशोधन आणि संवर्धन करायला हवे. कवी-लेखकांनी आपल्या भाषेची जुनी रूपे जाणीवपूर्वक वापरावी. त्यामुळे भाषेचा अव्याहत ओघ जाणवत राहील. माझे असे निरीक्षण आहे की, साठोत्तरी आणि नव्वदोत्तरी कालखंडातील काही कवी-लेखकांनी भाषेच्या अशा वेगवेगळ्या रूपांचा जाणीवपूर्वक वापर केलेला आहे. हे भाषा टिकवून ठेवण्यासाठी अत्यावश्यक आहे. सध्याच्या साहित्यात विशेषतः कवितेत इंग्रजी-हिंदी शब्दांचा वापर होताना दिसतो. काहींना हे आक्षेपार्ह वाटते, मात्र मला असे वाटते की, पूर्वीपासूनच मराठीचा अन्य भाषांशी संपर्क येत राहिला आहे आणि त्या भिन्न भाषांमधून अनेक शब्द मराठीने आपलेसे केले आहेत. इंग्रजी शब्दही आलेले आहेत किंवा इंग्रजी भाषेनेसुद्धा कित्येक भारतीय भाषेतील शब्द स्वीकारले आहेत. ही आदान-प्रदानाची क्रिया निरंतर सुरूच असते. यातून भाषा समृद्ध होते. त्यामुळे असे वेगवेगळे प्रयत्न होत राहिले तर मराठी भाषेची चिंता करण्याचे कारण राहणार नाही.

**काळे :** गेल्या काही वर्षांपासून भाषावाद, प्रांतवाद हे कळीचे प्रश्न झालेत. हा प्रश्न महाराष्ट्रापुरताच मर्यादित नाही. जगभरच या प्रकारचे प्रश्न ऐरणीवर आहेत. महाराष्ट्रात तर याचे मोठे राजकारण झालेय-होतेय. मात्र, मराठी कवी-लेखकांकडून याविषयी काही एक भूमिका घेतल्याचे किंवा याला विरोध केल्याचे दिसत नाही. तुमची याविषयी काय भूमिका आहे?

**डहाके :** हे खरेच आहे. मराठी साहित्यविश्वामध्ये या प्रकारचे विधान कुणी केले आहे असे माझ्या वाचनात नाही. मी सर्व भाषांविषयी आदर बाळगणारा आहे. उलट मला तर असे वाटते भाषांचे अभिसरण आपली भाषा, साहित्य, संस्कृती समृद्ध करणारे असते. त्यामुळे कोणत्याही एखाद्या भाषेला विरोध ही गोष्ट मला अतार्किक वाटते. वेगवेगळ्या भाषेतील साहित्यामुळे आपण समृद्धच होत असतो. भाषावादाप्रमाणे प्रांतवादाचा प्रश्नही आहे, पण हा संकुचित दृष्टिकोन आहे. आजच्या जगात भिन्न प्रदेशातले, देशातले लोक जगातल्या कुठल्याही भागात उदरनिर्वाहासाठी जात असतात, त्यामुळे प्रांतवाद जर आपण स्वीकारू लागलो तर जगात अनेक देशांत गेलेल्या लोकांना परत बोलवावे लागेल. त्यामुळे हा विचार कधीही योग्य नव्हता आणि नाही. स्थलांतर, देशांतर करण्याची प्रथा प्राचीन काळापासूनची आहे. ते अपरिहार्य आहे.

**काळे :** मराठीतल्या एका ज्येष्ठ लेखकाने परवा बडोद्यात मराठी भाषेच्या संदर्भात एकाच भाषेत राहण्याचा विचार मांडला आहे. या प्रकारचा संकुचित विचार मराठी भाषेसाठी, साहित्यासाठी अपायकारक ठरणार नाही का?

**डहाके :** जगातला कोणताही माणूस हा जन्मतः एक भाषक नसतो. कारण, वेगवेगळ्या भाषेत बोलणाऱ्या लोकांशी त्यांचा संपर्क येत राहतो. आपल्याकडे तर शालेय शिक्षणापासूनच 'त्री-भाषा' सूत्र आहे. त्यामुळे एक भाषक राहावे हा आग्रह मला चुकीचा वाटतो. मराठी भाषेतच सगळे व्यवहार केले पाहिजे हा दृष्टिकोन बरोबर आहे, पण त्यासाठी अन्य भाषेचा वाराही लागू नये हे काही मला पटत नाही. आपल्या भाषेत घट्ट उभे राहून अन्य भाषांचा स्वीकार आपण केला पाहिजे. व्यक्तीशः मला असे वाटते जितक्या भाषा मला येतील तितके त्या भाषांमधले साहित्य मला वाचता येईल. भारतीय माणसाला त्याच्या 'मातृभाषे'खेरीज एकतरी भारतीय भाषा अवगत असली पाहिजे. त्यातल्या त्यात हिंदीमुळे आपण भारतीय माणसांशी संपर्क करू शकतो. अलीकडे तर युरोपातसुद्धा असे दिसते की आपापल्या भाषेचा रास्त अभिमान बाळगत असताना इंग्रजी भाषेचा स्वीकार केलेला आहे. एका भाषेत कोंडून राहणे हे आपल्या भाषेच्या, संस्कृतीच्या आरोग्याच्या दृष्टीने देखील अपायकारक आहे. एक भाषक असणे हा जागतिकीकरणातला एक डावपेच आहे. तो आपण ओळखला पाहिजे.

**दिवटे :** या असल्या प्रकारांमुळेच मला वाटते मराठी कादंबरी किंवा कथा वाङ्मय जागतिक पातळीवर सोडाच भारतीय पातळीवरही टिकत नाही. आपल्या मर्यादा दिसून येतात.

**डहाके :** जागतिकीकरणामुळे वेगवेगळ्या भाषांमधले साहित्य इंग्रजीत भाषांतरीत होऊन आपल्यापर्यंत पोहोचले आहे. त्यातही लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, आहे ते इंग्रजी साहित्य म्हणून येत नाही. ते पोर्तुगीज, तुर्की, स्पॅनिश अशा विविध भाषेतले साहित्य म्हणूनच आपल्याकडे येत असते. मराठी वाचकांना-लेखकांना देशो-देशीचे हे वाङ्मय सहज उपलब्ध होणे ही अतिशय चांगली बाब आहे. म्हणजे जगातल्या अनेक विकसित-अविकसित भाषेतल्या साहित्यामुळे आपल्या अनुभवांची कक्षा रुंदावते, ही उपकारक गोष्ट आहे. त्यामुळे भाषा आणि साहित्य या बाबतीत आपण भिंती उभारणे योग्य नाही.

**दिवटे :** आमची पिढी जागतिकीकरणाच्या कालखंडात वाढलेली पिढी आहे. एक जनरेशन म्हणून आमच्यासमोरचे प्रश्न, बदललेली चिन्हसृष्टी, भाषासंकर, बदललेली सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व्यवस्था यामुळे साठोत्तरी कवितेपेक्षा, नव्वदोतर कविता नक्कीच वेगळी आहे. खरेतर, विश्ववाङ्मयाला आपण मराठी साहित्य म्हणून फक्त कविताच देऊ शकतो, एवढी मराठी कवितेची एक सशक्त परंपरा आपल्याला दिसून येते. तुम्हाला काय वाटते?

**डहाके :** माझे स्वतःचे मराठी कवितेविषयीचे मतही असेच आहे. मराठी साहित्यात कविता नेहमीच सकस राहिली आहे. अगदी साठोत्तरी कवितेच्या संदर्भातसुद्धा अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, वसंत दत्तात्रेय गुर्जर, नामदेव ढसाळ यांची कविता अन्य भारतीय भाषेतील त्यांच्या समकालीन

कवितेच्या तोडीची आहे. काही वेळा तर मला ती सरसही वाटली आहे. नव्वदोत्तर कविता वेगळी निश्चित आहे आणि थोडी पुढची देखील आहे. या काळाचे प्रश्न जे आमच्या काळात नव्हते त्याच्याशी हे कसे झुंज देतात आणि स्वतःची अभिव्यक्तीची वाट कशी काढतात, याबद्दल मला कुतूहल आहे.

**दिवटे :** या काळात वाईट कविता मोठ्या प्रमाणावर लिहिली जातेय आणि करमणूकप्रधान संस्कृतीकडून त्याचा स्वीकारही होताना दिसतो, अशा वेळी मराठी कवितेच्या भवितव्याविषयी आपण काय सांगाल?

**डहाके :** वाईट कविता नेहमीच लिहिली जात असते. त्यामुळे मराठी कवितेच्या भवितव्याची चिंता करण्याची गरज आहे, असे मला वाटत नाही.

**दिवटे :** साठोत्तर साहित्याचे महत्त्व उशिरा का होईना स्वीकारले गेले, विशेषतः साठोत्तर कवितेचे. यात आमच्या अनियतकालिकांचा रेटा कारणीभूत होता असे मला वाटते. आज मागे वळून पाहताना साठोत्तर साहित्याचे जसे काही एक महत्त्व आहे, तसे महत्त्व नव्वदोत्तरी साहित्याचे तुम्ही काय सांगू शकाल?

**डहाके :** नव्वदोत्तर साहित्य म्हटल्यावर मोठा असा पट आपल्या डोळ्यांसमोर येत नाही, याचे कारण कवितेखेरीज कथा, कादंबरी या साहित्यप्रकारात अपवादात्मकच निर्मिती झाली आहे, असे दिसते. मुख्यतः अनियतकालिकांनी कवितेलाच प्राधान्य दिले. कथा प्रकाशित होण्यासाठी आवश्यक ती दर्जेदार नियतकालिके नाहीत. त्यामुळे देखील चार-पाच कथाकारांच्या पुढे संख्या मोजता येत नाही. कादंबरीबाबतीत अजूनही साठोत्तरीचा प्रभाव आहे. त्यामुळे तिथेसुद्धा आपल्याला दोन-तीन नावे सोडली तर 'नव्वदोत्तरी कांदबरीकार' म्हणून डोळ्यांसमोर चित्र उभे राहत नाही. नाटक या साहित्य प्रकारात सुद्धा असेच दृश्य दिसते. कोलटकर, दिलीप चित्रे, नामदेव ढसाळ यांसारखे कवी स्वतःच स्थापित झाले होते. नव्वदोत्तर पिढीने आणि त्यांच्या अनियतकालिकांनी या कवितेचे पुनर्वाचन केले, त्यामुळे साठोत्तर कवितेच्या एकूणच कवितेकडे लक्ष वेधले गेले. साठोत्तर पिढी आणि नव्वदोत्तर पिढी यामध्ये एक रिक्त पोकळी होती. नव्वदोत्तर पिढीने, साठोत्तर पिढीशी अनुबंध जोडला. आपली परंपरा दाखवून दिली, शिवाय प्रत्येक काळाची स्वतंत्र कविता असते. त्या काळातले कवी आपली ओळख सिद्ध करीत असतात. त्याचबरोबर ते आधीच्या पिढीच्या पुढेही जात असतात. नव्वदोत्तर कवितेचे सुद्धा वाचन केले तर त्या कवितेने मराठी कविता समृद्धच केली आहे, असे आढळून येईल.

**काळे :** नव्वदोत्तर कालखंडात सर्वाधिक लिहिला जाणारा वाङ्मय प्रकार म्हणून 'कादंबरी' आणि 'कविता' या साहित्यप्रकाराकडे पाहता येईल. 'कादंबरी' हा प्रकार तर प्रकाशनदृष्ट्याही 'सेलबल' झालेला दिसतो. त्या तुलनेत 'कथा' हा निर्मितीच्या आणि प्रकाशनाच्या अंगानेही मागे पडलेला दिसतो. शेजारच्या हिंदीत मात्र आज 'कथा' केंद्रस्थानी असल्याचे चित्र आहे.

**डहाके :** एक म्हणजे 'कथा' हा साहित्यप्रकार दुय्यम मानला गेला. कथा छापणारी चांगली नियतकालिके बंद पडली. मुख्य म्हणजे मराठी कथेत अभिव्यक्तीच्या दृष्टीने आणि विषयाच्या दृष्टीने देखील फारसा बदल झालेला नाही. तिकडे हिंदीत उदय प्रकाशसारख्या कथाकाराने जो आवाका दाखवला आहे किंवा अन्य कथाकारांनी अभिव्यक्तीचे जे प्रयोग केलेले आहेत ते आपल्याकडे झाले नाहीत. कथा, कविता, एकांकिका या आकाराने लघू असलेल्या साहित्यप्रकारासाठी नियतकालिक असणे अत्यंत आवश्यक आहे, असे मला वाटते आणि इतिहासही तसाच आहे, परंतु ही गौण कारणे आहेत असे मी मानतो. कवितेच्या क्षेत्रात जसा बदललेला कालखंड दिसतो तसा तो कथेत अद्याप आला नाही. खरेतर, आपल्याकडे जे पाच-सहा कथाकार आहेत, त्यांच्याकडे ती क्षमता आहे.

**दिवटे :** वाङ्मयीन नियतकालिकांची भूमिका कोणत्याही साहित्य संस्कृतीत नेहमीच महत्त्वाची असते. आपल्याकडे साहित्य समीक्षा, कला समीक्षा यांना वाहिलेले किंवा सर्व कलांचा विचार करणारे एकही नियतकालिक नाही, याचाही काही एक परिणाम दिसतो का?

**डहाके :** सध्या तर 'पुरस्कार' हाच चांगल्या कलाकृतीचा निकष आहे की काय असे दृश्य दिसते. हे बरोबर नाही. विविध साहित्यकृतींचा सातत्याने परामर्श घेणारी नियतकालिके असली पाहिजेत. 'आलोचना'सारखे केवळ ग्रंथसमीक्षेला वाहिलेले नियतकालिक एकेकाळी होते. हे आज एखाद्या स्वप्नासारखे वाटते. समीक्षा छापणारी नियतकालिके नाहीत आणि वर्तमानपत्रांच्या रविवार पुरवण्यांत गांभीर्याने समीक्षा होत नाही. दुसरीकडे ग्रंथ प्रकाशनाचा वेग वाढला आहे. मराठीच्या प्राध्यापकांची संख्याही वाढली आहे, तरी देखील आपला समीक्षा व्यवहार अत्यंत क्षीण आहे. नव्या पिढीत तर हाताच्या बोटावर मोजण्याइतके देखील समीक्षक नाहीत. आधीच्या पिढीतले समीक्षक समकालीन साहित्यावर काही लिहीत नाहीत. 'अभिरुची', 'सत्यकथा', 'छंद' यांसारख्या नियतकालिकांतून अन्य कलांविषयी महत्त्वाचा मजकूर येत असे. अल्पकाळ चाललेल्या 'संदर्भ'सारख्या नियतकालिकाने देखील असा प्रयत्न केला होता. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. मराठीत आज 'कलाविषयक' नियतकालिकाची नितांत गरज आहे. कवी-लेखक, समीक्षक, मराठीचे प्राध्यापक हे सीमित वाङ्मयीन वातावरणात वावरताना दिसतात. त्यांना इतर कला प्रकारांमधील माहिती देखील नसते. 'साहित्य साक्षर' होणे जसे हे आपल्याला गरजेचे वाटते तसे इतर कलांच्या बाबतीतही साक्षर होणे गरजेचे असते, असे मला वाटते. या सगळ्यांचा आपल्या साहित्य अभिरुचीवर परिणाम होतो.

**दिवटे :** 'वाङ्मय अभिरुची' किंवा 'कला अभिरुची' यांचा विकास होण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करायला हवेत, असे आपल्याला वाटते.

**डहाके :** संस्कारक्षम वयापासूनच जर साहित्याचे इतर कलांचे संस्कार केले तर निश्चितच ही अभिरुची विकसित होऊ शकेल. शाळेतून, महाविद्यालयातून वाङ्मयीन किंवा कलाविषयक उपक्रम राबवता येऊ शकतील. शिक्षण संस्थाच्या प्रमुखांनी पुढाकार घेऊन वेगवेगळ्या कलाक्षेत्रातील लोकांचे सहकार्य घेतले पाहिजे. उत्कृष्ट चित्रपट असतील किंवा शिल्पकार, चित्रकार, लेखकांवरील माहितीपट असतील, अभ्यास सहली दरम्यान चित्रप्रदर्शन, ग्रंथालये यांना भेट देणे, विविध क्षेत्रातील कलावंतांचा मुलांशी संवाद घडवून आणणे असे अनेक उपक्रम या संदर्भात राबवता येऊ शकतील. पाठ्यपुस्तके या संदर्भात महत्त्वाचा घटक ठरू



शकतो.

**काळे :** मी पाठ्यपुस्तकाबद्दल आता विचारणार होतो. गेली काही वर्षे तुम्ही अभ्यास मंडळाचे निमंत्रक म्हणून कार्य करीत आहात. तुमच्या देखरेखीखाली पाठ्यपुस्तकांची निर्मिती होत असते, या सगळ्यांमागे वाङ्‌मयीन कलाविषयक अभिरुची घडवण्याच्या दृष्टीने काही विशेष प्रयत्न केला जातो का? मी हे यासाठी विचारतोय की आपल्या अभ्यासक्रमाचा एकूण दर्जा मला असमाधानकारक वाटतो.

**डहाके :** आम्हाला मुंबई महानगरापासून बेलोरो गावठाणपर्यंतच्या विद्यार्थ्यांना डोळ्यांसमोर ठेवावे लागते. हा एकंदर पट ध्यानात घेऊन साहित्य, इतर कला या विषयीचा मजकूर देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. मुलांना चांगल्या साहित्याची ओळख व्हावी, तसेच इतर कलाप्रकारांचाही आस्वाद कसा घ्यावा, या संदर्भात काही पाठांची योजना केलेली असते. विद्यार्थ्यांना सामाजिक भान यावे, कलांची ओळख व्हावी, हाही एक प्रयत्न असतो. अजूनही यात खूप काही करता येण्यासारखे आहे.

**काळे :** पण, या दृष्टिकोनामुळे किंवा तडजोडीमुळे वाङ्‌मयीन आणि इतर कलाविषयक अभिरुची सांभाळली जातेय असे दिसत नाही. मूळ उद्देशच बाजूला पडतोय.

**डहाके :** पाठ्यपुस्तकाच्या संदर्भात आपण एकसंघ वर्ग गृहीत धरू शकत नाही. शिक्षणाची परंपरा नसलेल्या समाजगटातूनही अनेक विद्यार्थी आता शिक्षण घेतायेत. त्यामुळे एक मध्य साधावा लागतो. त्यामुळे तडजोडी कराव्या लागतात. त्यामुळे ७० टक्क्यांचे समाधान होत असेल ते ३० टक्क्यांचे होत नसावे.

**दिवटे :** विद्यापीठ स्तरावरील अभ्यासक्रमाचे सूत्रही असेच असते का?

**डहाके :** विद्यापीठीय रचनेत मी कधीही नसल्याने मला त्याविषयी काही सांगता येणार नाही, परंतु आता महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांतील मराठीच्या अभ्यासक्रमांमध्ये काही एक एकरूपता असावी असा विचार दिसतो.

**काळे :** आपल्या विद्यापीठीय अभ्यासक्रमात 'दलित साहित्य', 'ग्रामीण साहित्य', 'स्त्रीवादी साहित्य' अशी वर्गवारी करून विषय आलेले दिसतात. आजच्या काळात हे कितपत सयुक्तिक वाटते? म्हणजे आपण किती काळ साहित्याचा विचार अशी वर्गवारी करून करणार आहोत?

**डहाके :** कदाचित विद्यापीठीय अभ्यासक्रमात अशी वर्गवारी करणे योग्य असेलही, पण वर्तमान काळात एकंदर मराठी साहित्याचा विचार करताना असे भेद करू नयेत, असे मला वाटते. उदा. नामदेव ढसाळ हा मराठीतला मोठा कवी आहे तो 'दलित कवी' आहे म्हणून मी त्याला सीमित करू इच्छित नाही. त्याप्रमाणे 'स्त्रियांची कविता' असा छोटा वर्गही करू इच्छित नाही. तेच ग्रामीण साहित्याबद्दलही माझे मत आहे.

**दिवटे :** आपण मराठीतले एक महत्त्वाचे कवी-अभ्यासक म्हणून आम्हाला परिचित आहात. आपला पाश्चात्त्य साहित्य-कलांचा व्यासंगही माहीत आहे. तेव्हा आपण आज मागे वळून पाहताना मराठी साहित्य कुठे पाहता?

**डहाके :** जागतिक साहित्याच्या तुलनेत मला मराठी साहित्य हे पुष्कळ थिटे वाटते. अपवादात्मक काही लेखक आहेत त्यांनी उत्तम कलाकृती दिलेल्या आहेत. उदा. जी. ए. कुलकर्णी, अरुण कोलटकर, मराठी लेखकाचे एकूणच जीवनविषयक, समाजविषयक आकलन ढोबळ असते. त्यामुळे ते स्थूलस्वरूपाचे साहित्य लिहीत असतात. जगण्याच्या तळापर्यंत जात नाहीत. वरवरच्या गोष्टी घेऊन त्या संदर्भातच काही गोष्टी लिहितात. त्यामुळे वाङ्‌मयीन महत्ता येत नाही. उदाहरणार्थ ग्रॅबीयल गार्सीया मार्क्वेज किंवा ज्युझे सारामागो किंवा ओरहान पामुक या लेखकांच्या व्हीजनचा विस्तार दिसतो, तसा प्रत्यय मराठी साहित्यात येत नाही. हे तथाकथित इंग्लिश-अमेरिकन लेखक नाहीत. आपल्यासारखेच छोट्या भाषा समूहाचे लेखक आहेत.

**काळे :** पण, मला वाटते कवितेच्या बाबतीत इतके निराशाजनक चित्र नाही.

**डहाके :** हे खरे आहे. जागतिक पातळीवर विचार करता येईल, अशी नक्कीच काही नावे मराठी कवितेत आहेत. उदा. मर्ढेकर, कोलटकर, चित्रे, ढसाळ यांच्या कविता मला त्या पातळीच्या वाटतात. साठोत्तरी लेखकांनी ही चौकट थोडीफार तोडली. खरेतर, दलित लेखकांकडून अशी अपेक्षा होती, तशी त्यांच्यात क्षमताही होती, परंतु 'स्व'कथनापलीकडे जाऊन व्यापक फलक असलेली कादंबरी या लेखकांनी लिहायला घेतली नाही. आता समाजातल्या सगळ्याच स्तरातून लेखन होऊ लागले आहे. मात्र, त्यांनी 'स्व'कथनाची मर्यादा घालून घेऊ नये. तरीही मी आशावादी आहे. तसे अनुकूल वातावरण देखील तयार होऊ लागले आहे. माध्यमक्रांतीमुळे जगभरातले उत्तम साहित्य सहज उपलब्ध होऊ लागले आहे. अशा साहित्याच्या वाचनातून, परिशिलनातून काही नवे फॉर्म्स नव्या लेखकांना सापडतील. त्यामुळे मराठी साहित्याने स्वतःच घालून घेतलेली कुंपणे नाहीशी होतील. अनुभवाची, अभिव्यक्तीची क्षितिजे रुंदावतील.

**काळे :** याच अनुषंगाने मला एक नेहमी कुतूहल असणारा प्रश्न म्हणजे मराठीतल्या लेखिकांचे, कवयित्रींचे मूल्यमापन कसे करायचे? आपण त्यांच्या लेखनाकडे पुरेसे लक्ष देऊ शकलो नाही, की मराठीतल्या स्त्री लेखनाच्या काही मर्यादा आहेत?

**डहाके :** नव्वदोत्तर पिढीमध्ये कविता, कथा, कादंबरी, नाटक या क्षेत्रांत लेखन करणाऱ्या स्त्रिया मोजक्याच आहेत. दलित साहित्याने जसा एक उठाव निर्माण केला तसा स्त्रियांच्या साहित्याच्या बाबतीत झालेला दिसत नाही. स्त्री मुक्ती चळवळ आली. स्त्रीवाद आला. वेगवेगळ्या विद्यापीठांतून स्त्री अभ्यास केंद्र स्थापन झाली. तथापि, म्हणावे तसे जोरकस लेखन मात्र या पिढीतल्या स्त्रियांकडून झाले नाही. या कारणांचा अधिक खोलवर जाऊन विचार केला पाहिजे.

**काळे :** लेखक आणि त्याची सामाजिकता या विषयावर नेहमीच बोलले जाते. साहित्याचा किंवा कुठल्याही साहित्यकृतीचा समाजशास्त्रीय दृष्टीने विचार होणे नक्कीच महत्त्वाचे आहे, मात्र ढोबळपणे सामाजिकता शोधण्याचे प्रकार वाढीला लागलेले दिसतात. विशेषतः ग्रामीण साहित्याच्या संदर्भात असा विचार होताना दिसतो.

**डहाके :** लेखक आणि त्याचा भोवताल यांचा अतिशय जवळचा संबंध असतो. त्यामुळे समाजात घडणाऱ्या महत्त्वाच्या घटनांविषयी लेखकांनी भाष्य केले पाहिजे, अशी अपेक्षा असते. किंबहुना कधी-कधी सामाजिक घटनांचे ढोबळ चित्रण केले की लेखकाचा समाजाशी संबंध प्रस्थापित होतो. अशी भावनाच लेखक आणि वाचक या दोघांच्याही मनात असते. मग साहित्याकडे समाजातल्या कोणकोणत्या घटनांचे कसेकसे चित्रण झाले आहे, याचा



तपास केला जातो. सामाजिक बांधिलकीचा आपल्याकडे वरवरचा अर्थ लावला जातो. साहित्याचे समाजशास्त्रीय आकलन करू नये असे माझे मत नाही. त्याचप्रमाणे सामाजिक संदर्भापासून साहित्य तुटलेले असते, असेही मला वाटत नाही. कोणत्याही साहित्यकृतीत समाज हा असतोच, पण तो किती व्यापक आणि सखोल स्वरूपात आलेला आहे, हे आपण पाहिले पाहिजे.

**दिवटे :** लेखक आणि सामाजिक बांधिलकी यावरही बोलले जाते. यात प्रत्यक्ष 'कृती'विषयी मी बोलतोय. तर 'कृती'च्या अंगाने तुम्ही चंद्रपूर सारख्या आदिवासी प्रदेशात होणाऱ्या किंवा शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या प्रदेशात होणाऱ्या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून काही करणार आहात का?

**डहाके :** याबबातीत मला एक विचार सुचतो. आपण लेखक-कवी, समाजाचे काही एक देणे लागत असतो. उदा. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांची शिक्षणाची काय व्यवस्था असेल? त्यांचा साहित्याशी कितपत संबंध येत असेल? त्यासाठी आपण काही स्थायी निधी उभारू शकतो का? लेखक-कवींनी, प्रकाशकांनी, संमेलनाच्या आयोजकांनी, प्रायोजकांनी, उद्योगपतींनी साहाय्य केले तर बऱ्यापैकी निधी उभारता येईल आणि त्याचा या मुलांच्या शिक्षणासाठी विनियोग करता येईल. फार मोठे जरी शक्य झाले नाही तरी या मुलांच्या वाचनासाठी उत्तमोत्तम पुस्तके तरी पुरवता येतील, असे घडले तर या संमेलनाची एक चांगली आठवण या मुलांच्या स्मरणात राहील.

**काळे :** शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही या शतकातली सगळ्यात दुर्दैवी घटना म्हणता येईल. या सगळ्याची मराठी साहित्याने कितपत दखल घेतली? आपण या विषयाची व्याप्ती समजून घेण्यात कमी पडतो आहोत का?

**डहाके :** या विषयावर चर्चा बरीच झाली. अहवालही प्रसिद्ध झाले, मात्र काही तुरळक कविता, कथा, एखाद दुसरी कादंबरी सोडली तर नीट चित्रण झालेले दिसत नाही. हा विषय एवढा अथांग आहे की त्याचा योग्य तो अभ्यास केल्याशिवाय चांगले लेखन करणे शक्य होणार नाही. एकूण कृषी जनसंस्कृतीचा हा ऱ्हास आहे, याची अनेक कारणे सध्याच्या वर्तमानात दडलेली आहेत. त्यामुळे कवी-लेखक म्हणून ती आपली जबाबदारीच आहे. मात्र, एखादी घटना घडली म्हणजे त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडलेच पाहिजे हा आग्रह देखील अनाठायी आहे. अशा दबावातून वरवरच्या चित्रणाखेरीज काही हाती लागणार नाही.

**काळे :** तुम्ही मुख्यतः महाराष्ट्राला परिचित आहात ते कवी म्हणूनच. एक दुसरा आउटलेट म्हणून तुमच्या 'चित्रां'कडे पाहता येईल. याशिवाय कादंबरी, नाटक, ललित लेखन, समीक्षा, संशोधन अशी चौफेर मुशाफिरी तुम्ही केलेली आहे. वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारात लिहीत असताना मुख्य अभिव्यक्तीकडे दुर्लक्ष झाले किंवा होते असे कधी वाटले का?

**डहाके :** कविता लिहीत असताना मला 'कथात्म गद्य'लेखन करण्याची गरज वाटली. काही गोष्टी कवितेतून येऊ शकत नाहीत, त्यासाठी आपण हे लेखन केले पाहिजे. 'योगभ्रष्ट' या दीर्घ कवितेच्या अगोदर माझी 'प्रेमबीम' नावाची कथा 'सत्यकथे'तून प्रकाशित झाली होती. किंवा 'मौज' आणि 'हंस'मधूनही काही कथा आल्या होत्या. 'अधोलोक', 'प्रतिबद्ध', 'मर्त्य' यापाठोपाठ या एक-दोन वर्षांत लिहिलेल्या छोट्या कादंबऱ्या आहेत. त्यांचे विषय हे कादंबरी या फॉर्मच्या दृष्टीने योग्य वाटले. माझे ललित लेखन हे रूढार्थाने ललित लेख नाहीत. निबंध, ललितलेखन, आठवणी आणि वैचारिक यांच्या सरमिसळीतून काही वेगळा फॉर्म मी शोधत होतो. दरम्यान, 'नाट्यधर्मी' या संस्थेसाठी काही एकांकिका आणि दोन-तीन नाटके लिहिली आहेत. हे सगळे लिहीत असताना निर्मितीचा आनंद झाला, पण यामुळे कवितेत खंड पडला नाही किंवा रेखाटने काढणेही थांबले नाही. मुंबईत आल्यानंतर मी सैद्धांतिक समीक्षा आणि उपयोजित समीक्षेकडे वळलो. यातही मला स्वारस्य असल्याने ही कामे मी केली. कवितेखेरीज इतर वाङ्मयप्रकार हाताळल्याने कवितेविषयीची ऊर्जा कमी होते असे मला वाटत नाही. वाङ्मयकोशासारख्या अधिक वेळ घेणाऱ्या गोष्टीमुळे नंतरच्या काळात कादंबरी लिहिली गेली नाही किंवा नाटकही. पण, एक कादंबरी आणि एक नाटक मात्र डोक्यात आहे. हे कधी लिहून होईल ते माहीत नाही, मात्र नक्की लिहिण्याचे जे म्हणून प्रकार आहेत, त्याविषयी मला सतत आकर्षण राहिले आहे.

**काळे :** या सगळ्यात तुम्ही नाही म्हणालात तरी मला नेहमीच असे वाटत आले आहे की, तुमच्यातल्या चित्रकाराकडे तुमचे दुर्लक्षच झाले आहे. रेखाटनांच्या पुढे जाऊन पेंटिंग्ज करावीत असे का वाटले नाही. वास्तविक, तुमच्या उमेदीच्या काळात मुंबईत चित्रकलेच्या क्षेत्रात अनेक नव्या गोष्टी घडत होत्या.

**डहाके :** मी पेंटिंग्ज अजिबातच केली नाही असे नाही. विविध माध्यमांतून मी पेंटिंग्ज केली आहेत, पण रेखाटने हे माझे अभिव्यक्तीचे सहज माध्यम आहे. म्हणजे एखादी कविता लिहावी इतक्या सहजतेनेच मी रेखाटने करतो. पेंटिंग्ज करायची इच्छा असूनसुद्धा मला तेवढा वेळ मिळाला नाही, पण या पुढच्या काळात यासाठी वेळ देण्याची इच्छा आहे.

**दिवटे :** दीर्घ कवितेचा फॉर्म अगदी सुरुवातीच्या काळात वापरूनही नंतर पुन्हा हा फॉर्म का वापरावा वाटला नाही?

**डहाके :** 'योगभ्रष्ट'नंतर छोट्या-मोठ्या कविता मी लिहिल्या आहेतच, पण तेवढा मोठा पट असलेली कविता मात्र लिहिली गेली नाही. दीर्घकविता लिहिण्यासाठी आवश्यक अशी निवांतता किंवा सलगता मिळाली नसावी. कादंबरी लिहायला जो कालावकाश लागतो तोच दीर्घकवितेसाठीही अत्यावश्यक असतो. दीर्घकविता एकार्थाने कवितेतली कादंबरीच असते. एका दीर्घकवितेची सुरुवात मात्र मी केलेली आहे. ती पटकथेच्या स्वरूपात लिहिलेली आहे. कदाचित, ती कविता पटकथेच्या फॉर्ममध्येच लिहिली जाईल.

**काळे :** 'योगभ्रष्ट' ते 'शुभवर्तमान' या दोन्ही संग्रहांत इतिहासाचे पुनर्वाचन करण्याचा तुमचा प्रयत्न मला व्यक्तिशः खूप महत्त्वाचा वाटत आला आहे. नंतरच्या कवितेत मात्र हे पुनर्वाचन झालेले दिसत नाही. 'वर्तमान' हेच तुमच्या कवितेचे केंद्र राहिले आहे.

**डहाके :** इतिहासाचा अंत ही घोषणा करण्याच्या या काळात मी वर्तमानावर अधिक लक्ष केंद्रित केले. दुसरीकडे समीक्षणात्मक, संशोधनात्मक लेखनामध्ये इतिहासाचे पुनर्वाचन सुरूच होते. त्यामुळे कवितेत हे केले नाही असे कधी वाटले नाही. मी साहित्याचा अभ्यासक देखील असल्याने इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र, पुरातत्त्वविद्या या विषयांत देखील प्रयत्न करत आलो आहे.



**दिवटे** : या विषयांसाठी आज तुम्हाला कोणता वाङ्मयप्रकार जवळचा वाटतो?

**डहाके** : मला असे वाटते की, तत्त्वज्ञान, आत्मिक प्रस्फुरणे, राजकीय-सामाजिक स्थिती एवढा सगळा मोठा पट कवितेतूनच व्यक्त झाला आहे. त्यामुळे आजही मला कविता हा साहित्यप्रकार व्यापक आणि खोल आवाका असलेला वाटतो.

**काळे** : एक कवी म्हणून मला नेहमी असे वाटत आले आहे की कवीने कवितेच्या फॉर्मबाबत सातत्याने वेगवेगळे प्रयोग केले पाहिजेत. यात त्या वाङ्मयप्रकाराची संदिग्धता वाढली तरी चालेल. अशा प्रयत्नातूनच नवे काही हाती येऊ शकेल.

**डहाके** : मला 'फ्युजन' ही गोष्ट आजच्या काळात महत्त्वाची वाटते. वाङ्मयप्रकारांचा बंदिस्तपणा आज जगभर नाहीसाच झालेला आहे. त्यामुळे कवितेमध्ये कादंबरी, नाटक, पटकथा यांचे रूपाकार मिसळून गेले तर कदाचित कवितेचाही एक वेगळा फॉर्म अस्तित्वात येईल. कदाचित त्यात इतर चित्रकलेसारख्या इतर कलांचे अंशही मिसळतील. शेवटी मानवी अस्तित्व कशातून पूर्णपणे प्रकट होईल हे आपल्याला सांगता येत नाही. हे सगळे कलाप्रकार याच अस्तित्वाची वेगवेगळ्या प्रकारे अभिव्यक्ती करीत असतात. काही कलावंतांना या अस्तित्वाचे समग्र रूप व्यक्त करण्यासाठी अन्य कला प्रकारांचाही उपयोग करावासा वाटतो. आज दृश्यकलेत इन्स्टॉलेशनसारख्या गोष्टीमध्ये चित्र, शिल्प, स्थापत्य या तीन कला मिसळलेल्याच आहेत. मग साहित्यात कविता या प्रकारात कथा, कादंबरी किंवा नाटक, ललितलेखन, निबंध मिसळले तर आश्चर्य वाटायला नको. भावकविता ही केंद्रस्थानी ठेवून कवितेचा विचार करणाऱ्या टीकाकारांची मात्र यामुळे पंचायत होईल. मी अशा कवितेचे स्वागत करतो. कारण, माझी कवितेविषयीची भूमिका रिजीड नाही. अशा प्रकारची कविता जर मराठीत लिहिली जाईल तर अन्य साहित्य प्रकारांपेक्षाही तिचे मोल जास्त असेल. माझ्या परीने मी अशा शक्यता शोधण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. नव्वदोत्तर कवितेत अशी काही उदाहरणे आढळतात.

**दिवटे** : 'कवितेची भाषा' या संकल्पनेविषयी तुमचे मत जाणून घ्यायला मला आवडेल.

**डहाके** : 'कवितेची भाषा' ही काही वेगळी असते असे मला वाटत नाही. जी आपली नेहमी बोलण्याची, व्यवहाराची भाषा असते, तीच भाषा कवितेची भाषा असते; परंतु, कवी नेहमीच उपलब्ध भाषेतून कल्पक अशी नवनिर्मिती करीत असतो. मग, ती प्रमाणभाषा असो की बोलीभाषा. पण, कोणत्याही काळामध्ये कवितेच्या भाषेला अतिशय महत्त्व असते. केशवसुतांना ज्या भावना व्यक्त करायच्या होत्या त्यासाठी मराठी कवितेत योग्य ते शब्दच उपलब्ध नव्हते. हेच मर्ढेकरांच्या बाबतीतही घडले, परंतु आज या कवींनी भाषेच्या मर्यादे पलीकडे जाऊन जी नवी भाषा शोधली तिचे आपल्यावर संस्कार आहेत. अरुण कोलटकर किंवा नामदेव ढसाळ यांनी देखील अशी नवी भाषा शोधली आणि कवितेच्या भाषेचा अवकाश अत्यंत व्यापक केला. त्यामुळे मी स्वतः महानगरी, ग्रामीण, दलित असे भेदाभेद करत नाही. त्या त्या काळात कवींनी आपल्या कवितेची भाषा शोधलेलीच असते. मला माझी भाषा मुद्रित ग्रंथातून जशी सापडली तशी मौखिक उच्चारातूनही सापडली.

**दिवटे** : एक कवी-लेखक म्हणून मान्यता मिळणे, महत्त्वाचे पुरस्कार, मान-सन्मान मिळणे, त्याच्या कर्तृत्वाची दखल घेतली जाणे हे प्रत्येक कवी-लेखकासाठी निश्चित महत्त्वाचे असते. आपण साठोत्तरीतले एक महत्त्वाचे कवी-अभ्यासक म्हणून परिचित आहात. साहित्य अकादमी, महत्त्वाचे मान-सन्मान आपल्याला मिळाले. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले. पुढे काय?

**डहाके** : या सर्व गोष्टी आपल्याला मिळतात तेव्हा आपण कृतज्ञच असतो. आपण जे काही काम केलेले असते. त्याची ही सुंदर पोचपावती असते. मला स्वतःला या सर्व गोष्टी आनंदमय वाटतात, पण आपण जे काही लिहीत असतो, ते कुठल्याही अपेक्षेशिवाय. पण त्याच्या लेखनाला असे प्रतिसाद मिळाले तर त्याच्याकडून अधिक चांगले लेखनही होऊ शकते. निर्मितीचा आनंद हा खराखुरा आनंद असतो. कारण, आपण कशाचा तरी शोध घेत असतो. त्या शोधात एखादा टप्पा असा येतो की, तेव्हा आपल्याला वाटते की आपल्याला काहीतरी गवसले आहे. तो आनंद विरळा आणि वेगळा असतो. मी अशा आनंदात जास्त रमतो. आणि पुढे काय? या प्रश्नाच्या रोखाकडे वळतो. यापुढे मला कॅनव्हासवर पेंटिंग्ज करायची आहेत. एक कादंबरी लिहायची आहे आणि साहित्य सिद्धान्ताचे वाचनही करायचे आहे.


**शब्दांकन** : संदीप रतन कांबळे
**संपर्क** : ९८२३८०८७३६

**वसंत आबाजी डहाके : ९८९०३६२७०३**
**मंगेश नारायणराव काळे : ९७६६५९४१५४**
**हेमंत दिवटे : ९९६७५३५१०३**

## हस्तिदंती मनोऱ्यातून खाली...

महाराष्ट्रात अगदी दूरदूरच्या खेड्यापाड्यांतून साहित्यनिर्मितीची हौस उपाडू लागलेली आहे. ती पूर्णतः प्रफुल्लित होईल असे वातावरण उत्पन्न झाले तर माझ्यासारख्याला आज वाटणारी निराशा पार नाहिशी होईल. दूर खेड्यात वा तालुक्याच्या गावी असलेल्या या उमलत्या साहित्यिकांना नागरी तरुणाइतकी विचित्र निराशा अजून आलेली नसावी. त्या साहित्यिकांना आणि प्रतिभेचे देणे लाभलेल्या सर्वच तरुणांना मी असे आवाहन करू इच्छितो की, नवसाहित्याच्या लाटेत वाहून जाण्याआधी तुम्ही जुन्या वाङ्मयाचे परिशीलन करा. त्यातले काही तुमच्यातला स्वाभिमान प्रकर्षाने जागृत करील, साहित्यिक नावाच्या हस्तिदंती मनोऱ्यातून तुमच्या मनाला खाली उतरवील.

**- ग. दि. माडगूळकर**
**(यवतमाळ - १९७३, अध्यक्षीय भाषणातून)**



# साहित्यसोहळा आणि त्या पलीकडे...

**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ही महाराष्ट्रातील एक महत्त्वाची सांस्कृतिक परंपरा आहे. १८८५ साली सुरू झालेला हा साहित्योत्सव आजही तितक्याच आनंदमयी वातावरणात साजरा केला जातो. म्हणूनच साहित्य संमेलन हे केवळ साहित्यिकांपुरते मर्यादित न राहता समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारे साहित्याचे, संस्कृतीचे आणि विचाराचे व्यासपीठ बनले आहे. मागील ८४ साहित्य संमेलने हा एक महत्त्वाचा सांस्कृतिक दस्तऐवज आहे. या संमेलनांच्या ऐतिहासिक कामगिरीचा हा धावता आढावा...**

**डॉ. रमेश धोंगडे**

प्रतिवर्षी येणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाबाबत जनसंपर्क साधनांद्वारे दोन गोष्टींना प्राधान्य देण्यात येते. एक अध्यक्षीय निवडणूक, दोन संमेलनाचे विविध दृष्टीने आणि विविध संदर्भातून केलेले वृत्तांकन. या दोन्ही गोष्टी आता साहित्याविषयी थोडी-फार जिज्ञासा असणाऱ्या वाचक - प्रेक्षकांच्या परिचयाच्या झाल्या आहेत. गणपती-उत्सव, दिवाळी, निवडणूकपूर्व गदारोळ यांचे वृत्तांकन जसे परिचयाचे अपेक्षित रीतीचे तसेच साहित्य संमेलनाचे वृत्तांकन असते. जनसंपर्क माध्यमे ही तात्कालिक विषयावर, घटनेवर, प्रश्नावर, चुरचुरित, आकर्षक प्रतिक्रिया देतात. त्यांच्या अस्तित्वाला ते आवश्यकही आहे. साहित्य संमेलन हे केवळ जनसंपर्क माध्यमांसाठीची एक तात्कालिक घटना व्हावी यातून साहित्याचा समाजातील स्तर लक्षात येतो. गेल्या १० वर्षांतील १० संमेलनांत अध्यक्ष निवडणुकीत काय वाद झाले, कोण जिंकले, कोण पडले, संमेलनातील विविध चर्चा-परिसंवाद-सादरीकरण यातून काय निष्पन्न झाले याबाबतची जनविस्मृती ही जनसंपर्क माध्यमांच्या नियमाला आणि अपेक्षेला साजेशी असली तरी भाषा, संस्कृती आणि वैचारिक क्षेत्र यांच्या प्रगल्भतेला आणि महत्त्वाला मुरड पडत असल्याची निशाणीही आहे.

साहित्य संमेलन हे १८७८ मध्ये न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी ग्रंथकारांचे संमेलन' या नावाने सुरू झाले. न्या. रानडे हे अध्यक्ष होते याचे कारण ते न्यायमूर्ती होते असे नव्हे, किंवा ते साहित्यिक होते असेही नव्हे, तर ते तत्कालीन शिक्षित समाजात विचारवंत म्हणून प्रतिष्ठित होते हे आहे. 'ग्रंथकार' म्हणजे केवळ कथा-कादंबरी-काव्य लिहिणारी व्यक्ती नव्हे. १९१५ पर्यंत ग्रंथकारांची अशी नऊ संमेलने झाली. दहाव्या संमेलनापासून म्हणजे १९१७ पासून महाराष्ट्र साहित्य संमेलन, मराठी साहित्य संमेलन, साहित्य संमेलन अशी नावे या संमेलनाला मिळाली. १९७३ ला ग. दि. माडगूळकर यांच्या अध्यक्षतेखाली ४९ वे 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' या नावाखाली संमेलन घेण्यात आले. संमेलनाची ही नामकरणे संमेलनाच्या हेतूंची निदर्शक आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातील म्हणजे १९४७ पर्यंतच्या एकूण ३१ संमेलनांत साहित्य संमेलनाचे नऊ हेतू संमेलनाच्या अध्यक्षांनी सांगितले आहेत. १) राष्ट्रहित जोपासणे, २) वाङ्मय-प्रेमाचे प्रदर्शन करणे, ३) मराठीचा विकास करणे, ४) साहित्यभक्तांना एकत्र येण्याची संधी देणे, ५) मराठी वाङ्मयाचा आढावा घेणे, ६) पुढील वाङ्मयाला वळण लावणे, ७) प्रतिभा व शिक्षण यांचे महत्त्व ठसविणे, ८) वाङ्मय-विचारांची चर्चा करणे आणि ९) ठराव पास करणे. यात मराठी भाषेचे संवर्धन करण्याचा हेतू सर्वच अध्यक्ष अग्रक्रमाने मांडतात. म्हणजे साहित्य-संमेलन हे केवळ कथा-कादंबरी कविता यांची दखल घेण्यासाठी नसून वैचारिक वाङ्मय व ललित साहित्य यांच्या निर्मितीने मराठीचे संवर्धन करण्यासाठी होते असे दिसते. राष्ट्रीयत्वासाठी मराठी इतिहास, साहित्य, संस्कृती यांचे भान ठेवण्याची प्रेरणा यामागे दिसते.

१९४७ पर्यंत साहित्य संमेलन हे साहित्यिकांचे संमेलन नव्हते-साहित्यावर प्रेम करणाऱ्यांचे ते संमेलन होते. १९१५ च्या संमेलनाचे अध्यक्ष गंगाधरराव पटवर्धन हे ना साहित्यिक होते ना राजकारणी. १९०५ च्या संमेलनाचे अध्यक्ष दादासाहेब करंदीकर हे केवळ साहित्यिकांचे मित्र म्हणूनच अध्यक्ष झाले. १९२८ च्या संमेलनाचे अध्यक्ष बापूसाहेब अणे हे राजकारणी म्हणून प्रसिद्ध होते. ह. ना. आपटे, न. चि. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, शि. म. परांजपे, वा. म. जोशी, कृ. प्र. खाडीलकर, मा. त्र्यं. पटवर्धन, वि. दा. सावरकर, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, प्र. के. अत्रे, भा. वि. वरसेकर, ग. त्र्यं. माडखोलकर असे मोजकेच अध्यक्ष हे साहित्यिक होते. इतिहासकार, राजकीय नेते, संशोधक, तत्त्वचिंतक या प्रकारचे लोकही संमेलनाध्यक्ष झालेले दिसतात. 'ग्रंथकार' या शब्दाचा अर्थ आणि संमेलनाचे हेतू लक्षात घेता असे असणे स्वाभाविक होते. साहित्य संमेलनाचा अध्यक्ष हा साहित्यिक किंवा समीक्षक असावा हा आग्रह १९४७ नंतर आला तर राजकीय व्यक्तीला अध्यक्षपदच काय पण कोणताच सहभाग न ठेवण्याचा आग्रह १९७५ पासून सुरू झाला. एका अर्थाने साहित्य संमेलन हे निखळ साहित्यासाठीचे संमेलन झाले. १९४९ ते १९७५ या काळात २० संमेलने झाली. त्यांचे अध्यक्षपद यशवंत, अनिल कुसुमाग्रज, पु. शि. रेगे, पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर यांसारख्या प्रतिथयश साहित्यिकांनी तर दुर्गा भागवत, वा. ल. कुलकर्णी, प्रियोळकर, न. र. फाटक, लक्ष्मणशास्त्री जोशी यांसारख्या समीक्षक विचारवंत वा इतिहासकार यांनी भूषविले. संमेलनाच्या अध्यक्षांची भाषणे ही साहित्यातील विषयांकडे, वादांकडे याच काळात प्रामुख्याने वळली.

१९४९ ते १९७५ च्या काळात संमेलनाध्यक्षांपैकी निम्म्या अध्यक्षांनी भोवती घडणाऱ्या राजकीय घडामोडींकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याचे दिसते. बिचकवणारी विहत्ता किंवा मनोरंजनाचे चातुर्य हे विशेष अध्यक्षीय भाषणात दिसतात.

१९४७ पर्यंत शासनकर्ते परकीय असल्यामुळे आणि बाह्यजगात राजकीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न सुरू झाल्यामुळे साहित्यात राष्ट्रीयत्वाला, स्वभाषेला, स्वसंस्कृतीला महत्त्व येणे स्वाभाविक



होते. सावरकरांना साहित्यनिर्मिती ही स्वातंत्र्यलढ्यातील सक्रिय सहभागापेक्षा दुय्यम दर्जाची वाटत होती तर तिकडे दुसरे महायुद्ध चालू असताना मराठी साहित्यिक मात्र संमेलनात मशगूल आहेत याची खंत अत्र्यांना होती. साहित्यक्षेत्र हे फार मर्यादित आहे याची जाणीव श्री. कृ. कोल्हाटकर, श्री. म. माटे, वा. म. जोशी यांच्या भाषणात दिसते तर खांडेकर आणि माटे मराठी साहित्यातील मध्यमवर्गीय संकुचितपणा, चटोरपणा आणि केवळ करमणुकीसाठी केलेला थिल्लरपणा यावर कडक टीका करतात. १९४९ पासून मात्र साहित्यातील कलात्मकता, सौंदर्य, साहित्याची स्वायत्तता या विषयांना महत्त्व आल्याचे दिसते. शासन हे स्वकीयांचे असल्यामुळे राष्ट्रीयत्वाचा विचार मागे पडलेला दिसतो. त्याऐवजी प्रांतिक अस्मिता वाढताना दिसते. गोवा मुक्तीसंग्राम, संयुक्त महाराष्ट्र. या महत्त्वाच्या घडामोडींचा ओझरता उल्लेख होतो पण चीनशी झालेल्या युद्धातील पराभव किंवा १९६५ च्या पाकिस्तानशी झालेल्या युद्धाचा उल्लेखही कोणी करीत नाही. या घडामोडींचा परिणाम साहित्यिकांवरही झालेला दिसत नाही. कुसुमावती देशपांडे दोन महायुद्धांनी इंग्रजी साहित्यकारात आलेली विफलता युद्धाची काहीही झळ न बसलेल्या मराठी साहित्यकारांनी फक्त पांघरूण म्हणून घेतली, असे म्हणतात. सांप्रतच्या मराठी जीवनाची परवड ही महायुद्धांनी नव्हे, तर आपल्या नालायकीमुळे झाली अशी टीकाही त्या करतात. न. वि. गाडगीळ, लक्ष्मणशास्त्री जोशी, जावडेकर हे काँग्रेस शासनाशी, शासनकर्त्यांशी जवळीक असणारे लोक त्यामुळे शासन, समाज व साहित्य यावर परखडपणे ते बोलूच शकत नव्हते. मराठी माणसाच्या परखडपणाचे मिथक किती फोल आहे हे अध्यक्षीय भाषणातून जाणवते. समोर शत्रू आला की त्याच्याशी हस्तांदोलन करायचे आणि तो गेल्यावर हवेत तलवार फिरवायची अशा तऱ्हेचे चित्र सर्वत्र दिसते. यातूनच नवकवितेवर टीका करायची पण मर्ढेकरांना चांगले म्हणायचे, मराठी कथेतील विषयांच्या दारिद्र्यावर बोट ठेवायचे पण आपल्या कंपूतील कथाकारांचा नावे घेऊन गौरव करायचा अशा परस्परविरोधी गोष्टी होत असलेल्या दिसतात.

दुर्गा भागवतांच्या १९७५ च्या अध्यक्षीय भूमिकेमुळे राजकारणी लोकांच्या **वसव्यामधून** साहित्य संमेलनाची सुटका झाली. १९८९ पर्यंत हे चित्र राहिले पण पुढे मदतकर्ते श्रोते म्हणून आणि अध्यक्षांच्या आश्रित वृत्तीचा परिणाम म्हणून शासनकर्त्यांचा प्रभाव पुन्हा दिसू लागला. शासनकर्त्यांशी घनिष्ट संबंध असणारे धनिक प्रायोजक होऊ लागले. मंत्रीमहोदयांचा प्रभाव स्वागत-समितीमार्फत जाणवू लागला. गेल्या दशकातील सांगलीतील संमेलनात तर संमेलनाध्यक्षाचे पद व त्याची प्रतिष्ठा राजकीय व्यक्तिमत्त्वांनी पूर्णपणे ग्रासली. १९९० नंतर मुक्त अर्थव्यवस्थेचा परिणाम ऐहिक संपन्नतेत विशेषत: शहरी जीवनात दिसू लागला. साहित्य संमेलने ही प्रचंड खर्चाची व सार्वजनिक डामडौलाची होऊ लागली. त्यांना जत्रेचे स्वरूप येऊ लागले. अध्यक्षपदासाठी निवडणुकीचे राजकारण साहित्यिक करू लागले. तात्त्विक मुखवटे गळू लागले. राजकारण्यांबरोबरच चित्रपट-सृष्टीतील कलाकारांना उत्सवमूर्ती बनवून या जत्रेच्या पालख्या मिरवू लागल्या. संमेलनाची गर्दी वाढली, उलाढाल वाढली, पडद्यामागील सूत्रधार वाढले, पुस्तकविक्रीचे प्रमाण वाढले, मार्केटिंगची तंत्रे अवलंबविण्यात आली. संमेलनाचा सण झाला. एका अर्थाने लोकांचा सहभाग खूप वाढला; पण, प्रसिद्धी आणि गर्दी यांच्या मोहाने साहित्य हे विशिष्ट भाषिक समाजाच्या ज्ञानसंस्कृतीमधील मानवी-प्रज्ञेचे व्यक्ती विशिष्ट असे उत्क्रान्त स्वरूप असण्याची शक्यता दुरावली.

स्वस्थचित्र साहित्यकारच 'मूर्धाभिषिक'(क्लासिकल) साहित्य निर्माण करू शकतो, असे न. चि. केळकर व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर म्हणतात. राजकीय उत्कर्षाच्या काळातच उत्तम साहित्य निपजते. स्वास्थ्य आणि सौरूप यांची पार्श्वभूमी असल्याखेरीज चांगले साहित्य निर्माण होत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातील बहुसंख्य अध्यक्षांना तत्कालीन मराठी साहित्य खुजे वाटत होते. स्वातंत्र्योत्तर काळातील अध्यक्षही मराठी साहित्याबाबत फारसे चांगले बोलत नाहीत. मराठी साहित्याने आपले जीवन खरोखरच प्रभावित केले आहे काय याबाबत पु. शि. रेगे साशंकता दाखवितात. तरुण मराठी साहित्यिक-विशेषत: कवी 'अव्यवस्थितप्रत' आहेत असे अनिलांचे मत. ते काय बरळतात ते त्यांनाच कळत नाही, पण आपण अपूर्ण असे काही लिहितो आणि ते सुंदर आहे असा सौंदर्यभ्रम त्यांना होतो. अनिलांचा रोख नवकवितेवर आहे. 'वैयक्तिक जीवनातल्या विसकळीत संवेदनांचा चिल्लर खुर्दा' आजचे कवी चिवडत बसतात हे त्यांचे निरीक्षण मर्मभेदी आहे. मराठी विचारवंत मराठीत लिहीत नाहीत म्हणून ती मरेल अशी भीती राजवाड्यांना होती, असे श्री. के. क्षीरसागर १९५९ च्या संमेलनातील अध्यक्षीय भाषणात म्हणतात. पण, आज ते मराठीत लिहितात म्हणून मराठी मरेल असे क्षीरसागरांना वाटते. कुसुमावती देशपांड्यांना मराठी लेखन हे इंग्रजी वाङ्मयाचे केवळ 'पडसाद' या स्वरूपाचे वाटते; मात्र, समकालीन साहित्यिकांपैकी आपल्या आवडीनुसार आणि सोयीनुसार काहींची नावे घेऊन मराठी साहित्यांचे बरे चालले आहे असा समज बहुसंख्य अध्यक्ष करून देतात. त्या काळचे बरे साहित्य आज विस्मरणात गेले आहे हे लक्षात घेतले तर त्यातला फोलपणा कोणालाही जाणवेल.





धास्तावलेपणा हा मराठी साहित्यिकांचा स्थायीभाव दिसतो. या धास्तावलेपणातून नैराश्य, चडफड आणि विद्रोही भावना निर्माण झालेल्या दिसतात. आपल्यावर सतत कुणीतरी अन्याय करीत आहे आणि आपण हतबल पण कृद्ध आहोत ही एक पुन:पुन्हा जाणवणारी आत्मकेंद्री भीरुता सर्वंकष आहे. कधी त्याचे कारण पारतंत्र्यात शोधले जाते, कधी भांडवलदारीत, कधी शहरीकरणात, कधी हिंदू वर्णव्यवस्थेत तर कधी थेट ग्लोबलाइझेशनमध्ये. १९४९ मध्येच जावडेकरांना जगाची संस्कृतीचे नेतृत्व आणि भारताची नवराष्ट्र म्हणून होणारी लक्षात घेण्यातच साहित्याचा कस टिकून राहील. ८५ व्या साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात, परिसंवादात किंवा काव्यसंमेलनात ही जाण दिसणार की साहित्य आणि संस्कृती, साहित्य आणि समाज, साहित्याची स्वायत्तता कला-कलावंत-सामाजिकता-वास्तव यांचे संबंध मराठी भाषेची सर्वेक्षणाविना लक्षात आलेली स्थिती याबाबतची पूर्वापार चालत आलेल्या मतांची फक्त नवीन शब्दात, नवीन अभिनिवेशाने फक्त उजळणी होणार?

माहिती आणि तंत्रज्ञान यातील प्रगतीने आज सर्व आजतागायत म्हणजे २०१२ पर्यंतच्या २० वर्षांतील अध्यक्षांच्या साहित्याकडे लक्ष दिले तर किमान सहा अध्यक्ष या वर्गातले आहेत हे ध्यानात यावे. परिज्ञान देणारे साहित्य मराठीत अलीकडच्या दीडशे वर्षांत फार नव्हतेच. त्या श्रेणीकडे जाऊ पाहणारे बरे साहित्य मराठीत होते व आहे. मराठी समाजाची बौद्धिक प्रगल्भता गेल्या वीसेक वर्षांत जसजशी वाढू लागली तसतसा साहित्याचा सामाजिक स्तर खाली येऊ लागला. हे समजून घेतले तर साहित्य - संमेलनाविषयी असमाधान व्यक्त करण्याची किंवा अमक्या-तमक्याला अध्यक्षपद मिळाले नाही अशी



निर्मिती यांना विरोधी असा विचार मराठी साहित्यात प्रकट होणार नाही, याची काळजी आपण घ्यायला हवी, असे ते म्हणतात. १९९० नंतर आपल्या प्रयत्नाविना, आपल्या पाठिंब्याची किंवा विरोधाची किंचितही तमा न बाळगता जागतिकीकरण किंवा ग्लोबलाइझेशन आले. प्रत्यक्षात त्याला पूरक असा स्वागतशील विचार मराठी साहित्यात आला नाही. उलट मूळच्या धास्तावलेपणातून त्याविषयी चीड, विफलता, भावनिक घुसमट मराठी कवितेत फोफावलेली दिसते. मात्र, ग्लोबलाइझेशनच्या मागच्या जागतिक आर्थिक प्रवाहांचे आणि त्यांना स्वहितार्थ वळवू पाहणाऱ्या राजकीय शक्तींचे यथार्थ ज्ञान याच्या अभावाने मराठी वैचारिक क्षेत्र आणि मराठी साहित्य - समीक्षता ना या धास्तावलेपणाचे निराकरण करू शकली ना साहित्यिकांना प्रगल्भ करू शकली. जागतिकीकरणाचा अनुभव सर्वसामान्यांना मार्केट आणि उपजीविकेच्या साधनांची उपलब्धी यावरूनच येतो. त्या अनुभवामुळे माणसाच्या संस्कृतीमध्ये कळत-नकळत बदल घडतात. या बदलांनी केवळ हुरळून वा भांबावून जाणारे साहित्य हे संकुचित दृष्टिकोनाचेच असणार. सर्वसामान्याच्या या अनुभवामागचा विशाल आर्थिक, राजकीय पटल प्रकारची माहिती कोणालाही सहजपणे उपलब्ध होऊ शकते. १९९० पूर्वी माहिती देणारे ग्रंथ हे ज्ञान देणारे ग्रंथ म्हणून मिरवले. वैचारिक वाङ्मयाच्या स्थानी त्यांना जागाही देण्यात आली. आज 'माहिती' आणि 'ज्ञान' यातला फरक स्पष्ट व्हायला लागताच वैचारिक लेखनाच्या छत्राखाली धांदलीने येणाऱ्यांची पंचाईत झाली. विद्यापीठीय पीएच.डी. प्रबंधांचे विशेषत: मराठी भाषा, साहित्य, संस्कृती यावरील प्रबंधांचे खरे स्वरूप 'अर्धवट माहितीचे संकलन' असे असून त्यात संशयाची वाणवा आहे असे स्पष्ट झाले. साहित्य हे ज्ञान देत नाही- पु. शि. रेगे म्हणतात तसे 'परिज्ञान' किंवा 'विजडम' देते माहिती ज्ञान - परिज्ञान ही चढती श्रेणी आहे. मराठी वैचारिक लेखन 'माहिती'वर स्थिरावले किंवा माहिती देणाऱ्या साहित्याला आपण कौतुकापोटी 'ज्ञान' देणाऱ्या साहित्याच्या वर्गात बसविले. साहित्याबाबत पाहिल्यास 'लोकप्रिय' साहित्याचे प्रमाण लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात वाढते. परिज्ञान न देणारे मनोरंजनाची कास धरणारे भरड साहित्यही वाढले.

या दोन्ही साहित्याचे साहित्यकार आणि ते आवडणारे लोक हे साहित्य-संमेलनात मोठ्या प्रमाणात दिसू लागले. १९९२ पासून ते खंत करण्याची गरज वाटणार नाही.

लोकशाही व्यवस्थेत शासकीय अनुदानाने सार्वजनिक सोहोळे किंवा कार्यक्रम करण्यात गैर काही नाही. साहित्य संमेलनावर शासन जो खर्च करते त्याविरुद्ध बोलण्याचीही गरज नाही. कारण, साहित्य संमेलन हे प्र. के. अत्रे विनोदाने म्हणतात तसा अगदी 'वाङ्मय-वृषभांचा पोळा' नसला तरी सणासुदीसारखा आनंदाचा सार्वजनिक सोहळा आहे. त्यात केवळ मनोरंजन नसते. सामान्य बुद्धीला पटतील, दीपवतील अशी बेतशीर बुद्धीची आतषबाजी असते आणि तसे असण्यात गैर काही नाही. कोणी सांगावे, याची प्रतिक्रिया म्हणून परिज्ञान देणाऱ्या साहित्याची निर्मिती, अशा साहित्याची प्रज्ञाकेंद्री समीक्षा कुठेतरी, कधीतरी शक्य होऊन उदयास येईल? कुणी सांगावे, मोठ्या प्रमाणात 'माहिती'कडे आणि थोड्याफार प्रमाणात 'ज्ञाना'कडे परभाषेच्या माध्यमातून धावणाऱ्या मराठी समाजात स्वभाषेत 'परिज्ञान' देणाऱ्या किंवा ज्ञानापलीकडच्या असे काही देणाऱ्या साहित्याचा स्तर उंचावण्याची गरज अशा संमेलनाच्या निमित्ताने मराठी समाजातील काहींना वाटेल!

**संपर्क :** (०२०) २५२३०८१६



# मुस्लीम-मराठी एकरूपता

महाराष्ट्र ही अनेक धर्मांची व पंथांची भूमी आहे. त्या धर्मांच्या / पंथांच्या महापुरुषांनी व संतांनी मध्ययुगातील मराठी साहित्य समृद्ध केले आहे. त्यांनीच नव्हे, तर पंडितकवी, शाहीर, बखरकार यांच्यासारख्या अन्य साहित्यिकांनीही. हे साहित्य अत्यंत मोलाचे आहे. मध्ययुगानंतर अवतरलेल्या काळात अवतरलेल्या आधुनिक काळात आधुनिक मराठी साहित्य व नवकथा-साठोत्तरी मराठी साहित्यातील दलित-ग्रामीण आदिवासी-स्त्रीवादी इ. महत्त्वाच्या नवप्रवाहांनी दिलेल्या योगदानाची कल्पनाही आपल्याला आहे. या प्रवाहात समर्थ साहित्य निर्माण होऊ लागल्याने या प्रवाहांच्या स्वत:च्या अस्तित्वाचे भान जाणवू लागले. त्यांचे व्यवच्छेदकत्व व वेगळेपण जाणवू लागले. त्या त्या अंगाने विविध वाङ्मयप्रकार व आकृतिबंध विकसित होऊ लागले. त्यांची समीक्षा होऊ लागली व वाङ्मयेतिहासात त्यांना स्थान मिळू लागले. त्याप्रमाणे वऱ्हाडी / नागपुरी, अहिराणी, कोकणी यांच्यासारख्या बोलीतही साहित्यनिर्मिती होऊ लागली. त्यांची स्वतंत्र साहित्य संमेलनेही होऊ लागली.

मराठी व फार्सी यांच्या संयोगाने निर्माण झालेल्या 'दक्खिनी' साहित्याचा प्रवाह यादव काळापासूनच नामदेवांच्या 'दक्खिनी' पदांच्या रूपाने महाराष्ट्रात वाहत होता; तो आजही महाराष्ट्रातील मुसलमानांत मौखिक रूपांत व दक्खिनी लोकसाहित्याच्या परंपरेने रूढ आहे. बार्शीच्या डॉ. कुन्ता जगदाळे यांनी संपादिलेल्या मुस्लीम स्त्रियांच्या दक्खिनी ओव्यांच्या ग्रंथाचे प्रकाशन मी गतवर्षीच केले होते. त्याचप्रमाणे विदर्भातील मलकापूरच्या रुक्मिणीबाई पाटील यांच्या 'वैदर्भी बहिणा' या ग्रंथाला मी नुकतीच प्रस्तावना लिहिली असून, तो ग्रंथही गतवर्षी प्रकाशित झाला आहे. गेल्या डिसेंबर २०११ मध्ये नाशिकला भरलेल्या चौथ्या अ. भा. अहिराणी साहित्य संमेलनाच्या समारोपीय सत्राचा मी प्रमुख अतिथी होतो. या बोलीतही समृद्ध साहित्याची निर्मिती होत आहे.

अलीकडे अ. भा. जैन, ख्रिस्ती, वीरशैव, मराठा, मुस्लीम मराठी साहित्य संमेलने होऊ लागली आहेत. तो तो प्रदेश व त्या प्रदेशाची भाषा एक असली तरी त्यात विविध धर्मांच्या, जातींच्या, पंथांच्या, आर्थिक स्तरांच्या लोकांची जीवनशैली, समस्या, व्यथा-विवंचना, अपेक्षा, आशा-आकांक्षा, धार्मिक चालीरीती-प्रथा व त्यामुळे त्यांच्या जीवनावर होणारे परिणाम इ. अनेक बाबी वेगवेगळ्या असू शकतात; आणि अशी विविधता असूनही त्या प्रदेशातील या प्रवाहांनी मिळून जो समाज सिद्ध होतो, त्यात अनेक बाबी समानही असतात. त्या प्रदेशाच्या साहित्यात खरेतर या सर्वच बाबींचे प्रतिबिंब उमटायला हवे पण असे होणे तितकेसे शक्य नसते. उदा. स्त्री म्हणून सर्वच स्त्रियांचे काही प्रश्न समान असले तरी मुस्लीम, जैन, वीरशैव, ख्रिस्ती धर्मांच्या व धनगर, कोष्टी इ.

## डॉ. यु. म. पठाण

जातींच्या स्त्रियांचे प्रश्न वेगवेगळे असू शकतात; तरीही व्यापक अर्थाने हे सर्व घटक त्या प्रदेश विशेषातील समाजाचे घटक असतात व तेथील भाषेच्या साहित्यात त्यांच्या समाज जीवनाचे प्रतिबिंब/चित्र त्या प्रदेशाच्या प्रातिनिधिक भाषेत उमटत असते. याचा अर्थ असा की या दृष्टीने प्रदेश - विशेषातील समाजात व्यवच्छेदकत्वही असते नि एकत्वही असते. या व्यवच्छेदकत्वामुळे त्या सामाजिक घटकाच्या साहित्यातही वेगळेपण असते व त्यामुळेच त्यांना वेगळे अस्तित्वही प्राप्त होते. जैन मराठी साहित्य संमेलन, ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलन, वीरशैव मराठी साहित्य संमेलन अशी संमेलने होण्यामागील संकल्पना हीच असली तरी त्यात 'सवता सुभा' आहे, त्या 'वेगळ्या चुली' आहेत, असे मानायचे कारण नाही कारण ही संमेलने एका व्यापक अर्थाने अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचेच विविध घटक आहेत. त्यात या सर्वांना एकदम स्थान मिळत नाही पण क्रमाक्रमाने प्रत्येकाला स्थान मिळायला हवे, अशा आशयाचे विचार मी २२ वर्षांपूर्वी पुण्याला १९९० साली झालेल्या त्रेसष्टाव्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले होते. दलित, ग्रामीण, आदिवासी साहित्य संमेलनांचाही मी या संदर्भात उल्लेख केला होता. अ. भा. मुस्लीम मराठी साहित्य संमेलनाच्या बाबतीतही माझी हीच भूमिका आहे. वर उल्लेखिलेल्या बहुतेक संमेलनांत मी आवर्जून सक्रिय सहभागही घेतला आहे. 'विविधतेत एकता' (Unity in diversity) हे तत्त्व तर आपल्या देशाच्या व भारतीय साहित्याच्या संदर्भातही स्वीकारलेले आहेच.

महाराष्ट्रातील मुस्लीम समाजाच्या मराठी साहित्याचे अस्तित्व व वेगळेपण मला गेल्या पाच दशकांपासून जाणवले. ते मला प्रथम जाणवले ते महाराष्ट्रातील मुस्लीम (सुफी) संतांच्या मराठी साहित्यामुळे तसेच दक्खिनी साहित्यामुळे नि त्यांच्या एकात्मतावादी त्यांच्या भूमिकेमुळे. त्यात वजीरुलमुल्क मुंतोजी, मुंतोजी बामणी ऊर्फ मृत्युंजय, चांद बोधले, शेख महंमद, शहामुनी आलमखान यांच्यासारखे दिग्गज होते. त्यांच्या मौलिक साहित्याविषयीचा सविस्तर विचार करणारा माझा ग्रंथ नुकताच म. रा. साहित्य संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केला आहे. सगनभाऊंसारखे प्रख्यात शाहीर होते. पुढच्या आधुनिक काळात मराठी वाङ्मयात महाराष्ट्रातील मुसलमानांच्या वास्तव जीवनाचे व त्यांच्या समस्यांचे, सुखदु:खांचे चित्रण तर राहोच पण जे उल्लेख (तेही अपवादात्मक) आले होते तेही बिचारे नगण्य... ड्रायव्हर, क्लीनर, गडी इ. असे तुरळक कथा-कादंबऱ्यांतील किरकोळ पात्रांच्या रूपात वावरत असत. १९४७ ते १९५९ या काळात मी जवळपास दोन-अडीचशे कथा लिहिल्या, त्या नियतकालिकांत प्रसिद्धही झाल्या, काही नवकथा लिहिल्या. त्या सत्यकथा-अभिरुची-वाङ्मयशोभा, किर्लोस्कर-स्त्री-मनोहर यांसारख्या मासिकांतून प्रसिद्ध झाल्या. त्यांचे दोन-तीन संग्रह तरी मला सहज प्रसिद्ध करता आले असते पण मी ते केले नाहीत; कारण, मला असे जाणवले की ते कथासंग्रह केव्हाही प्रसिद्ध करता येतील, त्यासारखे जीवनचित्रण मराठी वाङ्मयात होतच आहे पण ज्या मुस्लीम समाजात मी जन्मलो व जे जीवन मी बारकाईने पाहिले, ते अजूनही दुर्लक्षितच आहे; तेही महाराष्ट्रातल्या सामाजिक जीवनाचा अपरिहार्य व अविभाज्य भागच असून त्याचे प्रतिबिंबही मुस्लीम लेखक आपल्या लेखनात चांगल्या प्रकारे उमटवू शकतील. ते यासाठी पुढे यायला हवेत. त्यानंतर आजपर्यंतच्या काळात मी ज्या कथा लिहिल्या-अगदी गेल्या 'एकमत'च्या दिवाळी अंकापर्यंत-



त्या याच जीवनासंबंधी आहेत. हे अचानक घडले नाही, तर त्यामागे माझे नियोजन होते. या कथांचे 'जितराब' व 'हवेली' हे संग्रह प्रसिद्ध झाले असून, अजून किमान एक तरी संग्रह प्रसिद्ध होईल. मीच नव्हे, तर अनेक मुस्लीम लेखकही या काळात लिहीत होते. एहतेशाम देशमुख हे यातले एक महत्त्वाचे नाव.

अशा प्रकारचे अनेक लेखक हळूहळू पुढे येत होते पण त्यांना संघटित रूप नव्हते. मराठी वाङ्‌मयाच्या एका लक्षणीय प्रवाहाचे रूप आले नव्हते व ते यायला हवे होते.

कसे आहे हे मुस्लीम जीवन, त्याचे प्रातिनिधिक स्वरूप कसे आहे.

कमालीचे दारिद्र्य, अगतिकता, अज्ञान, दूरदृष्टीच्या नेतृत्वाचा अभाव, गरीब बिचारी कुणी हाका ही अवस्था, (सर सैयद अहमद व डॉ. झकेरिया, दलवाई वगळता) मार्गदर्शन करणाऱ्या वैचारिक नेतृत्वाचीही गरज, राजर्षी शाहू - डॉ. आंबेडकर - महात्मा फुले यांच्यासारखे महापुरुष न लाभल्याने आलेली दिशाहीनता व भिंगुळवाणेपण, शिक्षणाचा अल्प प्रसार, काही प्रमाणातले मूलतत्त्ववादी पुरोहितत्त्व व त्यांचे कालबाह्य 'फतवे', प्रारब्धवाद, परावलंबित्व, शासकीय कल्याणकारी व शिक्षणविषयक योजनांची माहितीच नसणे व मुस्लीम पुढाऱ्यांनी ती नीटशी न करून देणे, नवाबशाही-सरंजामशाही - खानदानीपण कोसळल्यावर झालेली दुरवस्था, निरक्षरता, परंपरावाद, अंधश्रद्धा - परावलंबित्व, अंडी, पान, पावबटर - खेळणी, फुगे विकणे, फळांच्या हातगाड्या - यांसारख्या चिल्लर व्यवसायातून एकवेळची सालन - रोटीही न मिळणे, कुपोषण, बालकामगारी, व्यसनाधीनता, बेभरवशाची मोलमजुरी, जातीय दंग्यांचे दुष्परिणाम, कुटुंबनियोजनाविषयीचे अज्ञान तलाकपीडित स्त्रियांची फरपट, मतदानाचे महत्त्व - कायदा व नागरिकत्वाचे हक्क यांच्याविषयीचे घोर अज्ञान, अनेकदा अकारण लादले जाणारे पाकधार्जिणेपण, दिशाहीन स्थिती, भविष्याचे तर राहोच पण वर्तमान दु:स्थितीचेही नसलेले भान अशा रहाटगाडग्यात व दुष्ट चरकाच्या चक्रव्यूहात पिचल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील मुस्लीम समाजाचे चित्र आजदेखील मराठी साहित्यात उमटले आहे का? सच्चर कमिशन किंवा साडेचार टक्के आरक्षण किंवा ओबीसीच्या काही सवलती देऊन शासन या समाजाच्या उन्नतीसाठी पावलं उचलू लागलं की काही निर्दय जातीयवादी याविरुद्ध कोल्हेकोई सुरूच करतात, याला काय म्हणावं? दलित समाजासारखं विद्रोहाचं भानही या समाजाला अजून आलं नाही; कारण, हा समाज अजून बाबासाहेबांसारख्या, जोतिबांसारख्या दिशादर्शकांची वाटच पाहात बसला होता. वेदना ही आस्तित्वाचा शोध घ्यायलाही प्रवृत्त करते; आणि साहित्य हेही या शोधांचं एक परिणामकारक माध्यम असतं. अशा प्रकारच्या जाणिवा मुस्लीम समाजातल्या युवक साहित्यिकांतही निर्माण होऊ लागल्या. ते आपण होऊन कथा, कविता, काहीसं आत्मकथनपर व वैचारिक लेखनही करू लागले. याला महाराष्ट्रातील ग्रामीण व दलित साहित्याची चळवळही प्रेरक व उपकारक ठरली; कारण, मुस्लीम समाजही या अन्य घटकांबरोबर त्याच समाजात राहत होता. अनेक गावांत खेडोपाडी मुस्लिमांच्या वस्त्या शेजारीच होत्या व आजही आहेत. शहरातल्या झोपडपट्ट्यांत तर ही घरं शेजारी-शेजारीच आहेत. शेतकाम करणारे मुस्लीम वा हिंदू सालकरी यांत कुठला भेद आहे?

मुस्लीम सत्यशोधक चळवळीनंही ही मरगळ झटकून टाकण्याचा चांगला प्रयत्न केला. एहतेशाम देशमुखसारखे कथाकार मुस्लीम जीवनाविषयीच्या कथा लिहू लागले. मुबारक शेख शहाजिंदे, राही, सैयद अल्लाउद्दीन, इलाही जमादार, खावर, ए. के. शेख, डॉ. मिन्ने यांसारखे कवी व गझलकार लेखन करू लागले. हुसेन जमादार, रजिया पटेल, प्रा. बेन्नूर, जावेद पाशा, डॉ. नदाफ, अब्दुल कादर मुकादम यांचं एतद्विषयक वैचारिक लेखन प्रसिद्ध होऊ लागलं. 'मुस्लीम मनाचा कानोसा' यासारखी सदरं मराठी दैनिकांत प्रसिद्ध होऊ लागली. उदय टिळक आणि विलास सोनवणे यांच्यासारखे अन्य धर्मीय व मुस्लिमांविषयी - मुस्लिमांच्या मराठी साहित्यविषयक चळवळीविषयी आस्था असणाऱ्या विचारवंतांनी उभारी दिली व या चळवळीत सक्रिय सहभागही घेतला. १९९० मध्ये सोलापूरच्या प्रा. बेन्नूर, प्रा. नदाफ, नल्लामंदू यांच्यासारख्या तरुणांनी या चळवळीला रूप दिलं व पहिलं अ. भा. मुस्लीम मराठी साहित्य संमेलन सोलापूरला झालं. त्याचं अध्यक्षपद मला स्वीकारण्याची विनंती त्यांनी केली होती; पण, मी त्याच वर्षी जानेवारीत पुण्याच्या त्रेसष्टाव्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झालो होतो. तरुण मुस्लीम साहित्यिकांना असे सन्मान मिळावेत व त्यांना प्रोत्साहन मिळावं, अशी माझी त्या वेळेपासून भूमिका होती व ती आजही आहे. मी या संमेलनांमध्ये नियोजन, उद्‌घाटन - समारोप - चर्चासत्रं इ. कोणत्याही कार्यक्रमात सहभागी जरूर होईन, पण अध्यक्षपद मात्र कधीच स्वीकारणार नाही; कारण, ते या तरुण मुस्लीम साहित्यिकांचं श्रेय आहे, असं सांगून कवी प्रा. फ. म. शहाजिंदे यांना पहिल्या अ. भा. मु. म. साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद दिलं व त्याचं उद्‌घाटन मी केलं. अशा संमेलनांनी मुस्लीम मराठी साहित्याची चळवळ जोम धरू लागली. सोलापूरव्यतिरिक्त रत्नागिरी, औरंगाबाद इ. ठिकाणी झालेल्या संमलेनांत मी सहभागी झालो होतो. औरंगाबादच्या इ.स. २०१० मध्ये झालेल्या आठव्या अ. भा. मुस्लीम मराठी संमेलनाला संपूर्ण महाराष्ट्रातून प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. सांगली-कोल्हापूरचे तर तीन-तीनशे प्रतिनिधी आले होते. उद्‌घाटन पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील व समारोप उच्च शिक्षणमंत्री ना. राजेश टोपे यांनी केला. शासनानं आपण होऊन पाच लाखांचा निधी जाहीर केला. त्या वेळी पारित झालेल्या ठरावांत पुढील ठरावही होते :

१. अशा प्रकारचं अनुदान शासनानं अ. भा. वीरशैव मराठी साहित्य संमेलन, अ. भा. जैन मराठी साहित्य संमेलन, ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलन वा तत्सम अन्य मराठी साहित्य संमेलनांनाही द्यावं.

२. उर्दू शाळांत मराठी विषय अनिवार्य करून त्यासाठी चांगले प्रशिक्षित मराठी शिक्षक नेमावेत.

महत्त्वाच्या वाङ्‌मयीन ठरावांबरोबरच वरील ठरावही पारित झाले होते.

गझलकार डॉ. मिन्ने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनाच्या 'मऱ्हाठवाणी' या स्मरणिकेत हे मुस्लीम मराठी साहित्यिकांचं वैचारिक तसंच ललित लेखनही प्रसिद्ध झालं व समाजाच्या अभ्युदयाचा व विविध समस्यांचा विचार करणारे व उपाय सुचविणारे लेखही प्रसिद्ध झाले. संमेलनाला अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. ठालेपाटील, सुप्रसिद्ध कवी विठ्ठल वाघ, संमेलनाचे मार्गदर्शक व विचारवंत विलास सोनवणे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. 'इतरांच्या या पापांचे ओझे आम्ही किती दिवस वाहायचे?' यासारखे परिसंवाद त्याचप्रमाणं महाराष्ट्रातील मुस्लीम समाजाच्या अन्य समस्यांवर विचार करून उपाय सुचविणारी चर्चासत्रं झाली, मुस्लीम त्यात या समाजाच्या व्यथावेदनांचा व आजच्या स्थितीचा विधायक विचार करण्यात आला.



मुस्लीम मराठी सूची संतकवी व आजचे मुस्लीम मराठी साहित्यिक यांच्याविषयीचा अनुल्लेख वा उपेक्षा, त्यांच्याविषयीचा काही संशोधकांचा व समीक्षकांचा चुकीचा पूर्वग्रह, या समाजाच्या आजच्या प्रखर समस्या व त्यावर उपाययोजना, मुस्लीम मराठी साहित्यिकांचा एकात्मतावादी, समन्वयवादी व देशप्रेमी तसंच भारताविषयी अढळ निष्ठा बाळगणारा दृष्टिकोन, दूरदृष्टीच्या विधायक व सकारात्मक भूमिकेचा पुरस्कार इ. बाबींविषयी मी प्रदीर्घ मुलाखतीत माझे विचार मांडले. मुस्लीम समाजाबरोबर अन्यधर्मीय समाजही या संमेलनास मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. संमेलन अत्यंत शांतपणे पार पडलं.

अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलनाध्यक्षाची निवड आजवर कुठलीही निवडणूक वाद न होता सर्वसंमतीनं व सन्मानपूर्वक झाली. आजवर झालेल्या अ. भा. मुस्लीम मराठी संमेलनांपैकी एका संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. जुल्फी शेख या महिला प्राचार्य होत्या व त्याही एकमतानचं निवडल्या गेल्या होत्या. त्याचप्रमाणं औरंगाबादच्या आठव्या संमेलनास मुस्लीम लेखिका व कवयित्रीही मोठ्या संख्येनं उपस्थित होत्या, याचा मला विशेष उल्लेख करावसा वाटतो. महाराष्ट्रातील मुस्लीम जीवनाचं व मुस्लिमांच्या मराठी साहित्यातील विविध लेखन प्रकारांचं त्याचप्रमाणं राष्ट्रनिष्ठेचं होतं. त्यांच्या उत्साहाचं हे दर्शन निश्‍चितपणे आशादायक, राष्ट्रीय प्रवृत्तीचं नि एकात्मतेचं द्योतक आपण मराठी साहित्याचेच एक अपरिहार्य व अविभाज्य घटक आहोत, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात आपल्याला सहभाग मिळायला हवा ही भूमिका, दहशतवादाचा प्रखर विरोध या साऱ्याच बाबी अत्यंत आश्‍वासक व आशादायक होत्या. त्यांत समरसतेचं नाटक वा कुठल्याही अन्य समाजाविषयीचा त्रागा नव्हता; मात्र, आपल्या व्यथावेदनांचं निराकरण व्हावं भारतीय नागरिक म्हणून आपल्याला गुण्यागोविंदानं जगता यावं, आपल्या समाजाचाही योग्य तो विकास व्हावा व आपली चौफेर प्रगती व्हावी, याविषयीची आस्था जरूर होती.

गतवर्षी डॉ. मिन्ने यांच्या अध्यक्षतेखाली अ. भा. मुस्लीम मराठी साहित्य व सांस्कृतिक संस्था स्थापन झाली. तिनं सांगली येथे अ. भा. मुस्लीम मराठी साहित्य संमेलन आयोजित केलं होतं. त्यांचे अध्यक्ष श्री. जावेद पाशा होते. प्रमुख अतिथी म्हणून मला निमंत्रित केलं होतं; पण, अपरिहार्य कारणास्तव मी जाऊ शकलो नाही. महाराष्ट्रातील राज्य सांस्कृतिक कार्यमंत्री व कॅबिनेटमधील काही मंत्री महोदय उपस्थित होते. हे संमेलन जरी वेगळ्या संस्थेनं भरविलं तरी तो औरंगाबादच्या संमेलनाच्या पुढचा टप्पा होता व त्याला संपूर्ण महाराष्ट्रातून प्रचंड प्रतिसादही मिळाला. चर्चा, परिसंवाद, कविसंमेलन, महत्त्वाचं अध्यक्षीय भाषण त्याचप्रमाणं 'दक्खिन दरवाजा' या मुस्लीम मराठी साहित्यिकांच्या विविधतापूर्ण ललित व वैचारिक साहित्यानं समृद्ध असलेली कलात्मक स्मरणिका प्रसिद्ध झाली. मुस्लीम मराठी साहित्य चळवळ, उशिरानं का होईना, महाराष्ट्रात रुजली. हा वेलू आता गगनाला भिडणार, यात शंका नाही.

**संपर्क : ९८२३९१३१७७**

# विवेकाधिष्ठित संतसाहित्य

संतसाहित्यानं आपल्याला काय दिलं, हा प्रश्न कधी कधी आजच्या काळाच्या संदर्भात आपल्याला त्रस्त करतो. हे साहित्य केवळ निवृत्तिवादी आहे, ते आता कालबाह्य झालं आहे, त्याला आजचा कुठलाच संदर्भ नसल्यानं आज ते अनावश्यक आहे, त्यातून वर्णावर्णांच्या भिंती अधिक पक्क्या झाल्या, ते विषमतावादाचा वा श्रेष्ठकनिष्ठत्वाचा पुरस्कार करतं, त्यातून पोथीप्रामाण्य आणि कर्मकांडाचा बडिवार माजवला गेला आहे, त्यातील भाषा ही मध्ययुगीन भाषा असल्यानं ते काहीसं दुर्बोध वाटतं, असे किती तरी आक्षेप घेतले जातात आणि हे साहित्य आजच्या काळात कसं अनावश्यक आहे, हे सांगितलं जातं. मी यापूर्वी केलेल्या विवेचनात यातील काही प्रश्नांची उत्तरं मिळतील, पण संतसाहित्य हे कालबाह्य झालं आहे काय? या मताचा इथं आवर्जून विचार करायला हवा. संतसाहित्य – मग ते कोणत्याही जाती-धर्मांचं असो, जनहिताचं उद्दिष्ट ही त्याची अपेक्षित फलश्रुती असल्यानं, त्याचप्रमाणं लौकिक आणि पारलौकिक यांच्या समन्वयाची भूमिका त्यात असल्यानं, काही उदात्त जीवनमूल्यांचा वा जीवनादर्शांचा ते पुरस्कार करतं. उदात्त विचार आणि उदात्त आचार यांचा समन्वयही त्यात आढळतो. सामाजिक जीवनाचं संतुलन यामुळं साधता येतं. बंधुभावाच्या तत्त्वामुळं समाजातले सारे घटक समान आहेत, ही जाणीवही निर्माण होते. वेद, कुराण, बायबल, धम्मपद, महावीरांचं किंवा बसवेश्वराचं वचन-साहित्य तसंच गुरुग्रंथसाहेब यातही याचा प्रत्यय आल्यावाचून राहात नाही. गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनीही आपल्या कीर्तनांतून याच विचाराचा प्रसार करून समाजप्रबोधन केलं नाही काय? विकार हेच आपल्या व आपल्या समाजाच्या अध:पतनास कारणीभूत असल्यानं विकारांवर नियंत्रण ठेवण्याचा, दुर्गुणांचा त्याग करून सद्गुणांचं संवर्धन करण्याच्या विचाराचा पुरस्कार संतसाहित्यानं सातत्यानं केला आहे. आजच्या समाजात दुर्गुणांचा, अविचाराचा, भ्रष्टाचाराचा, पराकोटीच्या स्वार्थाचा, भयानक हिंसेचा, कमालीच्या असहिष्णुतेचा, विषयासक्तीचा, अविचाराचा व क्रोधाचा आपल्याला पदोपदी प्रत्यय येत नाही काय? ही भयानक परिस्थिती निर्माण होण्यामागं समाजातील षड्विकारच कारणीभूत नाहीत का? दैवी संपत्तीवर आज आसुरी संपत्ती वर्चस्व गाजवीत असल्याचं आपल्याला जाणवत नाही काय? भावाभावात, घराघरात, गावागावात, राज्याराज्यात कलह निर्माण झाल्याचं आपण पाहात नाही का? आणि हे सारं असंच घडत गेलं तर आपल्या देशाचं काय होणार, ही चिंता प्रत्येक दिवसाची पहाट उजाडल्यावर आपल्याला भेडसावत नाही काय? या सर्वांवर नियंत्रण ठेवण्याचा नेमका उपाय संतसाहित्यानं सुचविला आहे आणि तो आहे मनावर नियंत्रण ठेवणं नि मनावर सुसंस्कार करणं. विवेकाची कास धरणं. संपूर्ण संतसाहित्य हे विवेकाधिष्ठित आहे. विवेकनिष्ठ जीवनदृष्टीचा पुरस्कार संतसाहित्यानं सातत्यानं केला आहे. संतसाहित्याचे हे सुसंस्कार जनमानसावर केल्यास आजच्या या प्रलयकालातही समाजाची नि देशाची नौका तरून जाऊ शकेल, असं म्हटलं तर ते अप्रस्तुत ठरू नये.

**– डॉ. यु. म. पठाण**

(पुणे – १९९०, अध्यक्षीय भाषणातून)





# तो सुंदर प्रवास...

शेवटी मित्राच्या आग्रहामुळे अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मी उभा राहिलो. खरेतर, एक दिवस मी अशी निवडणूक लढवेन असा विचार मी स्वप्नातही केला नव्हता. अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर निवडणूक सहज जिंकून जाऊ असे वाटत होते. पुढे एक-एक दिवस पुढे जाईल तशी निवडणूक कठीण होऊ लागली. सुरुवातीला वाटत होते, की निवडणूक फारफार तर दुरंगी अथवा तिरंगी होईल; पण, प्रत्यक्षात ती सातरंगी झाली. दोघांचे अर्ज अवैध ठरल्यामुळे ती पंचरंगी झाली. निवडणुकीच्या रिंगणात मी उतरलो होतो. माघारीचे दोरही कापले होते. लढण्याशिवाय पर्यायच नव्हता. निवडणुकीसाठी मी अक्षरश: महाराष्ट्र पिंजून काढला.

राज्यभर विखुरलेला माझा मित्रवर्ग, वाचकवर्ग आणि चाहतावर्ग मदतीसाठी पुढे आला. माझ्यासाठी या सर्वांनी प्रचंड कष्ट घेतले. प्रचार काळातच गावोगावी माझे सत्कार होऊ लागले तसा माझा आत्मविश्वास वाढू लागला. प्रचार काळात कोणत्याही उमेदवारावर आरोप-प्रत्यारोप करायचे नाहीत अथवा कोणत्याही उमेदवाराची निंदा-नालस्ती करायची नाही असे मी ठरविले होते. शेवटपर्यंत ते कटाक्षाने पाळले. याचा अर्थ माझ्यावर वार झाले नाहीत असे नाही. पण, ते सर्व मी आनंदाने स्वीकारले. कधीही खुलासा अथवा प्रतिखुलासा केला नाही. मीच निवडून येणार असे माझ्या भोवतालचे वातावरण व माझे अंतरमन सांगत होते आणि घडलेही तसेच. मतापासून, वयापर्यंत माझ्या निवडणुकीत विक्रमच विक्रम झाले.

निवडून आल्यानंतर काय करायचे हा सर्वांत मोठा प्रश्न माझ्या समोर होता. त्याबाबतचा विचारही काही प्रमाणात मी मित्रमंडळीशी चर्चा करून अगोदरच केला होता. (१) महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि बाहेरही प्रचंड प्रमाणात फिरायचे होते. (२) रेंगाळलेल्या वाचक चळवळीला गती देण्याचा प्रयत्न करायचा होता. (३) तरुणांमध्ये वाचनप्रेम निर्माण व्हावे यासाठी त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात मिसळायचे होते. (४) गरीब असलेल्या ज्येष्ठ साहित्यकांच्या औषधोपचारासाठी निधी गोळा करायचा होता. (५) कर्नाटकसह अन्य राज्यात जेथे जेथे मराठी वाचक आहेत तेथे तेथे जायचे होते.

खरेतर, ही माझ्या अध्यक्षपदाची विषयपत्रिका होती. ठाण्यात ८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले. या संमेलनात मी माझी विषयपत्रिका मांडली आणि तिला प्रतिसाद मिळाला. साहित्यिकांना मदत करण्यासाठी अनेक हात पुढे आले. दौऱ्यासाठी असंख्य निमंत्रणे आली. साहित्याचा केंद्रबिंदू माणूसच असायला हवा आणि साहित्यिकाला पाठीच्या कण्याप्रमाणे त्यांची म्हणून एक भूमिकाही असायला हवी. या माझ्या भाषणाचे कौतुकही झाले. संमेलनाच्या प्रारंभी 'नथुराम गोडसे' यांच्या निमित्ताने कटू प्रसंगही निर्माण झाले. याबाबतची माझी ठोस भूमिका मी व्यक्त तर केलीच शिवाय ठामपणे या घटनेचा निषेधही केला. पुढे संमेलन प्रचंड प्रतिसादात व्यवस्थित पार पडले

## उत्तम कांबळे

याचा आनंदही झाला. संमेलन काळात मला प्रचंड तणावातून जावे लागले हेही येथे नोंदवायला हवे.

संमेलनानंतर अध्यक्षाला त्याची विषयपत्रिका अंमलात आणण्यासाठी कोणतीही व्यवस्था आजपर्यंत तयार झाली नाही. अध्यक्षाला जे काही करायचे असते ते स्वत:च्या आणि लोकांच्या पाठबळावरच. मी स्वत: खूप फिरलो. भटक्या जाती-जमातीपासून ते विद्यापीठापर्यंत अनेक ठिकाणी प्रवास केला. मराठी साहित्य, त्याची सद्य:स्थिती, त्याचे भवितव्य, मराठी भाषेचे भवितव्य, वाचक जागृती आदी गोष्टींवर भरभरून बोलत राहिलो. ग्रथांचा प्रचार-प्रसार व्हावा म्हणून सांगली, कोल्हापूर, नाशिक आदी ठिकाणी सत्कार समारंभात हार, तुरे, शालीऐवजी पुस्तके देण्याचे आवाहन मी केले. त्यालाही प्रचंड प्रतिसाद मिळाला. जमा झालेली सर्व पुस्तके आणि शाली कविवर्य नारायण सुर्वे वाचनालयास दिल्या. काही शाली खेड्यापाड्यांत आणि वसतिगृहात वाटल्या. ज्येष्ठ साहित्यिकांसाठी फार मोठा निधी जमा होऊ शकला नाही याची मला खंत वाटते. जो काही निधी जमा झाला त्याचे वाटप बेळगाव आणि पुण्यातील साहित्यिकांना केले. कुणाला तरी लोकांच्या सहकार्याने औषधोपचारासाठी मदत करू शकलो याचा मनस्वी आनंद झाला.

अध्यक्षपदाच्या काळात खूप चांगले अनुभव आले. मराठी साहित्य आणि भाषा यांच्यावर प्रेम करणारा खूप मोठा वर्ग महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर असल्याचे मला दिसून आले. भाषा संवर्धनासाठी राज्यभर आजही अनेक उपक्रम राबविले जात आहेत. यापैकी अनेक उपक्रमांना मी स्वत: हजर राहून पाठिंबा व्यक्त केला. गावपातळीपासून ते राज्यपातळीपर्यंत झालेल्या अनेक साहित्य संमेलनांना हजर राहिलो. वेगवेगळ्या वयोगटातील आणि प्रदेशातील लोकांशी जवळून संपर्क साधला. त्यांचे लेखन जसे समजावून घेतले तसे त्यांचे जीवनही समजावून घेतले. मराठी साहित्य लिहिणाऱ्या लोकांची संख्या खूप मोठ्या प्रमाणावर वाढते आहे हे लक्षात आले. या साऱ्या नवलेखकांसाठी सातत्याने मागदर्शन करणारी अजूनही परिणामकारक व्यवस्था आपल्याकडे नाही. त्याचबरोबर या सर्वांचे साहित्य प्रकाशित करण्याचीही खूप मोठी व्यवस्थाही नाही. अनेक नवलेखक स्वत:च्या पैशातून किंवा प्रसंगी कर्ज काढून आपापले साहित्य प्रकाशित करताना दिसतात. त्यांच्या या साहित्यावर चर्चा होत नाही किंवा हे साहित्य लोकांपर्यंत पोहोचतही नाही अशी परिस्थिती आहे. याबाबत ठोस काहीतरी घडायला हवे असे सातत्याने वाटत आले. वर्षभराच्या कालावधीत मी स्वत: अनेकांच्या ग्रंथ निर्मितीला प्रोत्साहन दिले. अनेकांना प्रस्तावना लिहून दिल्या, शुभेच्छा दिल्या त्याचबरोबर काही नवलेखकांच्या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहिलो. महाराष्ट्राबाहेर जो मराठी वाचक व लेखक आहे त्यांची अवस्था तर आणखीनच बिकट आहे.

त्यांना चांगली पुस्तके मिळणे, त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशन किंवा त्यांच्या संस्थांना असणारी आर्थिक मदत आदी अनेक गोष्टी दिवसेंदिवस गंभीर बनत चालल्या आहेत. या सर्वांना मदत करण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांचा सातत्याने अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रात शासकीय पातळीवर एखादा उपक्रम परिणामकारकरीत्या राबविण्याची गरज आहे.



याबाबतचा पाठपुरावा साहित्य संमेलनामध्ये आणि महाराष्ट्रातील अन्य संस्था व व्यक्तींनी करायला हवा. साहित्य संमेलनाचा अध्यक्ष शोभेची वस्तू असते असे सातत्याने म्हटले जाते. ते सगळेच खोटे आहे असे नाही. निवडून आल्यानंतर त्याच्याकडे एक वर्षाचा कालावधी असतो. तसा तो अपुरा असला तरी त्याला जे काही करायचे आहे, यासाठी मदत मिळण्याची कोणतीही व्यवस्था आपल्याकडे नाही. सारे काही त्याला स्वत:लाच उभे करावे लागते. तो जे काही उभे करेल ते पुढे चालू राहण्याची व्यवस्था नाही. अध्यक्षाकडे जो काही अनुभव असतो तो अनुभव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळापासून ते भाषा आणि साहित्य विषयक उपक्रमापर्यंत वापरता येऊ शकतो. पण, असा प्रयत्न आतापर्यंत कोणत्याही अध्यक्षांच्या बाबतीत झाला नाही. पुढे होईल की नाही माहीत नाही; परंतु, तो व्हावा अशीही माझी इच्छा आहे.

संमेलनाचा अध्यक्ष झाल्यामुळे मला मानसन्मान तर मिळालाच; पण, त्याचबरोबर महाराष्ट्रातील भाषा आणि संस्कृतीसाठी काम करणाऱ्या प्रवाहापर्यंत पोहोचता आले. माझ्या दृष्टीने मला मिळालेला हा सर्वांत मोठा आनंद आहे. काही दिवस तरी मी या सर्व उपक्रमाशी स्वत:ला जोडून घेऊ शकलो. साहित्य व संस्कृती याबाबत स्वत:ची मते जशी मांडू शकलो तशी राज्यभरातील अनेकांची मतमतांतरे ऐकू शकलो. खूप मोठा अनुभव मिळवू शकलो. आपला समाज नेमका कोणत्या दिशेने चालला आहे? तो साहित्यात कसा उतरतो आहे? त्यांचा परिणाम काय होतो आहे? हे मी पत्रकार म्हणूनही पाहात होतो. पण, संमेलनाचा अध्यक्ष म्हणून तो अधिक मोठ्या प्रमाणावर पाहू शकलो. उद्याचे लेखक म्हणून ज्यांच्याकडे मोठ्या आशेने पाहता येईल असे अनेक जण मला वर्षभरामध्ये दिसले. असे लोक महानगरातच नव्हे, तर ते खेड्यापाड्यांतही आहेत. झोपडपट्ट्यांमध्येही आहेत अन् आदिवासी भागामध्ये तर आहेतच आहेत. प्रश्न आहे तो या सर्वांच्या पंखात बळ भरण्याचा. मला जेवढे शक्य होते तेवढी ऊर्जा मी काहींना देऊ शकलो. ऊर्जेच्या प्रतीक्षेत अजूनही खूप मोठा समूह आहे. याची जाणीव मला आहे. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हे कोणतेही सत्ताकेंद्र नसते याची मला जाणीव होती. आयुष्यात एका मोठ्या गोष्टीचा अनुभव म्हणून मी या पदाकडे पाहत होतो. स्वत:ला अधिक विस्तारण्यासाठी, माणूस अधिक जवळून पाहण्यासाठी या पदाचा उपयोग व्हावा असे मला वाटत होते. त्या बाबतीत मी थोडा फार यशस्वी झालो.

वर्षभराचा हा कालावधी, मी भरभरून अनुभव घेण्यासाठी वापरला. भविष्यातही मला या मोठ्या अनुभवाचा उपयोग होईल याची मला खात्री आहे. थोडक्यात, माझ्या बाबतीत 'तो प्रवास सुंदर होता' एवढेच मी म्हणू शकतो..!

**(शब्दांकन : फारुख बागवान)**

माहिती सहाय्यक, पंढरपूर.

**संपर्क : ९८८१०९९१४३**

# जिवंत लिखाण

भिन्न परिसरांतील लेखकांनीही एक साहित्यिक पथ्य पाळणे अवश्य आहे हेही या संबंधात नमूद केले पाहिजे. त्यांनी केवळ महाराष्ट्रातील लेखनाच्या नकला करण्याचा प्रयत्न करू नये. ज्या भूमीत आपण राहतो, वावरतो, त्या भूमीचे वैशिष्ट्य आत्मसात करून एक आगळे मराठीपण उभे करण्याचा त्यांनी ध्यास घेतला पाहिजे. मराठी भाषा आणि साहित्य दोन्ही त्यामुळे अधिक समृद्ध होतील. पूर्वी निजामाच्या राजवटीतील बी. रघुनाथ यांनी जे केले आणि आज हैदराबादेतील ए. वि. जोशी जे करीत आहेत, किंवा पूर्वी माळव्यातील भालचंद्र लोवलेकरांनी जे केले आणि आज धारवाडचे जी. ए. कुलकर्णी जे करीत आहेत त्यांचा आदर्श या लेखकांनी पुढे ठेवला पाहिजे. अजमेरात राहून शिवाजीपार्की किंवा सातारी गोष्ट लिहून भागणार नाही. ती अजमेरची, तिच्या परिसराची गोष्ट झाली पाहिजे. तिकडच्या भूमीत रुजून, बहरलेली गोष्ट झाली पाहिजे. हे असले जिवंत लिखाण मग सर्वांनाच हवेहवेसे होईल.

**– पु. शि. रेगे**

**(वर्धा – १९६९, अध्यक्षीय भाषणातून)**





# उत्सव नको, कृतीची गरज

डॉ. गंगाधर पानतावणे

भारतात अनेक भाषांची साहित्य संमेलने भरतात; परंतु, मराठी साहित्य संमेलनाची सर त्यांना येत नाही. कालची मराठी साहित्य संमेलनांनी खूपसे कौटुंबिक स्वरूप होते. साहित्यिक मर्यादित होते आणि संमेलनात बडेजावपेक्षा साहित्यविषयक प्रश्नांची आस्था अधिक होती. साहित्यिकांबरोबरच, विविध क्षेत्रातील माणसे, संस्थानिकसद्धा आत्मीय जाणिवेने सहभागी होत. मराठी भाषा आणि साहित्य यांचा संसार नेटका असावा या प्रेमापोटी भरणारी त्यावेळची साहित्य संमेलने आणि साहित्य संमेलनांचे अध्यक्ष बडेजावात गुंतून पडत असत. पण, अहिस्ते अहिस्ते संमेलनांचा विस्तार होत गेला आणि स्वातंत्र्योत्तर काळातील संमेलनांना गर्दीचे स्वरूप आले आणि या गर्दीचे रूपांतर जत्रेत केव्हा झाले हे कळलेसुद्धा नाही. लेखकांची, प्रकाशकांची आणि संमेलन संयोजकांचीही संख्या वाढली. आणि वेगवेगळी वळणेसुद्धा.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने केवळ महाराष्ट्रातच नाहीतर महाराष्ट्राबाहेर, अगदी भारताच्या राजधानीतही भरली. पण, साहित्य संमेलनांना जसजशी प्रचंड गर्दी व्हायला लागली तसतशी सतत गर्दीत वावरणारी आणि गर्दीचा सोस असणारी मराठी राजकारणी मंडळीही, या संमेलनांकडे वळू लागली. वेगवेगळ्या राजकीय पक्षांतील नेत्यांनी साहित्य संमेलनातील आयोजनात नको तितका रस दाखविला आणि अलीकडल्या काळात साहित्यिक किंवा साहित्यिक संस्थांपेक्षा कोणत्या कोणत्या राजकीय नेत्यानेच साहित्य संमेलन भरविण्यासाठी पराकाष्ठा केल्याचे प्रत्ययाला येते. त्यामुळे स्वाभाविकच साहित्य संमेलनाची उद्‌घाटने किंवा स्वागताध्यपद कोणत्या तरी राजकीय पक्षाच्या नेत्याकडे गेल्याचे दिसून येते. त्यामुळे एक लाभ झाला असावा. आर्थिक सोयी उपलब्ध होऊ शकल्या. श्रीमंत संमेलने घडू लागली. त्यामुळे अनेक राजकारण्यांना पक्षीय प्रतिष्ठा दुणावता आली. व्यक्तिगत दबदबाही निर्माण करता आला. आणि खूप काही.

पण, साहित्य संमेलनात मराठी भाषा आणि साहित्य यासंबंधीचे काही नवे उपक्रम वा प्रकल्प निर्माण करत आहे का? मराठीत अगणित बोली आहेत. त्या बोलींच्या संदर्भात सांस्कृतिक सामाजिक दृष्टीने अभ्यास, संशोधन आणि नंतर प्रकाराने याबाबतीत काही क्रियाशील पावले टाकता आली का? केवळ शासनानेच हे केले पाहिजे यापेक्षा साहित्य संमेलन संपल्यानंतरचा उरलेला निधी या कामी उपयोगात आणायला हवा, यासाठी मराठीतील भाषाशास्त्र संवाद आणि त्या त्या बोलींच्या जाणकारांवर ही जबाबदारी सोपविता आली नसती का? पण, तसे दिसत नाही. साहित्य संमेलन संपल्यानंतर उरलेल्या निधीचे नेमके काय होते, हे तपशिलाने बाहेर येणे गरजेचे आहे. साहित्य संमेलनाची घोषणा झाली की, निवडणुका आणि लोकशाहीच्या मार्गाने गदारोळ अपरिहार्यपणे होतो. अध्यक्ष यासंबंधीची चर्चा नेहमीप्रमाणे होते. हे खरेच आहे की, निवडणुकीच्या गदारोळामुळे अनेक साहित्यिक अलिप्त राहिले, हे असे का व्हावे? विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद सन्मानपूर्वक दिले जातेचना! करंदीकर, कुरुंदकर, महानोर, इंदिरा संत, रा. चि. ढेरे यांची आठवण आम्हाला झालीच नाही. रा. चि. ढेरे यांच्यासारख्या महान संशोधकांचा गौरव करण्याची संधी आम्ही गमावू नये. त्यासाठी घटना बदलावी आणि एकमताने महान साहित्यिकाचा सन्मान व्हावा.

एकेकाळी मराठी साहित्य-संमेलने एका विवक्षित होती. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक नवीन वाङ्मयीन प्रवाह आले. तळागाळातील, राना-डोंगरातील साहित्यिक व्यक्त होऊ लागला. अव्यक्त व अलक्षित अनुभव साहित्यात आले. परंतु, दलित ग्रामीण आदिवासी साहित्याची जेवढ्या प्रमाणात दखल घ्यायला हवी होती तेवढ्या प्रमाणात घेतली गेली नाही. या साहित्यनिर्मात्यांना बोटावर मोजण्याइतके अपवाद वगळता निमंत्रितही केले जात नाही. त्यांचे साहित्य मराठीच आहे हे लक्षात घ्यायलाच हवे. त्यातील अनेक लेखकांची पुस्तके भारतातील आणि जगातील अनेक भाषांत गेली आहेत, हे नाकारता येणार नाही. मग, स्वतंत्रपणे भरणाऱ्या दलित, ग्रामीण, आदिवासी साहित्य संमेलनांना नावे ठेवण्यात काय अर्थ आहे? ही संमेलन अतिशय गांभीर्याने भरविली जातात. अस्मितादर्श साहित्य संमेलन भरविले जाते. विद्रोही साहित्य संमेलन भरविले जाते. फुले-आंबेडकर साहित्य संमेलने भरविली जातात. येथे जत्रा नसतात. येथे साहित्य, समाज, संस्कृती या विषयानुरोधाने चर्चा, परिसंवाद घडविले जातात. वैचारिक मंथन होते. आशयगर्भ परिवर्तननिष्ठ कवी संमेलने होतात. मराठी साहित्याला मध्यमवर्गीय कोशातून बाहेर काढण्याचे आणि नवे वाङ्मयीन बियाणे रुजवून साहित्याच्या कक्षा रुंदावण्याचे व्यापक करण्याचे ही संमेलने कार्य करीत आहेत. आणि विशेष म्हणजे ही साहित्य संमेलने शासकीय अनुदानाशिवाय, लोकाश्रयावर होत आहेत. 'अस्मितादर्श'च्या साहित्य संमेलनात तर नवे-जुने साहित्यिक कोणतीही अपेक्षा न राखता सहभागी होतात.

अस्मितादर्श साहित्य संमेलन १९७४ सालापासून अखंडपणे भरत आहे. या संमेलनात अ. भा. मराठी साहित्य संमेलनात नसलेले दोन विशेष कार्यक्रम आयोजिले जातात. १. शोधानिबंध वाचन व चर्चा आणि २. लेखक-वाचक मुक्त संवाद.

मला वाटते की, सर्व साहित्य संमेलने पूर्णत: उत्सवी न होता त्या कार्यशाळा झाल्या पाहिजेत. साहित्य चर्चा, साहित्य समीक्षा आणि संशोधन यावर पूर्ण नसली तरी मोठ्या प्रमाणात भर देणारी असली पाहिजेत. मराठी भाषा संपणार आहे, अडचणीत आहे असे वारंवार तारसप्तकात सांगणाऱ्या विद्वज्जनांनी हे लक्षात ठेवायलाच पाहिजे, की आता महाराष्ट्रातील अनेक मूक समाज बोलू लागले आहेत, लिहू लागले आहेत. त्यांची साहित्य संमेलने समृद्धपणे भरू लागली आहेत. ग्रामीण भागातील अनेक बोलीतील साहित्य साजिवंत आहे. म्हणून मराठी भाषेला आणि साहित्याला मुळीच मरण नाही. मध्यमवर्गीय आक्रोश थांबायला हवा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. जोतिबा फुले, आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे यांचे विचारधन जोवर जिवंत आहे तोवर मराठी भाषेच्या मरणाचा विचार कोणी करू नये.

**संपर्क : ९४२२२०५१८७**



# उत्सवाकडून देखाव्याकडे...

दिनकर गांगल

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर दरवर्षी दोन-पाच कोटी रुपये खर्च होतो. त्यास तीन दिवसांत पंधरा ते पंचवीस हजार रसिक हजेरी लावतात. सुमारे दीडशे कवी-लेखक-समीक्षक-समाजचिंतक वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. ज्या गावी संमेलन होते तेथे तीन दिवस धूम माजते. मुंबई-ठाणे-पुणे याबाहेर संमेलन झाले तर गावभर उत्साह संचारला असल्याचा विशेष प्रत्यय येतो. गंमतीदार व उद्‌बोधकही विसंगती अशी, की एवढ्या मोठ्या सांस्कृतिक घटनेचा प्रभाव नंतर जराही जाणवत नाही. फक्त ज्या संस्थेमार्फत संमेलन भरते तेथील पदाधिकाऱ्यांची लगबग हिशोब मिटविणे, कार्यक्रमांच्या आढावा घेणे वगैरेसाठी काही महिने चालू राहते. नगरच्या १९९७ च्या संमेलनापासून तीन दिवस झालेल्या कार्यक्रमांचे जसेच्या तसे वृत्तांत छापणे व ते ग्रंथरूपाने प्रसिद्ध करणे अशी डॉक्युमेंटेशनची पद्धत सुरू झाली. गेल्या पंधरा वर्षांत चार-पाच संमेलनांचेच असे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. 'असं घडलं संमेलन' हा मा. य. गोखले यांनी संपादित केलेला ठाणे संमेलनाचा ग्रंथ अलीकडेच प्रकाशित झाला आहे. त्या संमेलनाची ती एका अर्थाने सांगता होय. दरम्यान, नव्या संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके हे निवडलेही गेले आहेत.

साहित्य संमेलनाचे पूर्वीचे नाव 'ग्रंथकार संमेलन.' तसे पहिले संमेलन भरून एकशे चौतीस वर्षे उलटून गेली आहेत, परंतु प्रत्यक्षात संमेलने झाली फक्त चौऱ्याऐंशी. खरेतर, तो छोटा साहित्यिकांचा व साहित्यरसिकांचा मेळावा असायला हवा. जसा डॉक्टरांचा, इंजिनीयरांचा, अगदी इतिहास संशोधकांचा भरतो तसा. त्यात साहित्यविषयक प्रश्न चर्चिले जायला हवे. पूर्वी काही प्रमाणात तसे घडतही असे. परंतु, साहित्य संमेलनाचे स्वरूप १९७४ पासून बदलले. त्यावर्षी पु. ल. देशपांडे संमेलनाचे अध्यक्ष होते. संमेलन इचलकरंजीला झाले. त्यावेळी प्रथम संमेलनाला दहा हजारांच्या आसपास लोक जमले. त्यावर्षी प्रथमच दूरदर्शनने अध्यक्षांच्या भाषणापासून सर्व कार्यक्रम सविस्तर दाखवले. संमेलनात 'कॅमेरा सेट अप' वगैरे मोठे ग्लॅमर होते आणि पुलंची त्यावर अचूक नजर होती. ते रास्तही होते.

इचलकरंजीच्या पाठोपाठ कऱ्हाड येथे १९७५ साली संमेलन भरले. तेथे दुर्गा भागवत अध्यक्ष होत्या. मुख्य म्हणजे देशात आणीबाणी होती. भागवत यांनी आणीबाणीविरुद्ध प्रखर भूमिका घेतली होती आणि त्यामुळे संमेलनाबद्दल वेगळे औत्सुक्य तयार झाले होते. त्यावेळी साहित्याबरोबर अन्य क्षेत्रांतील मान्यवर मंडळी संमेलनास उपस्थित होती. माझ्या शेजारी चित्रपट दिग्दर्शक गोविंद निहलानी येऊन बसल्याचे आठवते.

या दोन्ही संमेलनांचे प्रत्यक्षत: वा पर्यायाने आश्रयदाते यशवंतराव चव्हाण होते. परंतु, त्यांच्या थोरवीला तुल्यबळ ठरतील आणि साहित्यप्रेमापुरते बोलायचे तर सरस ठरतील असे वि. स. खांडेकरांपासून ना. धों. महानोरांपर्यंतचे साहित्यिक त्यावेळी अस्तित्वात होते. महानोर प्रकाशात आले तेच इचलकरंजीच्या संमेलनात व लगेच उच्च वर्तुळात विराजमान झाले. अशा मान्यवर बऱ्याच साहित्यिकांच्या उपस्थितीमुळे चव्हाण व त्यांचा गोतावळा कोणाला फार खटकला नाही. चव्हाण स्वत:देखील उत्तम वाचक व साहित्यप्रेमी होते आणि त्यांची ऊठबस साहित्यिक मंडळींत असे. कराडला चव्हाण यांचा आणीबाणीसंदर्भात प्रतीकात्मक निषेध झाला. ती छाया संमेलनावर सतत राहिली.

किंबहुना, त्यानंतर काही वर्षे साहित्य संमेलनातील राजकारण्यांची उपस्थिती हा मुद्दा वादाचा होत राहिला. पण, त्यांच्याविना संमेलन भरवण्याची धमकदेखील दाखवली जात नाही. त्यामुळे काहीतरी पळवाटा काढून राजकारण्यांना संमेलनात आणले जाते. साहित्य वाचन मुख्यत: मध्यमवर्गात होई. त्या मध्यमवर्गात राजकारण या विषयाबद्दल चर्चाबहुत असली तरी राजकारण्यांबद्दल नफरत असते. आणीबाणी, जनता पार्टीचा प्रयोग यामुळे मध्यवर्गीयांमधील राजकारणविषयक तिरस्काराला वैफल्याचे रूप आले. त्यामधून साहित्यिक-कलावंत विरुद्ध राजकारणी असे द्वंद्व सतत उभे केले गेले. त्यामधे राजकारणातील अनाचार वाढत आहे असे जेव्हा पराकोटीने वाटू लागले तेव्हा १९८१ साली एकदाच समांतर साहित्य संमेलन भरवले गेले. पण, माधव गडकरी यांच्यासारखे लोकाभिमुख नेतृत्व असूनदेखील हे संमेलन जेमतेम दीड दिवस आणि तेदेखील कॉलेजच्या छोट्या मैदानात घडून आले. 'चतुरंग', 'ग्रंथाली' या संस्थांचे वार्षिक मेळावे एवढे भरतच असतात. साहित्यिकांनी कोणतीही गोष्ट स्वत:च्या पूर्ण ताकदीनिशी करायची म्हटली तर ती जास्तीत जास्त मोठी समांतर साहित्य संमलेनाएवढी होऊ शकेल असा मापदंड तयार झाला!

इकडे, मुख्य साहित्य संमेलने वर्षानुवर्षे विस्तारत गेली. संमेलनास गर्दी होणे ही सामाजिक प्रक्रिया बनली, कारण साक्षर समुदाय वाढत होता. मग, गर्दी जमवण्यामध्ये गावोगावी अहमहमिका सुरू झाली. लेखक-कवींना देखील ती गर्दी आवडत होती. जिल्ह्याजिल्ह्यात राजकीय पुढारी निर्माण झाले होते, त्यांच्यापुढे आदर्श यशवंतराव चव्हाण, शरद पवार यांचा होता. त्यांना विविध साहित्यकलांना आपला आश्रय असावा असे रास्तपणे वाटू लागले. आणि नकळतपणे, साहित्यसंमेलनाची सूत्रे तथाकथित साहित्यबाह्य व्यक्तींकडे गेली. संमेलने ज्यांच्यामार्फत भरवली जातात त्या साहित्य महामंडळाला केवळ मानाचे स्थान राहिले आहे. त्यांनाही राजकारणी अथवा अमिताभसारखे नट यांच्याबरोबर थोडा लोकप्रियतेच्या चर्चेत असण्याचा वाटा मिळतो.

साहित्य संमेलनाचे आजचे स्वरूप दिसायला, त्यामध्ये वावरायला लोभस असते. संमेलनातील दोन-अडीच दिवस सामाजिकदृष्ट्या साक्षात्कारी असू शकतात. त्यामध्ये साहित्यचर्चेचा वाटादेखील योग्य प्रमाणात असतो. एरवी, छोटा कुंभमेळा वाटावा अशी अरुप गर्दी संबंध संमेलन परिसरात जाणवते. साहित्य विषयक कार्यक्रमांना, पुस्तक व चित्रप्रदर्शनांना लोक ओढीने भेट देत असतात.

कराडच्या संमेलनात (२००३) श्री. पु. भागवत यांची मुलाखत ऐकायला मंडपात दोन ते तीन हजार लोक बसलेले पाहून मी थक्क झालो होतो. पण हे सारे विलोभनीय असते.

साहित्य संमेलनातील कार्यक्रमांचे स्वरूप गेल्या तीस-चाळीस वर्षांत ठरून गेले आहे.



कार्यक्रमांमध्ये चर्चा विषय व वक्ते यांच्या नावांमध्ये बरीच विविधता असते. प्रादेशिक तोल नीट सांभाळला जातो, पण कल्पकतेच्या व आशयाच्या दृष्टीने फार काही हाती लागत नाही. तसेच, त्यांच्या सादरीकरणाच्या पद्धतीत नवीनता आणली जात नाही. नव्या माध्यमांचा फारसा उपयोग होत नाही. ठाण्याच्या संमेलनात एक दिवस चित्रपट संमेलन भरवावे असे त्या क्षेत्रातील मंडळी सुचवत होती. अक्षराच्या जागी चित्रांची भाषा येणार आहे तिची वेळीच दखल घेऊ असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या सततच्या आग्रहाला प्रतिसाद म्हणून संमेलनात दोन चित्रपट दाखवले गेले आणि एक चर्चा घडवून आणली गेली. कार्यक्रमांना कर्मकांडाचे स्वरूप संयोजक व वक्ते यांच्याकडून दिले जात आहे.

पुलं जिथे जात तिथे सर्व गोष्टींवर त्यांची हुकूमत चाले. त्यांनी इंचलकरंजीच्या संमेलनात कार्यक्रमाचा उत्तम पॅटर्न ठरवून दिला होता. मुख्य मंडपात कथाकथन, काव्यवाचन व मनोरंजनाचे मोठे कार्यक्रम होत, त्यावेळी बंदिस्त खोल्यामंध्ये साहित्यविषयक प्रश्नांवर गटवार चर्चा चालू असत. त्यामुळे त्या संमेलनात अनेक चांगले मुद्दे वेगवेगळ्या पातळ्यांवर उपस्थित केले गेले. अर्थात, काळही तशा चर्चांना अनुकूल होता.

कार्यक्रम संयोजनाची ही ठेवण नंतर कधी जमली नाही, त्यामुळे संमेलनांचे स्वरूप उत्सवी राहिले. त्या पलीकडे साहित्य व्यवहार या दृष्टीने संमेलनाचे फलीत काय? तर 'जवळ जवळ काही नाही' असेच उत्तर येते. स्वाभाविकच मग एवढा खर्च कशासाठी करायचा, असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचेही उत्तर 'गणेशोत्सव कसा केला जातो' यासारख्या प्रश्नांशी येऊन भिडते. गणेशोत्सव घरात असेल तर 'कुटुंबीयांची देवावरील निष्ठा व त्यांची खर्च करण्याची ऐपत' असे उत्तर येईल आणि गणेशोत्सव सार्वजनिक असेल तर 'कार्यकर्त्यांची हौस' असे उत्तर येईल. साहित्य संमेलन सार्वजनिकरीत्या भरवले जाते. संयोजकांपैकी महामंडळाकडे नियमावली व त्याच्या पदाधिकाऱ्यांचे मानपान यापलीकडे काहीच औत्सुक्य नसते. जी स्थानिक संस्था संमेलन भरवते तिच्याकडे हौसेचे कार्यकर्ते असले की संमेलन धडाक्यात पार पडते.

महामंडळातील ताण महाबळेश्वरच्या संमेलनापासून प्रकर्षाने ध्यानी आले. त्याआधी सांगलीला छोटा स्फोट घडून आला. संमेलनाचे माजी अध्यक्ष अरुण साधू पदाची सूत्रे न देता निघून गेले. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत तो वाद झाकला गेला. महाबळेश्वरला नियोजित अध्यक्ष आनंद यादव यांच्याशिवाय संमेलन पार पडले! या दोन्ही प्रसंगांचे खापर महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष ठाले पाटील यांच्यावर फोडले जाते. ते काही प्रमाणात सत्य असले तरी महामंडळाची विदर्भ शाखा तेव्हापासून असंतुष्ट आहे व त्यांची समजूत केंद्र समिती घालू शकलेली नाही. महामंडळात ती धुसफूस सतत चालू असते. तथापि, वाद तडीला न्यावे अशी ईर्षा व ऊर्जादेखील महामंडळात राहिलेली नाही. महामंडळ, त्याच्या घटक संस्था आणि संमेलन भरवणारी स्थानिक संस्था हे जे नातेसंबंध आहेत ते केव्हातरी कोलमडून पडतील अशी भीती वाटते.

ते टिकण्याचे खरे कारण आहे, की जोपर्यंत अर्थपुरवठा होत आहे तोपर्यंत या तिन्ही संस्थांची मंडळी आपापले हितसंबंध साधत एकत्र नांदत असतात. अर्थपुरवठ्यामधील मोठा वाटा सरकारचा असतो. त्या बीजावर बाकी भांडवल उभे राहते.

यामध्ये संमेलनाध्यक्षाचा हितसंबंध फार गमतीदार आहेत. त्याने फक्त संमेलनात येऊन मिरवायचे असते आणि त्याच्या आगेमागे वर्षभर महाराष्ट्रात सर्वत्र फिरून सत्कारच्या शाली गोळा करायच्या असतात. नारायण सुर्वे १९९५ साली परभणीला संमेलनाध्यक्ष होते. त्यांचा संपर्क आधीपासूनच साऱ्या महाराष्ट्रभर. त्या वर्षात ते फिरफिर फिरले. त्यांनी म्हणे दोनशे शाली गोळा गेल्या व त्या गरिबांना वाटून टाकल्या. त्यांनी त्या काळात व त्याच्या आधीदेखील ठिकठिकाणी नवोदित लेखकांना छान मार्गदर्शन केले. त्याबद्दल नंतर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतील मनोगतांमध्ये व अर्पणपत्रिकांमध्ये दखल घेतल्याचे दिसून येते. संमेलनाध्यक्षाला त्या पदी निवडून जाण्यात रस असतो तो संमेलनाच्या एवढ्या मोठ्या व्यासपीठावरून आपली भूमिका मांडता येते म्हणून. अलीकडे झालेल्या अध्यक्षांमध्ये अरुण साधू, आनंद यादव, द. भि. कुळकर्णी, उत्तम कांबळे आणि चंद्रपूरच्या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष वसंत आबाजी डहाके हे साहित्य विषयक पक्की भूमिका असलेले साहित्यिक आहेत ही समाधानाची बाब होय. त्यामुळे संमेलनाच्या उत्सवात काहीतरी प्राण दिसून आला. ज्यांना भूमिका नसते असे लेखक अध्यक्षपदी मिरवण्यात रमतात.

संमेलनाचे अर्थकारण हा नेहमी वादाचा मुद्दा येतो. अलीकडच्या काळात नागपूर येथील संमेलन त्यातल्या त्यात काटकसरीने पंच्याहत्तर लाख रुपयांत घडून आल्याचे ऐकले. एरवी संमेलनाचा खर्च दोन कोटी रुपयांपर्यंत जातो. तो संमेलनाचे स्वरूप पाहता समर्थनीय आहे. मात्र, साहित्यविश्व आपल्या हिमतीवर एवढी रक्कम उभी करू शकत नाही. साहित्यविश्वाने तसा प्रयत्न १९८१ साली केला आणि समांतर संमेलन भरवले. त्या संमेलनामधून साहित्यिकांचा सन्मान तीस वर्षांनंतर बिंदूरूपाने देखील राहिलेला दिसत नाही. संमेलने स्वायत्त व्हावी म्हणून वसुंधरा पेंडसे नाईक यांनी दुर्गा भागवत यांच्या प्रेरणेने मोठा निधी उभा करण्याचा संकल्प सोडला. तो निधी अर्धवट पडून आहे. वार्षिक मराठी साहित्य संमेलन बांडगुळाप्रमाणे प्रस्थापित विश्वावर अवलंबून आहे. लेखक वर्ग स्वत:चा मान स्वत: सांभाळू शकत नाहीत हे स्पष्ट झाले आहे. उत्सव ही कार्यकर्त्यांची हौस आहे. त्यामुळे संमेलने हौस आहे तोपर्यंत होत राहतील. लेखकांनी त्यांच्या प्रतिभासामर्थ्यांतून निर्माण होणारा हा जो साहित्योत्सव आहे तो कुतूहलाने पाहावा, जमल्यास त्यात तीन दिवस रमावे आणि साहित्यसंस्था हा उत्सव घडवून आपल्याच प्रतिभासामर्थ्यांचा गौरव करत आहेत याबद्दल कृतज्ञ असावं.

कधी कधी, कार्यकर्त्यांकडून थोडी अधिक अपेक्षा बाळगावी असे वाटते, कारण हे कार्यकर्ते आम समाजातील नसतात, साहित्यप्रेमी असतात, सुसंस्कृत असतात, एका मोठ्या परंपरा असलेला साहित्यसंस्थेशी जोडले गेलेले असतात. साहित्य संमेलन सामाजिक प्रक्रिया म्हणून सर्वसमावेशक होत असताना संमेलनातील संस्कृतिमूल्य जपले जाईल याची काळजी कार्यकर्त्यांनी घ्यायला हवी. संमेलनाला गेल्या कित्येक वर्षांपासून हेतुशून्यता येत आहे एवढ्या मोठ्या सांस्कृतिक घटनेत निरर्थकता शिरली तर मग आपल्या सुसंस्कृततेला अर्थ काय याचा विचार महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि संमेलन संयोजक साहित्यसंस्थेच्या कार्यकर्त्यांनी करायला हवा. विशेषत: तंत्रज्ञान प्रभावाच्या सद्य:काळात साहित्याची गरज व साहित्याचा संस्कार या संबंधात मूलभूत मांडणी होण्याची आवश्यकता वाटते. याचवेळी अध्यक्षाला त्याची भूमिका मांडण्यापलीकडे संमेलनाचे व्यासपीठ साहित्यविषयक मूलभूत विचारमंथनासाठी कसे उपयोगात आणता येईल याचा विचार व्हायला हवा. तरच संमेलनास सार्थकता लाभेल अन्यथा संमेलनास सध्याच उत्सवाचे स्वरूप आले आहे, ते आणखी मर्यादित होऊन देखाव्यापुरते राहील!

**संपर्क : ९८६७११८५१७**




# साहित्यसंमेलनाचे औचित्य

प्रा. रा. ग. जाधव

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अलीकडे परदेशांतही प्रतिवर्षी योजिले जात आहे. यंदाचे ८५ वे संमेलन चंद्रपूर येथील पुढील महिन्यात साजरे होईल. यांखेरीज साहित्य महामंडळाच्या पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर व इतर घटकसंस्था आपापली संमेलने आयोजित करीत असतातच. शिवाय महाराष्ट्रातील अनेक साहित्य संस्था, साहित्यप्रेमी मंडळे, कविमंडळे तथा उद्योजक, कामगार-वर्ग, ग्रामीण जन, आदिवासी, स्त्रीवादी संमेलनेही होत असतात. एवढेच नव्हे, तर ख्रिस्ती, मुस्लीम, जैन यांसारख्या धर्मांचे मराठी साहित्यप्रेमी कार्यकर्ते संमेलने भरवीत असतात. गुराख्यांचेही संमेलन होते. या संमेलन-व्यूहाचे वास्तव लक्षात घेतले, तर संमेलनाचे औचित्य हा विषय काहींना काहीसा अप्रस्तुत वाटण्याची शक्यता आहे. मला या तथाकथित अप्रस्तुत विषयांसंबंधीच काही विचार मांडावयाचे आहेत.

कोणत्याही प्रगत समाजाला सण-उत्सवांची, सार्वजनिक समारोहांची नैसर्गिक गरज असते. समाज केवळ पोटापाण्याच्या आकांक्षेवर जगत नाही. समाजाला काहीएक सामाजिक उत्सवपीठ हवे असते, समाजातील खूप लोक ज्याभोवती जमा होतील, एकत्र येतील, असे काहीएक निमित्त हवे असते. त्यामुळे समानबंधत्वाचे नातेच केवळ दृढ होते आहे नाही, तर समाजीवनातील अनेक प्रकारचा वेगवेगळेपणा दूर होऊन एकमेकांशी असलेला सारखेपणा लोकांच्या प्रत्ययास येतो. ही समाजमनाची अंगभूत गरज असते, सामाजिक नात्याची एकता पटणे-पटविणे इष्ट असते. समाज केवळ भाकरीवर जगत नाही, समाजाला जगण्यासाठी व्यक्तीप्रमाणेच समूहजीवनाच्या प्रचितीची गरज असते. अशी गरज संमेलने, उत्सव, जत्रा, इत्यादींमुळे भागली जाते. अगदी समाजशास्त्र घेतले, तरीही त्यात समाजाच्या संघटित स्वरूपाचे विश्लेषण करताना सामाजिक मनोरंजनाचा, मेळाव्यांचा घटक अपरिहार्यपणे लक्षात घ्यावा लागतो.

अर्वाचीनपूर्व काळात म्हणजे मध्ययुगात धर्मांच्या, तीर्थांच्या, साधुसंतांच्या, पुराणकथांच्या आधारे उत्सव साजरे होत. देवादिकांच्या जयंत्या पार पाडल्या जात. आपल्या समाजात कुलदेवतांचे उत्सवही साजरे होत व होतात, संमेलन-उत्सवांचे हे मध्ययुगीन लोण आधुनिक काळातही चालू आहे, फक्त मध्ययुगीन समाजस्थिती आता चालू नाही. आधुनिक काळ बदलला, नवा समाज घडू लागला, या समाजाच्या विरंगुळ्याच्या, उत्सवाच्या आकांक्षा वाढू लागल्या. मध्ययुगाला देवादिकांचे, साधुसंतांचे उत्सव साजरे करण्याचा अधिकार होता, कारण देवदेवता व साधुसंत हे समाजातूनच समाजाने निर्माण केले होते. जे स्वत: निर्माण केले आहे, ते गरजेनुसार साजरे करण्याचा समाजाला जणू जन्मसिद्ध हक्कच आहे, असे म्हटले पाहिजे व या हक्काला कोणीही आक्षेप घेऊ शकत नाही. अगदी समाजविज्ञाने घेतली, तरी त्यांनाही समाजाची सार्वजनिक समारंभाची गरज व हक्क नाकारता येत नाही.

आता मध्ययुग संपून आधुनिक युग सुरू झाले आहे. या युगालाही स्वत:ची समारंभ-उत्सवाची निमित्ते शोधावी लागली, निर्माण करावी लागली. आधुनिक युगात महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव आला, शिवजयंतीचा उत्सव सुरू झाला, साहित्य संमेलने आली, दिवाळी अंकांचे सोहळे आले व त्यांनी मध्ययुगीन देवादिकांच्या, साधुसंतांच्या जोडीने नवे असे उत्सवांचे, समारंभाचे मार्ग शोधून काढले. अगदी धार्मिक स्वरूपाच्या उत्सवांनाही धर्मनिरपेक्ष असे व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला. तथापि, आधुनिक समाज हा प्राधान्याने इहवादी समाज आहे. त्याचा भर ऐहिक जीवनावर आहे, ऐहिक अभ्युदयावर आहे. त्यामुळे जे जे खास मनुष्यनिर्मित आहे, त्याचे उत्सव करण्याचा प्रयत्न समाज करीत आहे. सर्जनशील व्यक्ती ही समाजाचे अपत्य आहे. समाजशून्य पर्यावरणात ललित कला, साहित्य वगैरे सर्जनशील कला निर्माण होणे कठीणच! कला-वाङ्मयीन निर्मितीमध्ये समाजाचे अस्तित्व, वाटा व अधिकार यांना कळत-नकळत मूकसंमती दिलेलीच असते. म्हणून आधुनिक सर्जनशील कला-वाङ्मय-निर्मिती ही खरेतर, समाजाची, समाजासाठी आणि समाजातून होत असते.

हे जर खरे आहे, तर आपले कला वाङ्मयीन संचित उत्सवाचा, संमेलनाचा, साजरे करण्याचा विषय आहे व तसा तो करणे हा समाजाचा जन्मसिद्ध हक्क आहे. सेलिब्रेशनचे नवे आधुनिक विषय म्हणजे ललित कला व साहित्य आणि म्हणून साहित्य संमेलनाचा उत्सवही!

मराठी संमेलन आता शतक पूर्ण करून पुढे गेले आहे. यंदाचे संमेलन जरी ८५ वे असले, तरी १९७८ पासून सुरू झालेले लेखकांचे संमेलन हेच काही वर्षे वगळून साहित्य संमेलनात रूपांतरित झाले आहे.

या साहित्य संमेलनाचे स्वरूप विकसनशील राहून काळाशी सुसंगत असे बदलतही गेले आहे. आद्य लेखक संमेलन ते आजचे विश्व मराठी साहित्य संमेलन हा उत्क्रांतीचा टप्पा मोठा विस्मयकारकही आहे. साहित्य हे समाजाच्या संस्कृतीत मुरले आहे आणि खरेतर, समाजच साहित्याच्या संस्कृतीत मुरलेला आहे.

काही प्रामाणिक व गंभीर प्रकृतीचे साहित्यप्रेमी हे संमेलनाच्या उत्सवी स्वरूपाबाबत, या जत्रेबद्दल नाराजी व्यक्त करतात. त्यात गांभीर्य हवे असे त्यांना वाटते. साहित्यनिर्मिती ही एकांतीची असते व म्हणूनही संमेलनाची जत्रा किंवा उरूस होऊ नये, असे त्यांना वाटते. साहित्यविषयक गंभीर, अभ्यासपूर्ण चर्चा संमेलनातून व्हावी, अशी त्यांची अपेक्षा असते. असे काही प्रत्यक्षात होताना दिसत नाही, अशी त्यांची तक्रार आहे.

हा आक्षेप खरा आहे; पण, पूर्णपणे योग्य नाही. आपले साहित्यसंचित 'सेलेब्रेट' करण्याचा समाजाचा अधिकार मानला, तर हे जाणवते. उत्सवासाठी का होईना, पण त्यापायी मोठा समाज एकत्र येतो व समाजाला एकत्र आणणे हे त्याचे कर्तव्यही आहे. शिवाय साहित्यनिर्मिती एकांतात होते, समीक्षा एकांतात होते हे पूर्णत: खरे नाही. साहित्य व समीक्षा या दोहोंना एकांतातून लोकांताकडे व परत लोकांताकडून एकांताकडे यावे लागते. एकान्त व लोकान्त हा साहित्यनिर्मितीचा जणू मंत्रच आहे. ताटी लावून बसावे हे योग्यच; पण, ताटी उघडा हे सांगणारेही मुक्तावचन योग्य आहे. मराठीवरचा गंभीर आक्षेप तर हाच आहे की आपले



साहित्य ताटी बंद करूनच सारखे राहते, ते ताटी उघडून बाहेर येत नाही. असो.

आधुनिक मराठी वाङ्मय समृद्ध आहेच. शिवाय मध्ययुगीन वाङ्मयही गुणवत्तापूर्ण आहे. या सर्वांची डोळाभेट वर्षातून एकदा जनसामान्यांना घडते, ती साहित्य संमेलनातून! समाजात कुठे, केव्हा व कसा एखादा प्रतिभावंत उदयास येईल हे सांगता येत नाही. संमेलन हे सामान्यजनांचे एक वाङ्मयीन प्रेरणास्थान होऊ शकते. हस्तिदंती मनोऱ्यात राहणाऱ्या साहित्यिकांना कोण काय सांगणार? पण, चांगले साहित्य तथाकथित अडाणी माणसालाही कळू शकते. त्याची चिकित्सा नाही करता येणार त्याला हे खरे! चांगली कविता ऐकून ग्रामीण जनताही उत्स्फूर्त दाद देते. त्या जनतेत एखादा ज्ञानदेव, एखादा केशवसुत, एखादा मर्ढेकर असू शकतो ना? ही संधी संमेलनाच्या जत्रेतून लाभते.

संमेलनाच्या जत्रास्वरूपापासून त्याला आता अलग करणे कठीण तर आहेच; पण, योग्यही नाही. जनताजनार्दनाच्या हक्काचे सांस्कृतिक संचित तुम्ही त्यापासून बळजबरीने हिसकावून घेता असा त्याचा अर्थ होईल.

तुम्हाला साहित्याची गंभीर चर्चा हवी ना, अभ्यासक हवेत ना, त्यासाठी चचासत्रे आहेत, महाविद्यालये आहेत, विद्यापीठे आहेत, साहित्यसंस्था आहेत, साहित्यप्रेमी मंडळे आहेत, हे सर्व जण गंभीर वाङ्मयीन चर्चेचे कर्तव्य कितपत पार पाडतात? परवा साहित्य अकादमीतर्फे मराठवाडा साहित्य परिषदेने भरविलेल्या औरंगाबाद येथील चर्चासत्राला अत्यल्प प्रतिसाद मिळाला असे वृत्त वाचण्यात आले. ज्यांनी वाङ्मयाबद्दल गंभीर व्हायचे, तेच उदासीन होत आहेत. त्यांना कोण सांगणार आणि कोण ऐकणार? ज्यांनी गंभीर वाङ्मयीन चर्चा करावयाची, ते करीत काहीच नाहीत आणि ज्या संमेलनाचे उद्दिष्टच समाजाशी असलेला साहित्यबंध अधिकाधिक दृढ करावयाचा, त्याला अभ्यासू गंभीर चर्चेचे स्वरूप हवे, हे म्हणणे अवास्तव होईल असे वाटते.

मला वाटते, गंभीर असा खरा प्रश्न एकूणच जीवनविषयक गांभीर्याचा आहे. गांभीर्य कुठे आहे आज? समाज तंत्रवेडा, रंजनवेडा, पलायनवादी होत आहे. चार घटका करमणूक शोधत आहे. गांभीर्य कुठे आहे? राजकारणात की अर्थकारणात, की समाजकारणात, की धर्मकारणात, की तंत्रविज्ञानात, की मानव्य विद्यांत? जे आडातच नाही ते पोहऱ्यात येणारच कुठून? प्रत्येक जण 'मी' सोडून गांभीर्य कुठेच नाही असा दावा करीत आहे. चित्रलिपी जणू समाजाची! हे अवमानवीकरण (dehumanization) आहे की अस्तित्वादी परात्मता? माणूस माणूसपण हरवत चालला आहे. कधीकधी वाटते, साहित्यकलांची समाजातील भूमिका काय? त्यांची ध्येये काय? हेच पुन्हा चर्चाविषय करावा. पण, पुन्हा वाटते, कुणासाठी?

साहित्य संमेलनाचे उत्सवी स्वरूप हे एका मोठ्या सामाजिक आजाराचा एक घटक आहे. त्याचे विश्लेषण करावयाचे तर आरोपीच्या पिंजऱ्यात फक्त संमेलनालाच उभे करून चालणार नाही असे वाटते.

गंभीरपणे आपण आपले काम करीत राहावे, केव्हातरी उजाडेलच उजाडेल या श्रद्धेने एवढेच!

**संपर्क : ९४०४२२७२१५**

# नवे धुमारे

चातुर्वर्ण्याच्या नावाखाली रूढिग्रस्त धर्मकांडे, ईश्वरादी मंत्रांचा धाक, प्रारब्धाची आखणी व उच्चनीचतेचे भयानक ओझे वागवीतच आपला समाज वाट चालतो आहे. आजही तो त्यातून बाहेर पडलेला दिसत नाही. आजही धर्माच्या नावावर प्रगत मानवी मूल्यांना आव्हान दिले जाते ही किती शोचनीय घटना आहे! महात्मा फुल्यांनी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेसाठी मोठा लढा दिला व प्रचंड धडक मारली असताही हे सर्व ओझे आमच्या मानगुटीवर अद्यापही बसलेले आहे. त्याचा परिणाम मराठी साहित्यात असा झाला की, मध्यमवर्गीय लेखनातील निर्मितीचा एक प्रगत लहानसा विभाग सोडला तर एकूण साहित्याची मानसिकता वरील ओझ्याखाली वाकलेलीच राहिली. त्यांना स्वत:च्या वर्गापलीकडे कोट्यवधी माणसे विविध दु:खांनी गांजलेली होती हे दिसून आले नाही. गावकुसाबाहेरचा आमचा दलितबांधव, आदिवासी, शेतकऱ्यांतील विविध थर, शेतमजूर, उगवता कामगारवर्ग आणि मध्यमवर्गातील खालच्या थरात होत जाणारी परवड व त्या वर्गातील कामधंद्यासाठी बाहेर पडणारा महिला वर्ग हे सर्व सदैव साहित्याच्या क्षेत्राबाहेरच राहिले. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यांच्या संदर्भातही किती नावाजलेल्या कलाकृती निर्माण झाल्या आहेत किंवा त्यांनी त्या त्या कालखंडाचे विविधांगी चित्रण केले आहे व ह्या राजकीय प्रश्नांना सखोलपणे साहित्यात व्यक्त केले आहे, असे आढळत नाही. (अर्थात् या बाबतीत शरच्चंद्र मुक्तिबोध, विंदा करंदीकर यांच्यासारख्या काही मोजक्या साहित्यिकांचा अपवाद करावा लागेल.) हे असे का घडले याचाही पुनर्विचार करावा लागेल. तरीही हा सर्व नाडला गेलेला समाज धडक मारतच नव्हता, असे नाही. त्याची जगण्यासाठी लढाई चालूच होती. ही अशी जीवनमरणाची लढाई सदैव चालूच असते. मग, तुमचे वाङ्मय त्यावर लिहो न लिहो. तुमचे साहित्य ह्या वादळी संवेदनांची, संभावनांची आणि आक्रोशांची दखल घेवो अथवा न घेवो ही झुंज आदिम कालापासूनची आहे आणि तिचा इतिहास हाच खराखुरा मानवी प्रगतीचा इतिहास आहे.

हा आविष्कार आधुनिक काळात प्रथम कविता व कथांच्या रूपाने प्रकट झाला. त्यांच्या लेखनातील विषय, भाषा, मांडणी व एकूण वळण, त्यांनी आणलेले नवनवे धुमारे यांनी मराठी साहित्याचे वातावरण दुमदुमून गेले. मुख्यत: बाबुराव बागुलांच्या कथा, नामदेव ढसाळांच्या कविता, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, राजा ढाले, दया पवार, लक्ष्मण माने, योगीराज वाघमारे, केशव मेश्राम आणि विशेषत: प्रा. गंगाधर पानतावणे ह्यांच्या 'अस्मितादर्श'ने मराठी साहित्याला मोठेच योगदान दिले.

**नारायण सुर्वे**

**(परभणी – १९९५, अध्यक्षीय भाषणातून)**



# ह्याची गोष्ट करता आली असती तर...

...आणि बाकीचे सगळे ज्यांना दुरुस्त्या सुचताहेत, त्यांनी ते करावे. मला विचार होताहेत ते असे :

जिथे गाव तिथे रस्ता, तिथे एस. टी., तिथे ग्रामपंचायत, तिथे प्रशस्त, स्वच्छ सुंदर, पुस्तक संपन्न, मोफत, दिवसाचे अठरा तास उघडे ग्रंथालय-नको? हवे तर शेजारी स्वस्त चहाचे छोटे हॉटेल. शाळा ते विद्यापीठ इथे शिक्षण होते आणि समांतरपणे ग्रंथालयातून शिक्षण होते. स्वतःचा स्वतःच अभ्यास करायची, समजावून घ्यायची गोष्ट घडायला हवी. पानपट्टीवाले, टपरीवाले, छोटे दुकानदार, मजूर, तरुण, स्त्रिया, शेतकरी, राजकारणी, एकूणेक नागरिक ग्रंथालयात येताहेत, वाचक होताहेत, अशी गोष्ट घडायला हवी.

महाराष्ट्रातील श्रीमंत लोक ग्रंथालये निर्माण करण्यात पुढाकार घेताहेत, अशी गोष्ट घडायला हवी. वाचन करणे ही माणसाची नैसर्गिक क्रिया नाहीये जसे भूक लागणे, तहान लागणे इत्यादी. वाचन करणे हे कौशल्य आहे आणि ते कमवावे लागते, जसे पोहणे, ड्रायव्हिंग करणे, **भांगलणी** करणे इत्यादी. कोणतेही कौशल्य प्राप्त करण्यासाठी चिकाटी, तंत्रशिक्षण, ध्यान देणे, बुद्धी वापरणे हे गुण आवश्यक असतात. वाचनकौशल्य ह्याचे संशोधन व्हायला हवे. वाचनकौशल्य ह्यावर गोष्ट, कादंबरी, कविता, नाटक लिहिता येईल. आदर्श वाचक कोणीच असू शकत नाही. वाचलेले सगळे शंभर टक्के एकदम कळले पाहिजे असा हट्ट धरण्यात अर्थ नाही. कळेल तेवढे कळून घेत वाचन चालू ठेवायचे. कळत कसे जाते, ह्यावर संशोधन करता येईल, गोष्टही लिहिता येईल. वाचक होणे म्हणजे अभ्यासू होणे.

वाचनक्रियेत भाग घेणाऱ्या आणखी दोन गोष्टी असतात.

१) मजकुराला वाचनीयता असणे,

२) मजकूर समजावून देणारा असणे.

मराठीतल्या पुस्तकांना (सर्व प्रकारच्या) खरोखर किती वाचनीयता असते? वाचक वाचायला लागला की वाचतच राहू शकतो, असे होते का? वर्तमानपत्रातल्या मजकुराला किती वाचनीयता असते?

वाचनीयतेचे घटक काय असतात? ह्यांचे संशोधन होणे आवश्यक नाही का?

ह्यावर गोष्टही होऊ शकते.

मजकुराला शैली असते. शैलीनुसार अर्थ येतो. शैली ते अर्थ हे समजावून देणारे ते टीकाकार. जो अर्थ निष्पन्न होतो, त्या अर्थाची थोरवीही टीकाकार सांगतात. थोरवी ठरवणे हे ज्ञानमीमांसाचे काम असते. टीकाकार तत्त्वज्ञानी असावा लागतो. असे तत्त्वज्ञानी टीकाकार नसतील तर वाचक पोरके होतात. लेखक बेशिस्त होतात.

कोणत्याही समाजात बहुसंख्य नागरिक सेकंड क्लासचे असतात. म्हणून वाचक, लेख टीकाकार हेही सेकंडक्लासचेच बहुसंख्य असतात. ह्याला इलाज नसतो आणि ह्यावरून वाईट वाटून घ्यायची गरज नाही.


## श्याम मनोहर

सेकंड क्लासच्या नागरिकांच्या बाबतीत बौद्धिक ऊर्जा कमी आणि मानसिक ऊर्जा जास्त असे असते. मग त्यांना मौज, उत्सव, जत्रा टाईप करावे वाटते. मौज, उत्सव, जत्रा ह्याला हरकत का असावी? नकोच. सेकंडक्लास नागरिक बौद्धिक क्षेत्रात येतात आणि बौद्धिक क्षेत्रातही मौज, उत्सव, जत्रा करू लागतात, तेव्हा बौद्धिक क्षेत्र संकोचू लागते. आणि सेकंडक्लास नागरिक बौद्धिक क्षेत्रात फर्स्टक्लास नागरिक म्हणून वावरू लागतात, तेव्हा बौद्धिक क्षेत्र भ्रष्ट होते. शिवाय सेकंडक्लास नागरिकांच्यामधेही मानसिक समस्या निर्माण होतात. साहित्य हे बौद्धिक क्षेत्र आहे.

जे खरोखर बुद्धिमान, फर्स्टक्लासचे आहेत, त्यांना अशा समाजात अधिक जबाबदारीने वागावे लागते. सेकंडक्लासवाले फर्स्टक्लासवाल्यांशी जवळीक करून स्वतःला स्थान प्राप्त करून घेऊ पाहतात. फर्स्टक्लासवाले गाफिल होऊन सेकंडक्लासवाल्यांशी रमले तर मात्र भ्रष्टाचार वाढीला लागतो. फर्स्टक्लासवाल्यांनी डोळ्यांत तेल घालून सतत सावध राहायचे असते. ह्याचा अर्थ असा नाही की फर्स्टक्लासवाल्यांनी सेकंडक्लासवाल्यांना टाळायचे असते. आपल्या सगळ्यांना एकत्रच राहावे लागणार आहे. खरे तत्त्व तर असेच आहे की सगळ्यांवर प्रेमच करायला हवे. हे तत्त्व कृत्रिमपणे आचरणात आणले तर विदुषकीपणा होतो. हे तत्त्व व्यक्तिमत्त्वाचा, जगण्याचा नैसर्गिक भाग होणे ही अतितपश्चर्येची गोष्ट आहे. अशी तपश्चर्या करीत राहावे. त्यातलाच भाग म्हणून फर्स्टक्लासवाल्यांनी निष्ठेने सेकंडक्लासवाल्यांना थोर निर्मिती आपल्याकडून निर्माण होत नाही हे मान्य करण्यात स्वातंत्र्य आहे, हे सेकंडक्लासवाल्यांना शास्त्रीय पद्धतीने स्पष्ट करावे, करीत राहावे सेकंडक्लासवाल्यांबाहेर जगताना फर्स्टक्लासवाल्यांनी आपला एकांतवास जपावा, साधावा आणि फर्स्टक्लास निर्मिती करण्यातल्या वेदना स्वीकारव्यात. फर्स्टक्लासवाला हा फर्स्टक्लासला असतो आणि शंभर टक्केवाला नसतो, ही गोष्टही फर्स्टक्लासवाल्यांनी लक्षात घ्यायची असते. फर्स्टक्लासवाल्यांनी शोध घेण्याच्या प्रेरणेशी अत्यंत प्रामाणिक राहून कठोरपणे सेल्फ असेसमेंट करीत निर्मिती करावी. दुर्लक्षितपणा वाट्याला आला तर दुःखी व्हावे. त्यात शरमेची गोष्ट नाही.

फर्स्टक्लासवाल्यांनी आणखी एक करावे. चार फर्स्टक्लासवाले एकत्र येतातच. त्यांचे बेबी युनिव्हर्स निर्माण व्हावे, छोटे विद्यापीठ निर्माण व्हावे आणि त्यांनी थोर निर्मितीची लक्षणे आणि प्रत्यक्ष निर्मिती ह्यात पॅशनेटली गुंग व्हावे, अशी साताठ यंग स्कूल मोफत ज्ञान निर्माण करू शकतात.

अशी छोटी विश्वे लेखकांची टीकाकारांची तयार होतात, पण टिकत नाहीत असे दिसते. थोर निर्मितीचा शोध घेण्याच्या पॅशनवरून ध्यान ढळते, हे त्याचे कारण आहे. शिवाय आणखी एक कारण संभवते ते असे- थोर निर्मितीच्या लक्षणांबद्दलचे मुद्देच सुचत नसावेत, किंवा शोध घेण्याची पद्धत सापडत नसावी. आणि आपल्याला वाटते तेच बरोबर म्हणत निर्मिती करीत राहायचे. मग, एक गट फुटतो. दुसरा करायचा, तोही फुटतो; मग, तिसरा किंवा गटात एकमेकांची निर्मिती चांगली म्हणत राहायचे किंवा त्याचे मत वेगळे न् माझे वेगळे असे म्हणत राहायचे. असे तरुणपण जाते. निर्मितीचे रूळ पडतात. निर्मितीला सार्वकालिनता येत नाही.



लेखक संपतो– संपतो म्हणजे शरीरानेही संपतो. लेखकाच्या नातेवाइकांना पुढाकार घेऊन त्याची स्मरणे करायची वेळ येते. लेखकांबद्दल लिहिले जाते/बोलले जाते, त्यात तेच तेच मुद्दे येतात. नवे सापडत नाहीत.

फर्स्टक्लासवाल्यांनी स्वतःशी, इतरांशी फर्स्टक्लासवाला म्हणून जगावे आणि येईल तो प्रसंग अंगावर घ्यावा, स्वतःला सतत टेस्ट करावे. फक्त कायद्यासमोर नागरिकाप्रमाणे वागावे.

आता काही व्यावहारिक गोष्टीः

काही प्रकाशक कॉन्ट्रक्ट, रॉयल्टी ह्याबद्दल सैल असतात. प्रकाशक लेखकाकडून पैसे घेतात अशीही उदाहरणे बोलली जातात. ह्यावर काय करायचे?

पुस्तक छपाई, शुद्धलेखन, मांडणी ह्यात सुधारणांना खूप वाव आहे.

हे सगळे गोष्टीत लिहिता आले असते तर किती मजा आली असती. गोष्टीत पात्रे असतात आणि ती चूक–बरोबर दोन्ही वागू शकतात. गोष्टीबाहेर विचार व्यक्त करणे म्हणजे बरोबरपणाचे टेन्शन! आणि आव! गोष्टीत टेन्शन आणि वाव मजेदार होतात.

(श्री. श्याम मनोहर : साहित्य अकादमी पारितोषिक विजेते लेखक. 'खेकसत म्हणणे आय लव्ह यू', 'उत्सुकतेने मी झोपलो', 'कळ', 'खूप लोक आहेत', 'इत्यादी कादंबऱ्या' आणि 'बाकीचे सगळे', 'बिनमौजेच्या गोष्टी' यांसारखे कथासंग्रह प्रकाशित.)

('ललित' जानेवारी २०११ मधून साभार)

**संपर्क : ०२०–२४२२४६०२**

## साहित्यनिष्ठेची कसोटी

मनुष्याचा भाषाव्यवहार रोजच्या साध्यासुध्या कामापासून तो अत्युच्च पातळीवरील कलाविलास आणि तत्त्वमीमांसा यांच्यापर्यंत चालू असतो. भाषा ही माणसाच्या सुधारणेची व संस्कृतीची वाहक आहे. साहित्यिकाचा तर सदोदित भाषेशीच संबंध येतो. म्हणूनच तुकारामांनी 'शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन' असे म्हटले आहे. म्हणून प्रत्येक लेखकाने आपल्या भाषामाध्यमाचे पावित्र्य व प्रतिष्ठा सांभाळली पाहिजे.

***'लोभ जीभेचा जळू दे***
***दे थिजूं विद्वेष सारा,***
***द्रौपदीचे सत्त्व माझ्या***
***लाभुं दे भाषाशरीरा***
***जाउं दे कार्पण्य 'मी'चें,***
***दे धरू सर्वांस पोटी;***
***भावनेला येउं दे गा***
***शास्त्र–काट्याची कसोटी'***

मराठीतील एक श्रेष्ठ कवी व सौंदर्यमीमांसक मर्ढेकर यांचा हा साहित्यविषयक दृष्टिकोन सदैव ध्यानात ठेवण्याजोगा आहे. विचाराला भावनेची जोड हवी; आणि भावनेला विचाराचे पाठबळ हवे. आपण जे अनुभवले, आपल्याला ज्याची मनोमन प्रचिती आली, त्याला छेद जाईल असा कोणताच सूर आपल्या साहित्यातून निघू नये म्हणून प्रत्येक लेखकाने दक्षता घेतली पाहिजे. आपल्या अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर त्याने कुठलेही अंतर्गत व बाह्य दडपण येऊ देता कामा नये. त्यासाठी पडेल ती किंमत देण्याची तयारी हीच लेखकाच्या साहित्यनिष्ठेची खरी कसोटी म्हटली पाहिजे.

**– गं.बा. सरदार**

(बार्शी येथे १९८०साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणातून)



# नव्या परिमाणाची अपेक्षा ...

डॉ. आनंद यादव

१९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि ग्रामीण मराठी समाजाच्या इतिहासाचे एक नवे पान उलगडले गेले. ते म्हणजे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाणांनी आपल्या सहकाऱ्यांना महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून नवनवीन शिक्षणसंस्था स्थापण्यास सांगितले. त्याचा परिणाम होऊन खेड्यापाड्यांतून प्राथमिक शाळा, तालुक्यांच्या गावी हायस्कूल, जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा केंद्रस्थानी असलेल्या शहरांतून महाविद्यालये स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. याचा हळूहळू परिणाम असा झाला की, बहुजन समाजात शिक्षणविषयक जागृती निर्माण झाली आणि शिक्षणाचे प्रमाण वाढले. नवसाक्षर तरुण पिढीला विकसनशील काळ असल्यामुळे नवनव्या नोकऱ्या मिळू लागल्या आणि ग्रामीण समाजाचा कायापालट होऊ लागला.

१९७० च्या आसपास दलित साहित्याची चळवळ सुरू झाली आणि मराठी साहित्याला एक नवे परिमाण मिळाले. जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, ख्रिस्ती साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी विविध सामाजिक घटकांतील साहित्य निर्माण होऊ लागले. त्यांची लहानमोठी नियतकालिके, अनियतकालिके निर्माण होऊ लागली.

ग्रामीण विभागात निरनिराळ्या ठिकाणी छोटी छोटी अनेक साहित्य संमेलने भरत असतात, ही स्वागतार्ह घटना आहे. त्यामुळे त्या त्या परिसरातील साहित्यिकांना त्यात सहभागी होता येते. ते आपल्या पिढीसाठी विचार मांडू शकतात. त्यांच्या साहित्याचा परिचय तेथील तरुण पिढीला होतो. त्या परिसरातीलच सामाजिक, सांस्कृतिक स्थितिगतीशी त्यांचा संबंध असल्याने त्यांना ते आपले वाटते. त्या साहित्याची आणि समाजस्थितीशी अनेक अंगेउपांगे प्रकाशात येतात आणि त्यामुळे इतर साहित्यिकांनी ती अधिक परिचित होतात. त्यांना त्यातून साहित्याच्या निर्मितीची अधिकाधिक प्रेरणा मिळते.

१९८० पूर्वी एकूणच मराठी साहित्यक्षेत्रात निर्माण होणाऱ्या नागरी (शहरी) साहित्याची विविध अंगोपांगानी मीमांसा करणारी अनेक नियतकालिके निघत; ती तर बंद झालीच; पण, तशी नियतकालिके विखुरलेल्या खेड्यापाड्यातील समाजात निर्माण होणे शक्य नव्हते. कारण, एकतर आर्थिकदृष्ट्या ग्रामीण समाज दुबळा असतो. शिवाय, तो शहरांसारखा एका जागी नसतो. त्यामुळे छोट्या छोट्या संमेलनातून एकत्र येऊन साहित्याची विविध अंगी चर्चा होणे शक्य व आवश्यक असते. अशी चर्चा होणे नितांत गरजेचे आहे, याचे भान या छोट्या छोट्या संमेलनांनी जाणीवपूर्वक ठेवले पाहिजे. कारण, अलीकडे या संमेलनांना जत्रेचे स्वरूप येते आहे की काय, अशी भीती मला वाटते. त्यात केवळ मनोरंजनाचे कार्यक्रम आणि जल्लोष होतानाच विशेष प्रमाणात जाणवते. त्यामुळे एकतर वाङ्मयीन संस्कृतीची नीटपणे जोपासना होत नाही; किंवा ती उथळ स्वरूप धारण करताना दिसते.

पूर्वी ग्रामीण समाजात तुरळक साहित्य होते; पण, अलीकडे त्यांची पिढी तयार झालेली दिसते, ही स्वागतार्ह घटना आहे. या पिढीने विचारपूर्वक आणि गांभीर्याने साहित्याची उपासना आणि जोपासना तसेच निर्मिती आणि समीक्षा गंभीरपणे, अभ्यासपूर्वक करण्याची गरज आहे. केवळ हौसे-मौजेने कोणतीही कलानिर्मिती होऊ शकत नाही. ती एक व्रतभावनेने केलेली उपसना असते, हे तरुण ग्रामीण साहित्यिकांनी जाणीवपूर्वक मनात रुजविण्याची आणि पोषण करण्याची गरज आहे.

वास्तविक, नियतकालिकांची, विविध ग्रंथप्रकाशनांची त्यासाठी नितांत गरज असते; पण, आर्थिकदृष्ट्या दुबळ्या असलेल्या ग्रामीण विभागात आज तरी ते शक्य नाही, असे दिसते. म्हणून छोटी छोटी संमेलनेच त्याची माध्यमे मानून, त्यांतून वाङ्मयीन चर्चा, चिकित्सा होण्याची आवश्यकता आहे. ही संमेलनेच तूर्त तरी वाङ्मयीन चर्चेची, चिकित्सेची आणि त्यांच्या प्रसाराची साधने मानली पाहिजेत.

या बाबतीत शहरी विभागांतील ग्रंथप्रकाशकांनी या ग्रामीण विभागातील वाङ्मयीन संक्रमणाच्या अवस्थेत आपली भूमिका ओळखून त्यांना खूप काही करता येईल, असे वाटते. विशेषत: ग्रामीण तरुण साहित्यिकांचे 'साहित्य' संस्करण करून छापले आणि प्रसिद्ध केले, तर त्यांना नवशिक्षित ग्रामीण तरुणवर्ग ग्राहक म्हणून उपलब्ध होऊ शकेल. शहरात आज मराठी ललित साहित्याचा वाचकवर्ग कमी-कमी होत चालला आहे. कारण, तो प्रामुख्याने इंग्रजी भाषेत शिक्षण घेऊन जागतिक पातळीवर नोकऱ्या करू लागला आहे. म्हणून तेथील प्रकाशकांनी आणि ग्रंथविक्रेत्यांनीही ग्रामीण विभागातील या नव्या ग्राहकवर्गाकडे वळावे. तेथील साहित्यप्रेमींनी ग्रंथालये स्थापन करण्यास मदत केली आणि ती त्यांनी स्थापन केली, तर त्यांना कायमचा नवा ग्राहकवर्ग मिळू शकेल; तसेच तेथील संस्कृतीलाही नवे परिणाम मिळू शकेल, असे मला वाटते.

नव्या पिढीच्या ग्रामीण साहित्यिकांनी केवळ हातात पडेल तेच आणि तेवढेच साहित्य वाचण्यापेक्षा आपल्या वाचनाला 'वाचनसंस्कृती'चे

## मातृभाषेची पाखरं...

**मातृभाषा ही केवळ बोलण्यासाठी वापरण्याची भाषा नसते. ती तुम्हाला तिच्यात अवगुंठित असलेल्या मराठी समाजाची ओळख कळत-नकळत करून देत असते. एवढेच नव्हे, तर मराठी संस्कृती, मराठी परंपरा, मराठी मन आणि त्याची मानसिकता, मराठी समाजाचा इतिहास, वारसा, ज्ञान-विज्ञान, मराठी व्यक्तिमत्त्व इत्यादी घडवीत असते... म्हणून कोणत्याही सुसंस्कृत माणसाने किंवा सुसंस्कृत होऊ पाहणाऱ्या तरुणाने मातृभाषेपासून वंचित होऊन स्वत:ला पोरके करून घेऊ नये, असे वाटते.**



स्वरूप प्राप्त करून दिले पाहिजे. सहित्यिकाची वाचनसंस्कृती म्हणजे नुसते इतरांचे साहित्य वाचून काढणे नव्हे. आपणास जर चांगला साहित्यिक व्हायचे असेल तर त्याने आपला समाज नीटपणे समजून घेण्यासाठी 'ग्रामीण समासशास्त्र' वाचावे, त्याचप्रमाणे सामाजिक मानसशास्त्र, व्यक्तीचे मानसशास्त्र, भारतीय संस्कृती, मूळ मानवधर्म, देशविदेशी भाषांतील उत्कृष्ट साहित्य इत्यादी नीटपणे वाचले पाहिजे. ते वाचले तरच आपल्या हातून चांगली साहित्यनिर्मिती होऊ शकते. पर्यायाने ग्रामीण समाजाला साहित्यसंस्कृतीचे नवे परिमाण लाभू शकेल.

चरितार्थासाठी नाइलाजाने शहरात राहणारा एक ग्रामीण साहित्यिक या नात्याने मला असे वाटते की, सर्व शहरी महाराष्ट्राच्या पोटापाण्याची अखंडपणे तरतूद करणाऱ्या, त्यासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या या ग्रामीण समाजाकडे निदान आता तरी लक्ष द्यावे आणि या दारुण अवस्थेतील ग्रामीण समाजाला आता तरी सुस्थितीत आणण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी त्याच्या गतानुगतिक, पारंपरिक जीवनसरणीतून त्याला मुक्त करण्याचा प्रयत्न करावा. शहरातील विविध समाजसुधारणावादी संस्थांनी, शासकीय सुधारणांनी, स्वयंसेवी संस्थांनी, सुधारकांनी, विचारवंत मंडळींनी इकडे मनापासून वळावे. आपला वेळ आणि धन या ग्रामीण समाजासाठी द्यावे आणि त्याचे मूलगामी परिवर्तन घडवून आणावे. ते हे कार्य मनापासून अनेक वर्षे, दीर्घ काळ करीत राहिले, तर महाराष्ट्राच्या स्वातंत्र्योत्तर काळातील ही एक युगप्रवर्तक क्रांती ठरू शकेल आणि समग्र मराठी जीवनाचे सार्थक होऊन त्याला एक नवी कळा आणि क्रांती प्राप्त होईल. देववाद, अंधश्रद्धा, गतानुगतिक वृत्ती यांतून ग्रामीण समाज पूर्ण मुक्त होईल आणि मराठी समाज सर्वार्थानी समपातळीवर येईल आणि एकमेकांशी समरस आणि एकरूप होईल आणि भारतासमोर एक नवा मूलगामी आदर्श निर्माण होईल. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांचे मूलभूत स्वप्न खऱ्या अर्थाने परिपूर्ण होईल. 'खेड्याकडे चला' म्हणणाऱ्या राष्ट्रपिता गांधींच्या विचारांची खरीखुरी पूर्तता होऊ शकेल.

**संपर्क : ०२०- २४३७९४५३**

## अमर क्षणांचे भांडार

मानवी जीवन अनित्य आहे. आपला प्रत्येक क्षण नदीतल्या पाण्याच्या थेंबासारखा वाहून जात असतो. पण जीवनात काही अलौकिक सुंदर अनुभव देणारे क्षण येतात. केशवसुतांनी त्यांना 'क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास' असे म्हटले आहे. कलेचे सामर्थ्य हे की ती या भासांना, क्षणांना पकडते. स्थिर, अमर करून ठेवू शकते. लिओनार्दो द विन्सी या चित्रकाराचे 'मोनालिसा' हे चित्र प्रख्यात आहे. त्यातल्या स्त्रीच्या चेहऱ्यावरचे रसिकांना दंग करून टाकणारे गूढ, तरल स्मित आज काही शतके त्याने असेच अमर करून ठेवले आहे खजुराहोची मूर्तिमंत मंदिरे, आग्र्याचा ताजमहाल, वेरूळचे कैलास लेणे, यांच्यासारख्या जड माध्यमातूनच कला हे साधते असे नव्हे. शब्दांच्याही अंगी अशा क्षणांना पुनर्जन्म देण्याचे सामर्थ्य असते. नाटकातल्या एखाद्या प्रसंगात एक क्षण अचानक जिवंत होतो आणि आपल्या काळजाला हात घालतो, त्या अनुभवाच्या मोहाने ते नाटक आपण पुन्हा पुन्हा पाहतो. काव्ये, कथा, कादंबऱ्या, उस्फूर्तपणे झालेली वैचारिक रचना यातील शब्दकलेने अमरत्व दिलेल्या अशा क्षणांचे आपल्याला पुन्हा पुन्हा दर्शन घडते. संस्कृती म्हणजे अशा अमर क्षणांचे भांडार!

**- विश्राम बेडेकर**

(मुंबई येथे १९८६ साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणामधून)

# साहित्य संमेलनाचा शीण

**रंगनाथ पठारे**

साहित्य संमेलनाविषयी काय लिहायचं? या विषयावर लिहायचा मला शीण आलाय. 'शब्दालय' दिवाळी अंकासाठी एकदा 'स्त्री-पुरुष नाते' असा विषय ठेवला होता. त्या निमित्ताने शांता गोखले यांची मुलाखत (बहुधा) अरुण म्हात्रे यांनी घेतली होती. त्यात त्या म्हणाल्या होत्या, स्त्री-पुरुष नात्याचा मला शीण आलाय. तिथला तो 'शीण येणे' हा शब्द - प्रयोग मला आवडला होता. साहित्य-संमेलनाच्या बाबतीत माझं तसं झालंय. म्हणून 'साहित्य-संमेलनाचा शीण'. तरीही मी लिहिणार आहेच. (शांता गोखले यांनीसुद्धा शीण आलेला असतानाही मुलाखत दिली होती याचा मला आधार आहेच की!) फक्त याआधी मी जे म्हटलंय त्याची पुनरोक्ती न करण्याचा प्रयत्न करतो. आणि तसा कितीही प्रयत्न केला तरी काही काही गोष्टी येणारच, याची मला नम्र जाणीव आहे.

संमेलनांना मी गेलेलो आहे. कुठलंही निमंत्रण नसताना केवळ ते पाहण्याच्या कुतूहलापोटी एकदा अन् बाकी निमंत्रित सहभागी म्हणून काही वेळा. चंद्रपूरला झालेल्या या आधीच्या संमेलनाला मी गेलो होतो. शांताराम पोटदुखे हेच त्याही वेळी स्वागताध्यक्ष होते. मी त्या संमेलनाचा वृत्तांतसुद्धा 'राजस' मासिकासाठी लिहिला होता. वसंत आबाजी डहाके यांना त्याच वेळी मी पहिल्यांदा पाहिलं. त्यांच्या कविता त्याच्या आधीपासून वाचत होतो. त्या कवितांच्या प्रभावात होतो. नंतर काही वर्षांनी आमची ओळख झाली. आता तिथंच संमेलन आहे आणि डहाके अध्यक्ष आहेत. ह्या वेळी ते निवडणुकीला उभे राहिले त्या सुमाराला दुसऱ्या एका निमित्ताने फोनवर बोलत असताना मी त्यांना विचारलं, 'तुम्ही निवडणुकीला उभे आहात आणि मी मतदार नाही हे कसे काय? हे असं कसं मराठी साहित्य आणि साहित्य-संमेलन?' ते म्हणाले, 'हे असं आहे खरं, आपण लोक तिकडे लक्ष घालत नाही. त्यामुळे असं होतं.' डहाके यांचा स्वर नेहमी प्रमाणे शांत आणि संयत. आपल्या कवितेतून कायमच राजकीय विधान करणाऱ्या डहाके यांच्या सरळ नेमस्त स्वराचं मला कायम आश्चर्य वाटत आलंय. त्यांनी या आधीची निवडणूक थोड्या गाठीभेटी घेत लढवली. तीत अपयशी झाले. ह्या वेळी तसलं काहीही न करता निवडून आले. त्यांना हा सन्मान मिळणे उचितच आहे. प्रश्न तो नाही. कारण, अलीकडच्या काळात फार कमी वेळा चांगल्या साहित्यिकाला ती संधी मिळालीय. प्रश्न असा आहे की, अशी संधी निर्माण करण्याचे दोर काही मोजक्याच मंडळींच्या हातात आहेत. त्यांनी मनात आणलं तरच ते होते. मी माझा स्वत:चा अनुभवच सांगतो. फर्स्ट ह्यांड एक्स्पीरियंस! दोनेक वर्षांआधी एका मोठ्या शहरात काही कार्यक्रमाच्या निमित्ताने गेलो असताना एका मित्रानं गप्पांच्या ओघात मला विचारलं, 'संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक नजीकच्या भविष्यात लढवण्याची कितपत इच्छा आहे?' म्हटलं, 'अजिबात नाही. आज जी परिस्थिती आहे अन् नजीकच्या भविष्यात ती तशीच राहील अशी लक्षणे दिसताहेत, तर त्या भानगडीत मी का पडावं?' मित्र म्हणाले, 'बघा बुवा. त्या अमक्या-तमक्याला तसा रस आहे. सध्याच्या जबाबदारीतून मुक्त झाले की ते लढू इच्छितात. तुम्हाला रस असेल तर तसे फीलर्स टाकता येतील.' आता बघा! हे असं ते चालतंय. कोणाला निवडून आणायचं ते आधीच ठरवून मतदारांची निवड केली जाते. किंवा त्या त्या संस्थांचे नेहमीचे हुकमी मतदारसुद्धा असतील. ती शक्यता मला अधिक दिसते. कारण, घ्या समजा मी पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचा गेली किमान पंचवीस वर्षे आजीव सदस्य आहे. त्या काळात आजीव सदस्यत्वासाठी शंभर रुपये वर्गणी होती. ती माझ्यासाठी माझ्या एका ज्येष्ठ मित्राने भरली होती. (त्याला नंतर ते पैसे मी बहुधा दिलेले नाहीत. अन् आता ते मैत्रीही दूर गेलंय.) गेल्या पंचवीस वर्षांत एकदा नगरच्या संमेलन-संयोजन समितीचा सदस्य म्हणून मी मतदार होतो. दुसऱ्यांदा उत्तम कांबळे उभे असताना होतो असं कांबळे मला सारखं सांगत होते. कारण, अर्थातच त्यांनी ती यादी स्वत: पाहिली होती. प्रत्यक्षात मतपत्रिका माझ्यापर्यंत आलीच नाही. माझं मत न मिळताही कांबळे उत्तम मतांनी निवडून आले. एकूणच चोवीस वर्षात मी एकदाही मतदार नव्हतो. मतदार निश्चित करण्याचे निकष कोणते, ते मला माहीत नाही. त्या त्या संस्थांनी ते कुठे उघड केल्याचे माहीत नाही. कोणाला असेल माहीत तर सांगा.

संमेलनात सहभागी होण्याची निमंत्रणे मात्र बऱ्याच वेळा आली. बेळगाव, परभणी, औरंगाबाद, अहमदनगर या ठिकाणच्या संमेलनातल्या परिसंवादात मी भाग घेतलाय. परळी-वैजनाथच्या संमेलनात माझी मुलाखतसुद्धा झाली होती. (हे त्यात लेखकांसाठी मानाचं समजलं जाण्याचा प्रघात आहे) मुलाखत घेणाऱ्यांत सतीश काळसेकर, नागनाथ कोत्तापल्ले यांच्यासारखे मातब्बर मित्रसुद्धा होते. नंतर बहुधा आळंदी, सांगली अशा ठिकाणी निमंत्रण असूनही मी गेलो नाही. त्यामुळे महामंडळाच्या समितीत कोणाच्या तरी लक्षात आलं असेल की आता याचा नाद सोडलेलाच बरा. नंतर नाशिकच्या वेळी तिथला एक मित्र बढाई मारत आणखी एका मित्राला म्हणाला, 'पठारे आणि त्याच्यासारखे लोक मी ठरवून कटाप केले.' (मी संमेलनांवर फुल्ली मारलेली असण्याचं त्याला माहीत नव्हतं, त्याला तो बिचारा तरी काय करणार?) परळीला माझी मुलाखत ठेवण्यात आली, याचा सुद्धा एक किस्साच आहे. आता तो सांगायला हरकतसुद्धा नसावी. परळीच्या आदल्या वर्षी नगरला संमेलन होते. तिथं यशवंत राव गडाख हे संयोजन समितीचे अध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष. त्यांच्यासारख्या सुसंस्कृत आणि आर्जवी माणसाने संयोजन-समितीतच घेतल्यावर तिथं जाणं आलंच. तिथंही मी एका परिसंवादात सहभागी झालो होतो. गडाख यांचं संयोजन आदर्श असंच होतं. संमेलनात जे काही झालं - सगळ्या चर्चा, परिसंवाद, भाषणं, कविता, या साऱ्याचं शब्दांकन करून ते अत्यंत उत्तम अशा ग्रंथाच्या रूपात त्यांनी ते प्रसिद्ध केलंय. अन् हे असं आणखी कोणीही कधीही केल्याचं मला माहीत नाही. अशा कष्टदायक कामांच्या भानगडीत कोण पडतो? तर, या संमेलनात सुधीर रसाळ यांच्याशी भेट झाली. मला जरा बाजूला घेऊन रसाळ म्हणाले, 'पठारे तुमची 'ताम्रपट' कादंबरी या वर्षी साहित्य अकादमीच्या पारितोषिकासाठी अंतिम स्पर्धेत होती. अंतिम निवड समितीत मी होतो. पुरस्कार तुम्हाला द्यायचा की 'मुंगीचे महाभारत'साठी गंगाधर गाडगीळांना असा पेच होता. गाडगीळांचे वय पाऊणशे वर्षे. ते ज्येष्ठ. त्यांना पुन्हा संधी मिळणे कठीण. त्यामुळे त्यांची निवड केली. तुम्ही तरुण आहात. तुम्हाला तो कधी



ना कधी मिळेलच.' ते ऐकून मी फार चकित झालो. त्यांनी मला हे सांगणे हे त्यांच्या मनाचे मोठेपणच. मी म्हणालो, 'ठीक आहे. पण, मला हे माहीत झाले नसते तर अधिक बरे झाले असते.' माझ्या बोलण्यातली काही एक विषादाची छटा रसाळापर्यंत पोहोचली असणार. कारण, याला जोडून लगेच ते म्हणाले, 'पुढच्या वर्षी परळीला संमेलन आहे. तुमची मुलाखत तिथे ठेवली जाईल. निमंत्रण आल्यावर नकार देऊ नका. नक्की या.' म्हणजे माझ्या काही म्हणण्या आधी त्यांनीच ते ठरवले असणार. एका तरुण लेखकाला नाउमेद होऊ द्यायचे नाही आणि आपल्यापुरता जो अपराधभाव (!) आपल्या मनात वाटतोय, त्याचे जरा परिमार्जन करायचे. रसाळ यांच्या या सुसंस्कृतपणाला प्रतिसाद देणे उचितच होते. त्यामुळे गेलो. अन् काही वर्षांनी ते अकादमीचे पारितोषकही केवळ योगायोगाने अस्मादिकांना मिळाले. कारण, त्या आधी बऱ्याच वेळा ते कसे थोडक्यात हुकते आहे असे कोण कोण सांगत असे. त्यामुळे वैतागून ते समजा मिळाले तरी आपण ते जाहीरपणे नाकारायचे असे मी माझ्यापुरते ठरवले होते. पण, मिळाले तेव्हा नेमाडे अकादमीच्या मराठी भाषेसाठीचे निमंत्रक होते. त्यांचा अवमान करणे मला शक्य नव्हते. खेरीज, चला अखेर मिळालं या आनंदाच्या भावनेने आधीच्या कडवटपणावर मातही केली होती. असो. यानंतर आत्मपर काही येणार नाही याची दक्षता घेतो.

आता, अध्यक्ष-पदात थोडा सन्मानाचा भाग असतोच. ते नाकारता यायचे नाही. पेपरात काही दिवस सारखे तुमचे नाव येते. ठिकठिकाणी तुमचे सत्कार-समारंभ होतात. गौरवपर भाषणे होतात. संमेलनाच्या मंडपात भाषणं. नंतरचे काही दिवससुद्धा मनाला आल्हाद. हे सारे साहित्यबाह्य असले तरी सुखाचेच ना! देवांना देखील स्तुती प्रिय असते. आपण तर मर्त्य माणसे. मात्र, गेल्या काही वर्षांत मुख्य समारंभातसुद्धा अध्यक्षाला तितके महत्त्व उरलेले नाहीय. एक प्रतीकात्मक मान त्याला दिला की भागते. संयोजकांसाठी महत्त्वाचे इतर बरेच बडे बडे लोक असतात. राष्ट्रपती, मुख्यमंत्री, न्यायमूर्ती, सिनेमा नट अशा लोकांची बडदास्त ठेवायची तर अध्यक्षांकडे त्यांना अंमळ दुर्लक्षच करावे लागते. अध्यक्षही समजुतीने घेतात. अर्थात, न घेऊन ते तरी काय करणार? पैसे उभे करायला राजकारणी लागतात; मग, व्यासपीठावर ते का नकोत? राजकारणी उत्तम वक्ते आणि अभिनेते असतात. गर्दी खेचण्याची आणि ती खुलवायची क्षमता त्यांच्यात असते. साहित्य-चिंतन वगैरे भानगडी ऐकण्यासाठी कोणी संमेलनाला जात नाही. तो वैताग का सहन करावा कोणी? चार घटका करमणूक झाली, विनोदी चुटके ऐकायला मिळाले की गर्दीचे भागते. औरंगाबादच्या संमेलनात मी एका परिसंवादात बोललो. त्यात भारत सासणे, मधु सावंत अशा लेखकांसोबत अरुण गुजराथी नामक राष्ट्रवादी काँग्रेसचे एक नेते होते. बहुधा विलासराव देशमुखसुद्धा होते. पण, ते भाषणं करून लगेच गेले. त्यांच्यासोबत बरीच गर्दीसुद्धा पांगली, हे आठवते. राजकारणीसुद्धा काही चांगली कामे करतात, त्याचे योग्य चित्रण साहित्यात यावे, अशी अपेक्षा विलासरावांनी व्यक्त केली होती. मी, सासणे, मधु सावंत आम्ही कोणीही फर्डे वक्ते नव्हतो. साहजिकच, 'आवरा,आवरा'च्या प्रेमळ टाळ्या आमच्या वाट्याला आल्या. ते मी स्वाभाविक मानतो. मी त्या टाळ्यांच्या निमित्ताने काही बोललो. आमच्यानंतर अरुण गुजराथी बोलले. बोलताना म्हणाले, 'अहो पठारे, त्याचे काय आहे बघा, लोक तुम्हाला बोलू देत नाहीत आणि आम्हाला लिहू देत नाहीत.' टाळ्यांचा कडकडाट झाला. आता बोला! काय बोलणार? बोलणे हे लेखकाचे काम नसतेच मुळात. त्याने लिहावे. जीव ओतून, हात-पाय खोडून लिहावे. आणि राजकारणी मंडळींना लिहायची कोणी मनाई केलीय? लोक तसे कधीच म्हणत नाहीत. त्यांनी सत्य तेच लिहिले तर ते श्रेष्ठसुद्धा होऊ शकेल. पण, सत्य लिहिणे त्यांना परवडणार आहे काय? मुख्यमंत्री-पदावरून पायउतार होताना अडलेल्या सगळ्या परवाना-पत्रांवर सह्या करत शब्दशः पोत्यांनी पैसे गोळा करण्याचे ते लिहिणार आहेत काय? की भूखंडांवर आरक्षण बसवणे आणि हटवणे अशा उद्योगात हवेतल्या हवेत करोडोंनी जमा केलेल्या पैशांचे? हे फक्त नमुन्यादाखल. आणखी कैक सांगता येईल. लिहिणे मुश्कील असते. सत्याचा शोध घेणे हे जीवखाऊ काम असते. तिथे खोटेपण, लपवा-छपवी चालत नाही. पण, संमेलनात त्याचा विचार कोण करतो? तिथे अरुण-भाईंचे वाक्य सुभाषितासारखे झेलले जाते. त्याविषयी तक्रार करण्याचे अर्थातच कारण नाही. पण, ज्यांना विचार करावासा वाटतो त्यांनी तो करावा, इतकेच.

संमेलनांच्या निमित्ताने पुस्तकांची चांगली विक्री होते असे म्हणतात. ती भलीच गोष्ट आहे. कोणती का होईना, पुस्तके विकली जातात हे उत्तमच. पण, त्यासाठी हे संमेलन, परिसंवाद, चर्चा, सादरीकरणे; ह्या भानगडी कशाला? कलकत्त्यात दुर्गापूजेच्या उत्सवाच्या निमित्ताने दहा दहा दिवस ग्रंथ-जत्रा भरते. आपणही अशी जत्रा भरवायला काय हरकत आहे? जत्रेला जोडून हे बाकीचे करमणुकीचे कार्यक्रम ठेवा. काव्यवाचन, काव्यगायन, नाटकाचे प्रयोग, सिनेमांतली गाणी; अगदी शास्त्रीय संगीतसुद्धा ठेवा. नाशिकसारख्या शहरात दरवर्षी अशी ग्रंथ-जत्रा सुरू करायला उत्तम संधी आहे. पंढरपूरला जशी विठोबाच्या भेटीसाठी वारी तशी ही ग्रंथांच्या भेटीसाठी वारी करायची. ग्रंथांसाठी एखादे तीर्थस्थळ महाराष्ट्रात का असू नये?

साहित्य-महामंडळाच्या कामाविषयी; विशेषत: कौतिकराव ठाले-पाटील यांच्या कार्य-पद्धतीविषयी पुष्कळ प्रतिकूल गोष्टी गेल्या काळात पेपरात आल्या होत्या. मला वाटते की, कौतिकराव हे उत्तम मराठा आहेत. मराठा हा स्वाभाविक कारभारी असतो. हे जातीवाचक घेतले तरी चालेल. कारण, आपल्या गाव-गाड्यातले ते एक स्वाभाविक सत्य आहे. ज्याला कारभार करायचा त्याला थोडे दाबातच राहावे लागते. तसे नसेल तर कामे होणार कशी? कौतिकराव हे उपक्रम-शील आणि धडाडीचे साहित्याच्या दुनियेत वावरणारे कार्यकर्ते आणि नेते आहेत. संमेलने भरविण्याच्या उद्योगा-पल्याड काही चांगले उपक्रम त्यांनी कौशल्याने आणि नेकीने राबवले आहेत. त्यांचे श्रेय पेपरवाले त्यांना का देत नाहीत? की त्यांना ते माहीतच नसते? की चांगल्या गोष्टींना बातमी म्हणून किंमतच नसते? एक उदाहरणच सांगतो. कौतिकरावांनी भाषा, बोली, भाषा-भगिनी अशा विषयांना केंद्राशी ठेवून उत्तम अकादामिक चर्चासत्रे घडवून आणलेली आहेत. आणि ते ग्रंथांच्या स्वरूपात छापून प्रसिद्ध केले आहे. बहुधा गेल्या वर्षी किंवा त्याच्या आधीच्या वर्षी त्यांनी गुलबर्गा येथे असाच एक परिसंवाद घडवून आणला. तो समकालीन कादंबरीवर होता. हरिश्चंद्र थोरातांपासून ते गजानन अपीने यांच्यापर्यंतच्या अभ्यासकांकडून त्यांनी उत्तम निबंध लिहून घेतले होते. त्याचेही त्यांनी पुस्तक केले. त्यासाठी त्यांनी चार कादंबरीकार निवडले होते. नेमाडे, श्याम मनोहर, रंगनाथ पठारे आणि गौरी देशपांडे. नेमाडे हे संमेलन वगैरे भानगडींपासून कायमच फटकून राहिलेले. त्यामागे त्यांची एक निश्चित भूमिका आहे. श्यामने त्याच्या 'कळ'सारख्या कादंबरीत संमेलन-संस्कृतीची भरपूर टवाळी केलीय. मीही माझी विरोधी भूमिका जाहीरपणे वेळोवेळी मांडली आहे. नेमाडेंना जे अगदी लवकर कळले ते होण्यास मला जरा वेळ लागला आणि प्रत्यक्ष अनुभवांमधून जावे लागले इतकेच. गौरी देशपांडे दिवंगत. त्यांचे संमेलन-संस्कृतीवर कितपत प्रेम होते, माहीत नाही.



खास नसावे. तर या अशा परिस्थितीत या सगळ्या बव्हंशी विरोधी दृष्टिकोन असलेल्या लेखकांची निवड कौतिकरावांनी केली, याचे काहीच का मोल नाही? हे टाळणे त्यांना सहज शक्य होते. चांगले आणखी पुष्कळ लेखक आहेतच की! कौतिकरावांनी सुरू केलेला हा उपक्रम गंभीरपणे नंतरच्या महामंडळ अध्यक्षांनी चालू ठेवावा असाच आहे. की अशा गोष्टी फक्त कौतिकराव ठाले-पाटील आणि यशवंतराव गडाख-पाटील यांनीच करायच्या?

या अखिल भारतीय साहित्य-संमेलनांमध्ये कविता सादर करण्यासाठी निमंत्रण मिळणे कवींसाठी बरेच प्रतिष्ठेचे मानले जाते असे मी ऐकून आहे. त्यांना ते तसे वाटते, ते काही आपण बदलू शकत नाही. त्याची आवश्यकता देखील नाही. पण, प्रतिष्ठा द्यावी अशा आणखी पुष्कळ जागा, पुष्कळ व्यासपीठे असतात, एवढेचच माझे म्हणणे आहे. कवी हे रोजच्या जगण्यातसुद्धा साहित्याच्या प्रेमाचे खरेखुरे दूत असतात. साहित्य-व्यवहार नामक गोष्टीला जी काही थोडीफार किंमत आजही आपल्या लोकात आहे तिच्यात कवींचा वाटा सगळ्यात मोठा. त्याचे तितके श्रेय मात्र त्यांना मिळत नाही; हेही तितकेच खरे. ओबड-धोबड पद्धतीने म्हणायचे तर कादंबरी लिहिणे हे एखादे बांधकाम करण्यासारखे असते. ते ठोसपणे पुस्तकाच्या रूपात समोर येते. ते चांगले असेल तर त्याला तसा प्रतिसादही मिळतो. कवी तरल, चपळ, क्षणात नाहीशा होणाऱ्या भासांसारखे क्षण पकडून त्यांना शब्दांत खेचत असतात. हे सगळ्यात मुश्कील काम. क्वान्तुम विश्वातल्या फ्लुइड हालचाली पकडण्यासारखे. इतरांना मुळात जे दिसत नाही, ते पाहण्याचे आणि त्याला आपल्या दुनियेत आणण्याचे काम कवी करतो. कवितेचे एखादे पुस्तक व्हायला वर्षे जातात. शिवाय आम्ही कविता-संग्रह छापत नाही असे अनेक प्रकाशक जाहीरपणे सांगतात. कवितेची पुस्तके खपत नाहीत. अगदी कुसुमाग्रजांनासुद्धा आपला पहिला संग्रह खिशातून पैसे घालून काढावा लागला होता. एकूण फार प्रतिकूल परिस्थितीत कवींना काम करावे लागते. कवी असण्याचा आंतरिक कैफ एवढेच त्यांचे टिकाव धरण्यासाठीचे कारक बळ. म्हणूनच कवींना कोणत्याही संमेलनाचे महत्त्व वाटत असेल तर त्याविषयी प्रतिकूल मत मी मांडणार नाही.

संमेलने दिवसेंदिवस अधिकाधिक भव्य होताहेत. मंडप, डेकोरेशन, गाद्या-गिर्द्या, फवारे, सजावटी; नाना गोष्टींसाठी नाना नव्या नव्या आयडिया. नुसत्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला किती खर्च येतो हे कोणत्याही संयोजकाला विचारून बघा. सरकार पैसे देते. नगर-पालिका, जिल्हा-परिषदा पैसे देतात. आणखी पुष्कळ सार्वजनिक उपक्रमही हातभार लावतात. हल्ली मोठ-मोठे प्रायोजकही मिळतात. हे सगळे मिळून हे अफाट भव्य सेलिब्रेशन होत असते. निमित्त साहित्य. साहित्य फक्त निमित्तापुरते उरलेय आणि हे सेलिब्रेशन महत्त्वाच्या जागी आलेय हे कोणाच्या ध्यानात कसे येत नाहीय? आता, पुष्कळ लेखक म्हणतीलसुद्धा की बाकी इतक्या सगळ्या गोष्टींचे सेलिब्रेशन चालते तर साहित्याचे का नको ? अगदी निमित्तापुरते ते उरलेले असले तरी चालू द्या की! अन् असा किती खर्च येतोय? दीड कोटी? दोन कोटी? याच्यापेक्षा तर शाहरूख खान एखाद्या लग्नात किंवा कार्यक्रमात नाचण्यासाठी जास्त बिदागी घेतो. अन् ती देणारे पुष्कळ आहेत. ३१ डिसेंबरला किती नट्या किती पंचतारांकित हॉटेलात नाचतात आणि त्यांना किती बिदागी मिळते याचे आकडेसुद्धा हल्ली कोटींमध्येच असतात. तेव्हा ह्या इतक्या किरकोळ खर्चात साहित्याच्या निमित्ताने उत्सव होत असेल अन् त्यात लक्षावधी जन-सामान्य सहभागी होत असतील तर तुमच्या पोटात का दुखावे? याला माझ्याजवळ उत्तर नाहीय. जे चाललेय ते चालूद्यात असेच म्हणायचे. उगीच काही तरी जड जड भूमिका घेऊन डोके का शिणवा? का हा इतरांना ताप?


एक छान किस्सा सांगतो आणि थांबतो. भाऊ पाध्ये नावाचा एक मोठा कादंबरीकार मराठीत होऊन गेला. आचार्य अत्रे (नेमाडे त्यांना कटाक्षाने प्रल्हाद अत्रे म्हणतात) यांनी 'मराठा' नामक त्यांच्या दैनिकातून अग्रलेख लिहून भाऊच्या लेखनाला अश्लील घाण वगैरे म्हणत पुष्कळ आरडा-ओरडा केला होता. त्याच्यामुळे पुष्कळ अधिक लोकांना भाऊचे नाव माहीत झाले. भाऊ नेहमीच स्वत:च्या मस्तीत जगला. त्याला जे लिहायचे, जसे लिहायचे तसेच त्याने लिहिले. ज्याला जागतिक दर्जाचा म्हणता येईल असा हा आपला लेखक. नेमाडे, चित्रे यांनी भाऊच्या लेखनाचा गौरव केल्यावर बाकीचे त्याच्याकडे गंभीरपणे बघायला लागले. श्याम मनोहरने 'भाऊ पाध्येची गोष्ट' नावाची एक उत्तम सांस्कृतिक-सामाजिक भाष्य करणारी कथा मल्लिका अमर-शेख संपादन करीत असलेल्या 'नंतर' नावाच्या मासिकात लिहिली होती. ती त्याच्या पुस्तकात समाविष्ट झालेली नसावी. श्रेष्ठ अभ्यासक आणि समीक्षक गो. मा. पवार यांनाही भाऊचे फार अगत्य होते. ते शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख असताना त्यांनी अशाच विद्यापीठ अनुदान मंडळाच्या कोणत्या तरी योजनेखाली भाऊला महिना-दीड महिना कोल्हापूरला विद्यापीठात ठेवून घेतले होते. विद्यार्थ्यांना त्याच्याशी सर्जनशील संवाद करता यावा म्हणून. तिथे कसलेही औपचारिक वेळापत्रक नव्हते. त्यामुळे भाऊचा वेळ आनंदात गेला असेल. नंतर गो. मा. पवार भाऊला एका साहित्य-संमेलनाला घेऊन गेले. संमेलन बहुधा अंबाजोगाइ ला होते. आणि अध्यक्ष व्यंकटेश माडगुळकर. संमेलनाच्या आदल्या दिवशी सकाळी भाऊ आणि पवार सर संमेलन परिसरात फिरायला गेले होते. तिथे समोरून व्यंकटेश माडगुळकर आले. पवारांनी माडगुळकर यांना 'हे भाऊ पाध्ये' असे सांगत ओळख करून दिली. त्यांच्या एकमेकात उत्तम गप्पा झाल्या. अखेरीस भाऊने अगदी निरागसपणे माडगुळकर यांच्या समोरच पवारांना विचारले, 'बाय द वे, यांचा काय परिचय?' त्या वेळी पवारांचे काय झाले असेल याची आपण कल्पना करू शकतो. माडगुळकर हे संमेलनाचे अध्यक्ष. भाऊ त्यांना ओळखत असणार हे पवारांनी नकळत गृहीत धरले असेल. किंवा भाऊला आधी त्यांचे नाव सांगायचे ते विसरून गेले असतील. माडगुळकर यांना काय वाटले असेल? भाऊ भन्नाट निरागस माणूस होता. त्याच्या अखेरच्या काळात सतीश काळसेकरमुळे आमची भेट झाली.

व्यंकटेश माडगुळकर यांचा एक लेख वाचल्याचे मला आठवते. त्यात ते, कालेलकर आणि चिटणीस बाई नगरला एका तरुण लेखकाकडे भेटीला गेल्याचा संदर्भ आहे. आणखी तिथे साहित्य, संस्कृती अशा चर्चा, गप्पा झाल्याचे काहीतरी असावे. ते आता नीट आठवत नाही. पण, त्यात तो तरुण लेखक माडगुळकर यांना परोपरीने सांगतो की, साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या भानगडीत पडू नका. अखेर बस – स्टेशनवर येऊन ते बसमध्ये बसले. बस सुरू झाली, चालू लागली, तरी तिच्यासोबत बाहेरून पळत हातवारे करीत तो तरुण लेखक त्यांना सांगत होता, 'तेवढं साहित्य-संमेलनाचं..... अध्यक्षपद.... निवडणूक.... ते करू नका.'

माडगुळकर यांनी त्या तरुण लेखकाचे नाव दिलेले नाही. पण, स्थळ, काळ, संदर्भ यांचे साधे गणित केले तरी तो तरुण लेखक म्हणजे भालचंद्र नेमाडे, हे सहज लक्षात येते.

चला, एक किस्सा सांगताना दुसराही आठवला. तोही सांगून घेतला. साहित्य संमेलनप्रकरणी हे एकूण पुष्कळच झाले.

**संपर्क : ९८५०१२१५१५**



# संमेलनांचे फलित...

डॉ. जयंत मो. गाडगीळ

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले की दोन मुद्दे नेमाने चर्चेला येतात. साहित्य संमेलने म्हणजे पैशाची नासाडी वगैरे आणि अध्यक्षाची निवडणूक होऊ नये, तो मान असावा इत्यादी. यावर वर्तमानपत्री चर्चा, किंवा माध्यमांना बाईट देण्याव्यतिरिक्त काही विचार गांभीर्याने करता आला तर बरे, म्हणून हा निबंध. साहित्यसंमेलनेच जर निरूपयोगी किंवा हानिकारक असली, तर अध्यक्षपद निवडणुकीने असावे की अन्य मार्गाने ठरवावे ही चर्चाच व्यर्थ आहे.

ज्या अर्थी इतके वर्षे हा प्रकार चालू आहे त्या अर्थी काही साधत असणारच हे एक चुकीचे गृहीतक आहे. जेव्हा बाजारात पैसा फिरतो तेव्हा त्याचे कोणी ना कोणी वाटेकरी होतात, आणि तो वाटा आपल्याला मिळेल, या आशेने अनेक व्यक्ती त्यात हिरिरीने भाग घेतात. अगदी लॉटरीसुद्धा त्याला अपवाद नाही. भाग घेणाऱ्या संस्था, आयोजित करण्यात पुढाकार घेणारे सामाजिक, राजकीय लोक, मांडववाले, जेवणाचे कंत्राटदार, अनुषंगिक व्यावसायिक यांचा कोणत्याही इव्हेंटमध्ये फायदा होतोच. किल्लारीच्या भूकंपामुळे पुण्यात होऊ घातलेली एक क्रीडास्पर्धा अगदी ऐनवेळी रद्द करावी लागली, तरी संबंधितांचे नुकसान तर झाले नाहीच.... प्रश्न राहातो, तो भाषा, वाङ्मय, लेखक आणि यासंबंधीच्या क्रियाशीलतेचा काही फायदा होतो का, किमान हानी तरी होत नाही ना, हे बघण्याचा.

तांत्रिकदृष्ट्या बघितले तर एका सार्वजनिक संस्थेच्या निवडणुकीने पदाधिकारी झालेल्या लोकांनी मतदान करून ठरवलेला एक उमेदवार अध्यक्ष होतो. त्यांचा एक वार्षिक कार्यक्रम म्हणजे साहित्य संमेलन. यात नियमबाह्य असे काही नाही. म्हणजे तांत्रिकदृष्ट्या संमेलने व अध्यक्षपदाची निवडणूक यात काहीच गैर नाही. मात्र, सामान्य लोकांचा असा समज होतो की ही एक खऱ्या अर्थाने संपूर्ण भारत (आणि काही संमेलनांच्या बाबतीत जागतिक) पातळीवर उत्स्फूर्तपणे साजरा होणारा मराठी भाषेच्या सांस्कृतिक परंपरेतला सोहळा आहे. तसेच अनेक लेखकांचा असा समज होतो की या संमेलनाचा अध्यक्ष होणे हे साहित्य विश्वातल्या आपल्या कर्तृत्वाला मान्यता मिळणे किंवा केलेल्या तपश्चर्येचे चीज वगैरे होणे असते.

जोपर्यंत एक पार्टी मानते की संमेलने म्हणजे खूप भारी काहीतरी आहे आणि दुसरी पार्टी म्हणते की हा एक दुर्लक्षणीय उपचार आहे, तोपर्यंत हे एक न सुटणारे द्वंद्व आहे, असे समजून त्याकडे दुर्लक्ष करता येते. पण, जोपर्यंत आपल्याला मान्यता मिळत नाही तोपर्यंत हा सगळा मूर्खपणा आहे असे म्हणायचे, आणि आपल्याला निमंत्रण मिळाले की मात्र हा सर्व प्रकार नीट आहे असे मानायचे हा दुटप्पीपणा आहे. काही काळ या साहित्य संमेलनाला समांतर अशी स्वाभिमानी, परिवर्तनवादी वगैरे संमेलने भरली. मात्र, या समांतर रेषा एकमेकांमध्ये कधी आणि कशा मिसळून गेल्या हे कळालेसुद्धा नाही.

साहित्य संमेलन कसे असायला पाहिजे? ज्यासाठी ग्रंथकार संमेलनांची सुरुवात झाली त्या ग्रंथकार लोकांत खरेतर सारेच यायला हवेत. विविध ज्ञानशाखांतील प्रत्यक्ष प्रयोगांवर आणि संशोधनावरील शोधनिबंध, वैचारिक ग्रंथ, जगभरातील ज्ञान मराठीमध्ये अद्ययावत करणारे माहितीपर गद्य, सृजनशील साहित्य, मनोरंजन करणारी पुस्तके, एखादी कृती कशी करावी हे सांगणारे मार्गदर्शनपर ग्रंथ, भाषेचा अभ्यास करणारे ग्रंथ, माहितीचे कोश, शब्दांचे-वाक्प्रयोगांचे कोश, सूची, निघंटु असे सारेच ग्रंथकार यात समाविष्ट व्हायला हवेत. यातील अनेक अंगांचे ग्रंथकार मराठीत फारसे नाहीत, किंवा उरलेले नाहीत.

अशा संमेलनांमध्ये ग्रंथकारांनी एकत्र यावे. त्यांच्या वाचकांनीही या ठिकाणी यावे. ग्रंथकारांच्या आजपर्यंत झालेल्या कामाची दखल घ्यावी, उभयपक्षी इच्छा असल्यास त्याचे मूल्यमापन व्हावे, समानधर्मा ग्रंथकारांना शक्य व इष्ट असेल तर एकत्रितपणे काम करायची काही व्यवस्था व्हावी, चांगल्या कामाची प्रशंसा व्हावी, विविध मार्गांने आणि रूपाने मदत करणे आवश्यक असल्यास त्या मदतीची चर्चा व्हावी. काही गंभीर विषयावर एखादा उपक्रम, अभ्यास कोणास सुचला असल्यास त्याची रूपरेषा मांडून त्यासाठीही ग्रंथव्यवहाराची सारीच अंगे, ग्रंथकार, प्रकाशक, वाचक, सरकार, समाज यांनी त्यावर ऊहापोह करून उत्तेजन द्यावे. काही तत्कालीक सामाजिक भाषिक समस्येवर ठराव करावे, काही ठरावांच्या अंमलबजावणीचा आग्रह धरावा. अशा संमेलनाचा एक भाग म्हणून ग्रंथप्रदर्शन व विक्री, काही मंचीय सादरीकरणे व्हावीत.

अशा संमेलनात लोकप्रिय किंवा अधिक खपाच्या पुस्तकांच्या, ललित मनोरंजक लेखनाच्या चाहत्या वाचकांची त्यांच्या आवडत्या साहित्यिकांशी भेटही व्हावी. ज्या गावात असे संमेलन होणार असेल त्याही गावातील भाषाविषयीच्या संस्था प्रकाशात येतील. त्यांच्याबद्दल विदेशी आणि बृहद् महाराष्ट्रीय आणि महाराष्ट्रभरातून माहिती होऊन अशा संस्थांचे जाळे तयार करता येईल. बाहेर जाऊन समृद्ध झालेल्या एकेकाळच्या गाववाल्यांकडून मदत मिळवता येईल. अनेक संस्थांना मिळून काही विधायक उपक्रम घेता येतील. संमेलन होणाऱ्या गावात संमेलनानिमित्ताने भाषेबद्दल सजगता वाढेल. अशाच स्वरूपाची ग्रंथकार संमेलने विभागवार होऊन अशाच उपक्रमांचे आणि त्यांच्या निर्माण होणाऱ्या फळाचे विकेंद्रीकरण होईल.

अशा प्रकारच्या अनेक विधायक उपक्रमातील कोणते उपक्रम, किती प्रमाणात रूढ साहित्य संमेलनात होताना दिसतात? असे कोणतेही उपक्रम या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने होताना दिसत नाहीत. काही व्यक्ती आणि संस्था जे काही करतात, ते अपवाद म्हणूनच. बरे इथे उल्लेख केलेल्या उपक्रमाव्यतिरिक्त काही उपक्रम होताना दिसतात का, किंवा काही वेगळा उपयोग होताना दिसतो का? तर उदाहरणार्थ, कराड येथील साहित्य संमेलनानिमित्ताने काही निधी उरला, त्याच सुमारास पारितोषिक समितीने शिफारस केलेल्या पुस्तकाला सरकारने पुरस्कार देण्याचे नाकारले. म्हणून त्या पुस्तकाला वेगळा स्वतंत्र कराड पुरस्कार दिला, आणि त्या निमित्ताने काही वेगळ्या प्रवाहातील लेखकांना कराड पुरस्कार मिळाला. यात सातत्य किती राहिले, किती लोकांना हे पुरस्कार मिळाले, किती लोक या उत्तेजनामुळे लिहिते राहिले, त्यांचा दर्जा काय राहिला हे प्रश्न विचारता येतात.

अशा संमेलनामुळे किती साहित्यिक पुढे आले असे बघू या. एका आख्यायिकेनुसार त्र्यं. बा. ठोंबरे



हे कमी वयाचे कवी एका संमेलनात आले, त्यांच्या काव्यवाचनानंतर हा तर 'बालकवी' असे कोणी म्हणाले आणि यानिमित्ताने मराठी भाषेतील हा बालकवी पुढे आला. ना. धों. महानोर असेच एका साहित्य संमेलनात झळकले. असे किती कवी गेल्या शंभरेक वर्षांत अशा संमेलनांमुळे लोकांच्या पुढे आले?

यातही असे ठळकपणे दिसून येते की ज्यांना साहित्यिक म्हणून ग्लॅमर आले, त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी लोकांची झुंबड उडाली, असे बहुतेक लेखक हे त्या त्या साहित्यप्रकाराचे मंचीय सादरीकरण करीत होते. कथाकथन, काव्यगायन–अभिवाचन, नाटके, चित्रपटकथा, गाणी, एकपात्री अशा निमित्ताने ते सतत लोकांपुढे आपले साहित्य सादर करीत राहिले. म्हणजे ते लिखित साहित्यामुळे नव्हे, तर सादरीकरणाच्या मौखिक परंपरेमुळेच लोकांपुढे येत राहिले. तसेच स्वत:च्या कार्यक्रम सादर करण्याच्या झपाट्यात साहित्य संमेलनाचा वाटा कमीच राहिला. साहित्य संमेलने नसती तरी स्वत:च्या सादरीकरणाच्या ऊर्जेमुळे ते कार्यक्रम सादर करीत राहिलेच. साहित्य संमेलनाने ज्यांना बोलावले नाही, मात्र आपापल्या स्वतंत्र सादरीकरणाने प्रसिद्ध होत राहिले, अशीही अनेक उदाहरणे सापडतात. 'झट सादरीकरण पट दाद' या प्रकारामुळे यातील काही ज्येष्ठांनी महाराष्ट्रात बघे तयार केले, असा रास्त आक्षेप काही वेगळ्या प्रवाहातील कवींनी घेतला, असा आक्षेप घेणारे कवी स्वत: अशा संमेलनांपासून जाणीवपूर्वक लांब राहिले. हंशा, टाळ्या, वाहवा यापलीकडे अधिक गांभीर्याने जाण्याची वाचकाची गरजच यांनी मारून टाकली. बरे आता सादरीकरणासाठी वेगवेगळी चॅनेल आणि त्यांना सतत काहीतरी दाखवत राहण्याची निकड यामुळे साहित्य संमेलनातून सादर होत राहणे कालबाह्य झाले आहे.

अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या दृष्टीने काही महत्त्वाचे राजकीय सामाजिक ठराव काही मोजक्याच संमेलनात झाले. तेसुद्धा बरेचदा एकांड्या शिलेदाराच्या सडेतोडपणामुळेच. बरेचदा त्यालाही संस्थाचालकांच्या बोटचेपेपणामुळे वाटाण्याच्या अक्षता लागल्याचीच उदाहरणे अधिक आहेत. म्हणूनच विविध मार्गाने सांस्कृतिक पोलिसगिरी करणाऱ्या, मूलतत्त्ववादी व्यक्ती, संस्था यांचा धोका वाढत असताना, त्यांच्या विरोधाचा सूरही अशा संमेलनातून उठताना ऐकू येत नाही.

काही वर्षांपूर्वी महाकोष म्हणून मोठ्या प्रमाणावर निधी गोळा करायचा प्रयत्न केला, त्यात फारच कमी पैसे गोळा झाले. मात्र, साहित्य संमेलनातून उरलेले पैसे सहयोगी संस्थानी वाटून घ्यायचे असे ठरविल्यावर एका संमेलनात सुमारे पाऊण कोटी रुपये उरले, आणि ते वळते करण्यावरून वाद झाला तेव्हा ते परत साहित्य परिषदेला मिळाले. म्हणजे समाजाकडून विविध रूपांनी पैसे गोळा करून चंगळ करायला पुष्कळ पैसा उभा राहातो, मात्र एखादा विधायक उपक्रम करण्यासाठी पैसा उभा राहात नाही, हेच यावरून दिसून येते. शतकभरापूर्वी म. फुल्यांनी एका सार्वजनिक उत्सवावर असाच आक्षेप घेतला होता, की अशा उपक्रमामुळे समाजाच्या पैशावर चंगळ करणाऱ्यांची फौज वाढेल. साहित्य संमेलनात आज शतकभरानी तीच परिस्थिती आहे हा म. फुल्यांचा द्रष्टेपणा म्हणायचा, का समाजाचा नतद्रष्टपणा?


ठीक आहे. एकवेळ या संमेलनानी फारसा फायदा होताना दिसत नाही हे मान्य करू. पण, फारसा तोटा होताना दिसत नाही. म्हणून ही संमेलने चालू ठेवायला हरकत नाही, असे संमेलनांचे काही समर्थक म्हणतात. पण, हे म्हणणेही चुकीचेच आहे. जिथे केलेला खर्च आणि त्यातून निघालेले फलित यांचा ताळमेळ बसणे गरजेचे असते अशा विविध विषयांवरच्या परिषदा, प्रदर्शने अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावरसुद्धा होत असतात. छपाईच्या फ्रँकफर्टच्या प्रदर्शनात तर मराठी प्रकाशकही गेलेले असतील. ज्या विषयाची परिषद असते, त्याबद्दल भरीव माहिती तेथे मिळते. म्हणूनच तर स्वत:च्या पदराला खार लावून लोक अशा ठिकाणी जातात. तेथेही खाण्यापिण्याची सोय, करमणुकीची सोय काहीतरी असेल, पण ज्यासाठी जमलो, तो विषय महत्त्वाचा असतो. साहित्य संमेलन हा असा एकमेव उपक्रम असेल की तेथे बाकी सारे काही होते, पण साहित्यविषयक, भरीव विधायक काही होत नाही. आणि ते सार्वजनिक पैशावर होते. अशा संमेलनाचे अनुकरण होते, हा सर्वांत वाईट परिणाम आहे.

चुकीच्या गोष्टींचे अनुकरण होते, त्याला प्रतिष्ठा मिळते. मग तसे करणे हेच योग्य असा चुकीचा संदेश नवोदित लेखकाला जातो. या चुकीच्या गोष्टीच श्रेष्ठ असतात असा संदेश वाचकाला म्हणजेच आस्वादकाला जातो. मग, विभागवार साहित्य संमेलने याच वळणावर जातात. मोठ्या शहरात उपनगरीय साहित्य संमेलने होतात. जातवार किंवा धर्मवार साहित्य संमेलने होतात. बरे असा वाईट परिणाम केवळ नवोदित लेखकांवर होत असता तरी तो त्यांच्या भाबडेपणाचा दोष मानला असता. पण गांभीर्याने लिहिणारे, आणि तारुण्यात बंडाच्या पवित्र्यात असणारे लेखकसुद्धा याला फसतात तेव्हा हा धोका अधिक स्पष्ट होतो.

उदा. ज्याला साठोत्तरी किंवा लघुअनियतकालिकात लिहिणारे असे म्हणतात ते लेखक, हे बंडखोरीच्या पवित्र्यात होते तेव्हा ते विविध अकादम्या, बक्षिसे, संमेलने, प्रकाशक, वगैरे साऱ्याच गोष्टी भंपकपणाच्या मानत. मात्र, यथावकाश त्यांचे बंड व्यवस्थेने थंड केले, यातील काही लेखकांना पुरस्कार, कमिटीवर घेणे, पाठ्यपुस्तकाला लावणे अशी बक्षिसे मिळाल्यावर लेखकाचा लेखकराव कसा होतो ते यातील अनेक लेखकानी स्वत:च्याच उदाहरणानी दाखवून दिले. पारितोषिकांना तुच्छ लेखणाऱ्या या लोकांनी बक्षिसे मिळावी म्हणून सेटींग लावली. आजपर्यंत मुलाखती देत नाही म्हणणाऱ्यानी मुलाखतींचा सपाटा लावला, सत्कार स्वीकारले, कमिटीबाजी केली, निवडणुका लढवल्या. बरे असे मिरवून घेताना काही वेगळा विचार दिला, काही सृजनशीलता दाखवली, असे झालेच नाही. हे सारे मराठी भाषा, साहित्य, परंपरा यांच्याकडे आम्ही गांभीर्याने बघतो म्हणणाऱ्यांनी केले म्हणून जास्त वाईट.

ज्ञानेश्वर, तुकाराम, चक्रधरांचे महानुभाव अनुयायी, अनेक ज्ञात अज्ञात गद्यपद्यलेखक वगैरेंनी मराठीत लिहून परंपरा चालती ठेवली, समृद्ध केली, म्हणून मराठी भाषा, तगली, जगली, वाढली, राजभाषा वगैरे होऊ शकली. त्यांना कोठे होती साहित्य संमेलनांची गरज? बरे, म. फुल्यांचा तर अशा संमेलनाना स्पष्ट विरोधच होता. तरीही त्यांचे समग्र वाङ्मय प्रकाशित होऊन त्यांच्या अनेक आवृत्त्या निघतात आणि वैचारिक मार्गदर्शनही करतात. आणि साहित्य संमेलने भरून शंभर वर्षे झाली, मराठी लेखनाची जागतिक भाषांत रूपांतरे झाली, काही मराठी लेखकांनी इतर भाषातून लेखन केले. तरी जागतिक पातळीवर पोहोचेल असे नाव सुचले, आणि मान्य झाले ते तुकारामांचेच.

**संपर्क : ९८५०८१२९८५**



# तेव्हा आणि आता...

साहित्य संमेलन या शब्दप्रयोगाने अजूनही बोध होतो तो मुळात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचाच. अजूनही म्हणण्याचे कारण असे की मराठीमध्ये वेगवेगळ्या साहित्य संमेलनांची आज एक स्वतंत्र अशी उपसंस्कृतीच निर्माण झाली असूनही व कितीतरी प्रवाहांची, कितीतरी प्रकारांची, कितीतरी ठिकाणी, जवळजवळ रोजच सरासरी एखादे तरी संमेलन असावे अशा रितीने कित्येक वर्षे वेगवेगळी साहित्य संमेलने विविध ठिकाणी आयोजित केली जात असूनही ‘साहित्य संमेलन’ म्हटले म्हणजे फक्त अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनच आपल्या डोळ्यांपुढे उभे राहते.

असे का होते? याचे एक कारण या ‘अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन’ नामक आयोजनाला ८५ संमेलनांची व सुमारे शतकोत्तर पाव शतकाहून अधिक काळची परंपरा लाभली आहे. पण, मुळात ही संमेलने ही ‘संमेलने’ नसून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ते ‘अधिवेशन’ आहे ही वस्तुस्थिती आता महामंडळाच्या केवळ घटनेत तसे उल्लेखित असण्यापुरतीच व शेवटच्या दिवशीच्या ठराव वाचनाच्या व टाळ्या वाजवण्याच्या नैमित्तिक उपचारापुरतीच मर्यादित उरली आहे. दुसरे कारण या संमेलनाच्या व्यासपीठावर, प्रायोजकत्व व स्वागताध्यक्षत्वात विविध पक्षोपक्षांच्या, विशेषत: सत्तारूढ पक्षोपक्षाच्या नेतृत्वाचा वाढलेला वावर, धनसत्ता व राजसत्तेचा लाभलेला आश्रय, त्यामुळे प्राप्त होत चाललेले ऐश्वर्य, उत्सवी सोहळ्याचे स्वरूप, प्रवास-निवास-भोजनाच्या अगदी दिमाखदार सोयींसह वर लाभणारी मानधनाची दक्षिणा हेही आहे. आयोजकांमधील सामान्य कार्यकर्त्यांना पडणारे कष्ट सोडल्यास सारे काही आपल्या खिशात हात न घालता परस्परच होत असल्यामुळे एका अर्थाने ही काही लोकांची सन्माननीय वार्षिक चंगळही झालेली आहे.

‘महाराष्ट्र’ हे भाषिक राज्य पुनर्रचनेच्या तत्त्वावर संघर्ष करून, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा त्यासाठी लढा लढून व त्यातही त्या लढ्याची मुहूर्तमेढ ही जुन्या मध्यप्रांताच्या असेंब्लीत नागपुरात, १९३८ साली तसा ठराव करून रोवली गेल्याचे जसे आता विस्मृतीत गेले आहे व त्यामुळे हा ‘महाराष्ट्र’ नुसता ‘महाराष्ट्र’ नसून तो ‘संयुक्त’ झालेला महाराष्ट्र आहे हे देखील जसे विस्मृतीत टाकले गेले आहे तसेच काहीसे हे साहित्य संमेलन हे मुळात या ‘संयुक्त’ महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांच्या स्वायत्त अशा प्रादेशिक साहित्य संस्थांच्या मिळून निर्माण केल्या गेलेल्या साहित्य महामंडळाचे ते ‘अधिवेशन’ असते व पुढे त्यात महाराष्ट्राबाहेरील भारतातील समाविष्ट व संलग्न केल्या गेलेल्या अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे ते अधिवेशन असते हे खुद्द त्या संस्था व त्या महामंडळाच्या देखील जणू विस्मृतीतच गेले

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**




आहे. असे म्हणण्यापेक्षाही गर्दीच्या, धनसत्तेच्या व राजसत्तेच्या त्याला लाभत गेलेल्या आश्रयामुळे त्याचे जे व्यावहारिक, आनुषंगिक लाभ विविध हितसंबंधितांसाठी त्यातून निर्माण झाले आहेत त्यामुळे त्याचे ते अधिवेशनाचे मूळ स्वरूपच जाणीवपूर्वकच विस्मृतीत टाकले गेले आहे.

केवळ हेच संमेलन नव्हे, तर हे संमेलन तेवढे भरविण्याचे जवळजवळ एकमेवच काम करणाऱ्या या महामंडळाच्या ज्या विभागीय घटक व अन्य समाविष्ट, संलग्न संस्था आहेत त्यांची विभागीय संमेलने देखील मुळात त्यांची अधिवेशनेच आहेत. मात्र, या संमेलनांच्या व्यासपीठांना गेल्या सुमारे दोन-तीन दशकांपासून लाभलेल्या गर्दी, राजाश्रय व प्रायोजकाश्रयामुळे आपल्या सोईसाठी आपण, विनयाने नव्हे, तर धूर्तपणे त्या गर्दीला ‘रसिक’ म्हणून संबोधण्याचे जे आनुषंगिक व्यावहारिक लाभ आयोजक व संबंधितांना असतात त्या पोटी तिला ‘रसिक’ म्हणू लागलो आहोत. त्यामुळे या विभागीय संमेलन संस्कृतीचेही स्वरूप शेवटच्या दिवशीचा केवळ टाळ्यांच्या गजरात कोणत्याही चर्चेविना ठराव-वाचनाचा उपचार सोडला तर मुळात अधिवेशनाचे उरलेलेच नाही. गेल्या अनेक दशकांतील अशा शेकडो ठरावांचे पुढे काय करायचे याच्याशी कोणालाच फारसे कर्तव्यही उरत नाही. त्याचा कोणी पाठपुरावाही करत नाही. एवढेच कशाला ते सारे ठराव जे करतात त्यांच्याकडे उपलब्ध देखील पुन: होत नाहीत. साहित्य विश्वाच्या मागण्या, सूचना, अपेक्षांचे पुढे वर्षानुवर्षे काहीच झाले नाही तरी त्याकडे लक्ष पुरविणे, त्यांचा पाठपुरावा करणे हे जणू आपले कामच नाही अशा थाटात खाऊन-पिऊन, हात पुसून, एक ‘संमेलन’ संपले की पुन: दुसरे ‘संमेलन’ आणि त्यात पुन: नवीन ठराव एवढे व्यावसायिक क्रिकेटसारखे चक्र मात्र अव्याहत सुरू असते.

थोडक्यात, या संस्थांच्या मूळ संस्थात्मक उद्दिष्ट व कार्यापेक्षा केवळ व्यासपीठीय, गर्दीच्या, पैसा व निधी जमवून तो स्थायी स्वरूपात ठेवण्याऐवजी व संस्थांच्या मूळ उद्दिष्टांवर खर्च करण्याऐवजी अनाठायी खर्च करण्याच्या व त्यासाठी धनसत्ता, राजसत्ता व गर्दीच्या लांगुलचालनाचे तेवढे मुख्य कार्य करणाऱ्या प्रमुख संस्थांमध्ये या ‘संमेलन’ नामक उत्सव भरविणाऱ्या संस्थांचे रूपांतर झाले आहे. एका अर्थाने आपल्या मूळ उद्दिष्टांनुरूप आवश्यक ते कार्यच करण्याचे टाळणाऱ्या या संस्थांची गरजच संपुष्टात आल्यासारखी ही स्थिती आहे.

आपल्या संस्था मुळात कशाकरता निर्माण केल्या गेल्या होत्या, त्यांची घटनात्मक उद्दिष्टे काय आहेत व त्यांची पूर्ती करण्याचा आग्रह आपण का, कसा व कशाकरिता धरून ठेवला पाहिजे याचा विचार करणे जवळजवळ आपल्या असलेल्या संस्थांनी आता सोडूनच दिले आहे. इतकेच काय तर त्याचे स्मरण



करून देणारे हे जणू त्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना अडचणीत आणण्यासाठीच तसे स्मरण करून देण्याचा उपद्व्याप करतात असे चक्क सांगितलेही जाऊ लागले आहे. त्यामुळे या संस्थांच्या मूळ उद्दिष्ट पूर्तीचा आग्रह धरणारे हे जणू शत्रू असावेत अशी वागणूक त्यांना दिली जाते आहे. घटनात्मक उद्दिष्टांना बांधील राहण्याऐवजी केवळ व्यासपीठीय, लोकप्रिय, लोकानुनयी होऊन आणि ज्याला राजकीय नेतृत्वाचा, खाजगी धनसत्तेचा, प्रायोजकांचा व तथाकथित सांस्कृतिक नेत्यांचा आश्रय लाभू शकेल, शासनाची भरघोस अनुदाने आणि शासनसत्तेचा वरदहस्त तेवढा लाभू शकेल अशाच रीतीने आपली मूळ संस्थात्मक उद्दिष्टे स्थगित ठेवून केवळ असल्या व्यावहारिक व आनुषंगिक लाभांपुरत्या या संस्था व त्यांचे कार्य मर्यादित करण्याची एक नवीच संस्कृती गेल्या सुमारे दोन-तीन दशकांपासून या संस्थांमधून सुस्थिर केली जात आहे. त्याचे कारण या अधिवेशनांची तथाकथित 'संमेलने' करणाऱ्या या संस्था, ज्या पूर्वी खऱ्या अर्थाने सक्षम व समर्थ प्रतिभावंत लेखक-कलावंत-विचारवंत-बुद्धिवंत-प्रज्ञावंत अशांच्या संस्था होत्या त्यातून आज त्यांचेच लोकशाहीच्या नावावर, निवडणुकांच्या राजकारणातून उच्चाटन केले जात जात त्यांचे नियंत्रणच संपुष्टात आणले गेले आहे. त्या आता प्रतिभावंतांच्या, लेखकांच्या, साहित्यिकांच्या संस्था उरलेल्याच नाहीत. तर स्वत:ला 'वाङ्मयप्रेमी' म्हणवणाऱ्यांनी साहित्याच्या नावावर त्या क्षेत्रासाठी असणारा निधी उपलब्ध करवून घेण्यापुरत्या तेवढ्या त्या 'साहित्य-संस्था' राखल्या आहेत. त्यांचे नेतृत्व व पदाधिकारी हे आज प्रामुख्याने मान्यवर लेखक, प्रतिभावंत, साहित्यिकांच्या हाती उरलेलेच नाही. त्यामुळे साहित्यक्षेत्राच्या गरजा जाणणारे द्रष्टे नेतृत्वही तेथे उरलेले नाही. प्रतिभावंत लेखकांनाही त्या संस्थांचे नेतृत्व स्वत: करण्याऐवजी त्यांचे आयते मान-सन्मान घडवून आणणाऱ्या कार्यकर्त्यांच्याच हाती त्या असाव्यात व त्यांनी फक्त आपले हितसंबंध तेवढे सांभाळावे एवढेच आज वाटते आहे. या संस्था चालवणे हे आपले कामच नव्हे ही त्यांची पक्की भूमिका झाली आहे. याचा अर्थ अगोदरच्या ज्या पिढ्यातील प्रतिभावंत लेखकांनी आपला वेळ, श्रम, घाम, पैसा खर्च करून या संस्था उभारल्या व टिकवून धरल्या ते एकतर आजच्या प्रतिभावंताइतके 'शहाणे', 'धूर्त', 'चाणाक्ष', तरी नव्हते अथवा त्यांना फारच रिकामा वेळ होता व तो कसा घालवायचा म्हणून तसले गंभीर उद्योग ते करत असावेत असाच करावा लागेल. मात्र, तरीही या संस्थांना आज 'साहित्य-संस्था'च समजले जाते. साहित्यिकांच्या या संस्था साहित्यिकांनी नव्हे तर गैरसाहित्यिकांनी स्वत:ला 'साहित्यप्रेमी' संबोधून घेऊन चालवाव्या यालाही एकेकाळी लेखक-कलावंत जो तीव्र विरोध करीत असत तशी गरज आजच्या प्रतिभावंतांनाच वाटत नाही. या संस्थांच्या नेतृत्वाला आज स्वतंत्रपणे या संस्थांसाठी, त्यांच्या गर्दीच्या नसणाऱ्या, राजाश्रय, सत्ताश्रय लाभू न शकणाऱ्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी लागणारा लोकनिधी उभारण्याची क्षमता, सामर्थ्य व विश्वासार्हता असल्याचा आत्मविश्वासच उरला नसल्याने त्या केवळ शासनावलंबी, विविध राजकीय पक्षोपपक्षांच्या नेतृत्वाशी जवळीक साधून त्यांच्याकडून प्राप्त निधी व अनुदानाश्रयी संस्था तेवढ्या होत गेल्या आहेत. त्या पोटी आपली स्वायत्तता देखील गहाण टाकणाऱ्या अटीसुद्धा त्या स्वीकारू लागल्या आहेत. अशा अटींना विरोध करणाऱ्या भूमिका घेणाऱ्यांशी आपल्या 'संस्थेचा संबंध नाही, ती त्यांची व्यक्तिगत भूमिका' असल्याचे खुलासे करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे.

परिणामी, या संस्थांच्या अधिवेशनांची व्यासपीठीय गर्दी खेचणारी 'संमेलने' करून त्या भोवती 'गर्दी' व 'बघे' जमवण्याच्या शक्यतांनुरूप आवश्यक तसे व तेवढेच कार्य, कार्यक्रम व त्याचे सवंग आणि सपाट स्वरूप निश्चित करून तेवढ्यापुरत्या त्या मर्यादित होत होत प्रायोजकाश्रयी, शासनाश्रयी व गर्दीश्रयी होत आपल्या मूळ उद्दिष्टांपासून कितीतरी दूरच नेल्या गेलेल्या आहेत. हे सारे खरे तर फारच गंभीर आहे. पण ते गांभीर्याने जाणून घेण्यात कोणालाच रस उरलेला नाही. एकीकडे आपली घटनात्मक उद्दिष्टे व त्यांच्या पूर्तीची दिशा आणि त्यासाठी आवश्यक साधनसामग्री उभारण्याची क्षमता घालवून बसलेल्या या संस्था दुसरीकडे आपणच मुख्य प्रवाही साहित्यव्यवहाराच्या व ११ कोटी मराठी जनतेच्या प्रातिनिधिक संस्था असल्याचे सांगायला मात्र विसरत नाहीत. जणू ११ कोटी मराठी जनतेने यांना एकमुखाने निवडूनच दिले असावे अशा थाटात ते हे सांगत असतात. परिणामी, या काही विशिष्टच संस्थांच्या पलीकडच्या मोठ्या परिघात व अवकाशात चालणारा साहित्य व्यवहार, जो वेगवेगळे प्रवाह, जाती-जमाती, अल्पसंख्य, वैचारिकता, तात्त्विकता, बांधिलकी, संकल्पना, यांचे प्रतिनिधित्व करतो, तो खऱ्या अर्थाने बहुसंख्य सुसंस्कृत कोट्यवधी मराठी जनतेचा कोणत्याही अर्थाने प्रातिनिधिक वाङ्मयीन व्यवहार ठरविलाच जात नाही. त्याला त्याच्या न्याय हक्कांचा शासनाश्रय, निधीचा वाटा व सांस्कृतिक प्रतिष्ठाही उपलब्ध करून दिली जात नाही. त्याच्या संमेलनांना अद्यापही 'समांतर', 'विद्रोही', 'व्यवस्था-विरोधी' मानून 'मुख्य-प्रवाही' नसलेल्याच साहित्य-संस्कृती व्यवहाराचाच, दुय्यमच दर्जा दिला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राम मनोहर लोहियांच्याच भाषेत या प्रक्रियेचे विवेचन करायचे झाल्यास हा भारतीय जातिव्यवस्थेतून झिरपणाऱ्या स्वत:लाच तेवढे 'मुख्य प्रवाही', 'सांस्कृतिक', 'वाङ्मयीन' समजण्याच्या वर्णवर्चस्ववादी अहंकारी मनोवृत्तीतून आपला समाज अद्यापही मुक्त न केल्या गेल्याचा परिणाम आहे.

ज्या साहित्य संमेलनाचा चेहरा 'साहित्य संमेलन' म्हटल्यावर आपल्या समोर येतो व ज्याचे अध्यक्षपद लाभल्याशिवाय आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता झाल्याचे विविध प्रवाहांमधील प्रतिष्ठित लेखकांनाही वाटत नाही त्याचे मूळ स्वरूप हे असे आहे. त्याही मागे जाऊन बघायचे झाल्यास न्यायमूर्ती रानडे ह्यांच्या पुढाकाराने १८७८ पासून सुरू झालेल्या 'ग्रंथकार संमेलन' या संमेलनाची मुळात परंपरा लाभलेले हे संमेलन आहे. एका छोटेखानी सभागृहात ग्रंथ, ग्रंथकार, ग्रंथसंस्कृती, ग्रंथव्यवहार, लेखक, प्रतिभावंत व त्या विश्वाशी संबंधित समकालीन विषय या संबंधात व समाजनिष्ठ, समाजोपायोगी अशा गांभीर्याने होणाऱ्या चर्चा, विचारमंथन, वाद-विवादाची असणारी ही गंगोत्री आज गर्दी व बघे जमवण्यासाठी भरविल्या जात असलेल्या संमेलन स्वरूपामुळे, आपण कितीही पवित्र अशी लोकगंगा झाली असल्याचा कितीही आव आणला तरी त्याची वस्तुस्थिती मात्र प्रचंड प्रमाणावर प्रदूषित असणाऱ्या गंगेसारखीच आहे. आपल्या मनातील नितळ, स्वच्छ, पवित्र, पारदर्शी व शुद्ध अशा हेतूंच्या गंगेची ती निश्चितच उरलेली नाही.

विशेष म्हणजे न्यायमूर्ती रानड्यांना, 'शेतकऱ्यांचा आसूड' उगारणाऱ्या सत्यशोधक महात्मा फुल्यांनी त्या ग्रंथकार संमेलना निमित्ताने लिहिलेल्या त्या ऐतिहासिक पत्रात ज्या अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या होत्या त्यातील त्यांच्या शेतकऱ्यांच्या मुलांनी अशी संमेलने भरवू



शकण्याच्या शक्यता आज नुसत्या फलद्रुपच झालेल्या नाहीत तर ह्या संमेलनांना सत्तेचा राजाश्रय व पैसा आणि प्रायोजकांचा धनाश्रय उपलब्ध करवून देणारी व बहुतांश संमेलने प्रायोजित करणारी मंडळी ही आज शेतकऱ्यांचीच मुलं आहेत. मात्र, महात्मा फुल्यांच्या कल्पनेतली त्यातली 'सत्यधर्मी' व 'सत्यशोधक' किती व कोण कोण आहेत हे आपण कधी तपासणार आहोत की नाही?

ग्रंथकार संमेलनातून प्रवाहित होत राहिलेला हा प्रवाह पुढे पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने आपल्या अधिवेशनांच्या स्वरूपात जोपासला, ही संमेलने तोवर आजच्या स्वरूपातली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने नव्हती. ती पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेची 'अधिवेशने' होती.

मराठवाडा तेव्हा निजामाच्या ताब्यात होता तर विदर्भ हा मध्यप्रांताचा भाग होता. खानदेश-जळगावपर्यंत तर विदर्भ साहित्य संघाचेच तेव्हा कार्यक्षेत्र विस्तारलेले होते.

१९६० साली संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर येथे मुख्यालये असणाऱ्या विभागीय साहित्य संस्थांनी मराठी भाषिक एकतेसाठी एकत्र येऊन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची स्थापना केली. त्यानंतर महाराष्ट्र साहित्य परिषदेची ही अधिवेशने त्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची म्हणून १९६५ पासून भरविली जाऊ लागली. चंद्रपूरचे नियोजित अ. भा. म. साहित्य संमेलन हे अशा अर्थाने खरेतर ८५ वे 'अधिवेशन' आहे ते प्रत्यक्षात अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे ८५ वे 'साहित्य संमेलन' नाही. पहिली पाच संमेलने म्हणजे १८७८ (पुणे), १८८५ (पुणे), १९०५ (सातारा), १९०६ (पुणे), १९०७ (पुणे), या संमेलनांपर्यंत 'स्वागताध्यक्ष' ही संकल्पना देखील अस्तित्वात आली नव्हती. १८०८ सालच्या पुण्यातल्या ६ व्या संमेलनापासून पहिल्यांदा 'स्वागताध्यक्ष' ही कल्पना अस्तित्वात आली. 'मराठी शब्दरत्नाकर'कार वा. गो. आपटे हे पहिले स्वागताध्यक्ष. पहिल्या महिला स्वागताध्यक्ष १९३६ सालच्या जळगावच्या संमेलनाला आनंदीबाई शिर्केंच्या रूपाने लाभल्या तर दुसऱ्या शशिकला काकोडकर १९९४ च्या पणजी येथील संमेलनानिमित्ताने लाभल्या. तिसऱ्या महिला स्वागताध्यक्षा सुमित्रा महाजन, इंदूरच्या २००१ च्या संमेलनाला लाभल्या. ८० स्वागताध्यक्षांपैकी फक्त ३ स्वागताध्यक्ष महिला आहेत. यावरून आणि संमेलनांच्या अध्यक्षपदीही महिला अध्यक्षांची अत्यल्प संख्या बघता हा सारा व्यवहार अद्यापही किती पुरुषप्रधान संस्कृतीचाच कसा भाग आहे हे लक्षात येईल.

ही संमेलने धरून पुढील १९०९ च्या बडोदा संमेलनासहित अध्यक्ष्यांची भाषणे देखील छापील स्वरूपात कधी नव्हती. त्यामुळे ती प्रत्यक्ष हजर राहून ऐकण्याला महत्त्व होते.

या संमेलनांच्या इतिहासात दोनदा अध्यक्षपद लाभलेले डॉ. आनंद यादव ह्यांना एकदाही या अध्यक्षपदी मात्र बसता न आल्याचा जसा इतिहास आहे तसाच अध्यक्षाशिवाय संमेलन उरकून घेतले गेल्याचा व लेखक साहित्यिक अध्यक्षाविनाच साहित्य संमेलन भरविण्याचा अवांछित व अवाङ्मयीन विक्रमही २००९ च्या महाबळेश्वर संमेलनाने अगदी उजळ माथ्याने केला आहे.

८५ संमेलनांपैकी ११ संमेलने एकाच गावी भरविली गेलेले गाव म्हणून 'पुणे' या गावानेही विक्रम नोंदवला आहे. ८५ संमेलनांपैकी म्हणजे एक चतुर्थांशपेक्षा अधिक पुणे-मुंबई-सातारा-कराड-सांगली-मिरज या पश्चिम महाराष्ट्रातील गावांच्या वाट्याला तर फक्त ९ संमेलने विदर्भाच्या वाट्याला आलेली आहेत. सर्वाधिक कमी म्हणजे केवळ ६ संमेलने मराठवाड्याने भरविली आहेत. दक्षिण महाराष्ट्रात ४ तर खानदेश विभागात ५ संमेलने, कोकण विभागात सर्वांत कमी म्हणजे केवळ ३ संमेलने, त्यातही दोन रत्नागिरीलाच, वाट्याला आली आहेत.

बहुसंख्य मराठी भाषिक ज्या ग्रामीण भागात असतो अशा भागांना तर ८५ संमेलने होऊनही या संमेलनांनी अद्याप स्पर्शच केलेला नाही. कारण, तिथे वार्षिक चंगळीच्या हव्या असणाऱ्या महानगरी सोयी-साधने उपलब्ध नसतात. विश्वाला दरवर्षी फुकटात गवसणी घालण्यासाठी घटना व नियमबाह्य असूनही संमेलने भरवायला दक्ष असणारी मंडळी ग्रामीण तळपातळीवर संमेलन भरवायला किती अनुत्सुक असतात हे वेगळे सांगायलाच नको.

भारताच्या राजधानीत देखील आजवर केवळ एकमेव संमेलन ते देखील १९५४ या वर्षी म्हणजे ५७ वर्षांपूर्वी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्याचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी भर पावसातही केले होते. मराठी खासदारांची एवढी मोठी संख्या असूनही व त्यातले अनेक दिल्लीवासी व राजकीदृष्ट्या प्रबळ असूनही भारताच्या राजधानीवर मराठीची मुद्रा या संमेलना निमित्ताने उमटवण्याची त्यांची इच्छाशक्ती किती क्षीण आहे आणि त्यांना तसे करायला भाग पाडण्यास हे संमेलन भरविण्याची जबाबदारी असणारे महामंडळही किती उदासीन आहे याचेच हे द्योतक आहे. दिल्लीत उपलब्ध विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या, ज्यात विविध पक्षांच्या प्रभावी नेत्यांचाही समावेश आहे व आपले काहींशी तर व्यक्तिगत स्नेहाचेही संबंध आहेत त्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत लेखकानेच मराठी भाषिकांची दिल्लीत राज्यव्यापी साहित्य संस्था उभारून मागील दोन-तीन संमेलनांपैकी एखादे तरी भारताच्या राजधानीत भरविण्याच्या दृष्टीने जे प्रयत्न व्यक्तिगत पातळीवर करून बघितले व महामंडळाच्या अध्यक्षांनी त्या प्रयत्नांना संस्थात्मक औपचारिक बळ प्राप्त करून द्यावे म्हणूनही जे प्रयत्न केले त्यालाही फारसा प्रतिसाद देण्याचा उत्साहही दाखवला न गेल्याने ते प्रयत्न तिथेच थांबवावे लागले आहेत. ८५ संमेलनांपैकी महाराष्ट्राबाहेर झालेल्या संमेलनांची संख्या तुलनेने अधिक बरी म्हणजे १८ आहे. मात्र, गेल्या दशकभरात महाराष्ट्राबाहेर एकही संमेलन आमंत्रण व गरज असूनही भरविले गेले नाही.

या संमेलनाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे सुरुवातीच्या सुमारे ४५ संमेलनांपर्यंत म्हणजे १९६५ पर्यंत तरी संमेलनांवर राजसत्ता व धनसत्तेची, ऐश्वर्य व बडेजावाची, अनाठायी खर्च वा सोहळेबाज आयोजनांची सावली पडलेली नव्हती. त्यामुळे प्रामुख्याने केवळ राजकारण्यांना संमेलनांचे स्वागताध्यक्षपद बहाल करण्याचीही तोपर्यंत फारशी गरज पडली नव्हती. स्वागताध्यक्ष हे देखील साहित्यिक वा साहित्यक्षेत्राशी संबंधित प्रमुख व्यक्तीच असत. १९६५ नंतर मात्र त्यात बदल होत जाऊन अशा व्यक्ती पुढे अपवादानेच स्वागताध्यक्ष केल्या गेलेल्या दिसतात.

या संमेलनांचे स्वागताध्यक्ष आणि अध्यक्ष दोन्ही राहिलेल्या व्यक्तींची संख्या ७ असून त्यात वि. मा. महाजन, चि. वि. वैद्य, न. चि. केळकर, द. वा. पोतदार, वि. स. खांडेकर, भा. वि. वरेरकर व उत्तम कांबळे अशा महत्त्वाच्या लेखकांचा समावेश आहे.

पती-पत्नी दोघांनाही संमेलनाध्यक्ष पद लाभलेले एकमेव साहित्यिक जोडपे कवी अनिल आणि कुसुमावती देशपांडे होते.

या संमेलनाचे १४ अध्यक्ष हयात आहेत. नागपूर येथे भरलेल्या ८० व्या अ. भा. मराठी साहित्य

संमेलनापूर्वी ७३ वर्षे इथेच म्हणजे १९३३ साली जे अधिवेशन नागपुरात भरले होते त्याचा सविस्तर वृत्तांत ग्रंथरूपाने उपलब्ध आहे. तो बघितल्यास या संमेलनाचे तत्कालीन स्वरूप हे लेखन प्रकार, भाषा, बोली, प्रमाण भाषा, व्याकरण, वाङ्मय, साहित्य, समीक्षा, लेखन, सिद्धांत, लेखक व संस्कृतिसंबंद्ध विविध समकालीन विषयांची किती सखोल, व्यापक व विद्वता आणि अभ्यासपूर्ण चिकित्सा आणि मीमांसा करण्याऱ्या अधिवेशनाचे कसे होते आणि कोणत्याही केवळ गावगप्पांना 'चिंतन' आणि गर्दीला 'रसिक' म्हणून लोकानुनय करण्याची गरज व परंपरा या व्यासपीठाला तेव्हा कशी नव्हती हे त्यावरून दिसते.

या अधिवेशनाचे स्वरूपच मुळी संबंधित समकालीन विषयांवर प्रत्यक्ष निश्चित असे मांडले गेलेले ठोस ठराव, भोंगळ अथवा संदिग्ध नव्हे, त्या त्या विषयाची त्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण सर्वांगीण चिकित्सा, मीमांसा, तपासणी करणारी, बाजू व भूमिका मांडणारी निवेदने, भाषणे, वाद, प्रतिवाद, सूचना, उपसूचना व त्यावरील सखोल चर्चा, ज्याचा आज साऱ्यांना केवळ कंटाळा आहे व गरजच नाही असे वाटते, असेच शिस्तशीर व वाङ्मयीन, साहित्यिक, वैचारिक गांभीर्याला बांधील होते. केवळ दहा-पाच मिनिटांत तेव्हा कोणी 'अभ्यासपूर्ण' बोलणे शक्य नव्हते त्यानुसार संमत होणाऱ्या ठरावानुसार पुढच्या अधिवेशनापर्यंत कार्य करणे, ठराव करून ते विस्मरणात न टाकता कार्य करणे, त्याचा पाठपुरावा करून नंतरच्या अधिवेशनात कार्याचा अहवाल सादर करणे ही कार्यपद्धत होती.

गर्दीची त्यामुळे गरजच नसणारे हे खऱ्या अर्थाने ग्रंथकारांचे, लेखकांचे, साहित्यिकांचे, प्रतिभावंतांचे क्षेत्र होते. आजही महामंडळ व त्यांच्या घटक संस्थांच्याही संमेलनात 'अधिवेशन' हा शब्द असला तरी तो शब्द हा केवळ त्या काळाच्या स्मारकाच्या स्वरूपातच तेवढा शिल्लक आहे. त्या अधिवेशनांमधील अभ्यासपूर्ण, विद्वत्तापूर्णतेची, व्यासंगाची जागा आज पसरट, घसरट, निसरड्या, गुळगुळीत वेळ मारून नेणाऱ्या व बऱ्याचशा विषयबाह्य अशा वरवरच्या उडत्या मांडणीने घेतली असून निश्चित विषयांवरील ठरावांची जागा भोंगळ व सपाट, फक्त गर्दीला चालणाऱ्या, भावणाऱ्या व त्यांच्या केवळ शाब्दिक चलाखीच्या मनोरंजनाच्या गरजा भागवणाऱ्या परिसंवाद-मुलाखती, रंजक कार्यक्रम अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांनी घेतली आहे. त्यात सहभागी असणाऱ्या कोणावरच कोणाचेच अभ्यासपूर्ण व तयारी करून बोलण्याचे कोणतेच बंधन नाही. आठ-दहा-बारा अथवा पंधरा मिनिटांत माणसे 'उरकून' घ्यायची असताना अशी बंधने घालणार कोण आणि पाळणार कोण? अधिकाधिक विभागांना अधिकाधिक प्रतिनिधित्व दिल्याचे तथाकथित लोकशाही 'कर्तव्य' केवळ उरकण्याच्या भावनेने वक्त्यांच्या, कवींच्या रांगा त्यातून या व्यासपीठावर लावल्या गेल्या आहेत. ऐश्वर्य, वैभव, बडेजाव, जाणीवपूर्वक ओढवून घेतलेला धनसत्तेचा, प्रायोजकांचा प्रभाव त्या प्रभावाखाली ही संमेलने कायम राखण्यासाठीच वाढविला गेला आहे. आणि तरीही त्याला 'उरूस', 'जत्रा', 'उत्सव', 'बडेजाव', 'ऐश्वर्याचे प्रदर्शन' म्हणू नका आणि म्हणणार असल्यास, 'त्याचीही समाजाला कशी गरज असते' आणि 'श्रीमंत होणे हा कसा गुन्हा नाही,' अशी चलाखीची विधाने करून आम्ही पुन: हे कसे योग्य आहे तेच पटवून देणार. ते कितीही व कितीही वेळा पटवून दिले तरी केवळ चलाखी, धूर्तपणा आणि 'उरूस', 'उत्सव', 'जत्रा', 'ऐश्वर्य', 'श्रीमंती' 'बडेजावाचे प्रदर्शन', 'चंगळ', एवढ्याच काही समाजाच्या गरजा नसतात, तर त्या सारा समाजच नियंत्रित करण्याचे सामर्थ्य, शक्ती आणि यंत्रणा उपलब्ध असणाऱ्यांना तो आपला आश्रित व आपल्यापेक्षाही खुळा व कमी उंचीचा हवा असतो त्यातून त्या निर्माण केल्या गेलेल्या असतात. या साहित्य संमेलनांचे व साहित्यसंस्थांचे आज प्रत्यक्षात असे झाले आहे.

यशवंतराव चव्हाण व्यासपीठावर नव्हे तर समोर बसले या आणीबाणी काळात यशवंतराव चव्हाणांसारख्या जाणत्या मुख्यमंत्र्याला असणाऱ्या विवेकाचा गौरव करून वारंवार ते उदाहरण देणारे हे संमेलन पुढच्या राज्यकर्त्यांकडून मात्र कधी १० तर कधी २५ आणि आता ५० लक्ष रुपयांच्या निधीसाठी व त्या मूळ भरवशावर पुढचे प्रायोजक-आयोजक लाभणारे संमेलन झाले आहे. कोणाला मिरवण्याचे तर कोणाला फिरवण्याचे, कोणाला जिरवण्याचे तर कोणाला कमावण्याचे ते साधन वाटू लागले आहे.

अशा वृत्ती-प्रवृत्तींविरुद्ध एकेकाळी 'समांतर' संमेलन भरविणारी सुबुद्ध व समर्थ, सक्षम मंडळी आज एकतर हयात तरी नाहीत वा जी आहेत ती गारठली तरी आहेत वा 'व्यवस्था शरण' तरी झाली आहेत. खुद्द महामंडळाचे देखील या संमेलनांवरील नियंत्रण पूर्णपणे सुटलेले आहे. कोणी किती रक्कम या संमेलनासाठी जमवावी वा उरवावी यावर संमेलन भरविणाऱ्या महामंडळाचेच नियंत्रण नाही. ते घालण्याची इच्छाही नाही. उरलेल्या रकमेचा विनियोग कोणी कसा कशासाठी करावा याचे नियम असले तरीही ते बाजूला सारून त्यावर वाद होऊ लागले आहेत. स्वत:च्या बळावर हे संमेलन कधीकाळी भरवण्याच्या हेतूने गाजावाजा करत स्थापलेल्या संमेलन महाकोषासाठी निधी उभारण्याची स्वतंत्र मोहीम चालवण्याची गरज, इच्छा व सामर्थ्य कोणातच उरलेले नाही. केवळ राजकारणी आणि शासन यांना त्यांच्या हस्तक्षेपासाठी दोष देण्याचा काळ कधीच संपला आहे. कारण तो त्यांनी करावा ही आता त्यांची गरज राहिली नसून ती संमेलने भरविणाऱ्यांचीच गरज झाली आहे. तेच तो हस्तक्षेप आता 'आमंत्रित' करत आहेत. आता त्यांचा हा हस्तक्षेप, प्रायोजकांचा व धनदांडग्यांचा हस्तक्षेप कायमचा व अपरिहार्यच राहावा असेच स्वरूप या संमेलनांना खुद्द ती घडविणाऱ्यांनीच दिले असून ते त्यांना तसेच कायम टिकायलाही हवे आहे.

थोडक्यात, या संमेलनामागचे संकेत, परंपरा, घटना, नियम, उद्दिष्टपूर्तीचे हेतू, अभ्यास, विद्वत्ता, व्यासंग, चिंतन, मीमांसा, चिकित्सा, विश्लेषण, वाद-प्रतिवाद यातून साकारणारी विवेकी व सहिष्णू वाङ्मयीन संस्कृती याचे हे संमेलन कमी आणि भरघोस ग्रंथविक्रीचा भरघोस व्यवसाय, धनसत्ता व राजसत्तेची भरघोस कृपा साधण्याची, त्यांच्याशी जवळीक साधण्याची व पुढच्या काही लाभांचे दरवाजे उघडून घेण्याची, अनेकांच्या अनेक प्रकारच्या संधी शोधण्याची, उत्सवी मानसिकता आणि वरवरची सपाट, संदिग्ध व वेळकाढू, 'काय वाटते' या प्रकारची भाष्ये यात बरेचसे या परंपरेचे रूपांतर झाले आहे.

या साऱ्या अवांछिताला वांछित वळण देऊ इच्छिणाऱ्यांचा संस्थात्मक प्रभाव शक्य तेवढा क्षीण करत तो नामशेष करण्याचीच इच्छा व आहे हे असेच चालू राखण्यात हितसंबंध दडलेल्यांची या व्यवस्थेवरची पकड यामुळे नजीकच्या भविष्यकाळात तरी आहे त्या स्थितीत फार बदलही संभवत नाही.

**संपर्क : ९९६०४९३६२२**



# ‘इतनी बडी किताब’

अखिल भारतीय साहित्य संमेलने ही महाराष्ट्राची मिरास आहे. मराठी अस्मितेचे ते एक प्रतीक आहे. हजारो लोक एकत्र येतात. साहित्य व्यवहारात चर्चा करतात. परिसंवाद, मुलाखती ह्याद्वारे विविध साहित्यिक विषयावर विचारमंथन होते. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आपल्या भाषणाद्वारे साहित्यासंबंधी प्रकट चिंतन करतात. अध्यक्षांच्या भाषणाचे खंड हे एक अतिशय मौलिक साधन आहे. काही साहित्य संमेलनानिमित्ताने झालेल्या, भाषणे, चर्चा, मुलाखती आणि वाचलेले निबंध ह्यांचेही संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. उदा. अहमदनगर येथे संपन्न झालेल्या सत्तराव्या साहित्य संमेलनाच्या साहित्य व्यवहारासंबंधी श्री. अरुण शेवते ह्यांनी संपादित केलेला आणि मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई या संस्थेने प्रकाशित केलेला सुमारे पाचशे पानांचा ‘संवाद’ हा ग्रंथ लक्षणीय आहे.

सत्तराव्या साहित्य संमेलनावेळी हजर असलेले कवी गुलजार ह्यांनी म्हटलेले आहे, ‘‘इतने चेहरे, लोग मैंने किसी साहित्य सम्मेलन मे पहले नहीं देखें! मैंने साहित्य की गोष्ठियाँ देखी हैं! कवि-दरबार देखे हैं! कवी सम्मेलन देखे हैं! उर्दू में अदबी कॉन्फरन्सेस देखी है! बँगला गोष्ठियाँ देखी हैं ! हिन्दी मे भी देखी हैं! पंजाबी मे भी देखी हैं! लेकिन जिस तरह यह महाराष्ट्र में मराठी के लिए होता है, उसपर सिर्फ महाराष्ट्र को ही नहीं, पूरे भारत को नाज है ! काश यह साहित्य इसी तरह लिया जाये! इतने लोगों, इतने चेहरोंकों देखकर मुझे सिर्फ यूँ महसूस होता है कि, मैंने पचास हजार पन्ने की, इतनी बडी किताब आजतक नहीं देखी !’’

कवी तो दिसतो कसा आननी? असे औत्सुक्य रसिकांच्या मनात नेहमी असते. संमेलनामुळे साहित्यप्रेमींना आपल्या आवडत्या साहित्यिकांना भेटण्याची उत्सुकता पुरी होते. ज्यांचे धडे किंवा कविता पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेले असतात, त्यांना भेटण्याची विद्यार्थ्यांना संधी मिळते. त्यांची स्वाक्षरी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची झुंबड पाहून आनंद वाटतो. पूर्वी संमेलनांवेळी त्याच त्या कवींच्या त्याच त्या कविता पुन्हा पुन्हा ऐकून त्या लोकांच्या तोंडपाठ होत असत. सुदैवाने आज आयोजक नवागतांचा शोध घेत आहेत. त्यामुळे अंधारात असलेले आणि प्रतिभेचे लेणे लाभलेले नवोदित कवी उजेडात आलेले आहेत.

अलीकडच्या संमेलनाला उत्साही स्वरूप प्राप्त झाले आहे. साहित्य संमेलन हा ‘इव्हेन्ट’ ठरत आहे. इव्हेन्ट मॅनेजरांची महाराष्ट्रामध्ये वानवा नाही. शिक्षण महर्षी, सहकार सम्राट, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी तयारच असतात. आपली प्रतिमा उजळून घेण्यासाठी साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम ही त्यांच्यासाठी एक पर्वणीच असते. ‘पैसा फेको तमाशा देखो’ असा हा प्रकार असतो. अनेकदा साहित्य व्यवहारासंबंधी अशा मंडळींना काही देणेघेणेही नसते. स्वत:च्या खर्चाने त्यांनी कधी एखादे पुस्तक विकत घेतलेले

**फादर फ्रान्सिस दिब्रिटो**

असते का? हा संशोधनाचा प्रश्न आहे. मग, त्याचे वाचन करणे दूरच राहिले.

### साहित्य संमेलनाध्यक्ष

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची निवड हा नेहमीच्या चर्चेचा विषय आहे. संभाव्य उमेदवाराने मतांचा जोगवा मागत हिंडत राहावे हे संमेलनाध्यक्ष या पदाचे अवमूल्यन आहे. या दगदगीमुळे शिवाजी सावंत, दया पवार आदी प्रतिभावंत साहित्यिकांना महाराष्ट्र कायमचा मुकला आहे.

लोकशाहीत निवडणुकीची प्रक्रिया आवश्यक असते, हे मान्य आहे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाला निराळी पत आहे. एखाद्या साहित्यिकाने आयुष्यभर साहित्याची जी सेवा केली असते तिची नोंद घेऊन, त्या व्यक्तीच्या गळ्यात संमेलनाध्यक्षपदाची माळ पडली पाहिजे. त्याच्या साहित्य-साधनेचा केलेला तो सन्मान असेल. मात्र, प्रत्यक्ष त्यासाठी काय करता येईल ह्याचा विचार विचारवंतांनी आणि सुज्ञ रसिकांनी केला पाहिजे.

साहित्य संमेलनाध्यक्षाचे भाषण व्यवहारासाठी दिशादर्शक असावे अशी अपेक्षा असते. वर्तमानपत्रांचे संपादक त्यांचा लेखाजोखा करीत असतात. त्यानंतर, ती भाषणे जवळजवळ विस्मृतीत जातात. वास्तविक, साहित्य संमेलनातील या भाषणावर साहित्य संमेलनात एखाद्या अधिवेशनात मान्यवरांकडून विश्लेषण झाले तर, उपस्थितांचे प्रबोधन होईल. (या निमित्ताने विचारवंत गंभीरपणे अध्यक्षांना भाषणांचे परिशीलन करतील!) तसेच विविध साहित्य संस्था वर्षभर त्या भाषणावर परिसंवाद आयोजित करू शकतात. अध्यक्षांचे सत्कार करण्याऐवजी अशा प्रकारच्या बौद्धिकासाठी संबंधित अध्यक्षांना मुद्दाम आमंत्रित केले जावे. या चर्चेतील मुख्य मुद्द्यांचे टीपण स्वतंत्रपणे प्रसिद्ध करून, संमेलनाध्यक्षांच्या भाषणाच्या खंडांमध्ये त्या टिपणाचाही परिशिष्टात समावेश करावा.

या ठिकाणी मला महाराष्ट्राचे गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील ह्यांचा गौरवाने उल्लेख करावासा वाटतो. वास्तविक, सांगली येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनावेळी स्वागताध्यक्ष म्हणून प्रथम त्यांची निवड झाली होती. परंतु, ‘राजकारण्यांनी साहित्यक्षेत्रात लुडबुड करू नये,’ असे सांगून त्यांनी मोठ्या मनाने त्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर नामवंत पत्रकार व लेखक श्री. उत्तम कांबळे ह्यांनी स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली आणि उत्तमपणे सांभाळली होती. त्यांनी लिहिलेली ‘स्वागताध्यक्षाची डायरी’ नंतर प्रसिद्ध झाली.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला उज्ज्वल इतिहास आहे. मात्र, महाबळेश्वरच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी श्री. आनंद यादव ह्यांची निवड होऊनही, त्यांना ते पद भूषविता आले नाही. ही महाराष्ट्राच्या इतिहासातील एक शोकांतिका होती. असे प्रकार यापुढे होणार नाहीत याबाबत सर्वांनी एकत्र राहणे आवश्यक आहे.

थोडक्यात, साहित्य संमेलनाचे व्यासपीठ पवित्र आहे. ते पावित्र्य जपले पाहिजे. साहित्यबाह्य व्यक्तीचा किंवा प्रवृत्तीचा त्याला संसर्ग होता कामा नये.

संपर्क : ९४२२६६९८५२



# नाकारलेल्या इतिहासाचे वर्तमान

वाहरू सोनवणे

अखिल भारतीय पातळीवर, राज्याच्या पातळीवर वेगवेगळे समाज गट आपापली वेगळी साहित्य संमेलने भरवित आहेत. मराठी साहित्य संमेलन, दलित साहित्य संमेलन, जैन साहित्य संमेलन अशा तऱ्हेने वेगवेगळ्या साहित्य चळवळीचे विचार मंच उभे राहत आहेत. आपली अस्मिता मांडत आहेत. या विचारमंचापैकी, दलित व बहुजन समाजाच्या साहित्याचे जे विचार मंच आहेत त्यांच्याकडून आम्हाला स्फूर्ती मिळाली; पण, या साहित्यांमध्येदेखील आम्हाला आदिवासी म्हणून आमचा ठसा उमटताना दिसत नाही. आमची म्हणून जी वैशिष्ट्ये आहेत ती नीट जपली गेली नाहीत तर हा ठसा उमटणेही कठीण आहे, अशी जाणीव होत गेली.

आदिवासी साहित्य कोणत्याही साहित्य प्रवाहाशी स्पर्धा करण्यासाठी नाही. आदिवासी साहित्य हे साहित्य चळचळीत आपला ठसा उमटवून इतरांबरोबर खांद्याला खांदा लावून ताठ मानेने, सन्मानाने चालता यावे, बोलता यावे यासाठी कटिबद्ध आहे.

आदिवासी दु:खाचे संदर्भ वेगळे आहेत. त्यांचे प्रश्न वेगळे राहणार आहेत. त्यांची उत्तरेसुद्धा वेगळ्या पद्धतीने शोधावी लागतील. वेगळा आशय घेऊन येणारे शब्द शोधावे लागतील म्हणून आदिवासी साहित्याचा प्रवाह हा वेगळा ठरतो आणि हे साहित्य म्हणजे आमच्या वैशिष्ट्यांचा शोध देखील ठरतो. फक्त साहित्याचा नव्हे, तर आदिवासी समूहाचा आणि जीवनाचा शोध!

आदिवासी साहित्य संमेलन, अध्यक्षीय भाषणे या संकलित पुस्तकांच्या मनोगतात डॉ. गोविंद गारे म्हणतात, 'आदिवासी साहित्य सबळ आणि समृद्ध व्हावे, असा आदिवासी साहित्यिकांचा प्रयत्न आहे. तो सुदिन निश्चित येईल. आता कुठे आदिवासी वाचू, लिहू लागला आहे. त्यांच्या जाणिवा त्यांच्या लिखाणातून प्रगट होत जातील तसतशा त्या प्रगल्भ होतील आणि हे कालानुरूप घडत जाईल, असा आत्मविश्वास आदिवासी लेखकांमध्ये निर्माण होत आहे.'

आदिवासी साहित्य हा आदिवासी समाजाच्या व्यापक परिवर्तनाच्या चळवळीचा भाग आहे. 'अरेरे, बिचारे आदिवासी' असा जो व्यवहार असे सांगतो, की आदिवासींवर दया करायची, त्यांना कुरवाळायचे आणि आपल्या मर्जीप्रमाणे त्यांना वागायला लावायचे आणि जर आदिवासी आपल्या मर्जीप्रमाणे वागले तर त्यांचे तोंड भरून कौतुक करायचे, आदिवासींना शाबासकी द्यायची आणि जर समजा आदिवासींनी त्यांचे ऐकले नाही, तर मग त्यांना कोणता तरी शिक्का मारायचा, बदनाम करायचे आणि जुन्याच शिव्या नव्याने द्यायच्या, त्यांच्या शिव्यांना, वागण्याला आदिवासींनी विरोध केला तर त्या आदिवासींना चिरडण्यासाठी मागे-पुढे बघितले जात नाही. हाच व्यवहार अजूनही आदिवासींच्या वाट्याला येत आहे. राजकीय क्षेत्रात असो की, एखाद्या आदिवासी चळवळीच्या क्षेत्रात असो कमी अधिक प्रमाणात हाच अनुभव येतो.

याचा अर्थ असा नाही की, आदिवासींसाठी काम करणारे सर्व फसवणारेच आहेत. त्यांनी प्रामाणिकपणे आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी जिवाची बाजी लावलेली आहे, हे मान्य करूनसुद्धा, आदिवासींचे मूळ प्रश्न शिल्लकच राहतात. आदिवासींत काम करणारे धर्म, पक्ष आणि समाज सुधारक आदिवासीत स्वाभिमानाची भावना जागवण्यापेक्षा अवलंबित्वाची भावना निर्माण करून आपले वर्चस्व प्रस्थापित करताना दिसतात.

आतापर्यंत आदिवासींबद्दल बरेच साहित्य प्रकाशित झालेले आहे. त्यात दुर्गा भागवत, माडगोड, सुदाम जाधव, गोदुताई परुळेकर, अनुताई वाघ, दीनानाथ मनोहर, जगदीश गोडबोले, शरद पाटील आहेत. यातले काही साहित्य सामाजिक चळवळ पुढे जाण्यासाठी तर काही डिगऱ्या मिळविण्यासाठी तर काही पैसा मिळविण्यासाठी तर काही निव्वळ साहित्य निर्मितीसाठी झालेले आहे. अशा साहित्यातून आदिवासी जीवनातले ताणतणाव, भावना, मानसिक संघर्ष, आनंद, मोह इत्यादींना वाट मिळणे शक्य नाही.

काही शिकलेले आदिवासी तरुण नोकरीतच रमून समाजाबाबत उदासीनता दाखवत असले, तरी काही तरुण समाजाबद्दल गांभीर्याने विचार करू लागले आहेत. भारतीय साहित्यात आपले प्रतिबिंब कुठे दिसते का? शिकलेला आदिवासी साहित्यात नायकत्वाची आपली भूमिका शोधू लागला आहे. साहित्यात आदिवासींचे उमटलेले जे प्रतिबिंब आहे ते आदिवासीला न्याय देणारे आहे का? अशा प्रकारची नजर ठेवून नव्या पिढीचा शिकलेला आदिवासी तरुण आपली अस्मिता शोधत स्वत:च आपल्या हातात लेखणी घेऊन लिहायला लागला आहे; आणि आपल्या दु:खांना, विद्रोहाला तो लिपीबद्ध करू लागला आहे. समानतेवर आधारलेली आदिवासींची संस्कृती शाबूत ठेवून तिचे जतन करण्याचा विचार आणि आदिवासी मुक्ती, मानव मुक्तीचा विचार करणाऱ्या त्या त्या साहित्य चळवळीशी आमचे नाते मैत्रीचे राहील.

आजपर्यंत आम्ही असे म्हणत आलो, की आम्हाला इतिहासात राक्षस म्हणून चिरडले, एकलव्याचा अंगठा तोडला, स्वातंत्र्याच्या लढाईत आदिवासी वीरांची प्रस्थापित इतिहासकारांनी नोंद घेतली नाही आणि म्हणून आपली पुढची जबाबदारी आहे की आमच्या इतिहासाला न्याय मिळवून देईल अशी साहित्य निर्मिती केली पाहिजे. आदिवासी स्वातंत्र्यवीर खाज्या नाईक, तंट्या भिल, भागोजी नाईक, बिरसा मुंडा, राणी दुर्गावती, रामदास महाराज, अंबरसिंग महाराज इत्यादींवर नाटक, कथा, पोवाडे, रोडाल्या, गाणी लिहिली गेली पाहिजेत व गायली गेली पाहिजेत. विपुल साहित्य निर्मिती करून आदिवासींचा इतिहास उजेडात आणला पाहिजे.

आदिवासी साहित्य आपल्या प्रश्नांचे आणि दु:खाचे मूळ शोधत आहे. मूळ शोधताना इतिहासाची पाने चाळत आहे. इतिहासात आदिवासींना राक्षस, किरात, दैत्य, असुर, जंगली, रानटी, नक्टे, चपट्या नाकाचे, कावळ्यापेक्षा काळे अशा प्रकारचे हिणकस वर्णन करून आदिवासींना हिणवले आहे. आजही आदिवासींना चोर-दरोडेखोर, लंगटे, भिलटे म्हणून हिणवतात. आदिवासीला पर्याय म्हणून 'वनवासी' हा शब्द प्रयोग करून आदिवासींचे अस्तित्व नष्ट करण्याचा



प्रयत्न होत आहे. आदिवासींचा इतिहास आणि अस्मिता नष्ट करण्याचा विरोधात आदिवासी साहित्य आपला आवाज बुलंद करीत आहे. आदिवासी क्रांतिकारकांचे गौरव गीत गात आहेत.

महाराष्ट्रात आदिवासी साहित्यिक 'उलगुलान', 'तारपा' आणि 'आदिवार्ता' या नियतकालिकांतून आपले लिखाण प्रकाशित करीत असतात. कलेच्या क्षेत्रात आदिवासी पेंटर सूर्यभान नागभिडे, गोसा पेंटर, रमेश ठाकरे, कृष्णा गडक, विश्राम वळवी इत्यादी आपले योगदान देऊन ही चळवळ मजबूत करीत आहेत.

डॉ. पुष्पा गावित, डॉ. विनायक तुमराम, डॉ. तुकाराम रोमटे, डॉ. महेश्वर गावित, डॉ. संजय लोहकरे संशोधन क्षेत्रात आपले पाय रोवून उभे आहेत.

देशातील मुलामुलींना दशरीबेनची गोष्ट सांगितली पाहिजे, कोण ही दशरीबेन. ती वेढची. ता. वालोद, जि. तापी गुजरात येथील आदिवासी मुलगी. दशरीबेन हिने १४ वर्षांची असताना महात्मा गांधींच्या आवाहनावरून चळवळीत वाहून घेतले. सर्वोदय चळवळीत काम करीत असताना दशरीबेन यांना अटक झाली. दशरीबेन यांना बडोद्यात जेल झाल्यानंतर त्यांना पुण्याला एरवड्याच्या जेलमध्ये पाठविण्यात आले. या जेलमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पत्नी कस्तुरबा गांधीही स्थानबद्ध झालेल्या होत्या. कस्तुरबा गांधींना लिहिता-वाचता येत नव्हते. तेव्हा एके दिवशी कस्तुरबाजींनी दशरीबेनकडे आपला मनोदय व्यक्त केला. मला लिहायला शिकवशील का? अशी विचारणा केली तेव्हा दशरीबेनला थोडा संकोच वाटला. पण, दशरीबेन नंतर कस्तुरबा गांधी यांना शिकवायला तयार झाल्या आणि कस्तुरबा गांधी यांना जेलमध्ये असताना लिहिणे-वाचणे शिकविले. कस्तुरबा गांधींनी जेलमध्ये असताना राष्ट्रपिता महात्मा गांधींना पत्र लिहिले तेव्हा म. गांधी पत्र वाचून दंग झाले. त्यांना खूप आनंद झाला आणि उलट टपाली कस्तुरबा गांधी यांना पत्र लिहिले जे काम मी करू शकलो नाही ते कोणी केले? अशा प्रकारे कस्तुरबा गांधींना शिकवणाऱ्यांचे कौतुक केले.

एका आदिवासी मुलीने राष्ट्रपिता म. गांधी यांची पत्नी कस्तुरबा गांधी यांना शिकविले ही माहिती इतिहासकारांना नाही, देशालाही ते माहीत नाही.

जेव्हा देशात स्वातंत्र्याचे जोरदार वारे वाहत होते, तेव्हा महात्मा गांधींनी १९४२ ला 'भारत छोडो' आंदोलन तीव्र केले. 'स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच,' असे लोकमान्य टिळक गर्जत होते. तर सुभाषचंद्र बोस, म्हणत होते, 'तुम मुझे खुन दो मैं तुम्हे आझादी दुंगा!' अशा प्रकारे देश स्वातंत्र्याच्या लढाईने पेटला होता. तेव्हा आदिवासी वीर काय करीत होते.

इंग्रजांच्या विरोधात खाज्या नाईकांनी सातपुडा पर्वतात 'अंबापानीची' लढाई लढली. या लढाईत ५५ आदिवासींना ढोल वाजवून गोळ्या झाडल्या. ते शहीद झाले, तर ४६० स्त्री-पुरुषांना अटक करण्यात आली.

'वीर बहादूर खाज्या नाईक' या पुस्तकाचे लेखक चामुलाल राठवा म्हणतात, जो कोणी इंग्रजांच्या विरोधात बंड करेल त्याची गत ही खाज्या नाईक सारखीच होईल. अशी दहशत देशात पसरावी म्हणून धरणगावला एका निंबाच्या झाडाला खाज्या नाईकाचे डोके कापून आठ दिवस टांगून ठेवले. तंट्या भिलने इंग्रजाच्या विरोधात लढा पुकारला म्हणून जबलपूरच्या जेलात फासी देण्यात आली.

जालीयनवाला हत्याकांडात शहीद झालेल्या देशभक्तांची संख्या किती होती? कोणी म्हणतो ३६७, कोणी म्हणतो ४०० तर कोणी म्हणतो ६००. शहिदांचा निश्चित आकडा मिळत नाही.

ज्यांनी देशासाठी आपले बलिदान दिले आहे, शहीद झाले आहेत, त्यांचा गौरव देशाला आहेच आणि असावाच पण 'मानगड' राजस्थानला इंग्रजांच्या विरोधात उठाव केला म्हणून १५०० हून अधिक आदिवासींना गोळ्या घालून ठार केले. मानगडचा पहाड शहिदांच्या रक्ताने लाल झाला रक्तात न्हाहून निघाला. स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात याची नोंद नाही. पण, आदिवासींचा न्यायाचा लढा चालूच आहे आणि ह्याच लढ्याचा एक भाग म्हणून आज 'मानगड शहिदांचे स्मारक' मोठ्या डौलाने उभे आहे.

आदिवासी स्वातंत्र्यवीर इंग्रजांच्या विरोधात तर स्वातंत्र्याची लढाई लढतच होते त्याचबरोबर देशातील शेठ, सावकार, जमीनदार यांच्या शोषण, दमण, अन्याय, अत्याचाराचा विरोधातही लढत होते. देश मुक्तीच्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधातही लढत होते; आणि देश मुक्तीच्या लढाई सोबत मानव मुक्तीची लढाई लढत होते. अशा प्रकारे आदिवासी स्वातंत्र्यवीर स्वातंत्र्याची दुहेरी लढाई लढत होते.

प्रस्थापित इतिहासकारांनी आदिवासी वीरांचा फक्त इतिहास नाकारला असे नाही, तर स्वातंत्र्याची मूल्येही नाकारली आहेत. आदिवासी काय देशाचे शत्रू होते? म्हणून आदिवासींचा इतिहास नाकारला? असा आदिवासींचा देशाला सवाल आहे. आदिवासी साहित्याचा पोत किंवा ढाचा हा साहजिकच आदिवासी जीवनातील ताण-तणाव, त्यांचे सुख-दुःख, त्यांचे निसर्गाशी असलेले नाते, अलीकडच्या काळातील जंगल व निसर्गाचा विनाशासोबत आदिवासी संस्कृती, जीवनावर होणारा वाईट परिणाम यांनी व्यापलेला आहे. भांडवली, भोगवादी संस्कृतीचा बाजारूपणा आणि यज्ञ संस्कृतीने जोपासलेली जंगल विनाशावर आधारलेली शेती पद्धत यांनी आदिवासी संस्कृती आणि जीवन पद्धतीवर आक्रमण पूर्वापार चालविलेले आहे.

मी प्रस्थापितांच्या विरोधात नुसतीच स्टेज कविता लिहिली नाही, तर आदिवासी चळवळीचे नेतृत्व आदिवासीनेच करावे म्हणून आदिवासी एकता परिषद स्थापनेत पुढाकार घेतला आणि आदिवासीत मानवी जीवनावर आधारित एक स्वाभिमान जागवला. आज आदिवासी एकता परिषदेने महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान आणि गुजरात या चार राज्यांत पकड घेतली असून, ती गतिमान होत आहे.

विद्रोही संस्कृती चळवळ आदिवासी संस्कृतीला आपली मूळ संस्कृती मानते. मानवी मूल्यांवर आधारित आदिवासी संस्कृतीचे महत्त्व जाणते. त्या मूल्यांच्या रक्षणासाठी प्रयत्न करते म्हणून मी कोल्हापूरच्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारले.

विद्रोही म्हणजे रक्तपात नाही, विद्रोही म्हणजे हिंसाही नाही. विद्रोही म्हणजे माणसाला माणुसकीचे जीवन मिळवून देण्यासाठीचा लढा. विद्रोही म्हणजे वर्ग, जात, पुरुषप्रधानतेवर आधारित व्यवस्थेत माणसाचे सर्व अंगाने, सर्व पातळीवर शोषण, दमन, भेदाच्या विरोधात पुकारलेला उलगुलान! म्हणजेच विद्रोह!!

मानवी जीवनाच्या विकासात जेथून संपत्तीची उत्पत्ती झाली तिथूनच मानव जीवनात शोषणाची प्रक्रिया सुरू झाली आणि मानव जीवनात स्वार्थ जागला. माझे माझे, तुझे तुझे असा भेद निर्माण होऊन शोषणावर आधारित व्यक्तिगत हितसंबंध जपणाऱ्या भोगवादी संस्कृतीचा जन्म झाला. सामाजिक हितसंबंध जपणारी आदिवासी संस्कृती आणि व्यक्तिगत हितसंबंध जपणारी भोगवादी

संस्कृती यांचा संघर्ष इथूनच सुरू होतो.

भोगवादी संस्कृतीने आदिवासी संस्कृतीला विकृत करून आदिवासी अस्तित्वाला नाकारून नष्ट करायला सुरुवात केली. आदिवासीचे 'वनवासीकरण' करणे हा त्याचाच एक भाग आहे. भोगवादी संस्कृतीची मूल्ये आदिवासींवर लादली जात आहेत. आदिवासीकडे मुलगा जन्माला आला की प्रतिष्ठेचा भाग म्हणून सत्यनारायण पूजेचा आग्रह धरला जातो. आदिवासीच्या लग्नात ब्राह्मणांचा आग्रह धरला जातो. आदिवासींची देवता 'याहा मोगी' आणि 'जगदंबा' एकच आहे असे सांगून जगदंबेचा पूजाविधी करण्याचा आग्रह केला जातो.

संस्कृती आणि इतिहास तज्ज्ञ अशोक राणा हे याहा मोगी आणि कुंती एकच आहे, असा आग्रह धरतात. आणि आदिवासींना रामायण-महाभारताच्या भोगवादी संस्कृतीला जोडू पाहतात काय? आदिवासी संस्कृतीचे विकृतीकरण करून मानवी मूल्यांवर आधारित संस्कृती नष्ट करू पाहत आहेत. आदिवासी संस्कृती धर्म पूर्व संस्कृती आहे. मानवी मूल्यांचा मोठा साठा आहे. हा मानवी मूल्यांचा साठा जपला पाहिजे.

**संपर्क : ९४२३५१७६९९**

# अविभाज्य आणि अभंग

दलित साहित्य का पाहिजे, या प्रश्नाचे उत्तर आणखी थोडं विस्तारानं सांगावयाचं म्हणजे आपण भारतीय समाजव्यवस्थेतील वास्तव डोळसपणे पाहिले म्हणजे त्याचे उत्तर आपोआपच मिळेल.

भारतीय समाजव्यवस्थाच उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ अशा जातीय पद्धतीवर आधारलेली आहे. म्हणून भारतीय समाजव्यवस्था व पाश्चिमात्य समाजव्यवस्था यात मूलत: फरक आहे. भारतीय समाजव्यवस्था जातीय पद्धतीवर (कास्ट सिस्टिम) आधारलेली आहे. पाश्चिमात्य समाजपद्धती वर्गपद्धतीवर (क्लास सिस्टिम) आधारलेली आहे. भारतातील जातीय पद्धतीच्या समाजव्यवस्थेत जन्माला आलेला व वाढलेला साहित्यिक जेव्हा आपल्या वास्तव अनुभवाला प्रामाणिकपणे आकार-रूप देतो, त्याप्रमाणे त्यांच्या वाङ्मयीन कलाकृतीत, त्याच्या अनुभवाचा आशय येतो. त्या आशयाला आकार-रूपही येते. जातीय समाजव्यवस्थेमुळे कलाकृतीच्या अनुभवाचा आशय महाराष्ट्रात व भारतातही जातीविशिष्ट आहे.

अशाच जातीय पद्धतीच्या समाजव्यवस्थेतील दलित साहित्यिक आपल्या अनुभवाला आकार-रूप देणार. त्यामुळे वेगवेगळ्या जाती लेखकांची आपापल्या अनुभवाचा वेगवेगळा आशय घेऊन, वेगळ्याच रूपात (फॉर्ममध्ये) वेगळ्याच आदर्शाने (नॉर्ममध्ये) येणे स्वाभाविक आहे. अपरिहार्य आहे. साहित्याला जेव्हा वास्तवाचा आधार असतो, तेव्हा ते वेगवेगळ्या स्वरूपात येणारच!

प्रत्येक जातीच्या-समाजाच्या जीवनातील अनुभव, भावविश्व, संघर्ष भिन्न व वेगवेगळे आहेत. हे वास्तव आहे, याचा विसर पडता कामा नये.

आपल्या देशात दलित, आदिवासी, विमुक्त-भटक्या जमाती व इतर मागासलेला वर्ग, भूमिहीन मजूर, झोपडपट्टीत राहणारे, फुटपाथवर राहणारे असे लोक मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांचे हे अस्तित्व मान्य केल्यावर, त्यांच्या जीवनावरील साहित्य दलित साहित्य हे आपोआपच त्यांच्या वेगळेपणात, वेगळ्या संवेदनात जन्माला येणारच आणि त्याचे वेगळेपणही साहित्याच्या आशयात वेगळेपणात राहणार हे आपल्याला नाकारता येणार नाही. म्हणून या देशाच्या समाजव्यवस्थेत असा हा मोठा दलित वर्ग आहे. म्हणून दलित साहित्य जन्माला येणार व त्याचे अस्तित्वही स्वतंत्र (जातिविशिष्ट) असे राहणार हे स्वाभाविक आहे.

त्यातच आतापर्यंतच्या काही पांढरपेशा-मध्यमवर्गीय लेखकांच्या साहित्यात दलितांचे खरे जीवन, त्यांच्या वेदना, आकांक्षा, संघर्ष आलेच नाहीत. दलित समाजाचे जीवन चित्रित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण, त्यांच्या साहित्याला वास्तवाचा खरा आधार नाही. दलितांच्या जीवनातील अनुभवाची जाणीव, दलित जाणीव या मध्यमवर्गीय लेखकांना नसल्यामुळे दलितांच्या जीवनाचे वास्तव दर्शन त्यांच्या साहित्यात होत नाही. त्यात दलितांच्या जीवनातील श्रद्धा, निष्ठा, आशा, आकांक्षा दिसत. (त्यांच्या दलितासंबंधीच्या साहित्यात जातिविशिष्टाच्या अनुभवाचा आधार नव्हता व नाही व ते निरीक्षण व सहानुभूती यावर आधारलेले होते म्हणून ते दलित साहित्य होऊ शकत नाही.)

गावकुसाबाहेर राहाणाऱ्या दलितांच्या जीवनाकडे खऱ्या अर्थाने मध्यमवर्गीय लेखकांचे लक्षच गेले नाही. अदृश्य (Invisible) माणसांच्या दु:खाचा हुंदका जगाला सांगितला नाही. अदृश्य माणसाला जगापुढे आणले नाही. दलितांना दलित म्हणून ठेवणाऱ्या प्रस्थापित रूढी, परंपरा, शास्त्रे याविरुद्ध आवाज मध्यमवर्गीय साहित्याने उठवला नाही.

दलित साहित्य हे दलितांच्या जीवनाचा एक अविभाज्य, अभंग असा भाग आहे. दलित साहित्यातील कथा, कादंबरी, काव्य, नाटक व आत्मकथा ही तळागळातील जीवनातून निर्माण झालेली आहे. दलितांचे विशिष्ट दु:ख आहे. ते विशिष्ट दु:ख मध्यमवर्गीय लेखकांना कळणार नाही. त्यांचे जीवनच दु:ख आहे आणि त्या दु:खातून मुक्तीचा मार्ग दलित साहित्य शोधत आहे. दलित साहित्य अदृश्य (Invisible) असलेल्या दलित समाजाला उघड करण्याचे कार्य करत आहे.

**- शंकरराव खरात**

**(जळगाव - १९८४, अध्यक्षीय भाषणातून)**



# नवे विचार नव्या वाटा

चंद्रपूर येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन विख्यात कवी आणि विचारवंत वसंत आबाजी डहाके यांच्या अध्यक्षतेखाली साजरे होणार आहे. साहजिकच या निमित्ताने पुन्हा एकदा नव्याने 'साहित्य संमेलने', त्यातला पैसा, राजकारण, अध्यक्षपदाची निवडणूक आणि त्यातले गोंधळ वगैरे विषय शिळ्या कढीला ऊत आणावे तसे ऐरणीवर येत आहेत. ठरावीक साच्याची तथाकथित आदर्शवादी मते मांडली जात आहेत. कोटी कोटी खर्च रुपये करून साहित्याचा बाजार मांडला जातोय, वगैरे मतांच्या पिचकाऱ्या उडवल्या जाताहेत. साहित्याच्या पवित्र क्षेत्रात राजकारणी लोकांचे काय काम, यासारखे सवाल नव्याने विचारले जात आहेत. या सगळ्यातूनच नेहमीसारखे हेही संमेलन पार पडेल आणि वर्षभरासाठी हा धुरळा खाली बसेल.

महिन्याभरापूर्वीच नाशिक येथे साधना साहित्य संमेलन साजरे झाले. साधना साहित्य संमेलनाचे हे चौथे वर्ष. यंदाचे संमेलन 'नाटक' या साहित्यप्रकाराला वाहिलेले होते. अनेक उत्तम प्रथा सुरू करणारे हे 'साधना साहित्य संमेलन'. उदाहरणार्थ दरवर्षी एकाच साहित्य प्रकाराला हे वाहिलेले असते. या संमेलनाला 'अध्यक्ष' नसतो. (म्हणजे अध्यक्षीय निवडणुकीतला गोंधळ नसतो.) त्याच्या ऐवजी त्या त्या साहित्यप्रकाराविषयी एक अभ्यासपूर्ण बीजभाषण असते. इतकेच नव्हे, तर त्याच संमेलनात त्या बीजभाषणावर त्या क्षेत्रातल्या दिग्गजांची चर्चा असते. (यंदा बीजभाषण विख्यात नाटककार गो. पु. देशपांडे यांचे होते तर त्यावर चर्चा ज्येष्ठ नाटककार चं. प्र. देशपांडे आणि ज्येष्ठ समीक्षक पुष्पा भावे यांनी केली.) एक ज्येष्ठ स्वभाषीय अथवा परभाषीय साहित्यिक उद्घाटक असतो. दरवर्षी नव्याच गावी हे भरते. त्या गावची एखादी संस्था या संमेलनाची सह-आयोजक असते.

सगळे खरेच अगदी आदर्श वाटावे असे आहे हे. या संमेलनाचे ब्रीदवाक्य अगदी पहिल्या वर्षापासूनच असे आहे की- ''या संमेलनात संमेलनाचा उत्साह असावा; पण, चर्चासत्राचा दर्जेदारपणा असावा.'' गेली चार वर्षे या संमेलनाचा एक क्रियाशील संयोजक म्हणून मागे वळून बघताना काय वाटते? विचार करायला हवा.

दुसरे एक उदाहरण घ्या. राजन खान हा वंडरफुल आणि उत्साही लेखक मुख्यत: चळवळ्या आणि कार्यकर्ता आहे. तो सातत्याने छोटी छोटी साहित्य संमेलने भरवत असतो, गावोगावी. 'मी संमेलन', 'तू आणि मी संमेलन', 'आपण संमेलन' वगैरे अशा संमेलनामागच्या त्याच्या कल्पना भन्नाट असतात. त्यातल्या दोन संमेलनांत तर मी अगदी ॲक्टिव्हली भाग घेतला आणि खूप आनंद मिळवला. हे सारेच अनुभव आनंदाचे होते. पण, पूर्ण समाधानाचे होते का? विचार करू या.

या अशा प्रकारच्या (छोट्या) संमेलनांचे मुख्य

## संजय भास्कर जोशी

प्रतिपादनच असते की अखिल भारतीय साहित्य संमेलनात जी पैशाची उधळण होते, जो भंपकपणा चालतो, जी अनागोंदी असते त्यावर उपाय म्हणून अशी छोटी संमेलने भरावीत. कल्पना उत्तमच आहे. पण, वास्तव काय आहे?

साधना संमेलनात साधनाचे संपादक डॉ. दाभोलकर प्रत्येक वेळी आवर्जून सांगतात, की या संमेलनात कोणत्याही लेखकाला पाच पैसेही मानधन दिले जात नाही.

साधनाचे नावच असे आहे, की कोणी लेखक त्याचा विचारच करत नाही. मला सांगा, ही अभिमान वाटावी अशी गोष्ट आहे? लेखकांनी फुकट यावे, आयोजकांनी चार चार महिने फुकट राबावे, (वेळप्रसंगी पदरचे पैसे खर्च करावेत) आणि साधले काय? तर संमेलनात सुमारे शंभर ते दीडशे, फार तर दोनशे श्रोते असतात. त्यातले बरेचसे संस्थांचे सदस्य आणि बोलणारे लेखक, त्यांचे नातेवाईक. म्हणजे गंभीरपणे बाहेरचे असे पन्नासेक लोक भाषणे ऐकायला येणार. कुणाला फसवत आहोत आपण? काय चाललेय काय? जेवण देणारा कॉंट्रॅक्टर, हॉल, सजावटवाले, प्रवास करणाऱ्या गाड्या सगळे पैसे घेतात. कोणी कोणी फुकट या आदर्शवादाची तळी उचलत नाही, फक्त आपल्या प्रतिभेने साहित्य क्षेत्र उजळवणारा (संमेलनातच असले शब्द वापरतात हो!) लेखक मात्र फुकट येणार. लेखकाच्या प्रतिभा निर्मितीवर तुम्ही साहित्य संमेलन भरवणार, तुमच्या संस्थेचे महत्त्व समाजात वाढवणार... आणि फक्त लेखकाला नागवणार? ही का अभिमानाची गोष्ट आहे?

असेच गोव्यात भरलेले एक संमेलन पाहिले. त्या साहित्य संमेलनाचे नावच मुळी 'शेकोटी संमेलन' असे होते. ती कल्पना सुरेखच आहे. रात्री चक्क एका देवळाच्या विस्तीर्ण आवारात मध्यभागी एक भली मोठी शेकोटी पेटवतात. जवळच स्टेज असते. आणि तिथेच हे संमेलन भरते. शे-दीडशे रसिक आनंदाने भाग घेतात. अशी नावीन्यपूर्ण कल्पनांची छोटी छोटी संमेलने जागोजागी भरतच असतात. त्यांचा म्हणून एक रोल आहेच. पण सज्जनहो, पंचायत राज्य आले म्हणून संसद नाही कुणी बरखास्त करत. सगळेच एकमेकाला पूरक असतात आणि सर्वांचे मिळून काहीतरी मोठे आणि मौलिक घडत असते. निदान घडावे अशी अपेक्षा असते.

ज्या अखिल भारतीय संमेलनाची हे सगळे लोक यथेच्छ चेष्टा करतात त्या पुण्याच्या ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मेघना पेठे आणि श्याम मनोहर यांच्या मुलाखतीला प्रत्येकी १०-१२ हजार प्रेक्षक असलेले आणि त्यांनी जागोजागी अत्यंत उमाळ्याने भरपूर टाळ्या वाजवत असलेले मी स्वत: पाहिले. हे सत्य तुम्ही नाकारणार का? असल्या बारक्या साहित्य संमेलनातले या लेखकांचे आजवरचे क्युमुलिटिव्ह श्रोते देखील १० हजारांच्या निम्मे-पावसुद्धा नसतील. तरी मोठे संमेलन त्याज्य? कारण, तिथे खूप पैसा लागतो? असेच पुण्याच्या एका उपनगरात भरलेले एक साहित्य संमेलन मी बघितले होते. तिथे तर उद्घाटनाला आलेल्या मंत्र्याचे भाषण संपताच ते मंत्री आणि त्यांच्याबरोबर जवळजवळ निम्मे सभागृह उठूनच गेले. केविलवाणा चेहरा करून साहित्यिक अध्यक्ष म्हणाले, मंत्रीसाहेबांना अर्जंट मीटिंग आहे ना, तेव्हा आपण रसिकांनी मोठ्या मनाने त्यांना माफ करू या आणि जायची परवानगी देऊ या.

साधना साहित्यसंमेलन, मी अटेंड केलेली रत्नागिरी, वसई, यवतमाळ, गोवा वगैरेची संमेलने भरलीच पाहिजेत. आय रिपीट, ती छोटी संमेलने तर



भरलीच पाहिजेत; पण, त्यांनी उगाच अखिल भारतीय साहित्य संमेलनावर राळ उडवण्याचा विनोद करू नये. शे-दीडशे लोक जमणे आणि हज्जारो लोकांनी करोडो रुपयांची पुस्तके खरेदी करणे यातला फरक तुम्हाला समजत नसेल तर काय बोलावे? किती काळ स्वत:ची फसवणूक करणार आपण? नागड्या राजाच्या अंगरख्यावरील फुलांचे रंग किती काळ मोजत बसणार तुम्ही? (राजन खानच्या साहित्य संमेलनात तर तीस-पस्तीस लेखकच एकामेकांशी बोलतात. तेव्हा त्याला आपण साहित्य संमेलन म्हणू नये हे बरे. तो तर लेखकांचा मेळावा. तो छान असतो हे मात्र खरे. मला तो अतिशय आवडतो. पण, त्याची आणि अखिल भारतीय साहित्य संमेलनाची तुलना करू नये हे बरे.)

साहित्य संमेलनाचा मूळ अर्थच न कळलेले दांभिक लोक हा विषय सॅबोटेज करताहेत आणि बिचाऱ्या लेखकांची जीवघेणी कोंडी करताहेत. हे सगळे प्रचंड दांभिक लोक रीतसर आपली पोळी भाजून घेण्यासाठी आदर्शवादाची तत्त्वे बडबडत आहेत. आता मला सांगा, गुटखा बंदी हा का बरे साहित्य क्षेत्राचा अजेंडा करावा? असेल हिंमत तर गांधीजींसारखे समाजातूनच थेट लाखो लोक जमवा ना. ते जमत नसेल तर साहित्य क्षेत्राला वेठीला धरू नका. अन्यथा, तुमच्यात आणि रस्त्यावरचे पाव-वडावाले आणि टॅक्सीवाले यांना वेठीला धरून संप अन् बंद पुकारून कोंडी करणारे यात काही फरक नाही. तुम्ही तितकेच दहशतवादी आहात. लेखकांना आज कोणीही वेठीला धरतो, त्यात तुम्हीही आहात. का नसावा कॉर्पोरेट क्षेत्रातला पैसा साहित्य संमेलनात? तुम्ही आपले कणे गमावले आहेत का? प्रायोजकत्व स्वीकारले याचा अर्थ त्या कंपनीचा अजेंडा आणि त्या कंपनीची अनैतिक प्रॉडक्ट्स तुम्ही पुढे सरकवायची गरज नाही हा आत्मविश्वास का नाही तुमच्यात? सरकारचे पैसे तुम्ही स्वीकारता; मग, सरकारची सारी धोरणे तुम्ही पुढे चालवता का? ती सगळी धोरणे तुम्हाला मान्य असतात का? काय हा सगळा दांभिकपणा चाललाय? कुणाला फसवतोय आपण? फक्त साहित्यक्षेत्राने आदर्श असावे, लेखकाने सगळी नैतिकता सांभाळावी या भंपक अपेक्षेवर लेखकाला नागवण्याचा हा उद्योग आहे. शिक्षक आणि साहित्यिक या दोनच घटकांना कायम आदर्शवादाचा क्रूस खांद्यावर वागवायचा मक्ता देणे यासारखा लबाडपणा नाही.

फक्त लेखकाला लुटण्याच्या या उद्योगाचा आपण निषेध करायला हवा. कॉर्पोरेट क्षेत्रातून जरूर साहित्य संमेलनासाठी पैसा यावा. मुळात संमेलन या संकल्पनेचा मूळ अर्थ आपण गमावला आहे असे मला वाटते. संमेलन म्हणजे केवळ गंभीर चर्चा नव्हे. संमेलन हा उत्सव आहे, सोहळा आहे. साहित्यावर प्रेम करणाऱ्यांनी एकत्र येऊन आपण सारे साहित्यप्रेमी आहोत याचा एकत्रित आनंद साजरा करणे आहे. गंभीर चर्चा विद्यापीठातल्या परिसंवादात व्हाव्यात. साहित्य संमेलन ही जत्रा असेल तर सो बी इट! जत्रेलाही काहीएक सकारात्मक अर्थ आणि संदर्भ असतात हेही लक्षात घ्या. साहित्य संमेलनाने एकूण त्या शहरात आणि महाराष्ट्रात साहित्यविषयक वातावरण निर्माण व्हावे, लोकांना पुस्तकांकडे खेचून आणावे, वाचन या गोष्टीविषयी सकारात्मक पर्यावरण निर्माण व्हावे. यासाठी हा उत्सव मोठा आणि धडाकेबाज व्हायला काय हरकत आहे? आणि त्यासाठी पैसा हा लागणारच. त्यात पैशाचे निर्लज्ज प्रदर्शन नको हे जितके खरे तितकेच जरूर तो देखणेपणा हवाच हेही खरे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अनेक अयोग्य गोष्टी आहेत, त्या दूर करायलाच हव्या. पण, याचा अर्थ तिथे चालते ते सगळेच भंपक हा टोकाचा दृष्टिकोनही बरा नव्हे. नुसते लांबोन खडे मारणे सोपे असते; पण, असे काही तरी मोठे घडवायला खूप मोठे नियोजन लागते हे कबूल करायला हवे.

कॉर्पोरेट क्षेत्रातला पैसा इतर अनेक सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नाहीका मोठ्या प्रमाणात वळवला जात? टीव्हीवरील जाहिरातींचे दर अक्षरश: लाखांनी असतात. फिल्मफेअर आणि फिल्म फेस्टिव्हल्स देखील अत्यंत खर्चिकच असतात. क्रिकेटचे सामने भरवण्यातही करोडोंचे गणित असते. या साऱ्याला तुफान प्रसिद्धीही मिळते. साहित्यक्षेत्राला असाच कॉर्पोरेट क्षेत्रातील पैसा मिळाला आणि साहित्याचे आणि एकूण वाचनसंस्कृतीचे असेच मोठ्या गाज्यावाजाने मार्केटिंग केले तर त्यात नेमके गैर काय आहे? टीव्हीवरच्या भिकार रिॲलिटी शोजकडे जाणारा अमाप पैसा थोडासा साहित्यासारख्या उत्तम क्षेत्राकडे वळवता आला तर का नको? काटकसर आणि साधेपणा याच मूल्यांचे गोडवे गात आपण काय साधत आहोत? पैसा आला म्हणून लगेच साहित्यप्रेम संपते थोडीच? ही समीकरणे आपणच बदलायला हवी. पुण्यातल्या साहित्य संमेलनात ग्रंथप्रदर्शन हे एक मोठेच आकर्षण ठरले. तिथे धुळीचा कण नव्हता आणि सूर्याचे किरण नव्हते, फक्त आनंदाचे क्षण होते. पण असे पूर्णपणे बंदिस्त, खाली पूर्ण कारपेट असलेले ग्रंथप्रदर्शन करायला प्रचंड पैसा लागलाच. लेखक प्रकाशक वर्गणी गोळा करून हे करोडो रुपये गोळा करणार आहेत काय? मग, कॉर्पोरेट क्षेत्रातून यासाठी पैसा आणण्यात काय गैर आहे? कॉर्पोरेट क्षेत्राची अट एकच असते की आम्ही पैसा दिला तर त्याच्या बदल्यात आम्हाला आमच्या कंपनीची जाहिरात व्हायला हवी. आमचा ब्रँड लोकांसमोर यायला हवा. टीव्हीवर सातत्याने येणाऱ्या जाहिराती आपण स्वीकारल्याच ना? एकच उदाहरण देतो. सत्तर-ऐंशीच्या दशकात दूरदर्शनवर दिसणारी क्रिकेटची मॅच आणि आज दिसणारी मॅच यांची तुलना करून पाहा. तेव्हा बॉल कुठे अन् कॅमेरा कुठे असेच व्हायचे. काहीच नीट दिसत नसे. प्रक्षेपणाचा दर्जा अनेकपटीने सुधारायला पैसा लागतो आणि तो पैसा कॉर्पोरेट क्षेत्राने दिला; आणि आज एकाच बॉलचे अनेक दिशांनी अनेक प्रकारे चित्रण दिसते. त्याचे ग्राफिक विश्लेषण दिसते. या साऱ्याला लागणारा अफाट पैसा कॉर्पोरेट क्षेत्रानेच दिला. तिथे कशा आपण प्रत्येक ओव्हरनंतर दिसणाऱ्या जाहिराती स्वीकारल्याच ना? इतर सर्व क्षेत्रात हा देखणेपणा, सफाई आणि उत्तम दर्जा हवा आणि साहित्य संमेलन मात्र काटकसरीने, साधे आणि उन्हातान्हात व्हावे हा कसला हिमटेपणा?

कॉर्पोरेट क्षेत्र याला पैसा देते म्हणजे उपकार नव्हेत ही मानसिकता आधी आपण स्वीकारायला हवी. सरकार पैसा देते तेही उपकार नव्हेत. साहित्यक्षेत्राने समाजाला दिलेल्या अपार आनंदाची ती किंमत आहे, आणि ती सरकार आणि कॉर्पोरेट क्षेत्राने द्यायलाच हवी. उरता उरला प्रश्न आक्षेपार्ह प्रायोजकांचा. साहित्य क्षेत्राने या बाबतीत आपली आपली आचारसंहिता घातली म्हणजे झाले. आक्षेपार्ह उत्पादनांची जाहिरात केली जाणार नाही हे ठणकावून सांगितले म्हणजे झाले. पण, सगळे कॉर्पोरेट क्षेत्रच चोर नव्हे आणि तिथला सगळा पैसा काही डागाळलेला नव्हे. साहित्य संमेलन देखणे करून, धडाकेबाज करून आपण लाखांनी लोक संमेलनात आणणार असलो तर कॉर्पोरेट क्षेत्र यापासून दूर राहूच शकत नाही. कारण, लोकांपर्यंत पोचणे ही कॉर्पोरेट क्षेत्राची गरजच असते. मग, एकामेकांची गरज ओळखून एकत्र येऊन काहीतरी भव्य घडवण्यात गैर ते काय? साध्या अन् काटकसरी चिमुकल्या संमेलनांनी शे-दीडशे लोकांना आनंद देणे



जितके सुंदर असते तितकेच धडाकेबाज संमेलन करून लाखांनी लोक संमेलनाकडे आकर्षित करणेही महत्त्वाचे असते. लक्षात घ्या, सहाच गोळ्या असणाऱ्या रिव्हॉल्व्हरने युद्ध लढता येत नाही, तिथे अनेक गोळ्या सुटणाऱ्या मशिनगनच हवी ना? म्हणजे शंभरपैकी वीस-पंचवीस गोळ्या बरोबर लागतील. तसे संमेलनात लाखो लोक आले तर त्यातले काही हजार साहित्याकडे वळतील. पन्नासच लोक जमवून मोठे काम कसे होणार? आणि त्यासाठी अमिताभ बच्चन आला तर येऊ द्या. त्याने काही स्टेजवर 'लावारिस'मधला नाच तर केला नाही ना? आचारसंहिता म्हणतो ती ही. पण, अमिताभच्या येण्याने दहा-वीस हजार तरुण साहित्य संमेलनात आले तर येऊ द्या. त्या निमित्ताने त्यांना लाखांनी ग्रंथ दिसू द्या. अमिताभच्या शेजारी बसलेले साहित्यिक दिसू द्या. पैसेवाले आणि प्रसिद्ध ते सारेच सर्वार्थाने वाईटच असतात या मानसिकतेतून बाहेर येऊ या.

बहुजन-अभिजन हे कप्पे पुरे झाले. लेखक म्हणजे कुणी थोर अन् बाकी खेळाडू, अभिनेते, राजकारणी, कॉर्पोरेट क्षेत्रातले सगळे सवंग सोंगाडे या भावनेतून बाहेर या. श्रीमंती लुळीपांगळी आणि अनैतिकच असते आणि गरिबी धट्टीकट्टी अन् उच्च नैतिकतेची असते हा भंपकपणा पुरे. लुळ्यापांगळ्या श्रीमंतीपेक्षा धट्टीकट्टी गरिबी बरी हे नक्कीच खरे आहे; पण, याचा अर्थ श्रीमंती नेहेमी लुळीपांगळीच असते असा नव्हे. आत्मविश्वास आणि वैचारिक सुस्पष्टता नसेल तरच लुळेपांगळेपण येते. आणि अशा वेळी गरिबीही लुळीपांगळीच असते. काटकसरी आणि साधेपणाने साहित्य संमेलन व्हावे या आग्रहातच अशा लुळेपणाचीच शक्यता जास्त आहे.

तर सारांशरूपाने असे म्हणता येईल, की गंभीर चर्चा आणि विचारविनिमय होण्यासाठी छोटी संमेलने जशी आवश्यक आहेत तशीच एकूण समाज वाचनाभिमुख होण्यासाठी देखणी आणि भव्य संमेलनेही आवश्यकच आहेत. मोठ्या संमेलनासाठी जास्त पैसा लागणार असेल तर तो जरूर कॉर्पोरेट क्षेत्रातून आणावा. सरकार काय किंवा कंपन्या काय, संमेलनाला देणगी देतात यात काही उपकार करत नाहीत ही मानसिकता असावी. एखाद्या कंपनीने संमेलनाला देणगी दिली याचा अर्थ त्या कंपनीच्या अनैतिक उत्पादनाची जाहिरात केली असे नव्हे, आणि अशी जाहिरात करण्याची अट त्या कंपनीने घातली तर ती मात्र ठामपणे धुडकावून लावावी. मोठ्या प्रमाणावर पैसा जमा करून लेखक-वाचकांचे भरपूर लाड करावेत, ज्यायोगे लेखक, वाचक किंवा साहित्यप्रेमी जमातीचा सदस्य असणे ही अभिमानाची गोष्ट वाटायला लागेल. पुस्तके वाचणे ही जीवनावश्यक गोष्ट आहे हे समाजाच्या मनावर ठसवण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्रातून पैसा आणि मार्केटिंगची नवनवी तंत्रे जरूर घ्यावीत. एखाद्या सोहळ्याला हौसे, नवसे आणि गवसे आले म्हणून काही बिघडत नाही. त्यातूनच गवस्यांना काहीतरी गवसत असते. त्यासाठी साधनशुचितेचा अतार्किक अतिरेक न करता उघडपणे आणि अभिमानाने कॉर्पोरेट क्षेत्रातला पैसा साहित्य क्षेत्राने घ्यावा, फक्त तो घेताना आपले खांदे आणि तत्त्वे झुकवायची गरज नाही. याचबरोबर फक्त देखण्या आणि खर्चिक संमेलनाने सारे काही साधले जाणार नाही हेही लक्षात घ्यायला हवे. 'नथिंग वर्क्स इन आयसोलेशन' हे एक मोठेच मोलाचे तत्त्व आहे. बदलत्या काळानुसार वेगवेगळ्या मार्गाने आपले काम साधता यायला हवे. साहित्य संमेलनच नव्हे, तर एकूणच साहित्यक्षेत्रापुढचा खरा प्रश्न तरुणाईला आकर्षित करण्याचा आहे. एकीकडे कोटी-कोटी रुपये खर्चून साहित्य संमेलन भरते तर जणू काही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला आपण एक दमदार पर्यायच निर्माण करत आहोत अशा थाटात गल्लोगल्ली अनेक साहित्य संमेलने भरताहेत; पण, एकूणच साहित्य संमेलनात तरुणांचा सहभाग हा चिंतेचा विषय असतो खरा. तरुणाईची नस ओळखण्यात साहित्यक्षेत्र नेहेमीच कमी पडते आहे. आणि त्याचे खापर बिघडत्या तरुणाईवर ढकलून मोकळेही होते आहे. अगदी सहज असं म्हटलं जातं, की डिस्को, पब्ज, मोबाइल, इंटरनेट किंवा अमेरिकेचे डेस्टिनेशन असलेले करीअर यात रमलेल्या तरुणांना आहे कुठे वेळ साहित्यासाठी? पण, हे तर अर्धसत्यच आहे. तोच तरुण चेतन भगतच्या कादंबऱ्यांची पारायणे करतो. हे सत्य का नाकारा? तोच तरुण 'सुदर्शन'ची नाटके बघायला गर्दी करतोच ना? म्हणजे आपणच कुठेतरी कमी पडतोय का?

इथे एका नव्याच प्रयोगाविषयी सांगायला हवं. एका दशकाहून अधिक काळ कार्यरत असलेलं 'अनुभव' मासिक आणि ते चालवणारी 'युनिक फीचर्स' ही संस्था नेहेमीच बदलत्या वाटा आणि नव्या प्रवाहांचं सारथ्य करत आलेले आहेत असं दिसेल. 'सारथ्य' हा शब्द मुद्दामच वापरला; कारण, त्यात एक सक्रियता आहे. सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातल्या बदलाचं वारं ओळखून आपली शिडे उभारण्यात या मंडळींनी नेहेमीच आनंद मानला आहे. साहित्यक्षेत्राने देखील तरुणाईला आपल्या परिघात घेण्याची निकड त्यांनी ओळखलेली दिसते आहे. आणि त्यासाठीच तरुणाईला ज्या माध्यमात अभिव्यक्त होणे आवडते त्या इंटरनेटवरच 'अनुभव' मासिकातर्फे गेली दोन वर्षे एक अभिनव इंटरनेट साहित्य संमेलन भरवलं जात आहे.

इंटरनेटवर साहित्य संमेलन भरवण्यात मुख्य हेतू अर्थातच अधिकाधिक लोकांपर्यंत पोचणं हा आहे. मैदानी साहित्य संमेलन हे मूलत: एक उत्सव असतो, सोहळा असतो, आणि ते ठीकच आहे. त्यात अर्थातच काही गैर नाही. तो तसा असायलाच हवा. समाजात वाचनसंस्कृतीची वाढ व्हावी, पुस्तकांकडे अधिकाधिक लोकांनी वळावे यासाठी असे उत्साही उत्सव असायलाच हवे. पण, अशा संमेलनात गंभीर चर्चांना मर्यादा पडणारच. अशा गंभीर चर्चा छोट्या संमेलनांनी घडवाव्यात. मोठ्या संमेलनातला उत्सव आणि छोट्या संमेलनातले विचारमंथन अशा दोन चाकांवर वाचनसंस्कृतीची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ होत असते. पण, या दोन्ही प्रकारच्या संमेलनात सहभागी होण्यासाठी स्थळ आणि काळाची बंधने पडतात. उदाहरणार्थ ऑस्ट्रेलियातल्या तरुणाला त्यात सहभागी होणे अशक्यच असते. आणि ईव्हन आपण त्या वेळी भले चंद्रपूरमध्ये असलो तरी काही कारणाने त्याच काळात दुसरे काही अत्यावश्यक काम असेल तर ते संमेलन हुकतेच. या प्रकारच्या समस्यांवर युनिक फीचर्स ही संस्था भरवत असलेलं इंटरनेटवरचं 'ई-संमेलन' हा उत्तम उपाय आहे. शिवाय इंटरनेटवरच्या 'अनुभव'च्या या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने काही गंभीर विचारमंथन होणे शक्य आहे. आणि मुख्य म्हणजे ते अधिकाधिक लोकांपर्यंत, स्थल-कालाचे बंधन न पडता पोचू शकेल. कारण, गंभीर विचारमंथन एकांतातच होते. या विचारातूनच हे अभिनव साहित्य संमेलन घेतले जात आहे.

युनिक फीचर्सच्या uniquefeatures.in संकेतस्थळावर हे साहित्य संमेलन भरवले जाते. अगदी अध्यक्षीय भाषण, अर्थपूर्ण परिसंवाद आणि मुलाखतींसह अनेक उत्तमोत्तम ठरलेल्या वेळी हे कार्यक्रम आमच्या संकेतस्थळावर अपलोड केले जातात. मुख्य म्हणजे साहित्य रसिकांना यात चर्चा करण्याची, सक्रिय भाग घेण्याची संधी असते. या अभिनव साहित्य संमेलनाला पहिल्या वर्षी विख्यात



साहित्यिक 'रत्नाकर मतकरी' अध्यक्ष म्हणून लाभले होते तर या वर्षी नुकतेच 'साहित्य अकादमी' पुरस्काराने सन्मानित झालेले ज्येष्ठ कवी ग्रेस हे अध्यक्ष आहेत. पहिल्या वर्षी यातले बरेचसे कार्यक्रम टेक्स्ट स्वरूपात होते तर या वर्षी बरेचसे कार्यक्रम ध्वनिचित्रफितीच्या स्वरूपात असतील. अनेक साहित्यिक-कलावंतांच्या मुलाखती, महत्त्वाच्या विषयांवर परिसंवाद आणि चर्चा असे या संमेलनाचे स्वरूप असते. लक्षणीय गोष्ट म्हणजे या उपक्रमात मराठीतले अनेक ज्येष्ठ आणि दिग्गज भाग घेतात. (मागच्या वर्षी नामदेव ढसाळ, सानिया वगैरेंच्या मुलाखती या संमेलनाचे खास आकर्षण होते तर यंदा प्रकाशन क्षेत्रातली तरुण पिढी हे खास आकर्षण आहे. शिवाय ग्रेस यांच्या शैलीदार आणि विचारप्रवृत्त करणाऱ्या मौलिक भाषणाची मेजवानी असेलच.)

एक मात्र आहे. रसिकांच्या प्रतिसादाशिवाय अर्थातच हे संमेलन अपूर्ण राहील. तेव्हा साहित्यप्रेमींनी नेमाने या संमेलनातील साहित्याचा आनंद घ्यायला हवा आणि आपली प्रतिक्रिया त्यांच्या संकेतस्थळावर नोंदवत राहायला हवी. कारण, हे संमेलन खऱ्या अर्थाने आपले सर्वांचे आहे. मुख्य म्हणजे या नव्या युगाचे आहे.

अशा नवनवीन उपक्रमांनी साहित्यक्षेत्रात नवे युग आणता येईल. मुख्य म्हणजे तरुणांना ज्या माध्यमात 'कम्फर्टेबल' वाटते त्या त्या माध्यमांचा अंगीकार साहित्यक्षेत्रानेही करायला हवा. कारण, साहित्यक्षेत्रापुढचे खरे आव्हान तरुणांना सामावून घेणे हेच आहे.

महाराष्ट्राला बेरजेच्या राजकारणाला मोठा वैभवशाली इतिहास आहे. मराठी साहित्याने देखील असेच बेरजेचे राजकारण करून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अभिनव पद्धतीने आयोजित केली जाणारी छोटी छोटी साहित्य संमेलने आणि इंटरनेटसारख्या माध्यमाला कवेत घेणारी ई-संमेलने अशा अनेक मार्गांची बेरीज करून वाचनसंस्कृती अनेकपटींनी वाढवायला हवी.

**संपर्क : ९८२२००३४११**

# मी संमेलनाला का जात नाही?



साहित्य संमेलनांना मी का जात नाही, या प्रश्नाचे उत्तर एका मिसऱ्यात द्यायचे तर -

'पर तबीयत उधर नहीं आती (गालिब)' असे देता येईल. साहित्य संमेलनाबद्दल माझे मत पूर्वीपासून अनुकूल नाही. आम्हाला समजायला लागले तेव्हा फार मूर्ख लेखक यात भाग घेत असत. वि. द. घाट्यांसारखे उपसाहित्यिक तर अध्यक्षही होते. पुढे माझ्या वाचनात जोतिराव फुले यांचे 'घालमोठ्या दादा'ला साहित्यसंमेलनातल्या उंटावरून शेळ्या हाकणाऱ्या साहित्यिकांबद्दलचे पत्र वाचण्यात आले आणि आपण बरोबर रस्त्याने चालत आहोत, याची खात्री पटली. साहित्यसंमेलने बदलतील किंवा आपण बदलू तेव्हाच हा दुग्धशर्करा योग घडेल, असे वाटते. एखादे वेळी असेही वाटते की, आपण हे साहित्यसंमेलनाला न जाण्याचे सोवळे तर पाळत नाही आहोत ना? कारण, हळूहळू साहित्यसंमेलनांना बोटे मोडणाऱ्या दुर्गा भागवत, पु. शि. रेगे, व्यंकटेश माडगूळकर, म. द. हातकणंगलेकर हे माझ्या जवळचे मित्र साहित्यसंमेलनांच्या धुरळ्यात घुसले त्यामुळे मी त्यांचे संबंध तोडले. तोडजोड म्हणजे शहाणपणा असतो, हे शहाणपण मला अजूनही आलेले नाही.

साहित्यसंमेलने नुस्तीच 'संमेलने' असतात, त्या अर्थी विरंगुळा म्हणून जाऊ म्हटले तरी मनोरंजन होईल याची खात्री वाटत नाही. संमेलनांना 'साहित्य' हे लेबल लावल्यामुळे साहित्यही नीट होत नसावे. जाण्यासाठी दुसऱ्या बऱ्याच गोष्टी आहेत.

**- भालचंद्र नेमाडे**

**संपर्क :** ०२२-२८९३२८०९



# वऱ्हाडी पाहुणचार

चंद्रपूरचं साहित्य संमेलन ठरलं आणि आपला समावेश नेमका कशात असेल याच्या काळज्या आणि चिंतांनी समग्र साहित्य प्रसव्यांच्या काळजांना भोके पडू लागली. मुळात आधी आपला समावेश असेल की नाही ही बेसिक काळजी होती. एकदा बेसिक गरजा संपल्या, की मग दुसऱ्या फळीतील गरजांची जाणीव होते. त्यानुसार आधी साहित्य प्रसव्यांनी आपले नाव यादीत आहे की नाही हे जाणून घेण्याच्या उठाठेवी सुरू केल्या. या उठाठेवींना काही जण उपद्व्यापही म्हणत असले तरी साहित्य प्रसव्यांचे सामाजिक स्थान लक्षात घेता तसे म्हणणे अशोभनीय आहे. ज्या लोकांना आपले नाव कोणत्याही आणि कशाच्याही यादीत नाही याची खात्रीलायक आणि निराशाजनक माहिती मिळाली, त्यांनी ओळखीच्या पत्रकारांच्या ओळखी घासूनपुसून अधिक स्वच्छ केल्या. या यादीबाद सहित्य प्रसव्यांच्या प्रतिक्रिया आणि त्यांचे लेखणीवाल्या व दांडकेवाल्या पत्रकारांशी धमाल संवाद घडले. चंद्रपुरात वऱ्हाडी पाहुणचार होईलच. त्या आधीचा हा शाब्दिक वऱ्हाडी पाहुणचार.

**यादीबाद १**

अलीकडे साहित्य संमेलने म्हणजे नुसता बाजार झाला आहे हो. तीन दिवसांत कोटी दोनकोटी रुपयांचा चुथडा होतो. मी म्हणतो, कशाला सरकारकडून पैसे घ्यायचे? सरकारचे पैसे घेणार, त्यांच्या समित्यांवर जाणार, मग कसली डोंबलाची आली आहे अस्मिता आणि आविष्कार स्वातंत्र्य?

**यादीबाद २**

साहित्य संमेलनात खरोखरच साहित्य असते का हो? हां, आता चार लोक एकत्र येतात, गप्पा मारतात, एकमेकांची कौतुकं करतात. पण, त्यासाठी तंगड्या तोडत कशाला कुठं जायचं?

**यादीबाद ३**

हे बघा, पाँ ल मा ड्युबोर्द एकदा असं म्हणाला होता की, ज्यांना साहित्य लिहिता येत नाही, ते साहित्यिकांना एकत्र आणून स्वत:चे समाधान करून घेतात..

ग्रेट. सर हे पाँ ल...

पाँ ल मा ड्युबोर्द !

हां, तर हे पाँ ल मा ड्युबोर्द कुठे आणि कोणत्या कालखंडात झाले ते सांगता का, म्हणजे मलाही जरा...

ते महत्त्वाचं नाही हो, तो झाला की नाही हेसुद्धा तसं बिनमहत्त्वाचंच आहे, तो काय म्हणाला ते लक्षात घ्या.

सर, ते लक्षात घेतलं, म्हणूनच तर म्हणतोय की त्यांच्या मतांचा जरा सविस्तर अभ्यास केला पाहिजे...

हाच प्रॉब्लेम आहे बघा आजच्या पिढीचा. प्रत्येक गोष्टीचा सविस्तर अभ्यास करतो म्हणायचं आणि गोष्टींचा ढीग वाढवित न्यायचा. तुम्ही काही काळजी करू नका, मी त्याच्या समग्र लेखनाचा सविस्तर अभ्यास आधीच केला आहे. त्याचं जे वाक्य मी आत्ता तुम्हाला सांगितलं, ते वाक्य सोडलं तर बेट्यानं उभ्या आयुष्यात काहीही बरं लिहिलं नाही. मी तुम्हाला सांगतो, तो एव्हढा नगण्य होता की त्याचं नावही फ्रेंच साहित्यात कुठं सापडणार

## तंबी दुराई

नाही. आपल्याकडल्या सारखी फुसक्या साहित्यावर पीएचड्या करण्याची पद्धत नाही ना तिकडं..

**यादीबाद ४**

साहित्याच्या आणि समीक्षेच्या परिप्रेक्षात सांगायचं झालं तर साहित्य, साहित्यिक आणि साहित्याचे रसिक हे तीन महत्त्वाचे कोन असतात. या तीन कोनांना सांधण्याचं काम साहित्य संमेलनांनी करायचं असतं. माझा प्रश्न असा आहे की आपली साहित्य संमेलने हे काम करतात का? आपण अगदी सत्तर-ऐंशी वर्षे मागे जाऊ आणि तिथून सुरुवात करू, मला सांगा...

काय घडलं?

तुम्हीच सांगा ना सर, काय घडलं?



हेच. काहीही नाही. काहीही घडलेलं नाही. फक्त संमेलनं झाली. आपल्या जाणिवांना ज्या अनुभवांच्या संधीप्रकाशाची गरज असते त्या संधीप्रकाशाचा एक साधा कवडसाही जी संमेलने आजवर दाखवू शकली नाहीत, त्या संमेलनाला जाऊन करायचं तरी काय?

सर, आपण पाच वर्षांपूर्वी अध्यक्ष होतात ना... मग...

तेव्हाच... तेव्हाच तर हे सगळं कळलं ना मला. अनुभवाविन मान डोलवू नको रे... आपल्याच कुठल्यातरी संताने हे सांगितलं आहे... तेव्हढ्यापुरता आपला आलो जाऊन संमेलनाच्या गर्दीत. पण, त्यामुळेच तर त्याचे वैयर्थ लक्षात आले...

**यादीबाद ५**

मला लपवाछपवी करायची सवय नाही बघा. कवींच्या यादीत माझं नाव नाही, म्हणून मी यावर्षी संमेलनाला जात नाही. यादीत माझं नाव का नाही आणि ते कोणामुळं ऐनवेळी गाळलं गेलं हे तुम्ही शोधून काढायचं आहे... मी तुम्हाला क्लू दिला, आता तुम्ही करा शोधपत्रकारिता...

यादीबाद साहित्यप्रसवे झाले मग यादीबाज साहित्य प्रसव्यांना गाठलं. झकास प्रतिक्रिया होत्या एकेकाच्या. अर्थ संकल्प सादर झाल्यावर तो कसाही असला तरी विरोधक म्हणतात, हा गरीब विरोधी अर्थसंकल्प आहे आणि सत्ताधारी म्हणतात, हा तळागाळातील लोकांना न्याय देणारा आहे. तसंच संमेलनाला जाणारे आणि न जाणारे यांचं. तर यादीबाज साहित्य प्रसवे..

**यादीबाज १**

हा भाषेचा सोहळा आहे, त्याला जत्रा म्हणा, संमेलन म्हणा, मेळा म्हणा काहीही म्हणा. परंतु,






एका भाषेचे हजारो रसिक एका मांडवाखाली जमतात, एकमेकांचे विचार ऐकतात याला माझ्या मते महत्त्व आहे. मला वाटतं की प्रत्येक मराठी भाषीकानं इथं यायला हवं.

परंतु, आबासाहेब, गेल्या वर्षी तुम्हाला फर्स्टक्लासचं तिकीट पाठवलं नव्हतं म्हणून तुम्ही रुसला होतात...

छेछे... कोणीतरी खोडसाळ पत्रकार होता, त्यानं आपलं काहीतरी लावून दिलं...

आबासाहेब, अहो मीच होतो आणि माझ्याकडे रेकॉर्डिंग आहे, तुम्ही अगदी स्पष्टपणे तसं बोलला होतात... पण, या वर्षी तरी फर्स्टक्लासचं आहे की नाही तिकीट?

तुम्हीच होता होय. असं आहे बघा मोहनराव.

मोहनराव नाही. मनोहर, यार माझा!

हे काय?

मनोहर हे माझं नाव, यार माझा हे माझ्या चॅनलचं नाव.

अस्सं. हे बघा मनोहरराव, यार माझा.

चॅनलचं नाव तुम्ही घ्यायची गरज नाही. ते फक्त मला घ्यावं लागतं. बोला.

हे बघा, नदीचं पाणी वाहतं असतं, म्हणूनच ते स्वच्छ असतं. तसंच सत्याचं आहे. सत्य हे कायम प्रवाही हवं, तरच ते स्वच्छ राहतं. जे सत्य तुम्ही गेल्या वर्षी ऐकून रेकॉर्ड करून ठेवलं ते तुमच्याकडे साचलेलं सत्य आहे आणि मी जे आत्ता बोललो ते प्रवाही सत्य आहे. कळलं?

हो सर, कळलं.

तर, हे होते विख्यात मराठी समीक्षक धोंडीबा उपाख्य आबासाहेब कुलकर्णी. त्यांच्या प्रवाही सत्यावरून त्यांना या वर्षी प्रथम श्रेणीचं तिकीट आणि वातानुकूलित निवासाची व्यवस्था याबाबत शब्द देण्यात आला असेल हे पुरेसं स्पष्ट होतं. मनोहर... यार माझासाठी!

**यादीबाज २**

मी असतोच दरवर्षी. कधी मी कवी संमेलनाचा सूत्रधार असतो, कधी कुठल्या परिसंवादात असतो. आपल्याला परिसंवादांच्या कोणत्याही विषयाचं वावडं नाही. सगळ्या विषयांवर आणि सगळ्या बाजूंनी मांडण्यासाठी माझ्याकडे मुद्दे असतात. विनोदी साहित्याची वाट लागली आहे का? अशा विषयावर परिसंवाद असेल तर मी, पूर्णपणे वाट लागली आहे आणि अजिबात वाट लागलेली नाही या दोन्ही बाजूंनी भक्कमपणे उभा राहू शकतो. लेखक होणं म्हणजे तरी काय असतं हो? कुणाच्या तरी भूमिकेत शिरून, ती व्यक्तिरेखा जगणं म्हणजे लेखक होणं. मग, तुम्ही एखाद्या परिसंवादात दोन्ही बाजू मांडल्या किंवा मांडू शकलात तरच तुम्ही खरे लेखक. त्यामुळं मी प्रत्येक वर्षी आयोजकांना फोन करून सांगतो. मला कुठल्याही परिसंवादात घाला, मी येतो. वेळेवर एखादा वक्ता वाढला म्हणून मला काढलं तरी काही वांधा नाही, वेळेवर एखादा आला नाही म्हणून मला स्टेजवर ढकललं तरी हरकत नाही. असा तयार माणूस कोणाला नको असतो? बोलवतातच हमखास मला.

**यादीबाज ३**

मला संमेलनानं कवी म्हणून मान्यता दिली याबद्दल मी संमेलनाचा अत्यंत आभारी आहे. कवींच्या निवडीसाठी कवितेच्या योग्यतेचा वादग्रस्त निकष न लावता कोटा सिस्टिमनुसार नावांची यादी तयार होणं हेच अंतिमत: कवितेच्या हिताचं आहे. अन्यथा, माझ्यासारख्या दुर्लक्षितांना हे मानाचं व्यासपीठ कधीच मिळू शकलं नसतं. कवितेची योग्यता पाहून जर त्या त्या कवीला आमंत्रण द्यायचं की नाही हे ठरणार असेल तर कवितांची योग्यता ठरवू पाहणार्यांची योग्यता काय हाच पहिला प्रश्न उपस्थित होईल. आणि या पहिल्याच प्रश्नाच्या उत्तराबाबत कदापि एकमत होणं शक्य नसल्यानं कवी संमेलनंच रद्द करावी लागतील. त्यापेक्षा कोटा सिस्टिम चांगली नव्हे काय? मी संमेलनात वाचून दाखविणार असलेल्या कवितेचं शिर्षक आहे,

तिच्या डोक्यात उवा होत्या म्हणून...

मी पुढे असं म्हणतो की...

अरे, गेलात वाटतं तुम्ही... ठीक आहे, संमेलनात भेटालच ना?

तर असो, संमेलनातल्या पाहुणचाराची तिखट चव जिभेवर येण्यापूर्वी जिभेला जरा तिखटाची सवय व्हावी म्हणून हा वऱ्हाडी वानवळा दिला.

संपर्क : ९८९२४१९२६७





# संतांची उच्छिष्टे...

संगीत रंगभूमी, दिवाळी अंक आणि साहित्य संमेलने ही मराठी संस्कृतीची वैशिष्ट्ये मानली जातात. पैकी संगीत रंगभूमी आज संप्रदाय झाली आहे. व्यावसायिक गणिते जुळविण्यात वाकबगार असलेल्यांनी दिवाळी अंकाची परंपरा अजूनही नीट जपली आहे. साहित्य संमेलने तर भारताबाहेरही पाऊल ठेवत आहेत. तथापि, साहित्य संमेलन म्हटले म्हणजे आपल्यासमोर येते ते साहित्य महामंडळ नावाच्या संस्थेच्या सहकार्याने आयोजित केलेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. प्रतिवर्षी हे संमेलन सहसा गाजते ते मुख्यत्वे अध्यक्षाच्या निवडणुकीच्या मुद्द्यावरून.

साहित्य संमेलनातील आणखी एक आकर्षण बिंदू म्हणजे विविध विषयांवरील परिसंवाद. संमेलनात संत साहित्यावर एखादा परिसंवाद असावा असा विशेषत: स्थानिक संयोजन समितीमधील मंडळीचा आग्रह असतो. संतसाहित्यावर प्रेम करणाऱ्यांची संख्या लक्षणीय असल्याची त्यांना कल्पना असते, शिवाय त्यामुळे गर्दीही वाढणार असते. विशेष म्हणजे संतसाहित्याची आजची प्रस्तुतता (किंवा उपयोगिता) किंवा संत साहित्य कालबाह्य झाले आहे काय हाच विषय वेगवेगळ्या नावांनी पुनरावृत्त होत असतो. त्यामुळे काही लोकांनी संतसाहित्यावर परिसंवाद असलाच पाहिजे काय, असा प्रश्नही उपस्थित करायला सुरुवात केली आहे. अर्थात, संत परंपरेतूनच पुढे आलेल्या 'दिंडी' नावाच्या गोष्टीचा उपयोग करून ग्रंथदिंडी काढून तिच्यात मिरविण्यात सर्वांनाच भूषण वाटते. दिंडीत पालखीमध्ये ग्रंथ ठेवले जातात. (ते कोणते असावेत यावरही वाद होतोच!) शालेय विद्यार्थ्यांना वारकऱ्यांच्या पोशाखात व विद्यार्थिनींना डोक्यावर तुळस देऊन वातावरणनिर्मिती करण्यात येते. परिसरात वारकरी संप्रदायाचे प्राबल्य असेल तर स्थानिक वारकऱ्यांना बोलावून दिंडी अधिक वास्तववादी बनवण्यात येते.

परंतु, या झाल्या आनुषंगिक बाबी. मुद्द्याचा आणि तत्त्वाचा प्रश्न हा आहे की, संत साहित्याचे मराठी साहित्यात काय स्थान आहे?

ते खरोखर बिनकामाचे असेल तर त्यास खुशाल संमेलनाबाहेर ठेवावे म्हणजे त्यांची आजची प्रस्तुतता वगैरेसारखे चार्वित चर्वण परिसंवादही आपोआपच बंद होतील. मात्र, ते काही कामाचे असेल तर मात्र त्यास सन्मानपूर्वक योग्य ते स्थान द्यायलाच हवे. म्हणजे उपरोक्त परिसंवादांऐवजी संत्यसाहित्याची योग्य दिशेने चर्चा होऊ शकेल असे विषय घेता येतील.

स्वत:ला आधुनिक म्हणवणारे परंतु खरी आधुनिकता न पेलणारे विचारवंत संतसाहित्याचे वक्ते म्हणतात. त्यांना संतसाहित्य हे मध्ययुगीन, प्रतिगामी व बुरसटलेल्या विचाराचे वाटते. त्यांच्या या म्हणण्यात कितपत तथ्य आहे याचा विचार करायला हवा.

मराठीत ज्याला सर्वसाधारणपणे 'संत साहित्य' म्हणून ओळखले जाते त्याची सुरुवात इसवी सनाच्या १३ व्या शतकात झाली. वस्तुत: चक्रधरस्वामींच्या महानुभाव पंथात निर्माण झालेले 'लीळाचरित्र',

**डॉ. सदानंद मोरे**

'स्मृतिस्थळ' हे ग्रंथ उत्तम दर्जाचे गद्य म्हणून जाणण्यात कोणत्याही भाषेला भूषण ठरावे या पात्रतेचे होते; तथापि, काही सांप्रदायिक समजुतींमुळे आणि आग्रहामुळे महानुभव पंथियांनी आपल्या साहित्याला सांकेतिक गुप्त लिप्यात जखडून टाकले. त्यामुळे त्यांचा जो काही फायदा व्हायचा होता तो झालाही असेल. परंतु, महानुभवतेवर असंख्य मराठी भाषक त्यापासून वंचित राहिले व त्याच्या मराठी साहित्याच्या जडणघडणीत फारसा उपयोग होऊ शकला नाही. विशेषत: मराठी गद्याचा पुरेसा विकास त्याच्या अभावी होऊ शकला नाही.

याच वस्तुस्थितीची दुसरी बाजू म्हणजे तेराव्या शतकातच काव्यरूपाने पुढे आलेले वारकरी संतांचे साहित्य हे मराठी साहित्याचा मुख्य प्रवाह ठरेल. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून प्रवर्तित केलेली ही साहित्य परंपरा अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत चालली, निळोबाराय पिंपळनेरकर हे या परंपरेतील शेवटचे कवी होत. या परंपरेचे यथार्थ वर्णन तुकाराम शिष्या संत बहिणाबाई शिऊरकर यांनी आपल्या सुप्रसिद्ध अशा 'ज्ञानदेव रचिला पाया.. तुका झालासे कळस' या रुपकातून केले आहे. ज्ञानेश्वर-नामदेव-एकनाथ-तुकाराम-बहिणाबाई-विनोबा ही या परंपरेतील महत्त्वाची नावे. ज्ञानेश्वरांच्या काळातच त्यांची तीन भावंडेही अभंगरचना करीत. त्यात मुक्ता या त्यांच्या लहान बहिणीचाही समावेश होता. शिवाय नामदेवांच्या घरातील दाही जनीसह पंधरा सदस्य, चोखोबा, त्यांची पत्नी, मुलगा, बहीण, मेव्हणा अशी संपूर्ण कुटुंबेच काव्यरचना करतात ही गोष्ट जगाच्या पाठीवरील कोणत्याही भाषेतील साहित्यात सापडणे कठीण आहे. त्यात चोखोबा तर अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजातील मुक्ताई, जनाई, सोयराई या स्त्रिया यावरून वारकरी संतपरंपरेतील साहित्यिकाला वय, वर्ण, जात, लिंगभाव यांच्या मर्यादा नव्हत्या हे दिसून येते. पंडिती वळणाच्या मराठी कवितेची रचना करणारे सर्व ब्राह्मण पुरुष होते तेथे स्त्रिया वा अब्राह्मणांना संधी नव्हती तसेच शाहीर मानले गेलेल्या कवीमध्ये सर्व वर्ण जातींचे कवी असले तरी स्त्रिया मात्र नव्हत्या. कारण, ही कविता स्त्रियांकडे पाहणाऱ्या विशिष्ट पुरुषी दृष्टीवर आधारित होती. त्या दृष्टीने स्त्रिया स्वत:कडे पाहू शकतच नव्हत्या. याचाच अर्थ असा होतो की, वारकरी साहित्य हे खऱ्या अर्थाने सार्वत्रिक-साहित्य आहे. हा दावा आधुनिक मराठी साहित्याला करता येईल काय? त्यात वाव नाही म्हणून दलित साहित्यिकांना आपला सवता सुभा उभारावा लागला. नंतर मुस्लीम हा लेखक तीच तक्रार करीत त्याच वाटेने गेले. इकडे तीच तक्रार शेख महंमदासारख्या मुसलमानाला वारकरी साहित्यपरंपरेत स्थान मिळाले. एवढी सर्वसमावेशकता अन्यत्र कोठे आहे? पाचसाडेपाचशे वर्षे चालवलेल्या या प्रवाहात साहित्यव्यवहाराकडे पाहून या काळात मराठी साहित्याचा सुवर्णकाळ म्हणण्याचा मोह दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्यासारख्या जागतिक पातळीवरील सर्व प्रकारचे वाङ्मय वाचलेल्या आधुनिकाला व्हावा यातच सर्व काही आहे.

आधुनिक मराठी साहित्यातील सर्व वाङ्मयप्रकार व वाङ्मयाने संप्रदाय हे युरोपियन विशेषत: इंग्रजी साहित्य व समीक्षाव्यवहाराच्या अनुकरणातून आलेले आहेत. आधुनिक मराठी समीक्षेबद्दलही हेच म्हणता येईल. यातून लिहिली गेलेली पुस्तके वाचून पाश्चात्त्य वाचक प्रभावित होईल हे संभवत नाही. अपवाद काहीसा दलित साहित्याचा. याउलट संतसाहित्याचे काही मराठी साहित्याचे वेगळेपण व वैशिष्ट्यपूर्ण ओळख सांगायची असेल, त्याचे जागतिक साहित्याला योगदान सांगायचे असेल तर संतसाहित्याकडेच बोट दाखवावे लागते. तशाच आशयाचे विवेचन जुन्या पिढीतील जाणते,



वाङ्मयवेत्ते प्रा. वासुदेव बाळवंत पटवर्धन यांनी केलेले आहे त्यात काही अतिशयोक्ती नाही.

मराठी साहित्य संमेलनाची परंपरा ज्यांनी सुरू केली त्या न्या. महादेव गोविंद रानडे यांना मात्र संतसाहित्याच्या माहात्म्याची आश्चर्यकारक जाणीव होती. वक्तृत्वोत्तेजक सभेच्या विद्यमाने न्यायमूर्तींनी वसंत व्याख्यानमाला सुरू केली हे सर्वश्रुतच आहे. प्रत्यक्ष व्याख्यान सुरू होण्याच्या आधी न्यायमूर्तींनी तुकोबांच्या अभंगातील एखाद्या कडव्याचा कल्पनाविस्तार करण्याच्या परिपाठ ठेवला होता. हे किती जणांना माहीत आहे?

१७५० सालापर्यंत म्हणजेच विठोबापर्यंत मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाह संत साहित्यच होता हे स्पष्ट आहे. त्यानंतर पुढे आलेल्या लावण्या रचणाऱ्या शाहिरांनी वेगळे विषय हाताळले. शाहिरांची लावणी हा एक वेगळा प्रकार असला तरी ते सर्वांनी निर्मिलेल्या वाङ्मयीन संस्कृतीचाच घटक होते व ते स्वत:लाही तसे समजतही होते. मराठी साहित्याचे हे पर्व १७५० ते १८५० असे मानण्यास हरकत नाही. त्यानंतरच म्हणजे इंग्रजी सत्ता येथे दृढमूल झाल्यानंतर व इंग्रजी भाषेचा परिचय झाल्यानंतर आधुनिक मराठी साहित्याचे पर्व सुरू झाले असे म्हणता येईल. म्हणजे हा कालावधी जेमतेम दीडशे वर्षांचा आहे. त्याच्या आधारे अस्सल मराठी साहित्याच्या परंपरेचे उच्चारण करू पाहणे हा प्रकारच हस्यास्पद आहे.

संतसाहित्य हे मुख्यत्वे धर्मपर आहे असा आक्षेप कोणी घेऊ शकेल. पण मग याच न्यायाने उदाहरणार्थ डांटेचे 'डिव्हाइन कॉमेडी' किंवा आंग्ल कवी मिल्टनचे 'पॅरेडाईज लॉस्ट' या कृतीही रद्दबातल समजाव्या लागतील. त्या तर महाकाव्याचे आदर्श म्हणून प्रस्थापित झाल्या आहेत. हाच प्रकार गटेच्या 'फाऊस्ट'चा. थोडक्यात, विचारवंताचे हे दुहेरी मोजमाप आहे!

पण मग संतसाहित्य आणि आधुनिक मराठी साहित्य यांच्यात अशी दरी का आणि कशी निर्माण झाली, हा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तर अवघड नाही. एकतर १७५० नंतर म्हणजे निळोबांच्या पश्चात वारकरी संतपरंपरा संपुष्टात आली व उत्स्फूर्त अभंगओव्या लिहिल्या जाणे थांबले. नंतर दुसरे असे की त्यानंतरच्या वारकरी सांप्रदायिकांनी आपल्या पूर्वसुरींच्या रचनांचे निरूपण करण्यातच समाधान मानले. आधुनिकतेचा वारा त्यांनी आपल्या अंगाला लागू दिला नाही. याउलट आधुनिक मराठी साहित्य लिहिणाऱ्यांनी वाङ्मयीन सत्त्वाचा व मूल्यांचा शोध घेताना संतसाहित्याकडे पूर्णपणे पाठ फिरवली. त्यामुळे या दोन परंपरामध्ये आंतरक्रिया म्हणतात ती झालीच नाही. पारंपरिक वारकऱ्यांनी आधुनिक साहित्याकडे दुर्लक्ष करणे आपण समजू शकतो. देवधर्माच्या मर्यादित प्रेरणेमुळे हे घडणे स्वाभाविक होते; पण, स्वत:ला उदारमतवादी समजण्यास आधुनिकांनी संतसाहित्याकडे पाठ फिरविणे हे न समजण्यासारखे आहे.

आधुनिक साहित्याची ही कोंडी पहिल्यांदा र. वा. दिघे यांनी फोडली. दिघ्यांच्या कादंबऱ्या या मुख्यत्वे संतांच्या जीवनदृष्टीवर व मूल्यसृष्टीवर आधारित आहेत. संतसाहित्याशी नाळ जोडायची म्हणजे अंभगओव्या लिहायच्या इतका यांत्रिक हा प्रकार नाही. उलट कांदबरीसारखा पूर्णपणे परकीय वाङ्मयप्रकार होऊन त्यातून अस्सल देशी परंपरा व्यक्त करायची हा खरा वाङ्मयीन पुरुषार्थ आहे. ती नक्कल नसून निर्मिती आहे.

दिघ्यांनी कथा-कादंबऱ्यांमधून केलेला प्रयोग दिलीप चित्रे आणि अरुण कोलटकर यांनी केला. खरेतर, साठोत्तरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या लेखकांच्या नव्या पिढीने आधुनिकतेच्या पाश्चात्त्य संकल्पनेच्या आहारी जाणे नाकारून आपली वाङ्मयीन पाळेमुळे आपल्याच मातीत रुजवण्याचा प्रयत्न केला. कोलटकरांच्या एका कवितासंग्रहाचे नावच 'भिजकी वही' असे आहे. हा सरळ सरळ तुकोबांच्या अभंगाच्या बुडवलेल्या वहीचा संदर्भ आहे. एका बाजूला अत्यंत आधुनिक वाटणाऱ्या चित्र्यांच्या कवितेत तर आधुनिक पाश्चात्त्य संदर्भाबरोबर संतसाहित्याचेही संदर्भ तितक्याच प्रमाणात आढळतात. आधुनिकता म्हणजे आपले स्वत्त्व गहाण ठेवणे नसून ते अधिक समृद्ध करणे होय.

कोलटकरांनी फक्त कविताच लिहिली. समीक्षेच्या वाटेत ते गेले नाहीत. चित्र्यांनी लिहिलेली समीक्षा मात्र संतसाहित्य परंपरेचा त्याग न करता, तिला आधुनिक साहित्याच्या विरोधी न मानता केलेली मांडणी आहे. तिच्याऐवजी म्हणजेच संतसाहित्याच्या समृद्ध वारसा वजा करून दीडशे वर्षांच्या भांडवलावर येणारी संमेलने मराठी साहित्याला फार पुढे नेतील असे वाटत नाही.

संतसाहित्याचा पाया न सोडता आधुनिकतेची कास परंतु उत्तराधुनिकतेलाही सामोरे जाणे कसे शक्य आहे. याचे अगदी अलीकडील उदाहरण म्हणजे भालचंद्र नेमाडे यांची बहुचर्चित 'हिंदू' ही कादंबरी. दुर्दैवाने नेमाड्यांच्या बहुतेक टीकाकारांना नेमाडे काय करीत आहेत हेच उमगले नाही. त्यांच्या एकतर संतसाहित्याचा पुरेसा अभ्यास नाही आणि दुसरे म्हणजे त्यांची आधुनिकतेची व पुरोगामित्वाची जाणीवच संकुचित आणि उथळ.

मराठी साहित्यातील संताच्या साहित्याचे स्थान ओळखणाऱ्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वरचा क्रमांक द्यावा लागतो. संतसाहित्यातील पारंपरिक हिंदू वर्णजातिव्यवस्थेचा स्वीकार करणाऱ्या भागाला बाबासाहेबांचा पूर्ण विरोध होता व त्यावर त्यांनी कठोर टीकासुद्धा केली आहे; परंतु, जोपर्यंत साहित्यमूल्यांचा प्रश्न आहे तोपर्यंत ज्ञानेश्वरी आणि तुकारामगाथा हे ग्रंथ सोडून बाकीचे साहित्य बुडवून टाकले तरी फार नुकसान होणार नाही, अशा आशयाचे मत त्यांनी व्यक्त केले होते. त्यांच्या स्वत:च्या मराठी भाषेवर संतसाहित्याचा प्रभाव होताच. 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' या त्यांनी चालविलेल्या वृत्तपत्रांच्या शीर्षकस्थानी ज्ञानोबातुकोबांचीच वचने ब्रीदवाक्यांच्या रूपात विराजमान झाली होती. बाबासाहेबांच्या प्रेरणेतून आधुनिक झालेल्या नामदेव ढसाळांसारख्या क्रांतिकारी दलित कर्त्यालासुद्धा धर्मांतरानंतरही संतसाहित्याशी असलेले नाते तोडावेसे वाटले नाही यात सर्व काही आहे.

खरा मुद्दा असा आहे की, मराठी साहित्य ज्या भाषेतून लिहिले जाते ती मराठी भाषा हीच मुळी संतसाहित्याने घडविलेली भाषा आहे. पाच-सहा शतके ही जडणघडणीची प्रक्रिया चालू होती. त्यामुळे संतसाहित्य नाकारणे हे मराठी भाषाच नाकारण्यासारखे आहे. त्याची तुलना मातीशिवाय मडके घडविण्याच्या कृतीशी करावी लागेल. मराठी भाषाच काय परंतु मराठी माणसाची विचारपद्धती आणि अभिव्यक्तीची शैली यांच्यावरही संतसाहित्याचा प्रभाव आहे.

अशी वस्तुस्थिती असताना संतसाहित्याला वगळून भरविलेले साहित्य संमेलन हे डेन्मार्कच्या राजपुत्राशिवाय सादर केलेले हॅम्लेट नाटक होईल याची जाणीव संबंधितांना करून देणे आवश्यक वाटल्याने हा लेखनप्रपंच केला. त्यापुढे तरी संतसाहित्याची सद्यःकालीन प्रस्तुतता या विषयावर परिसंवाद होऊ नये.

**संपर्क : ९८२२८३२८९६**



# संमेलनात स्त्री कुठे?

प्रा. रूपाली शिंदे

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ही मराठी साहित्य विश्वातील एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना आहे. संमेलनाला जाणं किंवा न जाणं, त्यावर बोलणं, त्याच्या विरुद्ध बोलणं, अगदी संमेलनावर बहिष्कार घालणं, या सगळ्याच प्रतिक्रियांना प्रसिद्धीचं वलय आणि महत्त्व प्राप्त झालेलं दिसतं. सालाबादप्रमाणे संमेलनं पार पडणं ही एक परंपरा आहे. तशीच संमेलनावर बरं-वाईट बोलणं अशी एक समांतर परंपरा सातत्याने चाललेली दिसते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा पुन्हा एकदा विचार करायचा झाल्यास या संमेलनात स्त्रिया कुठे आहेत, असा प्रश्न पडतो. बोटावर मोजता येईल इतपत अध्यक्षपदी निवड, कथा कथन, कविसंमेलनं, मुलाखत, परिसंवादात सहभाग. हे चित्र पाहिल्यानंतर साहित्य संमेलनात स्त्रियांचा सहभाग इतका नगण्य का? स्त्री साहित्याचा विचार करताना हळदीकुंकू, भोंडला या कार्यक्रमांसारखे स्त्री-साहित्यावर स्वतंत्रपणे स्त्रियांनी बोलावं असं का? साहित्याच्या मुख्य प्रवाहात स्त्री साहित्याबद्दल चर्चा का होत नाही? साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमपत्रिकेत स्त्रियांचा किंचित सहभाग का असावा? संमेलनाचं सध्याचं उत्साही आणि उत्सवी स्वरूप पाहता संमेलनात स्त्रीसाहित्याची चर्चा तसेच स्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग कमी प्रमाणात आहे याबद्दल खंत करावी का? असे अनेक प्रश्न मनात येतात. तरीही साहित्यसंमेलनासारख्या महत्त्वाच्या सांस्कृतिक उपक्रमांमध्ये स्त्रीचं प्रतिनिधित्व तुरळक प्रमाणात आढळतं. हे सत्य आपल्याला नाकारता येणार नाही.

साहित्य संमेलन हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक सत्ता, सांस्कृतिक सत्तेचं नेतृत्व या दोन कळीच्या मुद्द्यांशी जोडलेला आहे. सत्ताकेंद्र आणि प्रसारमाध्यमांच्या जवळ असणं ही साहित्यसंमेलनाच्या क्रियाशील सहभागासाठी ही पूर्वअट आहे. ही पूर्वअट पाळताना तरी सर्व जण समान आहेत. अशी सांस्कृतिक लोकशाही असलेली दिसते. सांस्कृतिक सत्तेचं नेतृत्व, धुरीणत्व ही गोष्ट आजही पुरुषसत्ताक समाजरचनेचा एक भाग/घटक आहे. एकूण कला निर्मिती प्रसारण आणि स्वीकारणं या सर्व अवस्थांमध्ये होणाऱ्या साहित्य व्यवहाराच्या केंद्रस्थानी स्त्रियांचं असणं तिचं महत्त्व अधोरेखित होणं ही सुद्धा सामाजिकीकरणातून घडणारी कृती आहे. ती दीर्घकाळ चालू राहणारी सामाजिक आंतरक्रिया (social interaction) आहे त्याला साहित्य संमेलनाचा अपवाद कसा असेल?

साहित्य निर्मिती, साहित्याचा आस्वाद-स्वीकार आणि साहित्याचा प्रसार या चार अवस्थांमधून होणाऱ्या साहित्यव्यवहाराशी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं काय नातं आहे? हे नातं कसं आहे? याचा विचार करता साहित्याच्या प्रसारणाशी त्याचं नातं आहे असं वाटतं. साहित्याची आवड, गोडी निर्माण व्हावी, निखळ वाङ्मयीन आनंद रसिकांना मिळावा, साहित्यप्रेमींच्या परस्पर संवादातून परस्परविरोधी मतमतांतरामधून विचारांना चालना मिळावी बुद्धीला खाद्य मिळावे आणि समाजाची-वाचकांची सांस्कृतिक भूक तोषवावी असा हेतू साहित्यसंमेलन नामक सांस्कृतिक उपक्रमामागे असावा अशी एक शक्यता वाटते. परंतु, एकूणच साहित्यसंमेलनाचे स्वरूप पाहता ते लेखक किंवा साहित्यिक केंद्र आणि संयोजकांच्या आधीन झाल्याचे दिसते. तिथे सृजन, निर्मिती आणि आस्वाद प्रसरणाला थारा नाही असे जाणवते. म्हणूनच साहित्यसंमेलन म्हणजे किंवा अध्यक्षपदी निवड होणे, त्यासाठी निवडणूक लढवणे म्हणजे साहित्य निर्मिती आस्वाद आणि प्रसार या साहित्यव्यवहाराशी समांतर चालणारे सांस्कृतिक सत्ताकरण आहे. साहित्य व्यवहाराशी संबंधित असे पर्यायी सत्ताकेंद्र असे स्वरूप साहित्यसंमेलनाला प्राप्त झालेलं दिसतं. म्हणून मग त्यावरची प्रतिक्रिया वेगवेगळ्या साहित्यसंमेलनांच्या रूपात व्यक्त झालेली दिसते. म्हणून साहित्य व्यवहाराशी नाते सांगणारे सांस्कृतिक सत्ताकेंद्री आणि त्याला विरोध करणारी प्रतिक्रियावादी साहित्यसंमेलनं घडत आहेत असे दिसते.

साहित्यसंमेलनात स्त्री कुठे? याचा विचार करताना मराठी भाषेपुरतं बोलायचं झाल्यास, लेखक लेखकाचे असतेपण आपण कसे विचारात घेतो हेही पाहिले पाहिजे. लेखन स्वातंत्र्य, प्रयोगशीलता, आविष्कार, सौंदर्यभावना, बंडखोरी, सामाजिकता या निकषांच्या संदर्भात आपण लेखक/साहित्यिक असणं लेखकाची प्रतिमा त्याचं असणं आपण लक्षात घेतो. साहित्याचा प्रसारणाशी ही लेखकाची प्रतिमा साहित्याच्या प्रसारणाशी फार जवळचं नातं सांगते असं म्हणता येणार नाही.

साहित्याचा स्वीकार आस्वाद आणि प्रसार हा टप्पा साहित्य सृजन आणि निर्मितीपेक्षाही महत्त्वाचा आणि अर्थपूर्ण होतो, भौतिकदृष्ट्याही अर्थपूर्ण ठरतो. तेव्हा साहित्यकलेला प्राप्त होणारे क्रयवस्तूवादी स्वरूप दुर्लक्षिता येणार नाही. लेखकाचे असतेपण ध्यानात घेताना लेखक/साहित्यिक म्हणून स्वत:चे करिअर घडविणे. मानसन्मान, पारितोषिक प्राप्ती, अभ्यासक्रमामध्ये निवड होणं विविध कमिट्यांवर वर्णी लावणे हे सारे साहित्याच्या अनुषंगाने येणारे भौतिक फायदे मिळविणे याचाही विचार झाला पाहिजे. भालचंद्र नेमाडे यांनी टीकास्वातंत्र्य या त्यांच्या ग्रंथामध्ये हल्ली लेखकाचा लेखकराव होतो तो का? या लेखामध्ये लेखकाच्या यशस्वीतेशी जोडलेल्या अर्थकारणाचा समाचार घेतला आहे. पण, लेखकाचा लेखकराव होणे तसेच लेखकही कळपातला व्यवहारवादी सांस्कृतिक एक होणं व्यवहारवादी सांस्कृतिक विश्वाचा एक अपरिहार्य भाग आहे. मानसन्मानाचे मृगजळ आणि व्यवहारवादाचे चकवे यांचे आव्हान सृजनमूल्यांशी एकरूप झालेल्या लेखकासमोर नेहमीच उभे राहिलेले दिसते. त्यांना बाजूला सारून साहित्यिकाने अस्सल, रसदार साहित्यनिर्मिती केलेली दिसते.

साहित्यसंमेलनासारख्या सांस्कृतिक उपक्रमात हजारो रसिक श्रोते त्यात हवशे-नवशे-गवसे सगळेच असतात. प्रादेशिकतेच्या अस्मिता ओलांडून एकत्र येतात. लेखक-वाचक खुलेपणाने भेटण्याची एकमेकांशी बोलण्याची, विचारांची देवाणघेवाण होण्याची खूप मोठी शक्यता अशा खुल्या संमेलनात निर्माण होते. परंतु, लेखक-वाचक आमने-सामने येऊन घडणाऱ्या खुल्या साहित्यसंमेलनामध्ये खुली चर्चा मात्र घडत नाही. संवादावाचून घडणारी, रसिक-श्रोत्यांना



कार्यक्रमस्थळी निष्क्रिय श्रोता बनवणारी संमेलने आज घडत आहेत. रसिक-श्रोत्यांच्या संवादामध्ये, साहित्य-साहित्यचर्चेमध्ये स्त्रीसाहित्याचा विचार अभावाने होतो. तो तसा का असावा! संवाद हरवत चाललेल्या समाजात संवाद साधण्याची संधी देणाऱ्या साहित्यसंमेलनासारख्या उपक्रमात स्त्रियांचा सहभाग तुरळक आहे. समाजाचा अर्धा हिस्सा असलेल्या स्त्री या एका प्रमुख समाज घटकाबद्दल इतकी अनास्था का असावी, हा प्रश्न मागे उरतो. दुराग्रह भडक विधाने निवास-भोजन, ग्रंथ विक्री, गर्दी या फूटपट्ट्यांनी साहित्यसंमेलनाचं यश मोजण्याच्या नादात संमेलनाच्या कार्यक्रमपत्रिकेत स्त्रीसाहित्य, स्त्रियांचा सहभाग अत्यंत मर्यादित सूत्रसंचालन - आभार क्वचित परिसंवादाचे अध्यक्ष अशा विशिष्ठ, मर्यादित भूमिकांपुरताच होतो. याबद्दल अधिक काय बोलावे! साहित्य संमेलन काय बहुतांश सांस्कृतिक उपक्रमांना विचारलेल्या करिअरिस्ट यशस्वीतेचा भौतिक सुखसोयींचा संदर्भ विसरून चालणार नाही. भौतिक फायदे आणि यशाशी जोडलेले सांस्कृतिक उपक्रम समाज निरोगी राखणार नाहीत तसेच समाजाची सांस्कृतिक भूकही भागविणार नाहीत.

स्त्री साहित्य त्यावरील चर्चा आणि एकूणच साहित्याची, सृजनाची, वाचन-चिकित्सेची खुली, निकोप चर्चा साहित्यसंमेलनासारख्या उपक्रमांमध्ये झाल्यास स्त्री साहित्याच्या मर्यादा आणि सामर्थ्य ठळकपणे समोर येतील. साहित्यनिर्मितीला नवी दिशा, चालना मिळेल. भारतीय स्त्री वादाच्या अनुषंगाने चर्चा घडेल. आजच्या स्त्रीला भेडसावणारे प्रश्न, भौतिक पातळीवरील जगण्याचा स्त्रीच्या जगण्यावर होणारा भला-बुरा परिणाम स्त्रीच्या सक्षमीकरणाबद्दल, स्त्रीच्या निर्णय स्वातंत्र्याबद्दल मुक्त स्त्री बद्दलचे स्त्रीने पादाक्रांत केलेली यशोशिखरे आणि स्त्रीच्या जगण्याला चिकटलेले कौटुंबिक संदर्भ तसेच स्त्रीचे सामाजिक भान, स्त्रीचे व्यक्तिकेंद्री जगणे याबद्दलचे बरेच समाजात असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होईल. असं होईल असा आशावाद यानिमित्ताने जागवू या!

**संपर्क : ९९२१०४७४६१**

## दुय्यम कला


लेखकाचं समाजाच्या जडणी-घडणीत काय स्थान आहे हे त्याच्या अस्मितेवर आणि त्याचं समाजमनाशी जे तादात्म्य घडतं, यावरच अवलंबून असतं. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी लेखक हा एक प्रकारे वैचारिक अधिष्ठाता समजला जात असे. नेत्याचं भाग्य त्याला लाभत असे. खांडेकर, फडके वगैरेंच्या सभांना राजकीय सभांसारखीच गर्दी व शान असे. पण, आता हे मानबिंदू ढळल्याचं दिसतं. लेखकाच्या पुस्तकापेक्षाही रेडिओ, टीव्ही व वर्तमानपत्रं यांतून होणारं त्याचं दर्शन अधिक महत्त्वाचं गणलं जाऊ लागलं आहेत. ही सार्वजनिक माध्यमं त्यांचं-त्यांचं तंत्र लेखकाला आत्मसात करायला लावीत आहे. तत्काळ धनप्राप्ती, प्रसिद्धी आणि प्रसार यांना लेखकही सहज वश होतो. आणि निखळ लेखनाचं जुनं तंत्र बाजूला ठेवून तो इतर प्रसंगीही या तंत्रांच्या चौकटीतच फार खोलवर न जाता, त्यांच्या विषयाच्या व आशयाच्या मर्यादा जणू त्याच दूरवर परिणाम करणाऱ्या आहेत असा समज करून घेऊन चुरचुरीत भाषा, थोडी करुणा, थोडा विनोद, माहितीचे अपुरे तुकडे वगैरेंचा एक रंगीन आकृतिबंध निर्माण करून लोकांचं रंजन करतो. त्याच्या आविष्काराचं सूत्रच बदलतं. त्याची भूमिका विचारवंतापेक्षा, कलावंतापेक्षा रंजकाची होऊन बसते. लोकही मग रंजनालाच प्राधान्य देतात. साहित्यिकाच्या ज्या सभांना गर्दी होते, ती त्याच्या गमतीच्या मालमसाल्यासाठी होते. कथाकथनाच्या गर्दीवरूनही साहित्याचे निकष कळावेत. यावरून मी कथेला तुच्छ मानते असं कुणी समजू नये. कथाकथनात रंजक, ठरीव कथांनाच अग्रक्रम मिळतो म्हणून गर्दी होते.

अशा परिस्थितीत साहित्य ही श्रेष्ठ कला राहात नाही. ती दुय्यम दर्जाची कला होते, नव्हे झालीच आहे असं पॉल गुडमन म्हणतात ते काही खोटं नाही.

**- दुर्गा भागवत**

**(कराड - १९७५, अध्यक्षीय भाषणातून)**





# चौकटीत अडकलेले संमेलन

रमेश इंगळे-उत्रादकर

अखिल भारतीय साहित्य संमेलन हा एक भाषिक उत्सव आहे. उत्सव ही साजरा करण्याची गोष्ट असते. त्या न्यायाने हा उत्सवही दरवर्षी एखाद्या शहरात तीन दिवस मांडव घालून साजरा केला जातो. उत्सवाचा हेतू मौज करणे, करमणूक करून घेत आनंद घेणे, मौज करत आनंद घेत परंपरा जपणे हा असतो. उत्सवाकडून नावीन्याचा हव्यास बाळगणे गैरलागू ठरते. अलीकडच्या काळात संमेलनाच्या खर्चाचा आकडा लाखातून कोटीच्या घरात गेला आहे. भव्य-दिव्यतेची चढाओढ लागल्यासारखे संमेलनाचे आयोजन होते आहे. बाह्यांग बदलते आहे पण अंतरंगात मात्र नवे काही होताना, घडताना दिसत नाही. वर्षानुवर्षांपासून संमेलनाचे स्वरूप ठरून गेले आहे. ग्रंथदिंडी, साचेबद्ध पद्धतीने होणारा उद्‌घाटन समारंभ, सहा-सात परिसंवाद, दोन-तीन कविसंमेलने, मुलाखती, कथाकथन, बालमेळावा वगैरे आणि शेवटी समारोप. हे सर्व इतक्या यांत्रिक पद्धतीने होते की त्यात जीवंतपणा नावालाही नसतो. भाषण आणि श्रवण या दोनच क्रिया सुरू असतात. बोलणाऱ्याचा वकूब असो नसो तो बोलत राहतो आणि श्रोते नाइलाजाने ऐकत राहतात. कवी-लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यापलीकडे संमेलन काही करत नाही. ज्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते त्यांची पात्रताही बऱ्याचदा संशयास्पदच असते. अखिल भारतीय म्हणवल्या जाणाऱ्या व्यासपीठावर अगदी सामान्य दर्जाची आणि सामान्य उंचीची माणसे कवी-लेखक म्हणून मिरवत असतात. ऐकणे एवढाच हेतू असेल तर साहित्य निर्मिती ही साधना मानून अखंड साहित्य सेवा करीत असलेल्या कवी-लेखकांना सन्मानाने आमंत्रित करून त्यांच्या निर्मितीचा आस्वाद घ्यावा, त्यांची साहित्यदृष्टी, जीवनदृष्टी समजून घ्यावी. त्यायोगे आपल्या साहित्य व जीवन विषयक जाणिका समृद्ध, प्रगल्भ करून घ्याव्यात असेही कुणाला वाटत नाही. अशी थोर माणसे स्वत:हून संमेलनाकडे फिरकण्याइतकी स्वस्त नसतात. त्यांना आपल्या कर्तृत्वाची कल्पना असते आणि त्याविषयी रास्त अभिमानही असतो. परंतु, त्यांच्या अभिमानाला त्यांची आत्मकेंद्रीतता ठरवून त्यांना टाळत राहणे व दुय्यम तिय्यम प्रतीची सामान्य वकुबाची अभ्यास-व्यासंग-साधना या अंगाने कुठलाही अधिकार नसलेली मंडळी बोलावून संमेलनाचा उत्सव दरवर्षी साजरा केला जातो. हे स्वरूप बदलविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होताना दिसत नाही. सारे मागील पानावरून पुढे सुरू असेच सुरू आहे. या पठडीला, चाकोरीला धक्का लावण्याचे जे अपवादात्मक प्रयत्न चुकून होतात ते तात्कालीकच असतात. त्यामुळे उत्सवाची मूळ संरचना कायम-स्थिर राहते. तिला मुळातूनच मोडीत काढून त्या जागी नवे काही रचणे, उभारणे सद्य:स्थितीत जरी कठीण दिसत असले तरी ते अशक्यप्राय वगैरे नाही; परंतु, त्या दिशेने प्रयत्न करणे, होणे गरजेचे आहे.

उत्सव म्हटला की गांभीर्याची अपेक्षा करता येत नाही. सवंगता आणि उथळता या तर उत्सवाच्या हातात हात घालून येणाऱ्या गोष्टी आहेत. भाषिक प्रश्नांकडे आणि साहित्य व्यवहाराकडे आपण गंभीरपणे पाहणार आहोत का, हा मुळात प्रश्न आहे. असे वृत्तीगांभीर्य आपल्या विचाराचाच भाग नसेल तर ते आचारात तरी कोठून येणार? जे लोक पुरेशा वृत्तीगांभीर्याने भाषेचा, साहित्याचा विचार करतात ते कायमच वेगवेगळ्या शब्दांत संमेलनाची संभावना करीत असतात. भाषा-साहित्य आणि संस्कृतीच्या विकास-वाढीसाठी तर दूरच पण रक्षणासाठी सुद्धा अशा स्वरूपाच्या संमेलनातून काहीच हाती लागत नाही असा त्यांचा सूर असतो. काही ठोस आणि मूलभूत, मूर्त स्वरूपाचे कार्य करण्याच्या मानसिकतेच्या आणि आंतरिक इच्छेच्या अभावामुळे हे संमेलन दरवर्षी भरणाऱ्या जत्रेसारखे भरते आणि हवसे-गवसे-नवसे जमवून होते तशी गर्दी याही जत्रेत बघायला मिळते अशी टीका या संमेलनावर नेहमीच केली जाते. संमेलनावर होणारी अशी टीका अनाठायी आहे का, याही प्रश्नाच्या खोलात शिरले पाहिजे. तसे पाहता अशा प्रकारच्या टीकेत नक्कीच तथ्य आहे. कोट्यवधी रुपये खर्च होणाऱ्या संमेलनातून हाती काहीच लागत नसेल, तीन दिवसांच्या कार्यक्रमांमधले सूर हवेत तिथल्या तिथेच विरून जात असतील, भाषेसाठी, साहित्यासाठी काही व्यापक स्वरूपाची, दूरदृष्टी ठेवून आखलेल्या कार्यक्रमांची, प्रकल्पांची आखणी होत नसेल तर संमेलनाचे प्रयोजन तकलादू गोष्टींवरच अधिष्ठित आहे असेच म्हणावे लागेल आणि त्याविषयी काहीएक गंभीर विचार न करता ते तसेच चालू ठेवणे त्यात कोणत्याही स्वरूपाचा बदल घडवून न आणणे म्हणजे पठडी, चाकोरी प्राणपणाने जपत परंपराशरण होऊन डोळ्यांवर कातडे ओढून घेतल्यासारखे होईल.

चौकट ही दिसायला सुंदर असते. ती तोरणे लावून सजवताही येते; पण, ती आपल्या अस्तित्वाला बंदिस्त करीत असते. परिवर्तनाची आस बाळगणाऱ्यांना आधी चौकट मोडण्याचे धैर्य अंगी एकवटावे लागते. विचारांचा - आचारांचा प्रवाह वाहता होण्यासाठी ती मोडली जाणे हीच अटळ वस्तुस्थिती बनते. आपली भाषा, आपले साहित्य आणि संस्कृती आज ज्या वळणावर येऊन ठेपली आहे, जागतिकीकरणाच्या बदलत्या वास्तवात त्यांच्या अस्तित्वावरच उठणारे जे प्रश्न निर्माण झाले आहेत, होताहेत त्या प्रश्नांकडे वेळीच सजग होऊन गांभीर्याने बघण्याची वेळ आली आहे. अशावेळी साहित्य संमेलनासारख्या व्यासपीठावरून केवळ उत्सवाची अपेक्षा करता येणार नाही. संमेलनाची चौकट मोडण्याची गरज निर्माण झाली आहे.

भाषेच्या निकोप विकास व संवर्धनासाठी, साहित्याच्या सकस निर्मिती व आस्वादासाठी खूप काही करता येण्यासारखे आहे. फक्त ते विचार आणि कृतीची जोड देऊन गंभीरपणे व्हायला हवे. त्यासाठी आपली प्रचलित संमेलनाची चौकट पहिल्यांदा मोडायला हवी. तरच काहीतरी भरीव करता येईल. भाषेचा साहित्याचा जागर वाडी-वस्त्यातल्या, खेड्यापाड्यातल्या मराठी भाषकांपर्यंत नेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करावा लागेल. संमेलन हे केवळ कवी-लेखक आणि केवळ वक्ते-श्रोते यांच्यापुरतेच सीमीत झाले आहे.

त्यात विचार-कल्पनांच्या आदानप्रदानाला स्थान नाही. साहित्य व्यवहारातल्या वाचक-प्रकाशक-ग्रंथविक्रेते, ग्रंथपाल, संपादक, संशोधक इ. घटकांचा सहभाग नाही. भाषेचे शिक्षक-विद्यार्थी, भाषेची-साहित्याची पाठ्यपुस्तके निर्माण करणारे घटक, भाषा आणि साहित्य चळवळीतले कार्यकर्ते हे संमेलनापासून दूर आहेत. या सर्व घटकांना सोबत घेतल्याशिवाय भाषेच्या, साहित्याच्या विकासाचा, संस्कृतीच्या संवर्धनाचा विचार परिपूर्ण होणार नाही.

साहित्यक्षेत्रात गेली काही वर्षे कवी-लेखक-संपादक म्हणून वावरताना, बऱ्याच संमेलनांना प्रत्यक्ष हजेरी लावून, काही संमेलनात प्रत्यक्ष सहभागी होऊन जे जाणवलं ते स्पष्टपणे मांडलं आहे. संमेलनाच्या स्वरूपाविषयी एवढी मांडामांड केलीच आहे तर परिवर्तनाच्या दिशेने जाणारा आणखी एक विचार मांडतो. मला वाटते- वर्षातून एकदा एखाद्या मोठ्या शहरात तीन दिवसांचे संमेलन भरवण्याऐवजी आपल्या प्रत्येक जिल्हा व तालुक्यांच्या ठिकाणी वर्षभर विविध वाङ्मयीन उपक्रमांचे, कार्यक्रमांचे आयोजन केले जावे. उपक्रमांचे, कार्यक्रमांचे स्वरूपही वेगवेगळ्या पद्धतीचे असावे. परिसंवाद, काव्यवाचन, व्याख्याने, चर्चासत्रे, मुलाखती असे नेहमीचे कार्यक्रम त्यात असतीलच; पण, त्यांची पुरेशा गांभीर्याने आखणी करावी लागेल. याशिवाय नवोदित कवी-लेखकांसाठी लेखन समृद्धी तर वाचकांसाठी वाचन समृद्धी शिबिरे भरविणे, लेखक-वाचक, लेखक-प्रकाशक, प्रकाशक-वाचक, संपादक-लेखक, संपादक-वाचक, ग्रंथपाल-प्रकाशक, लेखक-समीक्षक अशा वाङ्मयीन व्यवहारातील सर्व घटकांचा परस्पर संवाद घडवून आणण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे, वाचकांचा लेखकांसमवेत अनौपचारिक मुक्त संवाद, लेखकांचा शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद, पुस्तक प्रकाशने व ग्रंथ-प्रदर्शनांचा वेगळ्या पद्धतीने विचार करणे, ग्रंथभिशी-ग्रंथवर्तुळे चालविणे, दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिके सुरू करणे किंवा जी प्रकाशित होताहेत त्यांचे स्थैर्य आणि वाचकसंख्या वाढविणे असे कितीतरी उपक्रम सुचविता येतील. त्यांची संख्या वाढवून, स्वरूप ठरवून त्या संदर्भात विचारपूर्वक निश्चित असा आराखडा तयार करता येईल. (अलीकडेच शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी केल्या गेलेल्या ग्रंथोत्सवाचे आयोजन हा स्तुत्य उपक्रम होता.)

अशा कार्यक्रमांच्या आयोजनासाठी त्या त्या ठिकाणच्या विधायक कार्य करणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन होतकरू संस्थांची मदत घेता येईल. आर्थिक निधी आणि सहभागी कवी-लेखक, विचारवंत-कलावंत यांची रसद पुरविल्यास या संस्था सहज उपक्रम राबवू शकतील, कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करू शकतील. फक्त त्यांना विश्वासात घेणे, या कार्यातली त्यांच्या सहभागाची आवश्यकता पटवून देणे, सतरंज्या उचलणे व खुर्च्या टाकणे यासाठीच केवळ त्यांचा वापर होणार नाही याची काळजी घेऊन सन्मानाने त्यांना या अभिसरणात सहभागी करून घेणे सहज शक्य आहे.

अशा उत्सवी नसलेल्या गंभीर स्वरूपाच्या छोट्या छोट्या कार्यक्रमातून, उपक्रमातून विद्यार्थी, नवोदित लेखक, वाचक यांच्यावर होणारे संस्कार अमीर स्वरूपाचे असतात. त्यातून भाषा आणि साहित्याच्या पोषणासाठीची सकस भूमी तयार होत असते. अशा छोट्या छोट्या गटांत, तुकड्या-तुकड्यांनी वाङ्मयीन संस्कार पाझरत, झिरपत गेले की कालांतराने आपसुकच सगळे अंत:प्रवाह एकमेकांना मिळून ते निर्मल झऱ्यात रूपांतरीत झाल्याशिवाय राहणार नाहीत आणि खेड्यांपासून महानगरांपर्यंत भाषेचा, साहित्याचा निखळ, अनाहत नाद ऐकू येईल. हे सांगणे व कल्पनाही रोमँटिक वाटावी अशीच आहे पण किंचित अंतर्मुख होऊन विचार केला तर हे सर्व काही अशक्य मुळीच नाही, फक्त त्यासाठी तळमळीसोबत प्रबळ इच्छाशक्तीची आणि व्यापक स्वरूपाच्या यंत्रणेची गरज तेवढी आहे.

आता हे सर्व कुणी करावे, हा प्रश्न आहेच. या कार्याचे स्वरूप सांघिक आहे. वैयक्तिक इच्छा आणि तळमळ इथे फारशी उपयोगाची नाही. सत्ता आणि व्यापक यंत्रणा ज्यांच्याकडे आहे त्यांच्याकडूनच हे सर्व घडावे अशी अपेक्षा करता येईल. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ किंवा अखिल भारतीय साहित्य महामंडळ हे कार्य हाती घेऊ शकते. हा या मंडळांच्याच उद्दिष्टाचांच भाग आहे. त्यांनी गावोगावची साहित्यिक व्यासपीठे, वाङ्मयीन चळवळी, पुरोगामी संघटना, नाट्यसंस्था, ग्रंथालय चळवळी, वाचनालये, शाळा-महाविद्यालये, विद्यापीठे, मराठी विषयाचे प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, भाषा-साहित्य याविषयी आस्था बाळगणारे मराठी भाषीक, साहित्याचे वाचक अशा सर्व घटकांना विश्वासात घेऊन या अभिसरणातला आपला वाटा उचलण्यासाठी प्रवृत्त करावे. हेतू व वर्तनात पारदर्शकता असली तर मदतीसाठी शेकडो हात पुढे येतात. हा तर आपल्या भाषेचा, भाषिक अस्मितेचा प्रश्न आहे. त्यासाठी लोक निश्चितच पुढाकार घेतील. कोट्यवधी रुपये तीन दिवसांच्या उत्सवात उधळण्यापेक्षा अशा उपक्रमात सत्कारणी लावले तर त्यातून भाषेसाठी, साहित्यासाठी काहीतरी भरीव स्वरूपाचे काम होऊ शकेल. निदान या दिशेने प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे?

**संपर्क : ९८६०५५८३३१**

**चौफेर आणि सखोल**

'चित्र शिल्प' विशेष मिळाला. दोन दिवस लक्षपूर्वक वाचला आणि खूप काही मिळाल्याचा आनंद झाला. तुलनेने थोड्या जागेत आपण खूप मोठा ज्ञान आणि मनोरंजनाचा खजिनाच या अंकाच्या रूपाने उपलब्ध करून दिलेला आहे. दृश्यकलांविषयी इतकी मुळापासून आणि चौफेर जाणीव आपल्याकडे फार क्वचित दिली जाते. बोधचिन्हं, बॅनर्स-होर्डिंग्ज् ही दृश्यकलेची उपयोजित रूपंही आपण आवर्जून विचारात घेतलीत ही बाब निसंशय कौतुकास्पद आहे. आपले मन:पूर्वक अभिनंदन!

आपला जून-जुलैचा वाचन विशेषांकही मी विकत घेऊन वाचला होता. त्याचेही स्वरूप आणि मांडणी लक्षणीय होती. असे सखोल, चौफेर अंक आपण काढताहात ह्याची नोंद घ्यायलाच हवी.

– **मंगला गोडबोले,** पुणे



# साठोत्तरी ग्रामीण कादंबरी

**डॉ. वासुदेव मुलाटे**

एकोणिसाव्या शतकामध्ये शेतकरी आणि एकूण ग्रामीण कष्टकरी समाजाच्या शोषणविरूद्ध कार्य करणारे जे थोडेच समाजसुधारक व विचारवंत होऊन गेले त्यापैकी कै. कृष्णराव भालेकर हे होत. लोक अज्ञानामुळे दिशाहीन झाले आहेत. व त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन भट-ब्राह्मणांच्या निर्वाहाचे तारू चालले आहे अशी त्यांची खात्री झाली. समाजातील अज्ञानी लोकांचे, शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करणे दारिद्र्य नष्ट करणे यासाठी दीनबंधु सार्जनिक सभेच्या माध्यमातून त्यांनी जे कार्य केले त्याचा एक भाग 'दीनमित्र' हे नियतकालिक होते. या दीनमित्रमधून एप्रिल ते जुलै १८८८ या काळात बळीबा पाटील आणि १८५७ चा दुष्काळ या नावाचह कादंबरी क्रमशः प्रसिद्ध केली. तेव्हापासून ते १९६० पर्यंत काही ग्रामीण कादंबऱ्यांचा नामनिर्देश करता येईल. उदा. १९०३ साली प्रसिद्ध झालेली रा.वि.टिकेकर किंवा धुनर्धारी यांची पिराजी पाटील ही कादंबरी या दोन्हीही कादंबऱ्यांमधून दुष्काळासारखे नैसर्गिक संकट आणि पाटील-कुलकर्णी इ. शासकीय वतनदार आणि कर्मचारी यांच्यामुळे कृषिवलांची होणारी वाताहत चित्रित झाली आहे.

१९२० नंतरच्या काळात म. गांधींसारखा नेत्यांच्या नेतृत्वाचा उदया झाला त्यातून राजकीय आणि सामाजिक नेते - कार्यकर्ते यांचे लक्ष खेड्यांकडे वळले. प्र.ह.खाडीलकर यांची 'स्वाधीन संसार' (१९२७) भा.वि. वरेरकरांची 'सात लाखातील एक' (१९३०) रा.शा. पाटील यांची सीता (१९३१) ग.रा. वाळींबे किंवा रामतनय यांची मोहित्यांची मंजुळा (१९३१) खरा उद्धार (१९३६) वि.वा. हडप यांची अन्नदाता उपाशी (१९३७) गोदाराणी, वि.ल. बर्वे यांची मुचकुंददरी इ. १९२० ते १९४० च्या कालखंडातील कादंबऱ्यांचा विचार केला तर खेड्याच्या उद्धारातच एकूण देशाचा उद्धार आहे या जाणिवेतून त्यांचे लेखन झालेले दिसते.

या नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्यामध्ये द.वा.दिघे यांच्या पाणकळा (१९३९) सराई (१९४३) म.भा.भोसले यांची समरांगण (१९४१) द.र.कवठेकर यांची रेशमाच्या गाठी (१९४२) सावलीच्या उन्हात (१९४०) ही श्रीराम अत्तरहे यांची कादंबरी, शं.रा.भिसे यांची जंगलातील छाया, विठ्ठल दत्तात्रय चिदंरकर यांची महापूर (१९४३) इ. कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवनाचे फारच त्रोटक आणि धुसर असे चित्रण आले आहे. योगायोग अदभूत रम्यता, रंजकता यामुळे खेड्यातील भयाण वास्तवाकडे दुर्लक्षच झाले.

१९४५ च्या आसपासचा विशेषत: नंतरचा काळ हा एकूण वाङ्मयातील परिवर्तनाचा काळ आहे. बा.सी.मर्ढेकर हे याकाळातील महत्त्वाचे नाव त्यांच्या तांबडीमाती (१९४३) पाणी (१९४८) या कादंबऱ्यांमधून आधुनिकीकरणाने उद्ध्वस्त होणाऱ्या ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडते. परंतु दुर्दैवाने यादृष्टीने या दोन्ही कादंबऱ्यांची फारशी दखल मराठी सारस्वतांनी घेतली नाही.

१९४५ नंतर मराठी कादंबरीने समाजनिष्ठ व जीवनवादी दृष्टीकोणातून परंतु कलात्मकतेचे भान ठेवून ग्रामीण जीवनातील विविध व्यथा, वेदना आणि समस्या मुखर केल्या यात विभावरी शिरूरकर यांची बळी (१९५०) मधू मंगेश कर्णिक यांची वाडगी, बा.भ.बोरकरांची भावीण (१९५०) पेंडसे यांच्या एलगार (१९४९) हद्दपार (१९५०) गारंबीचा बापू (१९५२) हत्या (१९५७) कलंदर (१९५९) गो.नि.दांडेकर यांचा गिलू (१९५३) पडघवली (१९५५) पवनाकांठचा धोंडी (१९५६) माचीवरलाबुधा (१९५८) व्यंकटेश माडगूळकर यांची बनगरवाडी (१९५५) अण्णाभाऊ साठे यांची फकीरा (१९५९) इ. कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. खेड्यातील लोकजीवनात रूढ असणारे धार्मिक विधी समजुती लोकाचार रीतीरिवाज यांचेही दर्शन घडते. उद्धव शेळके यांची धग (१९६०) आणि मनोहर ललहारांची माणूस या दोन कादंबऱ्यांचा वेगळा उल्लेख करावा लागेल. कारण मराठी ग्रामीण कादंबरीच्या पुढच्या अभिनव प्रवासाची नांदी वाटावी अशा त्या कादंबऱ्या आहेत.

१९६० पर्यंतचे ग्रामीण कादंबरीकार हे प्रामुख्याने शहरातून खेड्यात आलेले किंवा वळलेले होते. तसेच समाजातील मध्यमवर्गीय, पांढरापेशी वर्गातील खेड्यातून शहरात नोकरीव्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झालेले होते. १९६० नंतर हळू-हळू ही परिस्थिती बदलत गेलेली दिसते. मध्यमवर्गीय समाजातील लेखकांबरोबरच प्रत्यक्ष कष्टकरी ग्रामीण समाजातून आलेले संवेदनशील लेखक मोठ्या प्रमाणात लिहू लागलेले दिसतात. त्यांच्या कादंबऱ्यातून व्यक्त होणाऱ्या जाणिवा या ग्रामीण माणसाच्या मूलभूत जाणिवा वाटतात. १९६० पर्यंतच्या एकूण ग्रामीण कादंबऱ्यांचा आढावा घेतला तर त्यांच्या निर्मितीचे प्रमाणही १९६० नंतरच्या निर्मितीच्या तुलनेत खूप कमी असे होते. म्हणजे १९६० नंतर निर्मितीचे प्रमाण तर वाढलेच पण त्याचे स्वरूपही लक्षणीय असे बदलत गेलेले दिसते. विविध विषयांचे आणि जीवनांगांचे वास्तवाभिमुख दर्शन घडविण्याच्या अट्टहासातून हे लेखन होत असलेले दिसते.

अण्णाभाऊ साठे यांच्या माकडीचा माळ (१९६३) आवडी (१९६३) वैर (१९६४) रानगंगा (१९६५) पाझर (१९६५) मास्तर (१९६६) वारणेचा वाघ (१९६५) इ. कादंबऱ्यामधून सांकेतिकता आणि रंजकता जाणवत असली तरी वारणेच्या खोऱ्यातील हे लेखन बरेचसे घटनाप्रधान आहे. १९६४ साली शंकर पाटलांची टारफूला ही कादंबरी आली. गाव आणि गावाच्या सत्तेसाठी चालणारा संघर्ष हाच या कादंबरीत केंद्रस्थानी आहे. सरंजामी परंपरा आणि आधुनिक जाणिव यांचा हा संघर्ष आहे. हे लक्षात घेतले तर १९६० च्या समाजपरिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर याचे महत्त्व विशेषत्वाने जाणवते. पारंपरिक सत्तेविरुद्धचा उद्रेक आणि जाती जातीमधील तणाव, हिंदू मुस्लीम संघर्ष ही स्वातंत्र्योत्तर काळातील वास्तव नजरेआड करता येत नाही. यादृष्टीनेच हमीद दलवाई यांच्या इंधन (१९६५) कादंबरीची दखल घ्यावी लागते. भविष्यात पुरोगामी शक्तींच्या रेटयातून पुरोहितशाहीचा पराभव घडेल हा हमीद दलवाईंचा आशावाद विशेष उल्लेखनीय आहे. देवकी (१९६३) ही मधु मंगेश कर्णिक यांची कादंबरीही थोड्याबहुत फरकाने याचा परंपरेतली आहे.

१९७१ साली दोन महत्त्वाच्या ग्रामीण कादंबऱ्या आल्या. यातील पहिली कादंबरी आहे. रा.रं.बोराडे यांची पाचोळा आणि दुसरी कादंबरी म्हणजे आनंद यादवांची गोतावळा. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात आणि जीवनात जी परिवर्तने येऊ लागली त्याचे पडसाद कशा प्रकारे उमट लागले याचे प्रतिकात्मक दर्शन घडविणाऱ्या या कादंबऱ्या आहेत. १९७३ साली प्रसिद्ध झालेला ना.धों. महानोरांच्या गांधारी या कादंबरीतून हैदराबाद संस्थानातील रझाकारी चळवळ आणि तिची खेड्यापाड्यांमधून असणारी दहशत चित्रित झाली आहे. भाकरी आणि फल (१९७२) मधु मंगेश कर्णिकांची कादंबरी म्हणजे कोकणातील एका महार कुटुंबाच्या तीन पिढ्यांची कहाणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील विचारांचा प्रभाव आणि परिवर्तनासाठीचा दलितांचा संघर्ष या कादंबरीत आहे.

१९८० ते १९९० च्या दशकात ग्रामीण साहित्यांची चळवळ जोमात होती. या चळवळीने अनेक नव्या लेखकांना लिहिते केले. त्याच बरोबर, जुने लेखकही नव्याउर्मिने लिहू लागले. 'गणगोत' (१९८५) या गणेश आवटे यांच्या छोटेखानी कांदबरीत एका विवाहीत ग्रामीण तरुणीची माहेराकडून होणारी उपेक्षा, सासरी हुंड्यासाठी व मानपानासाठी होणारा छळ, नवऱ्याकडून होणारी अकारण व अक्षम अवहेलना व मातृत्वाची उत्कट आस यातून होणारी गुदमर यांचे प्रभावी दर्शन घडते. ग्रामीण बोलीतील निवेदन आणि लयकारी प्रतिमांचा वापर लक्षणीय आहे. 'हाल्या हाल्या दूध दे' (१९८५) ही बाबाराव मुसळे यांची कादंबरी कर्जाच्या पाशात गुंतत गेलेल्या शेतकऱ्याची ससेहोलपट प्रकट करते. रवींद्र शोभणे यांच्या कोंडीमध्ये सरंजामी अवशेष असणारे जमीनदार आणि लोकशाहीत निर्माण झालेले नवे नेतेही सामान्य शेतकऱ्यांकडे कसे तुच्छतेने पहातात हे मांडले आहे. तर ग्रामीण भागातील जनतेला आकर्षण असणाऱ्या तमाशातील कलावंतांना कोणत्या दिव्यातून जावे लागते. हे उद्धव शेळके यांच्या डाळिंबाचे दाणे, आणि नटरंग या कादंबऱ्यातून प्रकट झाले आहे. ग्रामीण समाजकारण आणि राजकारण कसे विघातक वळणाकडे झुकले आहे हे, नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'उलटचालिला प्रवाह' किंवा मध्यरात्र (१९८५) आणि 'गांधारीचे डोळे' या कांदबऱ्यातून अत्यंत प्रत्ययवादी पद्धतीने मांडले आहे.

मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' ही कांदबरी आदिवासींमधील माणसांच्या माणूसपणाची बदलणाऱ्या सामाजिक संघर्षाचा शोध घेते. 'मेड इन इंडिया' (१९८७) ही पुरुषोत्तम बोरकरांची कांदबरी तिचा उपहास गर्भ भाषेसह विकृत होत चाललेल्या ग्रामीण मानसिकतेवर लक्ष वेधते. मोहन पाटील यांच्या 'लिगाडा', 'खांदेपालट','साखरपिदा', बस्तान, या कादंबऱ्या, असं जगणं लोकाचं ही शेषराव मोहिते यांची कांदबरी आनंद यादवांच्या 'झोंबी' (१९८७), 'नांगरणी'(१९९०) या आत्मचरित्रात्मक कांदबऱ्या, रंगनाथ पठारे, यांची हारण (१९९०) रामचंद्र पठारे यांची 'पायर' (१९८९) याही या काळातील लक्षणीय ग्रामीण कांदबऱ्या होत. सहकारातील प्रदुषणावर प्रहार करणारी विषवृक्षाच्या मुळ्या (१९८९) या वासुदेव मुलाटे यांच्या कांदबरीचा आणि रा.रं.बोराडे यांच्या 'सावट' (१९८७), 'आमदार सौभाग्यवती' (१९८९), चारापाणी (१९८९) या कादंबऱ्याही संघर्षाला सिद्ध होणाऱ्या ग्रामीण माणसाचे दर्शन घडवितात.

१९९१ ते २००० या कालखंडात विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' (१९९१), रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट'(१९९४) सरदार जाधव यांची 'कोयता' (१९९४), बाबुराव मुसाळे यांच्या 'पदवाटा', 'पाटीलकी', 'वादळ' या कादंबऱ्या आणि 'तहान' (१९९८), ही सदानंद देशमुखांची कादंबरी विकृत ग्रामीण राजकारण, भ्रष्ट नोकरशाही, ग्रामीणांच्या मूल्यभूत प्रश्नांकडे डोळेझाक करणाऱ्या नेत्यांच्या वृत्तीकडे लक्ष वेधतात. 'राहुकेतू' (१९९९),'जितगाणी', या मथू सावंतांच्या कांदबऱ्या स्त्री प्रश्नांचा शोध घेतात. रमेश अंधारे यांची 'पागोटा' (१९९९), रा.रं.बोराडे यांची 'इथ एक गाव होत '(२०००) याही लक्षणीय कादंबऱ्या होत. राजकारण , समाजकारण, धर्मांधता, नैसार्गिक आपत्ती इ.च्या माध्यमातून ग्रामीण माणसाच्या होणाऱ्या हाल अपेष्टा मागील कारणांचा शोध या सर्व कादंबंऱ्याच्या निर्मितीच्या मुळाशी असलेले प्रमुख कारण दिसते.

इ.स. २००० ते २०१० या दहा वर्षाच्या कालखंडात ग्रामीण वास्तव आणि या वास्तवातून उजागर झालेल्या प्रश्नांचा शोध घेणाऱ्या, ग्रामीण बदलत्या समाजमनाचा शोध घेणाऱ्या ज्या लक्षणीय कादंबऱ्या मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाला. त्यात 'बारोमास' या सदानंद देशमुखांच्या कादंबरीचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. शेतकरी जीवनाला बारा महिने वेढून बसलेल्या जन्माजात वेदनेतून आणि ओल्या सुक्या ग्रामीण परिसरातून प्रेरणा घेऊन या कादंबरीचा जन्म झाला आहे. शेतीचं चुकणारं गणित आणि शेतकऱ्याच्या नव्या लुटमारीचं चित्रही यांत उमटल आहे. 'धूळपेरणी' (२००१) ही शेषराव मोहिते यांची कादंबरी भारत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ (२००१)' भीमराव वाघचौरे यांची गराडा (२००२) या कांदबऱ्यामधूनही कृषिवलंच्या हालअपेष्टा आणि त्यांच्या जीवनातील भयावह प्रश्न चिंतनाचे विषय झालेले आहेत. 'बारदाना' (२००४) ही प्रकाश देशपांडे केजकर यांची कादंबरी एका नव्या समाजवास्तवाचे भान देते. तशीच शेवटी ग्रामीण माणसाची मूळं अंतिमत: शेतीशीच जोडलेली आहेत हे सांगते. रा.रं. बोराडे यांची 'मरणदारी'(२००५), डॉ. भाऊसाहेब कणसे यांची 'बेवड' (२००६) या कांदबऱ्याही याला अपवाद नाहीत. अशोक कुलकर्णी यांची चेअरमन (२००६) सहकार क्षेत्रातील राजकारण, तर भालचंद्र देशपांडे यांच्या आणि धरणीकंप होत राहिला (२००५), व 'अंधार' इथला सपंत नाही' या कादंबऱ्यातून माणसांवर कोसळलेल्या नैसर्गिक आपत्तीतही कसा अपहार आणि राजकारण केले जाते. यावर प्रकाश टाकतात. कैलास दौड यांची 'कापूस काळ' (२००९) ही कांदबरीही शेतकऱ्याच्या फसणाऱ्या अंदाजाचे दाहक चित्र उभे करते. 'भाऊबंद' (२००६) आणि चारखणी (२००९ या विजय जावळे यांच्या कादंबऱ्यातून विभाजनवादी वृत्तीतून निर्माण होणाऱ्या सामाजिक संघर्षावर प्रकाश टाकला आहे. कृष्णात खोत यांच्या 'गावठाण', आणि बालाजी मदन इंगळे यांच्या 'झिम पोरी झिम' (२००९) मधून बदलत्या ग्रामीण वास्तववादी स्त्रियांचा छळवाद कसा संपलेला नाही हे व्यक्त करतात.

या सर्व कांदबऱ्यांमध्धून विशेषत: नव्याने लिहिते झालेल्या लेखनांनी आणि बोराड्यांसारखा जुन्या लेखकाने ही त्यांना जाणवणारे ग्रामीणांचे आस्था विषय प्रामाणिकपणे मांडले आहेत. आज एकूणच ग्रामीण कादंबरी अनुभवांचे नवे नवे प्रदेश शोधून त्याचे अर्थ लावू पहात आहे हे अधिक महत्त्वाचे आहे.

**संपर्क : ९८२२६३४४३४**



# विश्व मराठी साहित्य संमेलन

**कौतिकराव ठाले-पाटील**

अमेरिकेत पहिले विश्व मराठी साहित्य संमेलन होण्यापूर्वी या संदर्भात वेगळ्या स्वरूपात काही उल्लेख, काही अपेक्षा, काही प्रयत्न झालेले आढळून येतात. त्यात विश्व मराठी साहित्य संमेलन ही संकल्पना नसली तरी परदेशात मराठी साहित्य संमेलन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त झालेली आहे. प्रा. श्री. म. माटे हे १९५० च्या सुमारास पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष असताना त्यांनी मराठी वाङ्मयाचा दहा खंडात्मक इतिहास लिहिण्याचा संकल्प सोडला होता आणि धडाक्याने काम सुरू केले होते. माट्यांच्या कामाचा धडाका पाहून साहित्य परिषदेतील इतर दिग्गज अस्वस्थ झाले होते. माट्यांचा हा संकल्प पुरा झाला तर त्याचे श्रेयही माट्यांनाच मिळणार होते. म्हणून या दिग्गजांनी माट्यांना अडवून नामोहरम करण्यासाठी एका बैठकीत माट्यांवर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. त्या प्रश्नांमध्ये नकारात्मक स्वरूपात विचारलेला एक प्रश्न परदेशात संमेलन घेण्यासंबंधीही होता. दशखंडीय इतिहासाच्या धडाकेबाज कामाकडे निर्देश करीत, 'अशा रीतीने उद्या तुम्ही मराठी साहित्य संमेलन परदेशातही घ्याल' असा प्रश्न खोडसाळपणे विचारला होता. प्रा. माटे मनमानी करतात, कोणाचे ऐकत नाहीत असा त्या प्रश्नाचा रोख होता. पण, माट्यांनी प्रश्न येताच न डगमगता ताडकन उत्तर दिले होते, 'अर्थातच. बोलावणे आले तर जरूर घेईन.' बोलावणे म्हणजे आजच्या भाषेत निमंत्रण. त्यावर प्रश्नकर्त्याने छद्मीपणाने विचारले होते, पण जाणार कसे? ''समुद्रात शिडे उभी करून.'' असे उत्तर माट्यांनी त्या वेळी दिले होते. बोलावणे आले तर जाऊ आणि संमेलन घेऊ हा परदेशात मराठी साहित्य संमेलन घेण्यासंबंधीचा पहिला उद्गार होता. त्यावेळी आजचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, 'मराठी साहित्य संमेलन' या नावाने पुण्याची महाराष्ट्र साहित्य परिषद घेत असे. साहित्य महामंडळाचा तोपर्यंत जन्मही झाला नव्हता. तो पुढे १९६१ साली झाला व १९६५ साली हे संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून साहित्य महामंडळाकडे आले आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन म्हणून भरविले जाऊ लागले.

प्रा. श्री. म. माटे यांच्या या उद्गारानंतर, महामंडळाच्या पहिल्या व एकूणात शेहेचाळीसाव्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी साहित्य संमेलने परदेशातही व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त केली. हे संमेलन १९६५ मध्ये हैदराबादला भरले होते. प्रा. माट्यांचे उद्गार व प्रा. वा. ल. कुलकर्णी यांची अपेक्षा माझ्या वाचनात होतीच. याशिवाय मराठी समीक्षेत नवीनतेची कल्पना मांडणारे समीक्षक आणि आपल्या कविता लेखनाने मराठी कवितेत नवे युग सुरू करणारे कवी बाळ सीताराम मर्ढेकर यांची खंतही माझ्या मनात होती. आपल्या 'वाङ्मयीन महत्ता' या पुस्तकात, 'मराठी वाङ्मयाला जागतिक संस्कृतिक्षेत्रात मानाचे नाही तर निदान नामाचे स्थान अजून का प्राप्त होत नाही,' असा प्रश्न मर्ढेकरांनी उपस्थित केला होता. मर्ढेकरांचा हा प्रश्न, माट्यांचा तो उद्गार आणि वा. ल. कुलकर्णी यांनी व्यक्त केलेली अपेक्षा ह्या गोष्टी मला अस्वस्थ करीत होत्या.

याचा अर्थ आमच्या अठरा वर्षे वयाच्या पोराने, संत ज्ञानेश्वराने लिहिलेला तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा अपूर्व संगम असलेला ज्ञानेश्वरीसारखा श्रेष्ठ ग्रंथ काय किंवा अडाणी समाजातून आलेला, समाज जीवनातील विसंगतीचा आणि मानवी जगण्यातील ढोंगांचा सूक्ष्मपणे वेध घेऊन परखडपणे आपल्या अनोख्या भाषाशैलीत मांडणारा महाकवी संत तुकाराम काय यांचीही नोंद जागतिक सांस्कृतिक क्षेत्रात करण्यात आम्ही अपयशी ठरलो होतो. मराठीतील हे दोन महान कवीही जगापर्यंत आम्हाला पोहचविता आले नव्हते. मर्ढेकरांची ही खंत, ही व्यथा महाराष्ट्राबाहेर जगाच्या पाठीवर ठिकठिकाणी छोट्या छोट्या समूहाने राहणारा आणि मराठी भाषेशी व संस्कृतीशी आपलं नातं टिकविण्यासाठी धडपडणारा भारताबाहेरचा हा मराठी माणूसच दूर करू शकेल आणि हे स्थान मराठी वाङ्मयाला आणि भाषेला मिळवून साहाय्यभूत ठरेल असे मला वाटत होते.

जगभरातला इतिहास असं सांगतो की, बऱ्याचदा आपल्या मूळ संस्कृतीपासून तुटत चाललेले, दुरावत चाललेले लोकच आपल्या मूळ संस्कृतीचे व आपल्या मूळ भाषेचे जतन करीत असतात. जगभरातून इस्रायलमध्ये संघटित झालेला आणि केवळ आपली नष्ट होत चाललेली भाषाच नव्हे, तर प्राणपणाने लढून आपला देशही निर्माण करणारा आणि हिब्रू संस्कृतीची पुनर्स्थापना करणारा यहुदी समाज हे अलीकडच्या काळातील याचे ढळढळीत उदाहरण सांगता येईल. आपल्या मूळ भाषेपासून दूर गेलेल्या व मूळ संस्कृतीपासून तुटलेल्या लोकांना 'डायस्पोरा' असं म्हटलं जातं. जगातील भिन्न भिन्न संस्कृतीचा व भाषांचा अभ्यास केला तर या डायस्पोरांनीच आपली मूळ भाषा व मूळ संस्कृती कट्टरपणे जतन करण्याचा प्रयत्न केलेला आहे असे आपणांस दिसून येईल. अमेरिकेतील मराठी माणसांनी २००८ मध्ये जेव्हा मराठी साहित्य संमेलन मागितले तेव्हा कोणतीही खळखळ न करता ते मी त्यांना दिले, तेव्हा माझ्यासमोर हीच उदाहरणे होती. महाराष्ट्रात व महाराष्ट्रालगतच्या सीमाभागात दरवर्षी लहानमोठी किमान पन्नास साहित्य संमेलने होतात. त्यांत त्या त्या परिसरातील लेखक-कवी-अभ्यासक व रसिक पुन्हा पुन्हा सहभागी होत असतात. त्यांना वारंवार संमेलनाची ही संधी मिळत असते. या उलट परदेशातील मराठी माणसांना अशी संधी मिळत नाही. तेही मराठी आहेत; तेही रसिक असू शकतात याचा विचार ज्येष्ठ म्हणविणाऱ्यांपैकी कोणालाही करावासा वाटला नाही. त्यांच्या रसिकतेचा सोयिस्करपणे या सर्वांना विसर पडला होता. परदेशात संमेलन दिल्यामुळे महाराष्ट्रातील रसिकांवर जणू आकाश कोसळले, महाराष्ट्रात जणू उत्पात घडला असे वातावरण निर्माण करण्यात आले.

ज्येष्ठ लेखक, पत्रकार, प्रकाशक यांच्याबरोबरच आणखी एक वर्ग या टीकेत सहभागी होता. लेखक, पत्रकार, प्रकाशक हे महामंडळाच्या बाहेरचे होते. परंतु, महामंडळाच्या प्रतिनिधींचा एक वर्गही, खरे म्हणजे महामंडळाच्या घटक असलेल्या


दोन साहित्य संस्थाही या टीकेत हिरिरीने सहभागी झाल्या होत्या. मुंबई मराठी साहित्य संघ आणि विदर्भ साहित्य संघ ह्या दोन संस्थांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी साहित्य महामंडळाच्या या निर्णयाला विरोध करीत होते. वस्तुतः बैठकीतला विरोध वेगळा आणि बाहेरून केलेला विरोध वेगळा. ह्या दोन्ही संस्था महामंडळाच्या घटक असल्यामुळे त्यांना महामंडळाच्या बैठकीत या संमेलनाच्या प्रस्तावाला विरोध करता येत होता, तसा तो त्यांनी केलाही. महामंडळाच्या बैठकीत परदेशात म्हणजे अमेरिकेत संमेलन घ्यायचे की नाही या निर्णयप्रक्रियेत या दोन्ही संस्था, त्यांचे प्रतिनिधी सहभागी होते. बैठकीत सकारात्मक, नकारात्मक, काय असेल ती भूमिका त्यांनी मांडली होती. लोकशाही व्यवस्थेने दिलेला अधिकार त्यांनी वापरला होता. सर्वांची मते ऐकून घेतल्यावर हात वर करून खुले मतदान करण्यात आले होते आणि आठ विरुद्ध दहा अशा मतांनी, अमेरिकेत साहित्य संमेलन घेण्यात यावे या बाजूने ठराव पारित झाला होता. लोकशाही संकेतानुसार बहुमताने झालेला हा निर्णय सर्व प्रतिनिधी व ज्या संस्थांचे ते प्रतिनिधित्व करीत होते त्या संस्था यांच्यावर बंधनकारक होता. या ठरावानुसार मुंबई मराठी साहित्य संघाने आधी योग्य भूमिका घेऊन लोकशाही संकेताचा आदर केला होता. आमचा विरोध आहे पण बहुमताने निर्णय झाला तर तो आम्हाला मान्य राहील, आम्ही संमेलनात सहभागी होऊ, असे त्यांचे म्हणणे होते व पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनात ते सहभागी झालेही.

पुढे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन म्हणून परदेशात संमेलन घेण्याऐवजी इतर भारतीय भाषा घेतात तसे आपणही विश्व मराठी साहित्य संमेलन म्हणून घ्यावे असे ठरले आणि अध्यक्ष म्हणून प्रा. गंगाधर पानतावणे यांची निवड झाली. दुसऱ्या वर्षी दुबई येथे दुसरे विश्व मराठी साहित्य संमेलन झाले. अमेरिकेतील पहिले संमेलन नुसते पारच पडले असे नाही, तर महाराष्ट्रातही होत नाही इतके नेटके, आटोपशीर व चांगले झाले. यशस्वी हा शब्द त्याला थिटा पडला. परदेशस्थ मराठी माणसांची रसिकता, आपल्या भाषेबद्दल त्यांना वाटणारी आस्था आणि वाङ्मयाबद्दलची ओढ त्यांच्या भरगच्च उपस्थितीने आणि आत्मीय प्रतिसादाने त्यांनी जगाला दाखवून दिली. मुंबई मराठी साहित्य संघाचे तिन्ही प्रतिनिधी, द. मा. मिरासदार, रा. रं. बोराडे, शंकर वैद्य, अजित दळवी, रामनाथ चव्हाण, नागनाथ कोत्तापल्ले, वामन होवाळ, सुधाकर गायधनी, अरुणा ढेरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक-कवी; प्रवीण बर्दापूरकर, राही भिडे, प्रकाश बाळ यांच्यासारखे ज्येष्ठ पत्रकार हे सर्व जण ह्याला साक्षी आहेत. परदेशातल्या मराठी साहित्य संमेलनाबाबत माझी भूमिका पक्की होती. ती महामंडळाला मी समजावूनही सांगितली होती. परदेशात कशासाठी मराठी साहित्य संमेलन घ्यायचे याचा विचार मी केलेला होता. भारताबाहेर गेलेल्या मराठी माणसांना अफाट प्रमाणात ज्ञानाची व अनुभवांची क्षेत्रे उपलब्ध आहेत. ते ज्ञान, ते अनुभव आत्मसात करून, त्या ज्ञानाचा व अनुभवांचा उपयोग त्यांच्याकडून महाराष्ट्रातील मराठी माणसांना व्हावा, त्यांनी ते ज्ञान मराठीत आणावे व भाषासमृद्धीतील आपला वाटा उचलावा. नुसते मराठी सणवार साजरे करून भाषा व संस्कृती टिकत व वाढत नसते हे ध्यानात घ्यावे. उलट बाजूने परदेशातील मराठी माणसांची मराठी भाषेशी असलेली नाळ घट्ट करण्यासाठी आणि त्यांची मराठी भाषा वापरण्याची प्रक्रिया चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्रातील मराठी माणसांनी व मराठी संस्थांनी त्यांना साहाय्य करावे. त्यांना भाषिक बळ पुरविण्याची जबाबदारी महाराष्ट्रातील मराठी संस्थांची आहे. हे संस्थांनीही विसरू नये. त्यांच्या कर्तृत्वाचा सार्थ अभिमान बाळगून त्यांच्याकडे आपलेपणाने पाहावे, त्यांच्याशी आपलेपणाने व्यवहार करावेत.

परदेशातील मराठी साहित्य संमेलन हे यासाठी आदान-प्रदानाचे काम करू शकेल, निदान यासाठी साहित्य संमेलनाचा उपयोग होईल अशी माझी धारणा होती व आजही आहे. मराठी साहित्य संमेलन हे एकमेकांजवळ पोहोचण्याचे एकमेव साधन आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरी पडत असलेली महाराष्ट्राची भूमी सोडून तिच्यावरचा भार काही प्रमाणात का होईना पण परदेशस्थ मराठी माणसांनी हलका केला आहे. त्यांच्या आपल्या, एकमेकांच्या परस्पर संबंधातून महाराष्ट्राचे व मराठी भाषेचे भवितव्य घडवता येणे, उज्ज्वल करणे शक्य आहे. ते आपण करू, घडवू असा विश्वास अशा संमेलनांमुळे आपण एकमेकांना देऊ शकतो असे माझे मन मला सांगत होते. त्यासाठी ते फक्त नीट व सुरळीतपणे झाले पाहिजे यासाठी माझा आटापीटा होता.

भारतात आपण सोडून इतर सर्व भाषक लोक आपल्या भाषेबद्दल केवळ जागरूकच नव्हे, तर अतिसंवेदनशील आहेत. आपल्या भाषेच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी ते सर्व जसा आग्रह धरतात, चळवळी करतात तसा आग्रह, तशा चळवळी मराठी भाषेसाठी कराव्यात हे आपल्यापैकी कोणालाही वाटत नाही. साहित्य महामंडळासारखी एखादी संस्था आपल्या भाषेसाठी काही करू पाहात असेल तर त्याला विरोध होतो. एक मराठी लेखक दुसऱ्या मराठी लेखकाला आतून, सुप्तपणे विरोध करतो. त्यात श्रेष्ठ मराठी लेखकाचे व मराठी भाषेचे नुकसान होते हे तो ध्यानात घेत नाही. नेमाडे, चित्रे, तेंडुलकर, जी. ए. यांच्या साहित्याचे अनुवाद झाले असते तर जागतिक स्तरावर मराठी वाङ्मय व भाषा पोहोचायला मदत झाली असती. मराठी लेखकांच्या आपसातील शीतयुद्धामुळे, श्रेष्ठ लेखकांच्या श्रेष्ठ कलाकृतींचे अनुवाद होणे जवळपास अशक्य आहे. या संमेलनाचा उपयोग अमेरिकेतील मराठी जाणकारांना अशा अनुवादाला प्रवृत्त करण्यासाठी होऊ शकतो. अमेरिकन इंग्रजीत झालेल्या अनुवादाच्या या कार्यातून श्रेष्ठ मराठी वाङ्मय जागतिक स्तरावर पोहोचवायला मदत होऊ शकेल. जगाच्या पाठीवर भारतातील महाराष्ट्र या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका प्रांतामध्ये दहा कोटी लोक मराठी नावाची एक भाषा बोलतात. या भाषेला किमान एक हजार वर्षांचा इतिहास आहे, भाषेच्या बाल्यावस्थेपासूनच समृद्ध वाङ्मयीन परंपरा आहे हे या अनुवादातून जगापर्यंत पोहचविता येईल.

अमेरिकेत पहिले विश्व मराठी साहित्य संमेलन घेण्याचा निर्णय मी जेव्हा जाहीर केला तेव्हा जी टीका करण्यात आली, या टीकेत अमेरिकेतील मराठी माणसांची वाङ्मयीन जाण ही १९६० च्या पुढे गेलेली नाही असाही एक मुद्दा काही जणांनी उपस्थित केला होता. ही टीका करताना त्यांच्यासमोर फक्त १९६० च्या दशकात अमेरिकेत गेलेला मराठी माणसांचा वर्ग होता. पण, त्यानंतर काळ बदलला. जग लहान झाले. मराठी माणसे जगभर पसरली. ती तिथल्या संस्कृतीला विरोध न करता आपली मुळे व महाराष्ट्राशी असलेले आपले नाते टिकवू पाहताहेत. महाराष्ट्राशी असलेल्या आपल्या नात्याला तोडू इच्छित नाहीत. मराठी भाषा हा त्यांच्या नात्याचा मुख्य आधार आहे. त्याला ते घट्ट धरून ठेवू पाहताहेत. अशा परिस्थितीत



महाराष्ट्राचीही काही जबाबदारी आहे. ती जबाबदारी ओळखून महाराष्ट्राने त्यांना प्रतिसाद दिला पाहिजे. हा फक्त आता एकट्या अमेरिकेतील मराठी माणसांचाच प्रश्न राहिलेला नाही, तर विविध देशांतील सर्व मराठी समूहांचा प्रश्न आहे. महाराष्ट्रच्या जशा त्यांच्याकडून काही अपेक्षा आहेत तशाच त्यांच्याही महाराष्ट्राकडून काही अपेक्षा आहेत. साहित्य संमेलन ही त्यातली फक्त एक अपेक्षा झाली. अशा संमेलनांमधूनच त्यांच्या वाङ्मयीन आकलनाचा प्रश्न दूर करण्यासाठी प्रयत्न करता येणार आहेत. नुसत्या शाब्दिक टीकेने तो दूर होणार नाही. त्यांची ही जाण, आकलन वाढविण्यासाठी आपणच प्रयत्न करण्याची गरज आहे. १९६० नंतर बदलत गेलेले मराठी वाङ्मयाचे रूप, मराठी वाङ्मयात आलेले नवीन वाङ्मयीन प्रवाह, समाजाच्या सर्व स्तरांतून आलेला लेखक-कवींचा मोठा वर्ग ह्या सर्व गोष्टी त्यांच्यासमोर ठेवून त्यांना अद्ययावत करण्यासाठी कोणीतरी पुढाकार घेण्याची, ही जबाबदारी उचलण्याची गरज होती. मराठी साहित्य महामंडळाने आपली जबाबदारी ओळखून ती उचलली आणि आपल्या उद्दिष्टपूर्तीचे एक पाऊल पुढे टाकले. हे पाऊल टाकताना माझ्यासमोर उभे केलेले अडथळे ओलांडून मला पुढे जाता आले त्याचे समाधान पुरेसे आहे.

अमेरिकेतील साहित्य संमेलन ठरविताना माझ्या मनात आणखी एक विचार होता. अलीकडच्या दहा-पंधरा वर्षांत इतर भारतीय भाषांची साहित्य संमेलने परदेशात व्हायला लागलेली आहेत. या संमेलनांमधून त्या भाषांचे अस्तित्व जागतिक स्तरावर प्रकट होत आहे. तेलगु, गुजराती, हिंदी, बंगाली, मल्याळम् या भाषांची साहित्य संमेलने परदेशांत ठिकठिकाणी झाली आहेत. त्या त्या भाषांतील ज्येष्ठ लेखकांनी अशी साहित्य संमेलने परदेशांत व्हावीत म्हणून प्रयत्न केलेले आहेत. त्या त्या भाषांतील प्रसारमाध्यमांनी अशी साहित्य संमेलने झाली तेव्हा विरोधाची व टीकेची मोहीम उघडली नव्हती, तर त्यांना आवश्यक तेवढी सकारात्मक प्रसिद्धी दिली होती. गुजराती भाषेच्या न्यूयार्क येथील साहित्य संमेलनाला तर गुजराती बरोबरच मराठी वर्तमानपत्रांनीही प्रसिद्धीचा हातभार लावला होता. अमेरिकेतील विश्व मराठी साहित्य संमेलनावर मराठी प्रसारमाध्यमे ज्यावेळी टीकेचा भडिमार करीत होती, त्याचवेळी अमेरिकेत न्यूयार्क येथे गुजराती विश्व साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी गांधीनगरमधून व्हिडीओ कॉन्फ्रन्सिंगद्वारा केले. अशा कौतुकभरल्या बातम्या त्यावेळी मराठी वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध झाल्या होत्या. मराठी भाषेचेही परदेशात असे साहित्य संमेलन व्हावे आणि परदेशातील इतर भाषक रसिकांना ह्या संमेलनांचा जसा लाभ मिळतो तसा तो परदेशातील मराठी रसिकांनाही मिळावा असा हे संमेलन ठरविताना माझा दृष्टिकोन होता.

जिथे जिथे भाषिक समूह आहेत तिथे तिथे भाषिक संधी निर्माण करणे व करून देणे आवश्यक असते. परदेशातील भाषिक समूहांना अशा संधी निर्माण करून दिल्या तर त्यांच्या ठिकाणी भाषिक जागरूकता निर्माण होऊ शकते. अशा संधीमुळे परदेशस्थ मराठी माणसांच्या मनात आपल्या भाषेबद्दल आस्था वाढवायला मदत होऊ शकते. त्याचा परिणाम इतर भारतीय भाषांच्या स्पर्धेत आपली भाषा जगाच्या पातळीवर उतरण्यात होऊ शकतो. जगभर आपल्या भाषेच्या प्रसाराला वाव मिळू शकतो. हे भान मुख्य समूहाने ठेवण्याची गरज असते. मुख्य समूह हे भान दाखवत नसेल तर त्या समूहाच्या भाषेसाठी काम करणारे सरकार, त्या भाषेतील साहित्य संस्था आणि निखळ भाषेचे काम करणाऱ्या सरकारी आणि बिगरसरकारी संस्था यांची जबाबदारी वाढते. ही जबाबदारी ओळखून सर्व संस्थांनी आपली कामे केली पाहिजेत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने आपली जबाबदारी ओळखली आणि विश्व मराठी साहित्य संमेलन घेऊन ती पार पाडली.

**संपर्क : ९८२२११५६०७**

## वाङ्मयाची प्रेरणा

लोकहितवादी गोपाळराव देशमुख व जोतिराव फुले हे दोघे धार्मिक व सामाजिक सुधारणेचा विचार करणारे ह्या नवयुगाचे पहिले पुरुष होत. लोकहितवादींचा विचार व फुले यांचा आचार सामर्थ्यशाली होता. अवनत व दलितवर्गाची प्रक्षुब्ध जाणीव व मूलगामी सामाजिक परिवर्तनाची आकांक्षा यांचे भारतातील पहिले प्रतीक फुले होत. मध्यमवर्गीय सुधारणेची चळवळ लोकहितवादींच्या वैचारिक लेखनापासून सुरू झाली. धार्मिक व सामाजिक विचारांचा विकास ब्रह्मसमाजाच्या महाराष्ट्रातील शाखेने केला. न्या. रानडे, डॉ. भांडारकर इत्यादिकांच्या प्रयत्नांनी या चळवळीला रूप आले. या चळवळीमुळे ज्या क्रिया व प्रतिक्रिया उत्पन्न झाल्या त्यातच महाराष्ट्रातील आधुनिक वाङ्मयाची चळवळ वाढीस लागली.

**– लक्ष्मणशास्त्री जोशी**
**(दिल्ली – १९५४, अध्यक्षीय भाषणातून)**





# भाषा सर्वेक्षण आणि सामंजस्य

१९९६ ची गोष्ट. आदिवासींविषयक समाजकार्य करतानाच त्यांच्या परंपरा, संस्कृती आणि भाषांच्या अभ्यासासाठी डॉ. गणेश देवी यांनी भाषा संशोधन आणि प्रकाशन केंद्र बडोदा येथे स्थापन केले. आदिवासींच्या सामाजिक उन्नतीबरोबरच, सांस्कृतिक उन्नयनाचे एक स्वप्न डॉ. देवी यांनी पाहिले. त्यातूनच भाषा केंद्राने विविध प्रकल्प हाती घेतले. भाषांतून व्यक्त होणारी मौखिक परंपरा, कमी होत चाललेल्या भाषा आणि विविध जनजमातींच्या लुप्त होत चाललेल्या भाषा, यांची जपवणूक संरक्षण व दस्तऐवजीकरण करणे, हा एक महत्त्वाचा प्रकल्प ह्या केंद्रातून गेली काही वर्षे चालवला जात आहे.

ह्या भाषा केंद्रातर्फे बडोदा येथे एक 'भाषा संगम' (Bhasha Confluence At Ground Zero) हा भारतीय पातळीवरचा मोठा कार्यक्रम आयोजित केला होता. ह्या कार्यक्रमासाठी भारतातील विविध भागांतून बहुभाषिक प्रतिनिधी आले होते. त्यात भाषातज्ज्ञ होते, भाषा व साहित्याचे संशोधक होते आणि अशा बुद्धिवंतांप्रमाणेच विविध विमुक्त समाजातील कार्यकर्तेही होते. ज्येष्ठ साहित्यिका महाश्वेतादेवी व थोर गांधीवादी नेते नारायणभाई देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली विविध चर्चासत्रे झाली. भाषा संपते म्हणजे काय? ती मरते का मारली जाते यांपासून भाषिक प्रश्नांवर विविध तज्ज्ञांनी आपले अनुभव व विचार व्यक्त केले. दोन दिवसांच्या ह्या 'भाषा संगम' कार्यक्रमातील भारताच्या विविध भागांतून आलेल्या सातशे प्रतिनिधींशी चर्चा करून काही निष्कर्ष काढले ते असे -

१. आमच्या भाषेवर आमचेच नियंत्रण कमी होत चालले आहे.

२. एकच भाषा वेगवेगळ्या पद्धतीने पुढे येत आहे.

३. आदिवासी भाषा ही केवळ भाषा नसून तीत जीवनदर्शन आहे. ह्यात 'प्रेम' ही गोष्ट प्रामुख्याने आहे.

४. केवळ आदिवासी नाही, तर सर्वच समाजाच्या जीवनशैलीत बदल होत आहे. त्यात आपली आपली स्वतंत्र ओळख अस्पष्ट किंवा नष्ट होत चालली आहे.

५. भाषिक प्रश्न कोणा एका समाजाचा, जाति-जमातीचा नाही, तर तो पूर्ण भारतीय समाजाचा प्रश्न आहे.

६. आपल्या भाषेत बोललो तर गाववाला, गावंढळ, असंस्कृत समजतील ह्या भीतीने आपल्या मूळ भाषेपासून दूर जाऊ नये.

७. आपल्या समाजविषयक व भाषाविषयक पूर्वसंस्कारापासून विचलित होऊ नये.

८. खरोखरच प्रश्न आहे का? असल्यास कुठे?

**अरुण जाखडे**

९. भाषा संपण्यापूर्वी त्याचे डॉक्युमेंटेशन - दस्तऐवजीकरण करावे, अन्यथा त्या संपल्या तर त्यांचे अस्तित्व होते हे कसे सिद्ध करणार?

१०. भय आणि संशय, ह्यातून सर्वच भारतीय भाषिक विश्वासार्हता धोक्यात येऊ शकते.

११. आपली भाषा इतर भाषिक लोकांना शिकविण्याचा प्रयत्न करणे.

१२. साहित्यिक, कवी यांनी आपली मूळ भाषा साहित्यकृतीत ठेवावी. यामुळे जितके दिवस ती साहित्यकृती टिकेल, तितके दिवस त्यातील भाषा टिकतील.

१३. छोट्या भाषांतील प्रकाशनांसाठी शासनाने पुढे यावे.

१४. लिंग्विस्टिक सर्व्हे लोकांनी करावा. लोकांनीच अनेक उपक्रम घ्यावेत.

१५. भाषिक प्रश्न सरकारऐवजी समुदायाने हाती घेतले पाहिजेत. प्रत्येक भाषा मुख्य प्रवाहात राहील ही गोष्ट आवश्यक नाही. संख्या अल्प असली तरी आत्मसन्मान असेल तर त्या विपरीत काळातही भाषा टिकतील.

१६. 'सर्व शिक्षा अभियाना'चे स्वरूप 'सर्व भाषा अभियान' असे असले पाहिजे.

भाषा संगम २०१० ह्या कार्यक्रमात विविध चर्चासत्रातून क्षीण होत चाललेल्या भाषा टिकविण्यासाठी कोणते प्रयत्न करावेत यासंबंधी काही मुद्दे मांडण्यात आले, आणि मुख्य म्हणजे भाषा, समाज, राजकारण आणि व्यवहार यांचे परस्परसंबंध अभ्यासले जावे ह्यासंबंधी निष्कर्ष मांडण्यात आले.

सर्वांत महत्त्वाचा निर्णय होता तो म्हणजे 'लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडियन लँग्वेजस' हा उपक्रम. हा उपक्रम आता जवळ जवळ शंभर वर्षांनंतर पुन्हा हाती घेण्याचे ठरले. यासाठी शासनाऐवजी अशासकीय सामाजिक संस्था, व्यक्ती, अभ्यासक व विविध जनजातीतील व समाजातील कार्यकर्ते ह्यांच्या सहभागातून करण्याचे ठरले.

भाषातज्ज्ञांच्या अनेक चर्चासत्रांनंतर भारतीय भाषांच्या लोकसर्वेक्षणाचे स्वरूप कसे असावे, त्यात त्या-त्या बोली अथवा भाषेविषयक कोणती माहिती असावी, ह्याचे निकष नक्की केले. असे निकष नक्की झाल्यानंतर भारतातील प्रत्येक राज्यातील विविध भाषा, बोलींविषयी माहिती गोळा करण्याचे ठरले. त्यासाठी प्रत्येक राज्यात प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. काही भाषा ह्या विशिष्ट जनजातींच्या असून, त्यासंबंधीची माहिती प्राध्यापक किंवा भाषांचे अभ्यासक ह्यांचेकडून मिळणे अशक्य होती. हे काम त्या त्या भाषांतील कार्यकर्त्यांकडून करून घेण्याचे ठरले.

अशा पद्धतीने गेल्या दोन वर्षांतील कार्याची फलश्रुती म्हणजे सर्व राज्यांत भारतीय भाषांच्या लोकसर्वेक्षणाचे चाललेले काम व मुख्य म्हणजे ह्यापैकी १५ राज्यांतील भाषिक सर्वेक्षणाचे काम जवळजवळ पूर्ण झाले. दि. ७ व ८ जानेवारी २०१२ ह्या दिवशी 'भाषा वसुधा २०१२' ह्या भाषा केंद्र बडोदाने आयोजित केलेल्या 'आंतरराष्ट्रीय भाषा भेट' कार्यक्रमात महाराष्ट्राच्या भार्षिक सर्वेक्षणाच्या खंडाचे प्रकाशन मा. श्री. कुमार केतकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी व्यासपीठावर के. के. चक्रवर्ती, डी. पी. पटनायक, नारायणभाई देसाई, डॉ. गणेश देवी आदी महनीय व्यक्ती तसेच महाराष्ट्राच्या ह्या खंडाचे समन्वयक व प्रकाशक अरुण जाखडे हे होते.

'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' हा प्रकल्प काय आहे?

१. PLSI (People's Linquistic Survey of India) किंवा भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण ही संपूर्ण अशासकीय म्हणजे लोकांच्या सहभागातून चाललेली व भाषिक हक्क, संवर्धन, तिच्यातील मौखिक परंपरा व दस्तऐवजीकरण करण्यासाठी



कटिबद्ध आहे. त्या कामासाठी ही एक चळवळ आहे. हे कार्य विविध राज्यांतील व भाषांतील बुद्धिवंत, विचारवंत, लेखक, सामाजिक कार्यकर्ते ह्यांच्या सहभागातून होत आहे.

२. भारतातील सध्या अस्तित्वात असणाऱ्या म्हणजे २०१० ते २०१२ मधील भाषांची सद्यःस्थिती पाहणे आणि त्यांची मांडणी करणे.

३. भाषिक वैविध्यतेप्रमाणेच भारतातील सामाजिक, सांस्कृतिक व इतर परंपरा यांचे वैविध्य लक्षात घेऊन त्यांचा विकास व संवर्धन करण्यासाठी सतर्क असणारी कार्यकर्त्यांची एकसंघशक्ती किंवा फळी तयार करून भाषिक सर्वेक्षणासाठी त्यांना कार्यरत करणे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येणारी भाषिक, सांस्कृतिक व जैविक वैविध्यता नष्ट होत चालली आहे, ते थांबवणे.

४. वेगवेगळ्या भाषिक समाजघटकांमध्ये जवळीक निर्माण करून बहुभाषिक, बहुसंस्कृतीय असा जो भारतीय समाजाचा मूळ पाया आहे, तो पक्का करणे.

५. सरकार व भाषिक जमाती यांच्यात जवळीक निर्माण करून परिस्थिती आणि परंपरेचे वैविध्य जपत, सरकारचा विकास आराखडा जाणून घेणे, आत्मसात करणे व आचरणात आणणे.

६. मातृभाषेमधून शिक्षण घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे, त्यासाठी आवश्यक ती शिक्षण साधने उपलब्ध करून देणे.

७. भारतात पुढील होणाऱ्या सर्वेक्षणाचा पाया बांधणे.

८. भाषिक वैविध्य जपतानाच, माणसांची सुरक्षितता टिकविणे.

९. ब्रिटिश काळात ग्रिअर्सन यांनी केलेल्या सर्वेक्षणाची ही नक्कल नाही. त्याचे पुनरसादरीकरण नाही किंवा ग्रिअर्सन ह्यांच्या सर्वेक्षणाला पर्याय नाही. तो आजच्या स्थितीतील भारताच्या भाषिक अस्तित्वाच्या व सामाजिक, सांस्कृतिक बदलाची नोंद घेणारा आहे. तो त्या–त्या भाषांचा अतिशय सखोल अभ्यास वा सर्वेक्षण नाही.

९. भाषा सर्वेक्षण म्हणजे लोकांच्या मदतीने व लोकांच्या सहकार्यातून कमी वेळात करावयाचा उपक्रम आहे. शासनाच्या मदतीशिवाय याचा अर्थ शासनाला समांतर असा नाही, तर आता अनेक उपक्रम समाजानेच स्वयंप्रेरणेने व स्वयंस्फूर्तीने करावेत व आपली सांस्कृतिक जबाबदारी पूर्ण करावी, हा खरा उद्देश आहे.

लोकसर्वेक्षणाचे नेमके स्वरूप

भाषांचे लोकसर्वेक्षण करताना ज्या गोष्टी लक्षात घेतल्या त्यापैकी काही महत्त्वाच्या खालीलप्रमाणे –

१. ज्या नावाने भाषा ओळखली जाते ते नाव. त्या नावाला असणारे पर्यायी नाव व ज्या भागात बोलली जाते त्या भागाच्या नकाशात तो भाग दाखविणे.

२. भाषेचा संक्षिप्त इतिहास.

३. चार ते पाच गीते, लोकगीते किंवा कविता. त्या भाषेतील देतानाच त्यांचा मराठी अनुवादही दिला जाणार आहे. ही गाणी किंवा लोकगीते कोठून व कशी उपलब्ध झाली ह्याच्या ससंदर्भ टिपा.

४. त्या भाषेतील कथा – लोककथा – गद्य नमुना – आणि त्याचा मराठी अनुवाद आणि ते कोठून उपलब्ध झाले त्याचीही ससंदर्भ टीप.

५. नातेसंबंधांची नावे – (उदा. भाऊ, वडील, आई, मुलगा, जावई इत्यादी.)

६. रंगनामे – (उदा. तांबडा, हिरवा इत्यादी आणि त्याचे मराठी रूपांतर)

७. वेळ, काळ, ऋतू दिवसातील विविध बदल – पहाट, सकाळ, माध्यान्ह, संध्याकाळ, कातरवेळ, रात्र ह्यांना त्या भाषेतील शब्द व त्यांचा मराठी अनुवाद.

८. त्या भाषांत अंतर (उदा. कोस, मैल, फर्लांग, कि.मी.) नामे, सर्वनामे, क्रियापदे, मापे (किलो, शेर, आठवा इत्यादी), महिने.

अशा अनेक पद्धतीने त्या भाषेचा परिचय होणार आहे. हे निकष भारतभरातील विविध भाषांतील भाषावैज्ञानिकांच्या अनेक चर्चा–सभा झाल्यानंतर ठरविले आहेत.

सर्व राज्यातील सर्वेक्षणांचे, त्या–त्या राज्यातील भाषातून २८ खंड प्रसिद्ध होतील व त्या सर्व खंडांचे हिंदी व इंग्रजी अनुवादाचे स्वतंत्र खंड तयार होतील. हे काम पूर्ण झाल्यानंतर ह्या अठ्ठावीस खंडांतून वीस महाखंड तयार होतील. त्याचे स्वरूप विस्तारभयास्तव येथे देत नाही; पण, ह्या खंडांत सर्व राज्यांतील भाषांचे एकत्रित सर्वेक्षण जसे असणार आहे,

महाराष्ट्राच्या भाषिक सर्वेक्षणाचा खंड एकूण चार भागांत आहे. तो असा –

१. मराठी आणि मराठीची रूपे : ह्यात अकरा भाषांचा समावेश आहे.

२. आदिवासींच्या भाषा : आदिवासींच्या जवळ जवळ सोळा भाषा यात समाविष्ट झाल्या आहेत.

३. भटक्या–विमुक्तांच्या भाषा : ह्या विभागात अठरा ते वीस भाषा मिळाल्या. आणखी काही मिळण्याची शक्यता आहे.

४. अन्य भाषा : ह्यात दःख्खनी किंवा नॉ लींगसारख्या भाषा समाविष्ट केल्या आहेत.

भाषांची ही स्थिती आजची आहे. २०१० ते २०१२ या काळात उपलब्ध झालेल्या व बोलल्या जाणाऱ्या ह्या भाषा आहेत.

महाराष्ट्रातील जनजातींच्या ह्या अन्य भाषांवर मराठीचे आक्रमण झाले आहे. इंग्रजीचे मराठीवर जसे आक्रमण होत आहे व मराठीचे नुकसान होत आहे, तसेच मराठीमुळे ह्या भाषा क्षीण होत चालल्या आहेत. मोठा मासा छोट्या माशाला मारतो हा नियम भाषांनाही लागू आहे. आज ज्या काही भाषा हाती लागल्या त्या भाषा हे सर्वेक्षण अजून पाच वर्षांनी झाले असते तर त्यातील बऱ्याच भाषा मिळाल्या नसत्या. एका अर्थाने उशिरा का होईना पण एक उत्तम भाषिक प्रकल्प महाराष्ट्रात होत आहे.

महाराष्ट्राच्या भाषिक सर्वेक्षणाचे काम आता पूर्णत्वास आले आहे. त्याचे पूर्वप्रकाशन झाले असले, तरी त्यात आणखी काही गोष्टींची भर घालून ह्या वर्षी १ मे २०१२ ला म्हणजे 'महाराष्ट्र दिनी' तो प्रकाशित होऊन महाराष्ट्रात सर्वत्र उपलब्ध होईल. पद्मगंधा प्रकाशन, पुणे ह्या संस्थेतर्फे त्याचे प्रकाशन होईल. अखिल भारतीय पातळीवर चालणाऱ्या ह्या भाषिक व सांस्कृतिक प्रकल्पात महाराष्ट्राचा समन्वयक, प्रकाशक होण्याची संधी मला मिळाली ही माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे. ह्या कामामुळे माझे व मुख्य म्हणजे माझ्या प्रकाशनसंस्थेचे नाव भारतात व जगभरच, दीर्घकाळ लक्षात राहील, असा मला आत्मविश्वास वाटतो. भाषा केंद्र बडोदा व डॉ. देवी यांनी दाखविलेल्या विश्वासास मी पात्र ठरलो ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे.

सारांश : भाषेच्या माध्यमातून शांती आणि सामंजस्य. भाषेच्या पुनरुत्थानासाठी आदान–प्रदान, भाषेचे धोरण ठरविणे, अल्पसंख्य समाजाच्या भाषाविषयक प्रकल्पांची गुणात्मकता पाहणे. सांस्कृतिक आणि भाषिक वैविध्यतेचा अभ्यास, शिक्षण, प्रशिक्षण यासंबंधीची साधनसामग्री उपलब्ध करून देणे अशी भाषाविषयक महत्त्वपूर्ण कामे म्हणजे PLSI – भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण हा महाप्रकल्प होय.

**संपर्क : ९८५००८६४२३**



# सृजन आणि शोषण

डॉ. गजानन नामदेव जाधव

यांत्रिकीकरण, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरण यांचा कृषिसंस्कृतीवर फार मोठा विपरीत, विदारक परिणाम झाला. त्यामुळे 'काजळलेला कृषिप्रधान ग्रामीण भारत' आत्मविनाशाच्या वाटेने प्रवास करू लागला. त्याची विनाशकारी होरपळ १९९० नंतरच्या दोन दशकांत जीवघेणी ठरू लागली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा जीवनसंघर्ष उग्र, दाहक, खडतर होऊ लागला. त्याच्या ह्या परवडीचे आणि वाताहतीचे चित्रण १९९० नंतरच्या कवितेतून उत्कटतेने प्रत्ययास येते. शेतकऱ्यांचे शोषण, त्यांची वेदना, त्यांची जागृती, त्यांचे आत्मभान आणि आंदोलनास प्रवृत्त करणारी त्यांची विद्रोही मानसिकता १९९० नंतरच्या कवितेतून प्रतिबिंबित होऊ लागली. त्यामुळे १९९० नंतरची ग्रामीण कविता अधिकाधिक समकालीन, वास्तववादी आणि आशयसंपन्न होऊ लागली, असे दिसून येते.

ना. धों. महानोरांनी पानझड (१९९७), तिची कहाणी (२०००) आणि गंगा वाहू दे निर्मळ (२००७) ह्या काव्यसंग्रहांतून शेतकऱ्यांचे दु:ख, त्यांची होणारी आबाळ आणि हेळसांड, स्त्रीजीवनाची फरपट आणि होरपळ अत्यंत नेमक्या, समर्पक शब्दांत व्यक्त केली आहे. त्यातून त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनातील कारुण्य प्रभावीपणे मांडून त्यांच्या सुखसमृद्धीसाठी निसर्ग, समाज आणि शासन यांना आवाहन केले आहे. 'कोरडे नक्षत्र' (१९९७) या काव्यसंग्रहातून प्रकाश होळकरांनी दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या वाट्याला येणाऱ्या जीवघेण्या व्यथा-वेदना अतिशय प्रभावीपणे साकार केल्या आहेत. पण, शेतकऱ्यांच्या नाकीनऊ आणणाऱ्या कोरड्या नक्षत्रांवरच त्यांनी लक्ष केंद्रित केले असल्यामुळे शेतकऱ्यांचे शोषण, त्यांचा विद्रोह यांचा वेध कवीने या संग्रहात घेतला नसल्याचे जाणवते.

नारायण कुळकर्णी कवठेकर आणि उत्तम कोळगावकर यांनी शेतकऱ्यांचे दु:ख, शोषण, राबणूक, फसवणूक आणि वाताहत तसेच त्यांचा भावनिक-मानसिक संघर्ष कृषिजीवनाशी संबंधित प्रतिमांतून व्यक्त केला आहे. त्यांच्या या विषयाशी संबंधित कवितांना सात्त्विक संतापाची धार आणि कारुण्याची किनार आहे. पण, दोघांचीही काव्यनिर्मिती तुलनेने कमी असल्यामुळे त्यातून शेतकरी बापाचा भरघोसपणे व्यक्त झाला नाही. शेतकऱ्यांचे शोषण, त्यांचा जीवनसंघर्ष प्रखरपणे 'काया मातीत मातीत' सगुण साकार करणारे विठ्ठल वाघ नंतरच्या काव्यसंग्रहात आपलीच उंची गाठू शकले नाहीत. पण कापूस, पाऊस, वृषभ आणि वारी ह्या विषयांवर स्वतंत्रपणे काव्यसंग्रह लिहिण्याची कलात्मक ताकद त्यांच्या नंतरच्या संग्रहात आढळून येते. मात्र, 'कपाशीची चंद्रफुले'(२०००) आणि 'वृषभसूक्तं' (२००३) ह्या संग्रहांतून त्यांनी शेतकऱ्यांची व्यथा-कथा, त्यांच्या हाल-अपेष्टा, त्यांचे शोषण, त्यांच्यावर होणारा अन्यायही कमी प्रमाणात का होईना पण प्रभावीपणे मांडला आहे. 'पाऊसपाणी'मध्ये तर त्यांनी अतिवर्षण, अवर्षण आणि अवकाळी, अवेळी येणारा पाऊस शेतकऱ्यांची दाणादाण उडवून देतो, धुळधाण करतो, याचे भरघोस चित्रण आढळून येते.

नारायण सुमंतांनी 'वृक्षवेद'मध्ये झाडाचे स्तोत्र गाऊन त्याचे ऐश्वर्य पटवून दिले आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या जगण्याशी, झगडण्याशी आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याशी असलेले वृक्षाचे संवादी नातेही शब्दबद्ध केले आहे. पण, शेतकऱ्यांचा बहुआयामी जीवन संघर्ष आणि त्याच्या कर्जबाजारी मानसिकतेचे आत्महत्येत होणारे परिवर्तन त्यांनी 'सातबारा' (२००२) आणि 'नारायण पासष्टी' (२००६) ह्या संग्रहांतील कवितांतून अत्यंत भेदक आणि वेधक शैलीतून साकार केले आहे. शेतकऱ्यांच्या दुर्दशेचे ऐतिहासिक भान, त्यांनी घ्यावयाचा लढाऊ पवित्रा, नवशिक्षित हिरव्यागार तरुण पिढीचा चंगळवाद, बिगरकृषिकरणाचा वाढता विळखा, कोरड्या दुष्काळाची तीव्रता, शेतकऱ्यांना समर्थपणे धीर देणाऱ्या अध्यात्माची अगतिकता, त्यांची विज्ञानतंत्रज्ञानाने केलेली ससेहोलपट, मूल्यभ्रष्ट समाजरचना, गळेकापू अर्थव्यवस्था आणि गेंड्याच्या कातडीची राजसत्ता इत्यादी अनेक घटकांचा प्रभावी आविष्कार नारायण सुमंतांच्या कवितेत आढळून येतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाची समर्थपणे अभिव्यक्ती करण्यात सुमंत यशस्वी ठरले आहेत.

लक्ष्मण महाडिक, कैलास दौंड, रमेश चिल्ले ह्यांनी कुणब्याची कविता (२००३), उसाच्या कविता (२००१), वसाण (२००२), भोग सरू दे उन्हाचा (२००७), ओस झाल्या दिशा (२०००), नांगरून पडलेले शतक (२००३) या आपल्या काव्यसंग्रहांतून दुष्काळाची मगरमिठी, कर्ज-कष्ट-उपासमार-अज्ञान-शोषण यांचे दुष्टचक्र, आधुनिक शेतीचे दुष्परिणाम, शेतमजुरांची परवड, शेतकरी स्त्रीची कुचंबणा, नातेसंबंधांतील कोरडेपणा, राजकारणी पुढाऱ्यांचा संधिसाधू दांभिकपणा, जागतिकीकरणाचा जीवघेणा तिढा, वाढत्या चंगळवादाचा वेढा आणि एकूणच मानवी मूल्यांची प्रचंड घसरण ह्या बाबी विलक्षण आत्मीयतेने, प्रचंड आस्थेने शब्दबद्ध केल्या आहेत.

जगदीश कदम, श्रीकांत देशमुख आणि इंद्रजीत भालेराव हे या कालखंडातील अत्यंत महत्त्वाचे आणि सामर्थ्यशाली कवी आहेत. जगदीश कदमांनी 'रास आणि गोंडर' (१९९८), 'झाडमाती' (२००३), 'नामदेव शेतकरी' (२००६) मध्ये शेतकऱ्यांची राबवणूक, त्यांची होणारी फसवणूक व नागवणूक मोठ्या जिव्हाळ्याने आणि पोटतिडकीने ध्वनित केली आहे. त्यात आवेश, वास्तवता आणि भेदकपणा आहे. धान्याच्या उत्पादनासाठी जिवापाड राबणारा शेतकरी शेवटी रास गमावून गोंडर सांभाळतो, झाडमातीच्या जैविक अनुबंधाला मुकतो आणि वैयक्तिक, व्यावसायिक, कौटुंबिक दु:खांचा अतिरेक होऊन आत्मघातास बळी पडतो. शोषण, काबाडकष्ट आणि पिढीजात दु:ख पदरी बाळगणाऱ्या शेतकऱ्यांची मानहानी तसेच दु:ख कहाणी ही जगदीश कदमांच्या कवितेची प्रेरणा आहे.

बळिवंत (१९९७) आणि आषाढमाती (२००३) ह्या दोन काव्यसंग्रहांतून बळिवंशाच्या दु:खाची गाथा श्रीकांत देशमुखांनी विलक्षण ताकदीने, कलात्मक गांभीर्याने साकार केली आहे. शेतकऱ्यांचे बारमाही कष्ट, त्यांचे वैयक्तिक



यातनाकांड, गावगाड्यातील कृषिसमूह संस्कृतीची पडझड, प्रस्थापित सामाजिक-राजकीय आर्थिक व्यवस्थेची शेतकऱ्यांविषयी असणारी उदासीनता इत्यादी महत्त्वाच्या बाबी देशमुखांच्या कवितेतून व्यक्त होतात. त्यांनी आता तर 'आषाढी'च्या धुंदीतही 'माती'चे दु:ख सोसणे कठीण असल्याची जाणीव भरघोसपणे, वैपुल्याने व्यक्त केली आहे. याचा अर्थ आता शेतकऱ्यांच्या मानसिक-आत्मिक जीवनसंघर्षावर आध्यात्मिक उपायही श्रेयस्कर आणि सोयीस्कर ठरत नाही, ही त्याची शोकांतिका श्रीकांत देशमुखांनी शब्दबद्ध केली आहे.

इंद्रजीत भालेराव हे जागतिकीकरणातील शेतकरी बापाचे अत्यंत वस्तुनिष्ठतेने आणि वैचारिक जाणिवेने रेखाटणारे एक अग्रगण्य, महत्त्वाचे कवी आहेत. १९९० पूर्वी त्यांनी 'पीकपाणी'तून ग्रामीण जीवन, तेथील दु:ख-कष्ट, हाल-अपेष्टा यांचे अतिशय ताकदीने रेखाटन केले आहे. त्यांचे 'आम्ही काबाडाचे धनी' (१९९२) हे दीर्घकाव्य म्हणजे शेतकऱ्यांचे कष्ट, त्यांचे दारिद्र्य, त्यांची अभावग्रस्तता आणि त्यांच्या जीवनसंघर्षाची एकात्म आणि शोकांत प्रेमकहाणी आहे. 'दूर राहिला गाव' (१९९४) मध्ये त्यांनी कृषिनिष्ठ ग्रामीण माणसांची घालमेल आणि घुसमट, वाताहत आणि व्याकुळता व्यक्त केली आहे. 'कुळंबिणीची कहाणी' (१९९८) ही कृषिनिष्ठ ग्रामीण भागातील स्त्रीची जीवनकहाणी आहे. ग्रामीण स्त्रीच्या पदरी येणारे हालाखीचे जीवन, तिची व्यथा-कथा मांडून भालेरावांनी ग्रामीण स्त्रीचा जीवनसंघर्ष साकार कला आहे.

'पेरा' (२००२) आणि 'टाहो' (२००४) ह्या दोन काव्यसंग्रहांतून त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाचे, त्यांच्या स्थितीगतीचे, त्यांच्या बदलत्या मानसिकतेचे अत्यंत प्रत्ययकारी शब्दांकन केले आहे. शेतकऱ्यांच्या दु:खाची सनातन गाथा, त्यांच्यावरील अस्मानी-सुलतानी संकटांची मालिका, शेतीव्यवस्थेची झालेली परवड, त्यातून आलेला कर्जबाजारीपणा, गळेकापू स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेने घडविलेली त्याची आत्महत्यानुकूल मानसिकता, कुणब्यांना लढण्याची शिकवण देणारी झुंजारवृत्ती इत्यादी महत्त्वाच्या वैशिष्ट्यांमुळे भालेरावांची कविता म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाचा जिता-जागता, लढण्यास-प्रवृत्त करणारा बलदंड आविष्कार आहे, म्हणून जागतिकीकरणातील शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाचे धारदार प्रकटन हे भालेरावांच्या कवितेचे बलस्थान आहे.

१९९० नंतरच्या मराठी कवितेतील शेतकऱ्यांचा जीवनसंघर्ष कष्ट आणि उद्रेक, वेदना आणि आत्मभान, शोषण आणि आंदोलन अशा दुहेरी स्तरावर व्यक्त झाला आहे. दया पवारांनी 'सरवा' आणि 'धरण' ह्या कवितांमधून शोषित-दलित स्त्रीची कृषिजीवनाशी निगडित व्यथा मांडली आहे; तर तुळशीराम काजे यांनी राबणाऱ्या, कष्ट करणाऱ्या श्रमिकांच्या व्यथा-वेदनेबरोबरच शेतकऱ्यांची पडझड आणि त्याचे अवमूल्यन ठसठशीतपणे रेखाटले आहे. इतकेच नव्हे, तर त्यांनी 'अन्नदाता भिकेला लागला आणि दलाल खाऊन माजला' हे वास्तव सांगून कृषकाने आता नांगराचे आयुध करून क्रांतिसिद्ध होण्याचा संदेश दिला आहे.

महेश मोरे आणि अनिल पाटील यांची गाव-शिवारातील कास्तकारांच्या वेदना, हाल-अपेष्टा, त्यांची सुख-दु:खे तपशिलाने पण कलात्मकरीत्या रेखाटली आहे. त्याचबरोबर त्यांचे होणारे शोषण आणि त्याविरुद्ध घ्यावयाची भूमिकाही निर्देशित केली आहे. सदानंद देशमुख, प्रकाश किनगावकर, शशिकांत शिंदे, केशव सखाराम देशमुख, भगवान ठग, प्रमोद माने, जयराम खेडेकर यांच्या कवितेतून शेतकऱ्यांचे नाना तऱ्हेचे कष्ट, त्यांची निरनिराळ्या प्रकारची संघर्षरूपे, त्यांचे होणारे शोषण, त्यांच्यावर होणारा अन्याय, त्यांना येणारे आत्मभान अतिशय बारकाव्यांनिशी तपशीलवारपणे तसेच कलात्मकतेने व्यक्त झाले आहे. अजय कांडर यांनी कोकणातील स्त्रीचे दु:ख आणि शोषण, कष्ट आणि समर्पण शब्दबद्ध केले, वसंत पाटलांनी धरणाआधीचे आणि धरणानंतरचे वास्तव आपल्या कवितेतून रेखाटले, शिवाजी मरगीळांनी मराठवाड्यातील 'गावकळा' सांगितली तर विठ्ठल कुलटांनी वऱ्हाडातील 'गावगाळा' साकार केला.

आभाळमाती (शंकर वाडेवाले) आणि आयुष्य नांगरताना (हेमंत कुमार एकनाथ कांबळे) ही दोन दीर्घकाव्ये शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदनांचा, हाल-अपेष्टांचा, प्रश्न-समस्यांचा सर्वांगीण वेध घेणारी आहेत. 'आभाळमाती'मध्ये शंकर वाडेवाले यांनी शेती, शेतकरी आणि त्याची धर्मपत्नी यांच्या परस्पर संबंधांना अष्टाक्षरी रचनाबंधातून मुखरित केले आहे. 'आयुष्य नांगरताना'मध्ये हेमंतकुमार कांबळे यांनी जागतिकीकरणातील नवजागृत शेतकऱ्याचा वर्तमानकाळातील 'साहेबां'शी साधलेला संवाद सादर केला आहे. प्रस्तुत दीर्घ चिंतनकाव्य म्हणजे शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांची तात्त्विक आकलनासह केलेली सूत्रबद्ध मांडणी आहे. शेतकऱ्यांच्या एकूण जीवनाबद्दल मूल्यबधिर आणि संवेदनशून्य असलेल्या समाज व्यवस्थेचा कवीने धारदार शैलीत परखडपणे समाचार घेतला आहे.

जागतिकीकरणाच्या अरिष्टात सापडलेला मध्यम शेतकरी विनाशाच्या कडेवर येऊन ठेपला आहे. टाहो, आक्रोश याशिवाय तो आता काही करू शकत नाही. त्याला तारण्याचे सामर्थ्य आता आषाढीच्या वारीतही उरले नाही. यांत्रिकीकरण, शहरी आक्रमण, जागतिकीकरणामुळे उद्‌भवणारी स्पर्धात्मकता, नापिकी, कर्जबाजारीपणा, पराभूत मानसिकता शेतकरी विरोधी राजकीय धोरण, नफेखोर मुक्त अर्थव्यवस्था यामुळे शेतकरी हतबल झाला. आत्महत्येच्या माध्यमातून स्वत:ला संपविणे या निर्णायक टप्प्यावर तो येऊन पोचलो. शेतकऱ्यांच्या सध्याच्या पिढीची मानसिकता नकारात्मक, निराशवादी बनत चालली. आपल्या पुढील पिढीच्या व्यथावेदनेचे, त्याच्या अपमानास्पद लाजिरवाण्या जगण्याचे आपणच भागीदार आहोत, याची त्याला विलक्षण खंत वाटते. म्हणून तो भयग्रस्त निराशावादी आणि नकारात्मक वृतीचा बनला आहे. त्याची ही असह्य, विपरीत आणि अंतर्यामीची वेदना बालाजी इंगळे अत्यंत समर्थपणे व्यक्त करतो.

पूर्वी-सारखा राहिला नाही बाप
आता राकट, दणकट
आजकाल तो भितो स्वत:च स्वत:ला
पेरण्यासाठी मुठीत घेतलेल्या बियांना
आणि तिफण ओढणाऱ्या बैलांना तो भितो
रिकाम्या आभाळाला तो भितो
आणि भरून आलेल्या ढगालाही तो भितो
तो भितो गवताच्या एक दोन पात्यांनाही
आणि हातात खुरपं घ्यायलाही
भीती वाटते त्याला उगवण-बघतानाही
आणि आलेल्या पिकांची रास करतानाही
बापाच्या या? भीतीचं
मला काही वाटलं नाही
पण मला धक्का बसला
स्वत:च्या सुनेला दिवस गेलेत
हे कळल्यावर आनंदण्यापेक्षा तो भ्याला तेव्हा!

**(वेधांचा प्रदेश, पृ. ५९)**

१९९० नंतरच्या ग्रामीण कवितेचे आणखी एक बलस्थान म्हणजे या कवींनी शेतकऱ्यांच्या शोषणाचा खुलेआम पंचनामा केला आहे. स्वातंत्र्योत्तर



काळातील शासकीय धोरणे शेतकऱ्यांच्या हिताची नव्हती त्यामुळे शेतकऱ्यांच्या वाट्याला व्यथा-वेदना आल्या. व्यापारी दलाल, राज्यकर्ते, अधिकारी आणि प्रस्थापित शेतकऱ्यांचे पद्धतशीर शोषण करतात. 'बळीराजा असे संबोधून शेतकऱ्यांना पाताळात घालण्याची पद्धतशीर योजना आखतात. पाऊस माळावर पडो की मळ्यात, पाणी बरोबर त्यांच्या तळ्यात जमा होते आणि पीक कोठेही येवो, ऊफनणी कशीही केली जावो, रास त्यांच्याच खळ्यात पडते.' हे वास्तव १९९० नंतरच्या कवींनी समजून घेतले आणि त्याचे प्रकटन आपल्या कवितेतून केले. थोडक्यात, शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाची, शोषणाची जाणीव ह्या कवींना आहे. प्रचलित राजकीय-आर्थिक व्यवस्था शेतकऱ्यांची पिळवणूक करीत आहे, याबद्दलची जागृती आता ह्या कुणब्यांच्या पोरांना होत आहे. ते शेतकऱ्यांना ह्याबाबत जागृत, दक्ष करीत आहेत. हे कवी त्याला आता 'लढायला शीक' असे सांगतात. शोषणाची जाणीव, जागृतीची मानसिकता हे या कवींचे बलस्थान आहे.

१९९० नंतरच्या ग्रामीण कवितेत शेतकऱ्यांच्या सृजनाबरोबरच त्याचे शोषण, त्याच्या हालअपेष्टांबरोबरच त्यांच्यावर होणारा अन्यायही चित्रित झाल्याचे दिसून येतो. पण, शेतकऱ्यांच्या समस्यांची पाळेमुळे प्रचलित राजकीय-आर्थिक व्यवस्थेतच दडलेली आहे, याची जाणीव या कवींना झालेली आहे, ती त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्तही केली आहे. आता केवळ 'जीवनसंघर्ष' नव्हे, तर अन्याय-जुलूम यांच्याविरुद्ध लढा या भूमिकेवर हे कवी येऊन ठेपले आहेत. त्याची जाणीव सर्वप्रथम अत्यंत ताकदीने विठ्ठल वाघांनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे. त्यानंतर इंद्रजीत भालेराव हे दुसरे अतिशय महत्त्वाचे नाव आहे. त्याशिवाय नारायण सुमंत, जगदीश कदम, श्रीकांत देशमुख, अनिल पाटील, रमेश चिल्ले, हेमंतकुमार एकनाथ कांबळे, कैलास दौंड, शशिकांत शिंदे, लक्ष्मण महाडिक, सदानंद देशमुख, फ. म. शहाजिंदे, केशव सखाराम देशमुख, जयराम खेडेकर, अनिलकुमार पाटील, संतोष पद्माकर पवार आणि बालाजी इंगळे ही काही महत्त्वाची नावे यासंदर्भात आवर्जून उल्लेख करावी, अशी आहेत.

**संपर्क : ९४२३१५६८१**

# गूढकथा-साहित्याच्या प्रवाहात?

**प्रा. नवनीत देखमुख**

कथा हा वाङ्मयप्रकार सर्वांच्या आवडीचा आहे. लहान मुलांना राजा-राणी, राक्षस, परी, जादू, चमत्कार असले विषय आवडतात. मागील पीढ्यांचं बालपण असल्याच कथा-गोष्टींवर पोसलं गेलं. चांगलं काम केलं तर पुण्य पदरात पडतं. वाईट काम केलं तर शिक्षा मिळते. नकळत या कथा-गोष्टींमधून लहान मुलांना संस्कार मिळत असतात. तारुण्यात प्रेमकथा आवडायला लागतात. मराठी साहित्यात कथा हा वाङ्मय प्रकार महानुभावी यापासून आढळतो. तुकारामांच्या अभंगातूनही एखादी कथा सापडते. कथा की प्रवचन हे सारं कथेला हाताशी घेऊनच पूर्णत्वास महानुभावियांपासून जातं.

कथा, लघुकथा, दीर्घकथा, ललितकथा असे वेगवेगळे संदर्भ घेऊन मातब्बर लेखकांनी कथालेखन केलं. श्री. म. माटे, य. गो. जोशी, सानेगुरुजी, वि. स. खांडेकर यांसारख्या लेखकांच्या कथांना साहित्यात सन्मान प्राप्त झाला. वि. स. खांडेकरांनी तर रूपक कथांमधे मोलाची भर टाकली. काळानुरूप कथा आळोखे पिळोखे देत राहिली. कथा क्षेत्रांमधे नवेनवे प्रयोग लेखक करू लागले. लघुकथा, दीर्घकथा यांचेही प्रयोग सुरू झाले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात खऱ्या अर्थाने कथा वाङ्मय प्रकार बहरून आला. कथेने विषयाची बंधने तोडली. व्यक्तिगत पातळीवर कथा मानवी मूल्यांचा मानवी जीवनाचा वेध घेऊ लागली. मानवी जीवनातले ताणतणाव, संघर्ष, घटना प्रसंगी यासोबतच जीवनमूल्यांशी करावी लागणारी तडजोड मनाच्या, संवेदनांच्या विविध पातळ्या यामुळे कथा विश्व अधिक समृद्ध झालं.

असे असले तरी गूढकथा मात्र दुर्लक्षित राहिली. गूढकथा लेखक हे मागणी तसा पुरवठा करतात त्यामुळे साहित्याशी त्यांचा संबंध येत नाही. बहुधा या धारणेतून समीक्षकांनी टीकाकारांनी गूढकथा नाकारली. परिणामी, वाङ्मयापासून दूर असलेली कथा म्हणून गूढकथांची संभावना झालेली दिसते. साहित्य संमेलने, साहित्यिक चर्चा यांमधूनही कधी गूढकथांची साधी दखलही कधी घेतली गेली नाही. चर्चा तर मग दूरच राहिली.

तसे पाहिले तर गूढकथा हा कथाप्रकार सर्व लोकांना आवडतो. पण, तो तेवढ्यापुरता दिवाळी अंकापर्यंत. गूढकथांची वाङ्मयीन परवड होण्यासाठी आणखी एक कारण आहे. रहस्य कथा, जासूसी कथा, हेरकथा असं एक सर्वसाधारण संबोधन गूढकथेला प्राप्त झालं आहे. गूढकथेची परिमाणं स्पष्ट नाहीत. किंबहुना असे म्हणावे लागेल की साहित्यानं गूढकथा नाकारली आहे. जे सर्व लोकांना आवडते त्याची दखल मग साहित्यामधे का घेतली गेली नाही. वाङ्मयामधे गूढकथेची दखल घेतली गेली असती तर हा कथा प्रकार अधिक समृद्ध झाला असता. पण, गूढकथा लेखन भरभराटीला आलं नाही. आज आमच्यासमोर गूढकथालेखन करणारी किती नावे येतात? जी. ए. कुलकर्णी, रत्नाकर मतकरी, नारायण धारप यांनी गूढकथेत वेगवेगळे प्रयोग केले. पण, वाङ्मयीनदृष्ट्या धारपांचं स्थान काय? रत्नाकर मतकरींच्या गूढकथांखेरिज (मतकरींनी) त्यांनी साहित्याच्या इतर प्रांतात जी मुशाफिरी केली त्यामुळे काही अंशी त्यांची दखल घेणे साहित्यविश्वाला भाग पडले. गूढकथा लेखक हा व्यावसायिक लेखन करतो म्हणून साहित्यातून हद्दपार होतो; असे दिसून येते.

### गूढकथेचे वेगळेपण

मानवी जीवन वेगवेगळ्या आयामाचं आहे. इथं काही गोष्टी संगतवार आहेत तर काही अतर्क्य आहेत. भूत, आत्मा, तंत्र मंत्र या गोष्टी विज्ञानवादी युगात अंध:श्रद्धा समजल्या जाणाऱ्या आहेत. विज्ञानवादी युग पुनर्जन्मालाही मान्य करीत नाही. असे असले तरी उपरोक्त धारणा जनमानसात काही अंशी रुजलेल्या असतातच. विज्ञान तंत्रज्ञान कितीही विकसनशील असले तरी मानवी मनाची निर्मिती करू शकत नाही. गूढकथा मानवी मनाचा वेध घेणारी असते. ते एक प्रकारे मनाचे विविध प्रस्तर



मोकळे करणे, उलगडणे ही गतिमानता गूढकथेत असते. मनाची विविध स्पंदने गूढकथेला आकार देत असतात. आपले कथाबीज आतार्किक वाटू नये यासाठी वास्तवतेचा आधार घेण्याचे कामही गूढकथा करते. या दरम्यान लेखकाची चिंतनगर्भ मनोभूमिका अधिक खोलवर जाण्याचा प्रयत्न करीत असते. लघुकथेप्रमाणे सुरुवात मध्य आणि शेवट ही स्थितंतरे गूढकथेतही असतात. शेवट हा धक्कातंत्राचा वापर करून केलेला आढळतो. जीवनातील अनाकलनीयता अस्वस्थ करणारी असते. या अनाकलनीयतेचं आकलन व्हावं ही भूमिका गूढकथा लेखकाची असते. सर्वसामान्यांच्या दृष्टीला जे दिसत नाही, ते डोळ्यांसमोर उभं करण्याची दृष्टी लेखकाची असते. अफाट कल्पनाशक्ती, जीवनातील चिरंतन शाश्वत मूल्यांचा शोध आणि लेखकाची चिंतनगर्भता गूढकथेला निखळ वाङ्मयीन स्वरूप प्राप्त करून देतात.

मानवी भावविश्वाची भीती ही एक मानसिकता असते. 'भीती वाटणे' ही एक सहज संवेदना आहे. प्रत्येकालाच जीवनात केव्हाना केव्हा कुठेतरी 'भीती' ही वाटलेलीच असते. भीती ही कशाचीही असो. प्रत्येकाने या भीतीचा अनुभव घेतलेला असतो. भीतीजन्य घटना प्रसंगी, या अनुषंगाने निर्माण झालेली विविध भावस्पंदने साकार करणं हे अतिशय कठीण काम आहे. लेखक हे आव्हान लीलया पेलतो. हा लेखक नुसता मानवी भावविश्वातच रमतो अशातला भाग नव्हे. अमानवीय व्यवहारही त्याच्या मन:पटलावर कल्पनाशक्तीने जाणवत असतात. गोचर आणि अगोचर या दोन्ही भावावस्थामध्ये गूढकथालेखकाला प्रवेश करता येतो. ही त्याची अनुभूती तो इतरांनाही आपल्या लेखनाने देत असतो. जीवनात राग द्वेष, सुख दु:ख, मत्सर सूड असल्या भावभावना तर प्रत्येकालाच असतात. या भावनांचं मोठ्या प्रमाणात उद्दीपन होणं गूढतेकडे नेणारं ठरतं. पण, म्हणून गूढकथा ही सूडकथा, रहस्यकथा किंवा भूताखेताची कथा नसते. विविध मानवी भावभावनांचे स्तर मोकळे करण्याचा या कथेचा मानस असतो. चांगलं वाईट, राग द्वेष, प्रेम जिव्हाळा, उत्कटता दुर्बलता या गुणावगुणांची आंदोलनं सारखी हिंदकळत असतात. गूढकथा लेखक या गुणावगुणांचा नव्यानं विचार करून एका वेगळ्या धारणेला आणि प्रवाहालाच जन्म देतो. मान्यता पावलेले रूढ संकेत, रूढ असलेली प्रतिमा प्रतीके यांच्या मुळाशी जाऊन शोध घेण्याची किमया लेखकाची असते. तसेही मानवी जीवनात असंख्य अतार्किक घटना प्रसंग घडत असतात. कधी भ्रम विभ्रम होत असतात, कधी भय नैराश्य ग्रासत असते. मानवी जीवनाची एक विशिष्ट मर्यादा आहे. गूढकथा लेखक या मर्यादेपलीकडे डोकावू शकतो. त्यामुळे वाचकाला अचंबित करण्याचे सामर्थ्य त्याच्याजवळ असते. केशवसुतांची 'झपूर्झा', 'हरपलेले श्रेय' या कविता कुठेतरी अज्ञाताचा शोध घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. बालकवींना देखील स्मशानातल्या चितांचे ज्वाळ काळोखात लवलवतांना दिसतात. मातब्बर लेखककवींना अज्ञाताची, अद्‌भुताची, गूढतेची ओढ काही ना काही अंशी दिसून येते. गूढकथा लेखक या अज्ञातामध्ये, अद्‌भुतामध्ये आणि गूढतेमधे डोकावतो. त्याचा पाठलाग सुरू होतो तो अज्ञात जाणून घेण्यासाठी! अस्पर्श असलेल्या धारणांना हा लेखक स्पर्श करतो. वाचकांसमोर ठेवतो. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांची अज्ञाताचा वेध घेणारी ही कविता इथे बोलकी ठरावी.

नारायणराव हिंडत असतो का रात्री अपरात्री
वाड्यातून अस्वस्थ समंधासारखा.......
की, भासच असावा तसा.....
अखेरच्या क्षणी.....
खूप तडफड झाली होती का त्याची......
तुम्ही त्याचे पाय धरून ठेवले होते म्हणून तुम्हासच खास करून विचारतो,
आणि.....
त्या बंद माडीत काल मध्यरात्री
कोंडलेल्या वाघाची असावी
तशी गुरगुर मी ऐकली
तुम्ही काही ऐकलं कां,
की तोही भासच असावा....

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनाही या गूढतेचा मोह आवरता आला नाही.

काव्यातली प्रसंगी काही लेखकांच्या कथा कादंबऱ्यातील गूढता आम्ही स्वीकारलेली आहे. पण, स्वतंत्र अशा गूढकथेला आम्ही स्वीकारीत नाही. गूढकथांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणारे अभ्यासक नाहीत. कथा, लघुकथा, ललितकथा, दीर्घकथा यांच्यासाठी जे मापदंड आहेत तेच गूढ कथेसाठी आहेत काय? आणि हेच मापदंड असले तर साहित्यामधे या कथांचं स्थान नेमकं कोणतं? इतर कथा प्रकारांना वाङ्मयात जे स्थान आहे ते मग गूढकथेला का नाही?

तसे पाहता गूढकथेला कुठलेही परिमाण नाही. मापदंड नाही. कवितेच्या प्रवाहातून वाहत वाहत तिने स्वत:चे अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. रत्नाकर मतकरी यांच्या 'निवडक गूढकथा' या पुस्तकाला ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांनी फार सुरेख प्रस्तावना दिली आहे. गूढकथेवर भाष्य करणारी ही पहिलीच दमदार प्रस्तावना असावी. गूढकथेकडे होत असलेल्या दुर्लक्षीलेपणावर शांता शेळके यांनी वाचकांचे, समीक्षकांचे लक्ष वेधले आहे. त्या म्हणतात, ''रत्नाकर मतकरींच्या गूढकथांचे स्वागत करायला हवे, ते आणखी एका कारणासाठी! मराठी साहित्यात गूढकथा हा प्रकार दीर्घकाळ बव्हंशी उपेक्षितच राहिलेला आहे. आपल्याकडच्या चांगल्या लेखकांनी देखील याकडे द्यावे तेवढे लक्ष दिलेले दिसत नाही. अनुभवांचे वेगळे अपरिचित आकार शोधणे, गूढतेच्या स्पर्शाने वास्तव आशय अधिक गहिरा व अर्थपूर्ण करणे, त्याला वेगळे परिमाण देणे अशा कितीतरी कलात्मक संभाव्यता व सामर्थ्ये या वाङ्मय प्रकारात आहेत; पण, आपल्या लेखकांनी त्यांचा मागोवा फारसा घेतलेला दिसत नाही.''

कवयित्री शांता शेळके यांनी गूढकथेचं सामर्थ्य मान्य केलं आहे. **'दा विंची कोड'**सारखी कादंबरी-चित्रपट गूढताच शोधत पुढे जाते. वास्तवता आणि गूढता यांचं बेमालूम मिश्रण कादंबरीला जागतिक स्तरावर नेऊन बसवते. मराठी सारस्वतांना गूढकथा लक्ष देण्याजोगी का वाटली नाही याचे आश्चर्य वाटते.

**संपर्क : ८६००६७६५५६**

**अदलाबदल**

आपला 'लोकराज्य'चा नोव्हेंबर २०११ चा अंक मिळाला अंकाची एकूण मांडणी व लेख विचारांना चालना देणारे व विविध विषयांना स्पर्श करणारे आहेत. माझ्या लेखात चित्रकार वासुदेव गायतोंडे यांच्या चित्राखाली 'पिकासो' असे नांव पडले आहे. दुसरे चित्र जे गायतोंडे यांचे नांव घालून छापले आहे ते चित्रकार कै.तय्यब मेहता यांचे आहे.

**-नलिनी भागवत,** मुंबई

# रेटन तं भेटन!

विदर्भाचा अनुशेष (मराठीत ज्याले आपण 'बॅकलॉग' म्हनतो ना थे) कवा भरून निंघण त निंघो बुवा. देवालेबी माहीत नसन. त्याच्या यादीत विदर्भाचं नाव असन असं मले त काही वाटत नाही. साऱ्या ब्रम्हांडाची देखरेख करनं म्हणजे सोपं काम थोडीच हाय. अन् विदर्भाकडं जवा सरकारच पाहत नाही त ईश्वराले एवढी फुरसद भेटत तरी असन का? थो त मेनका, रंभा, उर्वशीतच गुंग असन. एवढे चांगले चेहरे सोडून विदर्भातले चिमले थुत्काडं पाह्यन्यात त्याले कायचा आनंद येनार हाय. बरं त्याचा कारभारही लय मोठा 'आठशे कुशे नवशे पासा, डवऱ्याचा पासा त शेजाऱ्याले पुसा' असा त्याचा 'बारभाई खटला अन् ताल नाही पटला'. त्याच्या झेरॉक्सही भक्कम. ओरीजीनल कोणती हेच नाही समजत. जीथं देवाचं असं तीथं सरकारचं त सुसूच नका 'जंधन कमी अन कन्हारनच जास्त'. घोषणावर घोषणा. अंमलबजावणी कवडीची नाही. कार्यक्रम राबवण्याचा दुष्काळ. 'अटकली कोल्ही अन् भुकुभुकु मेली', विदर्भाची अशी चीतरकथा झाली राजेहो. 'कायच्यात काय अन् फाटक्यात पाय' अस म्हंजे असच घडून राह्यलं. शिक्षण हाये पण नोकरी नाही. धंदा कराव त भांडवल बेपत्ता. शेती वहाव त उत्पन्न गायब. सांगाचा मतलब चने हाय त दात नाही अन् दात हाय त चने नाही.

ब्रम्हांडात पृथ्वी, पृथ्वीत आशिया, आशियात भारत, भारतात महाराष्ट्र अन् महाराष्ट्रात विदर्भ अशी घसरकुंडी हाय. मले एकानं एकडाव प्रश्न विचारला होता का जगात जर्मनी, भारतात परभनी त विदर्भात काय? म्या म्हनलं वर्गणी! ज्याची म्हनान त्याची एका माणसानं त कमालच केली. त्यानं पह्यले दहा दहा रुपये वर्गणी मांगतली. आम्ही कां कुं न करता देली. काही दिवसानं शंभर शंभर मांगाले आला. म्या म्हनलं थे कायची होती अन् हे कायची हाय त. थो बेसरमासारखा म्हने हे सांस्कृतिक कार्यक्रम कराची अनं थे होती हे वर्गणी वसूल करासाठीची वर्गणी या वसुलीसाठी लागनारा खर्च वसूल व्हाव म्हणून मांगतली. नाही त मी काय पदरचे पैसे करू काय म्हने. आत्ता बोला. झाला ना जांगळबूत्ता.

गंमतीची गोष्ट सोडा. विदर्भाचा बॅकलाग शिल्लक हाय थो हायेच. निसर्गानं मोठ्या नद्या नाही देल्या. पहाडं नाही देले. थे जावू द्या मोठे मोठे मानसं इथं जन्म घ्याले जसे काय घाबरले. कोणता नेता नाही का अभिनेता नाही. कोणती मल्लीका शेरावत नाही का विद्या बालन नाही. एकदम ऊलाला ऊलालाच कराची घडी. प्रयत्न त भरपूर झाले असतीन, वेळेवर लागवड केली असन. व्यवस्थित मशागत म्हनजे निंदन डवरन झालं असन. पण झाडाले बहर काही आला नाही, फळ काही धरलं नाही. आम्ही आपले


## डॉ. मिर्झा रफी अहमद बेग


वाटच पाहून राह्यलो. 'रातभर जागली पन हाती नाही लागली'. 'अडान्याचं फेरनं अन् कवलाचा धिंगाना'च सारा.

विदर्भात संत मात्र भरपूर. ज्या जमिनीत तनाशिवा दुसरं काही उगवत नाही तिथं गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, शेगावचे गजानन महाराज, इतकच काय पन यवतमाळ जिल्ह्यात धनज माणिकवाडा या माह्या छोट्याशा जन्मगावातले संतश्रेष्ठ श्री फकिरजी महाराज. सारी विदर्भ भूमी याहिच्यानं पावन झाली. मा जिजाऊंच सिंदखेड राजा अन् रूखमीनीचं कौंडण्यपूर हे माहेरही विदर्भात. ईतकच नाही त पुण्या मुंबईतल्या बऱ्याच लोकांच सासरही इथच. मग त्याहिले नाक दाबून अंधामंधात विदर्भात याच लागते. 'अटकली खुटी त जाशीन कुठी' आमालेबी त्याहीचं आगत स्वागत करा लागते. पदरी पडल्याच्यानं पवित्र झालं दुसरं काय?

तसा त भारतच कृषीप्रधान हाय. विदर्भात त शेतीशिवाय दुसरं काही दिसतच नाही. भारत कृषीप्रधान ठरला कसा याची बी एक गंमत हाय. युनोमध्ये असं ठरलं का ज्या देशात जास्तीत जास्त शेतकरी आत्महत्या करतीन त्या देशाले कृषीप्रधान हे पदवी द्याची. भारताच्या प्रतिनीधीनं थे सिद्ध केलं अन् भारताले कृषीप्रधान हे उपाधी भेटली. मंग काय शेतकरी चेकाळले. भारताचं कृषीप्रधानपद हिसकल्या जावू नये म्हून त्याहीनं जो आत्महत्या कराचा सपाटा लावला का ज्याचं नाव थे. नापिकी झाली कर आत्महत्या. कर्ज झालं टाक विहीरीत ऊडी. घे फाशी, पे एन्डोसल्फान. झोप रेल्वेखाली. कसंही कर पण दे जीव. हे फक्त विदर्भाच्या शेतकऱ्यानं केलं. उरल्या मराठी प्रदेशानं नुसती मजा पाह्यली. तरीबी उसाच्या शेतकऱ्याले सबसीडी. अन् विदर्भाच्या कापूस पिकविणाऱ्याले पे बीडी, अन् खेय सापसीडी. 'मेहनत करे मुर्गा अंडे खाय फकिर' पुन्हा जांगळबूत्ता पुन्हा बॅकलाग.

आम्ही विदर्भाचे लोकं तरी समाधानी हाव. असल्याचा आनंद नाही का नसल्याचं दुःख नाही. ठेविले अनंते ही आमचेवाली भूमिका. जास्त तपलीफ घ्याची नाही जीवाले तरास द्याचा नाही. एका भाषेत सुखाची दुखात टाकाची नाही. पलंग टाकून बसाचं. आली हरिले कीव तं देईन आणून नाही त तशीच द्याची ताणून. टाके तुटेपर्यंत धावूनही जर पदरात गोटेच येत असन त उदरात काटे भरावच कायले. त्यापेक्षा कांदा भाकर खाची अन् अख्या गावाले आयकू जाईन अशी ढेकर द्याची. म्हणून आमाले जास्त श्रम कराची सवय नाही. कोरडवाहू शेती असल्याच्यानं मोजून सहा मह्यने काम. एक डाव उलंगवाडी झाली का टाकला खांद्यावर शेला का रीकामटेकडेपणा सुरू. पावसाया ये पर्यंत फुरसद नाही. पाऊस आला का खांद्यावरचा शेला काढाचा अन् तीथ तुत्या ठेवाचा तो पर्यंतचा टाईमपास कुठं कराचा त जमन तसा. वाटन तीथं. अर्थशास्त्रात हा नापास. इतिहासात फेल. गणितात इतका कच्चा का याले जर विचारलं गुणीले का भागीले? त हा म्हनन दोघीले. म्हणजे सारी बोंबच बोंब. आमच्या गावचा रामदास तर लय वस्ताद. एकदम वल्ली. 'महादेवले द्याचं नाही सहादेवचं घ्याचं नाही' असा त्याचा स्वभाव. जवा पाह्यलं तवा थो बाजीवरत झोपला दिसे. बाजही मोडकी अन् दोऱ्याही तुटलेल्या. एका जनानं त्याले म्हटलं का लेका कमाई कर, पैसे जमव, घर बांध, सहा बाय सहाचा पलंग बनव त्यावर मुंडाहात गादी टाक अन् मंग आराम कर. त हा बेसरम म्हने का एवढं सारं करूनबी जर आरामच कराचा त आताही मी आरामच करून राह्यलो. केला लेकानं जांगळबूत्ता असे एकेक नग आमच्या विदर्भात हाय.


पण आमचं दुखनं वेगळच हाय. आता थेच सांगतो. नाहीत तुमी म्हणान का हे नमनाआंधीच घडाभर तेल लावून राह्यला. या महागाईत चमचाभर तेल भेटत नाही घडाभर तर दुरची गोट झाली. त गोष्ट सुरू होती विदर्भाच्या बॅकलागची. थो कसा भरून निंघन? कोणाच्यानं निंघन? मंधात काही लोकाहीनं



धस्कट काढलं का विदर्भ वेगळा झाल्याशिवाय काही प्रगती होत नाही. मोर्चे, संप, उपोषन सुरू झाले. कोनी म्हने असा कसा देत नाही? कोनी म्हने घेतल्याशिवाय राहत नाही. मोर्चा सुरू झाला वेगळ्या विदर्भाचा पन पुढं पुढं त्याच्यात ज्याजे जे जे मांगाच होतं थे थे घुसले. मंग त एकच कल्लोय झाला. कोण काय बोले अन् कोण काय आयके सारं डोक्यापलीकडचं झालं. एक म्हने विदर्भ वेगळा, तर दुसरा म्हने कापसाले भाव. तिसरा म्हने धरनाचे पैसे, चवथा मांगे मरणाचे पैसे. मोर्चाचं रूपांतर सभेत झालं एकेक शूरवीर भाषण द्याले लागला. जसं काय धरन फुटलं. मुंहमे आया बक दिया, ‘तालाले ताल नाही अन् हालाले हाल नाही’ वेगळा विदर्भ राह्यला बाजूले अन् सचिनच्या शंभराव्या शतकासाठी शुभेच्छा देऊन लोकं घरी गेले. विदर्भ राह्यला जाग्यावर. नागपूर राजधानी काही झाली नाही. झाला जांगळबुत्ता बॅकलाग पुन्हा बॅकफुटवर.

म्या एकडाव असाच वेगळ्या विदर्भाचा सर्वे केला. सखारामले पुसलं वेगळ्या विदर्भाबद्दल तुहं काय मत हाय? त थो म्हने वेगळा विदर्भ म्हंजे काय हेच मले समजत नाही. अरे म्हनलं हा त पह्यलीतच हाय. मंग बकारामले विचारलं वेगळा विदर्भ पाह्यजे का नाही? त थो शायना म्हने विदर्भ म्हनजे काय, हे पह्यले सांग. मेला रे म्हनलं मानूस. हा आंड्यातूनच नाही निंघाला त बांग कवा देईन. शेवटी गेलो तुकाराम म्हाल्याकडं म्हंजे सलूनवाल्याकडं. कोनाची तरी थो कटिंग करून राह्यला होता. तोंडाचा पट्टा मशीनीवानी सुरू. म्या त्याले म्हनलं तुकारामभाऊ वेगळ्या विदर्भाबद्दल तुहं काय मत हाय? विदर्भ महाराष्ट्रात राह्यला पाह्यजे का अलग झाला पाह्यजे? कैची संग तोंडबी सपासप चालवत त्यानं उत्तर देलं, आम्ही त्याले बोलकं वर्तमानपत्र म्हनो. त्यानं अशी काही भैरवी आयकवली का आठ दिवस माहे कान भन्न झालते. थो म्हने विदर्भ वेगळा झाला काय अन् महाराष्ट्रात राह्यला काय मी आत्ताही भादरतो अन् नंतरही मले भादराचच काम राहीन ना? मंग माह्या नशिबात मरेलोक वस्तराच राहत असन त राहेना विदर्भ कुठंही मी कायले मंधामंधात भादर भादर करू? सांगा आता काय बोलता अशा ईबलीसासंग!

आमी विदर्भाचे लोक वयले त सुत नाही त भूत. प्रेमात कंबरेचं सोडून देतो. रागात सोडून घेतो. आमचे पोट्टे म्हातारपनात आमाले लाथा मारते तरी आमी काही बोलत नाही. जवानीत आमीबी कोणाच्या बापाचं आयकलं नाही. मंग जिथं कोनतं धोरनच नाही, नुसतं घोरनचं असल्यावर, विदर्भाच्या बॅकलागच्या गोष्टी करनं म्हनजे लंगड्यानं पृथ्वी प्रदक्षीना करण्यातलाच प्रकार झाला ना. आमी त देवगायीवानी आशाच सोडली होती. पण झाला भाऊ चमत्कार. प्रत्येकाचा एक दिवस येत असतो. चंद्रपुरात साहित्य संमेलन होणार हाय असं ऐकलं अन् आमची आशा कुबीरलीं अपेक्षेले दिवस राह्यले. आमचा रामदास त समजे का शेतीच्या साहित्याचच संमेलन आहे. एक कुदय पावडं मलेही आनचं हाय हाय म्हने. म्या म्हनलं बह्याडा कुठंही दांडा नको घालू, असं संमेलन दरवर्षी होत असते. साहित्यिक कमी अन् खर्च जास्त. नाक लहान नथ मोठी, श्रोते कमी कवी आंगभर. ज्याले साहित्यातलं कयते त्याची मजा. सामान्यासाठी त घोडं मेलं ओझ्यानं अन् शिंगरू येरझारीनं. संमेलनात दरवर्षी ठराव घेतल्या जाते. विधेयकच पास होते म्हनाना. (यंदा लोकपाल विधेयक पास होणार अशी बातमी हाय). बेळगाव महाराष्ट्राले जोडा याची त दरवर्षीच उजळनी असते. यंदा त्याच्यात वेगळ्या विदर्भाचा म्हंनजे विदर्भाच्या बॅकलागचा ठराव घ्याचा अन् द्याचा वर पाठवून. आमची पोटदुखी या वेळी नक्कीच शांत होईन. अन् समजा विदर्भ वेगळा झाला त बॅकलाग खतम होईन असं तुमाले वाटते का? मले त नाही वाटत. एका घराचे दोन घरं, भिकाऱ्याचं झालं बरं. आता मुंबईवाले मजा करते उद्या नागपूरवाले करतीन. एकडाव का फुल मंत्रालय नागपुरात आलं त लोकं उठले सुटले नागपुरात. तिथले लॉज, हॉटेल, नात्या गोत्याहीचे घरं दारं धो धो नाल्यासारखे वाह्यतीन. अथरलं घोंगडं पसरले पाय आता काहून म्हनतं मेली वो माय, अशी अवस्था होईन. मंग उरल्या विदर्भाचा बॅकलाग तयार होईन. मंग त्याहीचे आंदोलन सुरू. द्या वेगळा वऱ्हाड. अकोलेवाले तुपानं धुतीनं बाकीचे गोट्यान पुसतीन. शेवटी बॅकलाग काही संपणार नाही. रेटन त्याले भेटन हेच तत्त्व खरं ठरन. त्यासाठी आंगात ताकत, डोक्यात युक्ती लागन. तूप खा लागन पन म्हशीचं नाही गावरान गाईचं. पण थे सापडन कुठी? गावातून तर लोकच पसार झाले. गाई बैलाची त गोष्टच सोडा.



**संपर्क : ९४२३४३४३५०**



# सारेच दीप मंदावले आता...

**नरेंद्र लांजेवार**

वाचन, लेखन, चिंतन आणि प्रबोधनाची महाराष्ट्राला एक परंपरा लाभली आहे. स्व. यशवंतराव चव्हाणांसारखे सुसंस्कृत राजकीय नेतृत्व महाराष्ट्राच्या उभारणीत महत्त्वपूर्ण ठरले होते. याच यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा वसा आणि वारसा सांगणाऱ्या अनुयायांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक नेतृत्वाला किती संकुचित केले ते साहित्य-कलेच्या सवतेसुभ्यावरून दिसू लागले आहे. साहित्य-कला-संस्कृतीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या साहित्य संस्थांनी महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व ज्या कल्पकतेने करावयास पाहिजे होते, त्यामध्ये या साहित्य संस्थांना अपयश आलेले आहे. पन्नास वर्षाच्या कालखंडात महाराष्ट्राचा चेहरा सांस्कृतिकदृष्ट्या का उजळून निघू शकला नाही? याला साहित्य-कलेच्या क्षेत्रातील कार्य करणाऱ्या संस्था-संघटना, त्यांचे पदाधिकारी तथा त्यांचे सहानुभूतीदार सुद्धा जबाबदार दिसतात.

साहित्य संस्थांमध्ये आज साचलेले गढूळपण प्रखरतेने दिसून येते. साहित्यिक वाङ्मयीन उपक्रमांपेक्षा साहित्य संस्थांमधील आपले पद आणि आपल्या चेल्याचपाट्यांची वर्णी लावण्यातच अख्खी हयात खर्ची करणारे काही पदाधिकारी बघितले तर साहित्य संस्था कोणत्या व्यापक उद्देशाने स्थापन झाल्या होत्या, याची जाणीव ना या साहित्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना, ना साहित्याच्या नावावर राजकारण करणाऱ्यांना!

अखिल भारतीय प्रादेशिक साहित्य संस्थांच्या एकूणच व्यवहाराबाबत नाक मुरडणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पण लोकशाहीच्या माध्यमाने या साहित्य संस्थांच्या कारभारात क्रीयाशील सदस्य न होता बाहेरूनच गोटे मारणाऱ्यांची संख्या वाढली आहे. खरंतर आजच्या या प्रस्थापित साहित्य संस्थांचा कारभार सुरळीत नाही, असे म्हणणाऱ्यांनी स्वत: पुढाकार घेऊन तो कारभार कसा आदर्शवत राहू शकतो हे दाखवून देणे जास्त महत्त्वपूर्ण आणि कसोटीचे आहे. जोपर्यंत अशा कसोटीवर स्वत:ला सज्जन म्हणवून घेणारे उतरणार नाहीत तोपर्यंत प्रस्थापित साहित्य संस्थांना विरोध करणे म्हणजे फक्त वांझोटाच संघर्ष राहणार आहे.

नुकतेच महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे झाले. सोबतच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सुद्धा सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे झाले. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ ही चार प्रादेशिक साहित्य संस्थेने एकत्र येऊन उभी केलेली शिखर संस्था आहे. यामध्ये मराठी साहित्य परिषद पुणे, मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद, विदर्भ साहित्य संघ नागपूर, मुंबई मराठी साहित्य संघ मुंबई या चार संस्था अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या मुख्य घटक संस्था आहेत. आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, गोवा आणि छत्तीसगड येथील एक-एक समाविष्ट संस्था आणि बडोद्याची एक संलग्न संस्था ह्या महामंडळासोबत आहेत. आज महाराष्ट्राच्या प्रशासकीय विभागानुसार विचार केला तर कोकण विभाग, नाशिक आणि अमरावती विभागासाठी स्वतंत्र साहित्य संस्था दिसत नाहीत. पुणे विभागासाठी स्थापन झालेल्या मराठी साहित्य परिषदेचे वर्चस्व मुंबई शहर वगळता संपूर्ण कोकण, खान्देश आणि नाशिक विभागापर्यंत १४ जिल्ह्यांमध्ये विस्तार दिसतो. औरंगाबादच्या मराठवाडा साहित्य परिषद संपूर्ण मराठवाड्यात आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर संपूर्ण विदर्भात शाखा आहेत. मुंबई मराठी साहित्य संघाची मुख्य शाखा वगळता एकही शाखा नाही.

आज अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या घटक संस्था आणि संलग्न संस्था एकत्र केल्या तरीसुद्धा शंभरपेक्षा जास्त शाखा दिसत नाहीत. अनेक शाखा फक्त कागदोपत्री आहेत. पस्तीस जिल्ह्यांमध्ये विस्तारलेल्या बारा कोटीच्या महाराष्ट्रात एक लाख लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असणारे तिनशे अठ्ठावन्न तालुके आहेत. खरतर एक लाख किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या गावात चांगल्या पद्धतीच्या साहित्य संस्था असावयास हरकत नाही. परंतु आज ज्या स्वत:हून संपूर्ण महाराष्ट्रात आम्हीच वाङ्मयीन नेतृत्व करीत आहोत अशी शेखी मिरवितात, त्या अखिल भारतीय तथा विभागीय घटक साहित्य संस्था फक्त काही शहरांमध्येच अस्तित्व टिकवून आहेत. ही परिस्थिती खरोखरच आत्मचिंतन करण्यासारखी आहे.

आज पन्नास वर्षाच्या कालखंडात ठिकठिकाणी स्थानिक पातळीवरचे नेतृत्व पुढे येऊन साहित्य - कला-संस्कृतीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांची एक नवीन पिढी दिसू लागली आहे. या नवीन नेतृत्वाला जुन्या संस्थांचे झेंडे खांद्यावर घेण्याची इच्छा नाही. आपापल्या परिने आपापल्या परिसराची वाङ्मयीन भुख भागविण्याचे काम स्थानिक साहित्य संस्था चांगल्या पद्धतीने करीत आहेत. काही स्थानिक पातळीवर वाङ्मयीन प्रेमी एकत्र येऊन अभिरूची संपन्न अशी वाङ्मयीन नियतकालिके प्रकाशित करीत आहेत.

तत्त्ववेत्ता खलील जिब्रान ज्याप्रमाणे म्हणतो की, की जिथले कलावंत जनतेच्या क्षुद्र वासना पेटविण्याचाच उद्योग करतात-त्या राष्ट्राची कीव करा. आज वाङ्मयीन-सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्राची थोड्याफार प्रमाणात अशीच अवस्था झाली आहे. मराठी भाषेचा मिथ्या अभिमान बाळगून, विविध छोट्या-मोठ्या पुरस्कारांची खैरात करून, चांगल्या लेखन करणाऱ्या लेखकांना संपविण्याचे काम स्थानिक राजकारणी आणि पुरस्कार वाटणाऱ्या साहित्य संस्थांनी सुरू केले आहे. कोणत्याही सामान्य कलाकृतीची उंची अतिशय फुगवत न्यायची आणि त्या कलाकृतीच्या लेखकाची तुलना सरळ मर्ढेकर, केशवसूत, कुसुमाग्रज यांच्यापर्यंत नेऊन ठेवण्याचा प्रताप सध्या सुरू आहे. इतर कोणत्याही राज्यात महाराष्ट्रासारखे गल्ली-बोळातून पुरस्कार दिले जात नसतील. महाराष्ट्रात रोज डझनावरी पुरस्कार वाटल्या जात असल्यामुळेच कुवत नसणारेही रातोरात लेखकराव होतात! इतर भाषांमधील ज्ञानपीठची संख्या आणि मराठीतील ज्ञानपीठची संख्या बघितली तर खरोखरच आपल्या मराठीतील लेखकांच्या अनुभवांची उंची का वाढत नाही याची प्रचिती येते.

आजच्या समकालीन विषयांना बगल देऊन मराठी साहित्यातून विनोद हद्दपार होत आहे का? किंवा आजच्या महिला नेमकं काय वाचतात? अशा



पांचट आणि पोचट विषयांवर चर्चा करण्यातच साहित्य संस्था धन्यता मानतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, लवासा प्रकरण, शेतकऱ्यांवरचा गोळीबार, खैरलांजी, वाढती बेरोजगारी, अण्णा हजारेंचे, मेधा पाटकरांचे आंदोलन आणि साहित्यिकांची भूमिका अशा वास्तवपूर्ण समस्यांवर साहित्यसंमेलनांच्या व्यासपीठावर ब्र सुद्धा निघत नाही.

गटातटामध्ये विभागलेल्या साहित्यिक-लेखकांमध्ये एकमेकांची आम्ही कशी जिरवली, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निवडणूकीत याला कसं पाडलं... त्याला जीवनव्रती पुरस्काराने सन्मानीत केले, याला साहित्य अकादमी नाही मिळू दिली, त्याला पुढच्यावर्षी विश्व साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचे गाजर तर दुसऱ्याला महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी शिफारस किंवा साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी वर्णी अशी लालूच थोरामोठ्यांना साहित्य संस्थांचे पदाधिकारी दाखवित असतात.

महाराष्ट्रात एक लक्ष लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या तीनशे अठ्ठावन तालुक्यांमध्ये या प्रादेशिक साहित्य संस्थांचे जाळे हवे होते. आज महाराष्ट्रात शंभर पेक्षा जास्त तालुक्यांमध्ये नावालाही या संस्थांचे अस्तित्वच नाही. मुंबई-मराठी साहित्य संघ यांची एकमात्र शाखा मुंबईला आहे. त्यांची सभासद संख्या सतराशेच्या घरात आहे. पुण्याच्या मराठी साहित्य परिषदेचे कार्य चौदा जिल्ह्यांमध्ये विखुरलेले असून त्यांच्या फक्त सत्तावीस शाखा आहेत व नऊ हजार सभासद आहेत. मराठवाडा साहित्य परिषदेच्या सव्वीस शाखा व तीन हजार सभासद आहेत. विदर्भ साहित्य संघाच्या पासष्ट शाखा व सहा हजार पाचशे सभासद आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्राचे नेतृत्व करणाऱ्या या चार साहित्य संस्थांच्या शिलेदारांची आजीव सभासद संख्या बारा कोटीच्या महाराष्ट्रात फक्त वीस हजार दोनशे व एकुण शाखांची संख्या फक्त एकशे सहाच्या आसपास आहे. या शाखांमध्येही जास्तीत जास्त फक्त पंचवीस-एक शाखाच खऱ्या अर्थाने कार्यरत आहेत, बाकी फक्त कागदोपत्री!

नवे वाचक घडविण्याचे काम शाळा-शाळांमधून, सार्वजनिक ग्रंथालयांमधून, साहित्य-कला-संस्कृतीच्या संस्थांमधून आजतरी बंद आहे. वाचन संस्कृती मंदावते आहे, आजचा युवक साहित्यापासून दूर जात आहे, यावर फक्त गळे काढण्याचेच काम साहित्य संस्था करीत आहेत. पण ग्रंथालयांचे प्रश्न सुटले पाहिजेत, यासाठी साहित्य संस्था रस्त्यावर उतरतांना दिसत नाहीत.

महाराष्ट्रात पदवीपर्यंत सर्वांना पूरक वाचनमाला अनिवार्य केल्याशिवाय वाचनसंस्कृतीला चांगले दिवस येणार नाहीत. यादृष्टीने महामंडळाने खरतर प्रयत्न करावयास हवे. परंतु ही मागणी ना विद्रोही साहित्य संमेलनवाले, ना ग्रामीण ना आंबेडकरवादी उचलून धरतात, ना महामंडळाला अशा काही वेगळ्या उपक्रमात विशेष रूची वाटते. उद्याचा वाचक घडला पाहिजे यासाठी या वाङ्मयीन संस्थांकडे उपक्रमच नाहीत, हेच सत्य!

मी स्वत: या वाङ्मयीन घटक संस्थांचा तथा अखील भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा सक्रीय सदस्य या नात्याने आजरोजी चालणारा कारभार जवळून बघितला असल्याने या वाङ्मयीन संस्थांच्या घटक संस्थांमध्ये वाङ्मयीन उपक्रमांबाबत खरच गांभीर्य दिसत नाही. जाण्यायेण्याच्या प्रवासभाड्यांबाबत चालणारे रुसवे-फुगवे, शह-कटशहांच्या राजकारणात कोण कोणावर कशी मात करतो, याबाबतच अधिक गांभीर्याने घेतांना दिसतात!

आजरोजी साहित्याच्या घटक संस्थांना स्थानिक पातळीवर पर्याय उभे झालेले असतांना सुद्धा शासकीय मदतीमुळेच प्रस्थापित संस्थांची मिरासदारी टिकून आहे. काम करणाऱ्या प्रत्येक छोट्या-मोठ्या साहित्य संस्थांना शासनाचे अनुदान जर मिळत गेले तर प्रस्थापित साहित्य संस्थांची मिरासदारी कमी होईल. आज अखिल भारतीय स्तरावरचे व राज्य-विभाग स्तरावरचेही तीस ते पस्तीस साहित्य संमेलने महाराष्ट्रात दरवर्षी होतात. गुराखी साहित्य संमेलनापासून बंजारा साहित्य संमेलनापर्यंत, दलित साहित्य संमेलनापासून विद्रोही साहित्य संमेलनापर्यंत विविधांगी संमेलने होत आहेत. पण या विविधांगी साहित्य संमेलनांना शासन आर्थिक्र सहकार्य करतांना दिसत नाही.

आज अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाजवळ संमेलनासाठी उभा केलेला पंच्याहत्तर लाखांपेक्षा जास्त निधी आहे. हा निधी एक कोटीच्या घरात गेल्यावरच त्याच्या व्याजातून अखिल भारतीय संमेलने शासकीय मदतीविना घेण्याचा विचार महामंडळाचा आहे. परंतु निधी एक कोटीच्या घरात होत नाही व जमा झालेल्या निधीवरील व्याजावर इन्कम टॅक्स भरावा लागतो, अशी कोंडी आज महाकोषाची झाली आहे. एक कोटी रूपये उभे झाल्यावरही त्याच्या व्याजातून अखील भारतीय स्तरावरचे साहित्य संमेलनांचे आयोजन होणे ही अशक्य बाब आहे. तरी मग एक कोटी रूपये जमा करण्याचा महाकोषाचा अट्टाहास का? हा प्रश्नही कोणाला पडत नाही.

महाराष्ट्रातील साहित्य संस्थांनी काय दिवे लावलेत? व वाङ्मयीन निकोप वातावरणासाठी काय प्रकाश पाडला? गावोगावी साहित्य संस्था उभ्या करण्यात का अपयश आले? युवक साहित्यापासून का दूर जात आहेत? याची परखड कारणमिमांसा होणे गरजेचे आहे. आजच्या साहित्य संस्था ह्या खुर्ची बचाव पवित्रा घेणाऱ्या संस्थाधिपतींच्या हातच्या बाहुल्या झाल्या आहेत.

प्रत्येकाने आपापल्या कुवतीप्रमाणे स्थानिक पातळीवर छोटे-मोठे वाङ्मयीन उपक्रम सुरू केले तर उद्याचा महाराष्ट्र हा निश्चितच सुसंस्कृत तथा वाचन-लेखन-चिंतन करणाऱ्या समुदायाचा असेल.

**संपर्क : ९४२२१८०४५१**

**अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या वतीने दरवर्षी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडल्या जातो. आज यासाठी सातशे एक्यानऊ मतदार आहेत. त्यामध्ये पूर्वाध्यक्ष बारा, महाकोषाचे विश्वस्त मंडळ नऊ, नागपूर-पुणे-मुंबई-औरंगाबाद चार घटक संस्थांचे प्रत्येकी एकशे पंचवीस मतदार, आंध्रप्रदेश-कर्नाटक-मध्यप्रदेश-गोवा आणि छत्तीसगड या पाच समाविष्ट संस्थांचे प्रत्येकी चाळीस मतदार, बडोद्याच्या एका संलग्न संस्थेचे दहा मतदार व संमेलन घेणाऱ्या निमंत्रक स्वागत समितीचे साठ मतदार असे फक्त एकूण सातशे एक्यानऊ मतदार मतदानाचा हक्क बजावतात. लवकरच महामंडळाची घटना दुरूस्ती होऊन चार घटक संस्थांचे प्रत्येकी एकशे पंचवीस ऐवजी एकशे पंच्याहत्तर आणि समाविष्ट संस्थांचे चाळीसवरून साठ सभासद करण्यात येणार आहेत. म्हणजे पुढच्यावर्षीपासून (२०१२) नऊशे एक्यानऊ मतदारांना अ.भा.म.साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडण्याचा हक्क मिळणार आहे. आज महाराष्ट्रात एक लाखाच्या घरात लेखक-साहित्यिक-कवी असतांना अवघ्या एक हजार मतदारांना आपल्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडण्याचा हक्क बहाल होतो - ही साहित्यिक लोकशाही अजूनही बाल्यावस्थेत आहे, ती केंव्हा वयात येणार? हा खरा प्रश्न आहे!**



# सर्व प्रवाहांना सामावून घेते का?

अखिल भारतीय पातळीवर होणारे मराठी साहित्य संमेलन हे केवळ वाड.मयाच्या दृष्टीनेच नाही तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दृष्टीनेही महत्वाचे आहे. या निमित्ताने साहित्यिक चर्चा तर होतातच, पण मोठा ग्रंथ खरेदीचा व्यवहारही घडतो. अनेक ठिकाणी काही कोटीच्यावर ग्रंथ खरेदी झाल्याची उदाहरणे आहेत. वाचन संस्कृतीचा विकास होण्याच्या दृष्टीने साहित्य संमेलनांचा नक्कीच उपयोग होतो.

साहित्य संमेलनामध्ये केवळ साहित्यासंबंधीच चर्चा होतात, असे नाही. पुष्कळदा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांवरही चर्चा होतात आणि या चर्चा समाजाला एक नवे भान देण्याचे कार्यही करीत असतात. क्वचित राजकीय प्रश्नांवरही चर्चा होतात. समाजातील महत्वाच्या प्रश्नांबद्दल चर्चा होतात. उदा. बेळगावला जेव्हा साहित्य संमेलन झाले तेव्हा भाषावार प्रांतरचना आणि कर्नाटकातील मराठी भाषिक यावर मोठे विचारमंथन झाले. परिणाम स्वरुपी महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी खटला दाखल केला. सर्वोच्च न्यायालयात जो निर्णय लागेल तो लागेल. परंतु सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचे एक महत्वाचे पाऊल मात्र महाराष्ट्र शासनाने उचलले, ते बेळगाव येथे झालेल्या साहित्य संमेलनामुळे हे मात्र उघड आहे.

याचा अर्थ असा की, साहित्य संमेलनामध्ये साहित्याबरोबरच समाजाच्या ठसठसत्या प्रश्नांवर चर्चा होते, होऊ शकते. आणखी एक विशेष म्हणजे अशा प्रकारचे अखिल भारतीय साहित्य संमेलन भारतातील इतर भाषांमध्ये फार क्वचितच होते हे महाराष्ट्राचे वेगळेपण आहे. गौरवाची गोष्टही आहे.

आता अशा एका महत्वाच्या साहित्य संमेलनामध्ये सर्व साहित्य प्रवाहांना स्थान मिळते का ? हा प्रश्न नेहमीच उपस्थित केला जातो. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी काही बाबी समजून घेणे गरजेचे आहे. त्यातील प्रमुख बाब म्हणजे हे संमेलन आयोजित करण्यामध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ महत्वाची भूमिका पार पाडत असते. म्हणजे संमेलनाचे स्थळ ठरविणे, परिसंवादाचे व इतर कार्यक्रमांचे नियोजन करणे या बाबी महामंडळाच्या वतीने होतात. हे महामंडळ म्हणजे महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील मराठी साहित्य संस्थांच्यामधील पदाधिकाऱ्यांचे बनलेले असते. त्या त्या साहित्य संस्थांच्या निवडणुका होतात आणि महामंडळाचे पदाधिकारी बदलत राहतात. त्यामुळे महामंडळाचे पदाधिकारी साहित्यासंबंधी काय विचार करतात, त्याचे प्रतिबिंब साहित्य संमेलनामध्ये उमटत असते. पदाधिकारी बदलले की कार्यक्रमांचे स्वरुप बदलण्याची शक्यता असते. त्यामुळे साहित्य संमेलनाचे रुप सतत बदलत असते.

आणखी एक महत्वाची बाब म्हणजे दरवर्षी वेगवेगळ्या गावी साहित्य संमेलन होते. महामंडळाला आपले कार्यक्रम ठरवीत असताना त्या

**डॉ. नागनाथ कोत्तापल्ले**

त्या गावच्या स्वागत मंडळाच्या भावना आणि कल्पना समजून घ्याव्या लागतात. प्रत्येक गावाच्या स्वभावाप्रमाणे कार्यक्रम बदलत जातात. अर्थात संमेलन कुठेही असले तरी महामंडळ आणि संमेलन स्थळीचे स्वागत मंडळ महाराष्ट्रभराच्या आणि बृहन् महाराष्ट्राच्याही सारस्वतांना संमेलनामधून स्थान देण्याचा प्रयत्न करते. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागातील लेखक, कवी, अभ्यासक कसे सहभागी होतील ते पाहिले जाते. महाराष्ट्राबाहेरील साहित्यिकही सहभागी होतात.

या सर्वांचा अर्थ असा की, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ही गोष्ट असंख्य लोकांच्या सामूहिक प्रयत्नातून साकार झालेली गोष्ट असते. शिवाय ते सर्व समावेशक करण्याचा प्रयत्नही केला जातो. त्यामुळे होते असे की, सर्व नव्या प्रवाहांना एकाच संमेलनात सामावून घेतले जाण्याची शक्यता धूसर होत जाते. वेगवेगळ्या कार्यक्रमात वेगवेगळ्या प्रवाहातील लेखकांना निमंत्रित केले जाते. म्हणजे कवी संमेलनात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी कवींना निमंत्रित केले जाऊ शकते. किंवा वेगवेगळ्या परिसंवादांमधून प्रस्थापितांबरोबरच नव्या प्रवाहातील अभ्यासकांना सहभागी केले जाऊ शकते. परंतु या प्रवाहांवर स्वतंत्रपणे चर्चा आयोजित होऊ शकतील असे घडत नाही. तरीही आयोजक तसा प्रयत्न करतात. उदा. बार्शी येथे झालेल्या साहित्य संमेलनात पहिल्यांदाच ग्रामीण साहित्यावर स्वतंत्र परिसंवाद ठेवण्यात आला होता. त्यानंतरही कोठे कोठे असे स्वतंत्र परिसंवाद आयोजित केले जातात. दलित साहित्यावरही साहित्य संमेलनामधून परिसंवाद आयोजित केले जातात. मात्र, आदिवासींच्या साहित्यावर स्वतंत्र परिसंवाद किंवा चर्चा कुठल्या साहित्य संमेलनात झाली असे निदान मला तरी आठवत नाही. त्याबरोबर स्त्रीवादी साहित्यासंबंधी किंवा स्त्रियांच्या साहित्यासंबंधी चर्चा केल्या गेल्याचे फारसे दिसत नाही. लिहिणाऱ्या स्त्रियांचा सहभाग वेगवेगळ्या कार्यक्रमांमधून दिसतो. परंतु स्त्रीवादाला केंद्रस्थानी ठेवून चर्चा करणे गरजेचे आहे, याचे भान ठेवले जातेच असे नाही.

दलित, ग्रामीण, आदिवासी आणि स्त्रीवादी हे आजचे महत्वाचे आणि सशक्त प्रवाह आहेत. पण त्याबरोबरच मुस्लीम मराठी साहित्य प्रवाह, ख्रिश्चन मराठी साहित्य प्रवाह हेही आमच्या सांस्कृतिक जीवनाच्या दृष्टीने महत्वाचे प्रवाह आहेत. या प्रवाहांची चर्चा होणे गरजेचे आहे. परंतु या प्रवाहांची चर्चा कुठल्या संमेलनात स्वतंत्रपणे झाली, असे काही स्मरत नाही. निदान पुढच्या संमेलनांमधून तरी या प्रवाहांवर साधक बाधक चर्चा व्हावी असे वाटते.

एकंदरीत काय की वेगवेगळ्या साहित्य प्रवाहांमधील लेखक आणि अभ्यासक संमेलनातील वेगवेगळ्या कार्यक्रमात सुटेसुटे सहभागी होतात. परंतु प्रवाहांना केंद्रस्थानी ठेवून क्वचितच चर्चा होतात, असे दिसते.

अर्थात आयोजकांच्या दृष्टीने विचार करताना त्यांचे स्वातंत्र्य मान्य करावे लागतेच. पण तीन दिवसात सगळ्या गोष्टी कशा बसवाव्यात हा त्यांच्या पुढचा प्रश्न असतो. त्यामुळे आता प्रवाहांची स्वतंत्र संमेलने सुरु झाली आहेत. या सर्व बाबी मान्य करुनसुध्दा असे म्हणावेसे वाटते की, नव्या प्रवाहांना केंद्रस्थानी ठेवून आयोजन केल्यास ते फलदायी ठरणार आहे. कारण मराठी साहित्य संमेलन हे अखिल भारतीय आहे.

**संपर्क : ८८०५७७०८८८**



# उत्क्रांतीच्या उंबरठ्यावर

All of the changes in publishing since 1960 are significant. There are far fewer publishers.

**- Donald Westlake**

प्रकाशन व्यवसायात बरेच बदल होत आहेत. एकीकडे जगभरात संपादन, मुद्रण, मार्केटिंग, सेल्स या विभागात नवे प्रयोग होत असताना जागतिक प्रकाशन व्यवसायाच्या तुलनेने थोडा मर्यादित असलेल्या व त्यामुळे मागे असलेला मराठी प्रकाशन व्यवसाय जागतिक दर्जावर चालणाऱ्या कामाचे बरेचसे गुण आत्मसात करत आहे. असे असले तरी या बदलांबद्दल अतिशय जागरूक व जबाबदार राहणं महत्त्वाचं आहे. प्रकाशन क्षेत्र हे इतर व्यवसायाच्या दृष्टीने वेगळे आहे. या क्षेत्रात होणाऱ्या बऱ्याच गोष्टींचा प्रभाव समाजावर पडत असतो. २०११ च्या उत्तम अनुवादच्या दिवाळी अंकाच्या संपादकीयमध्ये मी याचमुळे असं लिहिलं होतं की, प्रकाशन व्यवसाय उत्क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा आहे.

समाजामध्ये कुठल्याप्रकारची पुस्तकं अधिक वाचली जातात या एका निकषावरून समाजाची मानसिकता व त्याचे सांस्कृतिक मार्गक्रमण लक्षात येऊ शकते. त्यामुळे समाजाच्या सांस्कृतिक व बौद्धीक उत्कर्षासाठी त्या समाजात वाङ्मयीन किंवा अभिजात पुस्तक वाचली जाणं अतिशय महत्त्वाचे आहे. पण सध्या तसे दिसत नाही. याचे बहुतांशी कारण आहे ते म्हणजे माणसाच्या व्यक्तिगत आयुष्यावर होणारे तंत्रज्ञानाचे आक्रमण व ग्लोबलायझेशन. झपाट्याने यश मिळविण्यासाठी 'हू कॅन विन'सारखी पुस्तकं विकली जात आहेत. 'इन्स्टंट सर्व'च्या जमान्यात वेट लॉस, हॅपीनेस, कूकरी बुक्स यांची विक्री वाङ्मयीन पुस्तकांपेक्षा अधिक आहे. काळानुरूप साहित्यप्रकाराचा ट्रेन्ड येत असतो. कधी कथा अधिक लोकप्रिय झाल्या, कधी कविता वरचढ होत्या तर कधी कादंबऱ्या; पण, सध्या चालू असलेला नॉन फिक्शनचा ट्रेन्ड लवकर संपावा अशी आशा प्रत्येकाच्याच मनात असेल.

युरोपमध्ये होणारा प्रकाशन व्यवसाय हा एका वेगळ्याच पातळीवर चालतो. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, हंगेरियन भाषेतील प्रकाशक पुस्तकाच्या कंटेटप्रमाणेच त्याच्या सौंदर्यमूल्यावर खूप भर देतात. या प्रकाशकांचे कॅटलॉग बघितले तर कलेच्या दृष्टीने ते फारच प्रभावी असतात. मुळात इन हाऊस डिझायनरच असतो त्यांच्याकडे. भारतामध्ये असणारे इंग्लिश प्रकाशकही याबाबतीत आता प्रयत्नशील राहत आहेत.

आणखी नवा एक ट्रेन्ड प्रकाशन व्यवसायात येऊ पाहत आहे, तो म्हणजे कोलॅबरायझेशनचा. म्हणजेच वेगवेगळ्या विषयांत नैपुण्य असणाऱ्या दोन व्यक्ती किंवा संस्था एकत्र येऊन काम करणे. हे पूर्वीही होत होते. आता मात्र हे व्यवसायिक पातळीवर एक बिजनेस स्ट्रॅटेजी म्हणून होत आहे. 'हार्पर कॉलिन्स' ही इंग्रजीमधील मान्यवर प्रकाशन संस्था. नवीन लेखकांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी त्यांनी 'हार्पर स्टुडिओ' ही नवी संस्था सुरू केली. यात संपादन, डिझाईन, विक्री व मार्केटिंग यांमध्ये लेखकांचा सहभाग असतो. म्हणजेच लेखकाचे एक वेगळे वलय तयार करण्याचा ते प्रयत्न करतात. लेखक, प्रकाशक हे नातं एका नव्या पातळीवर नेऊन दोघांनाही अधिकाधिक फायदा व्हावा, यादृष्टीने दोघांनी एकत्र काम करण्याचा नवा पायंडा येथे रचल्याचा दिसतो. 'पेंग्वीन' ही आणखी एक महत्त्वाची संस्था. पेंग्वीनने एका अतिशय नावाजलेल्या प्रिंटरच्या संयुक्त विद्यमाने स्वत:साठी एक बिझनेस मॉडेल तयार केले. युरोपमधल्या प्रकाशन व्यवसायातील दिग्गजांचा असा अंदाज आहे की, २०१२ हे वर्ष कोलॅबरायझेशनचे असेल.


**अभिषेक जाखडे**


मराठी प्रकाशन व्यवसायावर मात्र सर्वांत मोठा प्रभाव पडणार आहे, तो आय. टी. क्षेत्राच्या आगमनाने. नवे तंत्रज्ञान या क्षेत्रात येऊ पाहत आहे. याचेच दोन महत्त्वाचे घटक म्हणजे इ-बुक्स व इंटरनेट मार्केटिंग.

पुस्तक व वाचक यांना जोडणारा एक महत्त्वाचा घटक किंवा दुवा म्हणजे पुस्तक विक्रेता. मध्यंतरीच्या काळात स्पर्धा वाढत आहे, म्हणून विक्रेत्यांच्या बरोबरीनं मार्केटिंग एजंट आला. काही वर्षांपूर्वी पुस्तकं वाचकांपर्यंत घेऊन जायची गरज दिसली. यातून इंटरनेटचा वापर सुरू झाला. मार्केटिंगसाठी इ-मेल करणे, ब्लॉग लिहिणे यातून सुरुवात होऊन पुढे फेसबुक, ट्विटर ही माध्यमे सुरू झाली.

प्रकाशन संस्था एखाद्या पुस्तकाची लाट निर्माण करण्यासाठी या सोशल मीडियाचा उपयोग करतायेत. याचे सध्याचे उदाहरण म्हणजे ॲरो बुक्सची ट्वायलाईट सिरीज. ट्वायलाईट जेव्हा प्रकाशित झाले तेव्हा या पुस्तकाची लेखिका 'स्टेफनी मेयर'नं स्वत:ची सुंदर वेबसाईट तयार केली. दरम्यानच्या काळात फेसबुक व ट्विटर उदयास येत होते व लोकप्रियही होत होते. याचा फायदा घेत या पुस्तकाची ओळख करून देणारी, त्याला पूरक चित्रे, माहिती इत्यादी असणारी पेजेस तयार करण्यात आली. बघता बघता अनेक लोक मेंबर्स झाले. पुढे या सिरीजमधली इतर पुस्तकंही तयार झाली. 'वॅम्पायर लव स्टोरी'ची थीम असणारे पुस्तकाचे वेगळे वातावरण निर्माण झाले. इतके की ही थीम घेऊन अधिक पुस्तकं बाजारात येऊ लागली; 'ट्वाय्लाईट सिरीज'वर सिनेमे प्रदर्शित झाले व तरुण पिढीत लोकप्रिय झाले.

यातून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेता येण्यासारखी अशी आहे की आजकाल आपण जे साहित्यिक वातावरण, उत्साह वगैरे म्हणतो ते डिजिटल मीडियातून तयार झाले. आपल्या सोयीनुसार या वातावरणाचा उपयोग घेणे वाचकाला शक्य झाले आहे. दुसरे असे की काही वर्षांपूर्वी असे होत होते की लोक पुस्तकं वाचत, पण त्याची चर्चा करत नव्हते. रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात या चर्चेसाठी सामान्य वाचकाला वेळ नव्हता. सोशल मीडियाद्वारे कॉमेन्ट्स् देऊन हा मूक होत जाणारा वाचक बोलका होत आहे.

'ट्वायलाईट'सारखी बरीच उदाहरणं आहेत व त्यांनी कमी अधिक यशही मिळवले; पण, याचे प्रमाण मराठीमध्ये कमी आहे. आपण समाजात

वाङ्मयीन उत्साह कमी आहे असं म्हणतो. पण, खरोखरीच आपण डिजिटल मीडियाचा व्यवस्थित वापर करतो का, हा प्रश्न आपण विचारला पाहिजे. कदाचित याचे उत्तर 'नाही' आहे, कारण यादृष्टीनं पूरक असे प्रयत्न आपण केले नाहीत. याची कारणे बरीच आहेत व तो या चर्चेचा विषयही नाही. पण ही कारणं, आव्हानं यांना पार करून याचा सकारात्मक उपयोग करणं महत्त्वाचं आहे.

काही वर्षांपूर्वी पुस्तकंच वाचकापर्यंत गेली पाहिजे अशी एक चर्चा सुरू झाली. यातूनच इ-बुक्स व इंटरनेट सेललाही सुरुवात झाली.

इ-बुक्स म्हटल्यावर मराठी प्रकाशकांच्या मनात कापरं भरतात. ही भावना चुकीची आहे, असं नाही. याचा उचित वापर केला नाही तर पूर्ण प्रकाशन व्यवसायाला बुडीत घालण्याचे सामर्थ्य इ-बुक्समध्ये आहे. त्यामुळे प्रकाशकाच्या मनात इ-बुक्समुळे भीती निर्माण होणे स्वाभाविकच आहे. माझ्या या विधानाला पूरक असे उदाहरण बघायचे झाले तर संगीत व्यवसाय. ९० च्या दशकात गाणी ऐकायची म्हटल्यावर आपण एच.एम.व्ही, टी. सीरिज इत्यादीच्या कॅसेट आणायचो. आता मात्र इंटरनेट वरूनच डाऊनलोड करतो. म्हणजेच विक्री हा आर्थिक उपलब्धतेचा मोठा स्रोतच बंद झाला. अर्थात, वेगळ्या वाटा शोधून हा व्यवसाय पुन्हा भरभराटीला आला हा भाग निराळा. असो.

पण, इ-बुक्समुळे वाचकांसाठी खूप मोठी सुलभता निर्माण झाली आहे. हे एक महत्त्वाचे वास्तव प्रकाशन व्यवसायाशी संबंधित असलेल्या प्रत्येकानं लक्षात ठेवलं पाहिजे. इ-बुक्स स्टोरेज, किंमत व फिचर्सच्या बाबतीत हार्ड कॉपीच्या तुलनेत वरचढ आहेत. शिवाय हाताळायला, ते कोठेही घेऊन जायला सोपे व सुलभ आहे. इ-बुक्स नजीकच्या काळात प्रचंड लोकप्रिय होतील यात वाद नाही. कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल, आयपॅड या सर्वांवर ते वाचणे सुलभ आहे. त्यातच भारत सरकारने 'आकाश' हे नवीन गॅजेट तयार केल्याने इ-बुक्स भारतामध्ये लवकरच अधिक लोकप्रिय होतील.

प्रकाशकाच्या दृष्टीने विशेषत: मराठी प्रकाशकाच्या दृष्टीने विचार केला तर मात्र हा प्रकार गोलमालच वाटतो. एक म्हणजे, कुठल्याच प्रकाशकाला आजतरी इन हाऊस इ-बुक्स बनविणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे तो दुसऱ्यावर अवलंबून आहे. परत प्रत्येक इ-बुकमेकरचे ॲप्लीकेशन वेगळे, त्यामुळे इ-बुक्समध्ये युनिफॉर्मिटी नाही. दुसरे असे की एकदा का हे इ-बुक बनविले की, त्याच्या विक्रीवर कोणताच ताबा प्रकाशकाचा राहत नाही. हे व असे काही प्रश्न ओळखून त्यावर योग्य तोडगा काढण्याच्या दृष्टीनं 'मराठी प्रकाशन परिषदे'सारख्या जबाबदार संस्थेनं पुढाकार घेतला तर याचा चांगला उपयोग होऊ शकतो. इ-बुक्सबद्दल स्टीव्ह जॉब्ज म्हणतात-

'It doesn't matter how good or bad the product is, the fact is that people don't read anymore. ... Forty per cent of the people in the US read one book or less last year. The whole conception is flawed at the top because people don't read anymore.

- Steve Jobs, 15 January 2008


त्यामुळे इ-बुक्सबद्दल कुठलेही धोरण स्वीकारण्यापूर्वी एकूणच पुस्तक वाचनासाठी उत्साहाचे वातावरण निर्माण करणे व वाचन संस्कृतीचा विकास करणे महत्त्वाचे आहे.

विक्री व वितरणाचा एक पुढचा भाग म्हणजे ऑनलाईन सेल. ह्या प्रकाराचा पायंडा घातला तो www.Amazon.com ने. आता भारतात www.Flipkart.com या दृष्टीनं जोरदार कामगिरी करीत आहे. वाचक आज घरबसल्या पुस्तकाची माहिती या संकेतस्थळांवर पाहू शकतो. पुस्तक आवडले तर ऑर्डर दिल्यानंतर ते घरपोच येते. तसेच पारंपरिक स्वरूपाच्या हार्डकॉपी विक्री यामुळे सध्या तरी हे 'ऑल विन सोल्युशन' आहे असं म्हणता येईल.



एकूणच आय. टी. क्षेत्राच्या आगमनामुळे एका बाजूने प्रकाशन व्यवसायाच्या सीमा रुंदावत आहेत तर दुसऱ्या बाजूने नवी आव्हाने समोर येत आहेत. आय. टी. क्षेत्रामुळे येणाऱ्या पर्यायांबद्दल प्रकाशन व्यवसायातील सर्वांनीच खुल्या मनानं स्वागतशील असले पाहिजे. असे असले तरी या आगमनाचे अतिक्रमण होत नाही ना? याबाबत देखील सजग असले पाहिजे. काही वर्षांपूर्वी टी. व्ही. आल्यानंतर पुस्तक वाचन या विरंगुळ्याच्या कार्याला प्रतिस्पर्धी निर्माण झाला. सोशल मीडिया, इंटरॲक्टीव्ह प्रोग्रॅम्समुळे हे प्रतिस्पर्धी वाढत आहेत. त्या नवनव्या मीडियांच्या स्पर्धांत व वातावरणात सक्रिय राहणे आवश्यक आहे. त्यामुळे नवे तंत्रज्ञान व Basics यांची योग्य सांगड घालून पुढे जाणे महत्त्वाचे आहे.

**संपर्क : (०२०) २५४४२४५५**



# मराठी अभिजात कशी?

मराठी भाषा सल्लागार समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा दर्जा' मिळविण्याचा शासन प्रयत्न करणार असल्याची घोषणा केली. त्याबाबतच्या चर्चेत या संदर्भातील पुढील निकषांकडे लक्ष वेधले गेले. "High antiquity of its early texts/ recorded history over a period of 1500-2000years, A body of ancient literature /texts ,which is considered a valuable heritage by generations of speakers. The literary tradition be original and not borrowed from another speech community. The classical language and literature being distinct from modern, there may be a discontinuity between the classical language and its later forms of its offshoots." मराठी ही जगातील १० व्या क्रमांकाची भाषा असली तरी तिचा जन्म २००० वर्षांपूर्वीचा नसल्याने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळू शकत नसल्याचा मुद्दा पुढे आला. मराठी भाषेचा जन्म नेमका केव्हा झाला याबाबत कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, संचालक-मराठी संशोधन मंदिर, यांचा 'मराठी भाषा उद्‌गम व विकास' हा १९३३ साली प्रकाशित झालेला ग्रंथ अतिशय मोलाचा समजला जातो. त्यात ते म्हणतात, ''सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत ह्या भाषांनी आपापल्या परीने मराठीस जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो. निरनिराळ्या प्राकृतभाषा बोलणारे निरनिराळे समाज निरनिराळ्या काळी वरून आर्यावर्तातून अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात उतरले आणि तेथे स्थायिक झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा बनली. महाराष्ट्र देश ज्याप्रमाणे गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अश्मक, कुंतल, विदर्भ, कोकण इत्यादी लहान लहान देशविशेषांचा मिळून बनला व महाराष्ट्राची लोकवसाहत ज्याप्रमाणे निरनिराळ्या लोकघटकांनी मिळून झाली, त्याचप्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या-विशेषत: माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्या मिश्रणाने बनली. महाराष्ट्र देश, मराठा समाज व मराठी भाषा ह्यांची घटना वर दिलेल्या रीतीने ख्रिस्तोत्तर ६००-७०० च्या सुमारास झाली.'' (पृ. १६८)

कृ. पां. कुलकर्णी यांनी आपल्या ४९६ पृष्ठांच्या या शोधग्रंथात या विषयाचा सांगोपांग वेध घेतला आहे. विषयाचे सर्व पैलू मांडण्यासाठी त्यांनी या संदर्भातील तज्ज्ञांच्या ३२ मौलिक संदर्भ ग्रंथांचा वापर केलेला आहे. कुलकर्णींच्या मते मराठी भाषेचे वयोमान १३००-१४०० वर्षांचे ठरते. असे असेल तर मग मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळू शकणार नाही. याबाबत (१) डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर लिखित 'प्राचीन महाराष्ट्र' 'खंड १ व २',(२) हाल सातवाहनाची 'गाथा सप्तशती' - संपादक, स. आ. जोगळेकर, (३) गुणाढ्याचे 'बृहत्कथा' हे व राजारामशास्त्री भागवत, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, वि. का. राजवाडे, वि. ल. भावे, रा. भी. जोशी आदींचे ग्रंथ तपासून काय चित्र समोर येते त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू या.

'कथा सरित्सागर' या महाग्रंथाचे मराठी भाषांतर श्री. ह. अ. भावे यांनी केले असून, त्याच्या पाचही खंडांना ख्यातनाम विदुषी दुर्गा भागवत यांच्या पाच

**हरी नरके**

प्रदीर्घ आणि विवेचक प्रस्तावना आहेत. त्या प्रस्तावनेत म्हणतात, ''गुणाढ्याच्या बृहत्कथेची तुलना रामायण आणि महाभारताशी करण्यात येते. प्राचीन भारतातल्या साहित्याचा एक विशेष असा आहे की, पुष्कळ ग्रंथ लुप्त झाले आहेत आणि असंख्य ग्रंथ केवळ खंडावस्थेतच आढळतात. अशा विलुप्त ग्रंथांत गुण्याढ्याच्या बृहत्कथेचा समावेश होतो. बृहत्कथेसंबंधी उल्लेख अनेक जुन्या ग्रंथात आढळून येतील. बृहत्कथेचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ संस्कृतात व प्राकृतात आहेत. हे ग्रंथ शैव व वैष्णव मतातून निघालेले आहेत आणि जैन मतातलाही ग्रंथ उपलब्ध आहे. तेव्हा भिन्न परंपरांना मान्य असलेला बृहत्कथा हा एक प्राचीन लोकप्रिय ग्रंथ होता यात संशय नाही.''

बृहत्कथेशी प्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ दोन आहेत. ते दोन्ही काश्मीरचे असून, अकराव्या शतकात उपलब्ध झालेले आहेत. दोहोंची भाषा संस्कृत व मते शैव आहेत. पहिला जागतिक ख्याती पावलेला ग्रंथ हा सोमदेवाचा 'कथा सरित्सागर' आणि दुसरा क्षेमेंद्रांची 'बृहत्कथा मंजिरी' हे दोन्ही ग्रंथ श्लोकबद्ध असून, ते वृत्त अनुष्टुभ आहे. कथा सरित्सागरची भाषांतरे युरोपिय भाषांमध्येही उपलब्ध आहेत. परंतु, 'बृहत्कथा मंजिरी'चे इंग्रजीत एकच व तेही काही भागांचेच भाषांतर झालेले आहे. अकराव्या शतकात सोमदेव शर्मा या काश्मीरचा राजा अनंत याच्या पदरी असलेल्या कवी पंडिताने अनंत राजाची राणी सूर्यवती हिला रिझवण्यासाठी पैशाची भाषेत त्याकाळी उपलब्ध असलेल्या बृहत्कथेवरून संस्कृतात कथासरित्सागराची रचना केली. आपण हा ग्रंथ गुणाढ्याच्या बृहत्कथेवरून रचला आहे ही गोष्ट सोमदेवाने ग्रंथारंभीच सांगून गुणाढ्याचे चरित्रही सांगितले आहे,'' असे दुर्गा भागवत म्हणतात.

डॉ. श्री. व्यं. केतकर या ग्रंथाबाबत आपल्या 'प्राचीन महाराष्ट्र' या ग्रंथात म्हणतात, ''पैशाचीतील मुख्य विश्रुत ग्रंथ म्हटला म्हणजे बृहत्कथा होय. तो कुरू युद्धोत्तर इतिहासाचा संरक्षक आणि त्याबरोबरच इतिहास विपर्यासाचा संरक्षक आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात बृहत्कथेपासून इतिहास निष्कर्षणाचा पद्धतशीर प्रयत्न केलेला आढळेल. ऐतिहासिक कथासूत्राच्या शोधाच्या अनुषंगाने अनेक प्रश्न विवेचनास घेतले गेले आहेत. त्यापैकी एक प्रश्न म्हटला म्हणजे बृहत्कथेच्या कालासंबंधीचा होय. ...बृहत्कथा अखिल भारतीय कथांचा संग्रह असल्यामुळे आणि त्यामध्ये प्रतिष्ठानकथा व दक्षिणापथकथा, कुंडीनपूर कथा येत असल्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासास त्या संग्रहाचा उपयोग करणे प्राप्त झाले. हा संग्रह तयार करण्यात वररुचीचा हात असल्यामुळे आणि वररुची हा महाराष्ट्राच्या भाषेचा आद्य वय्याकरण असल्यामुळे वररुची विषयक अधिक विधाने करणे प्राप्त झाले. ...वररुचीची माहाराष्ट्री बुद्धपूर्व आहे आणि वररुचीचे व्याकरण पाली किंवा अर्धमागधी या भाषांच्या उदयापूर्वीचे आहे, असे आमचे मत आहे. आणि पैशाची भाषेचे प्रामुख्य ज्या काळात होते तो काळ वररुचीच्या व्याकरणाने दिग्दर्शित होत आहे. वररुचीच्या काळा-पूर्वी काही पिढ्या पैशाची ही वाङ्मयाची भाषा होती. ...त्या काळात माहाराष्ट्री भाषा प्रगल्भ झाली होती. आणि प्राकृत भाषांत तीच प्रमुख होती हे स्पष्ट आहे. या प्रगल्भतेचा काळ अर्थात वररुचीच्या पूर्वी दोनतीनशे वर्षे इतका तरी होता असे म्हणण्यास हरकत नाही ...त्यावरून 'प्राकृत प्रकाशा'च्या उत्पत्तीच्या काळी चारही प्राकृत भाषांचे व्याकरण

असणे आणि 'महाराष्ट्र' हा शब्दही अस्तित्वात असणे हे पूर्ण संभवनीय वाटते. एवंच महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक मोठा उजेडाचा कालविभाग म्हटला म्हणजे वररुचीचा व पाणिनीचा काल होय. या वररुचीचे अस्तित्व पाणिनीच्या कालाहून दूर नसावे आणि वररुची व पाणिनी हे दोघेही जवळजवळ समकालीन असल्यामुळे ते दोघेही एका गुरूचेच शिष्य होते ही कल्पना उद्‌धृत होऊन आणि विद्वान वर्गाच्या आख्यायिका संग्रहात शिरून ती कथापीठ लंबकात समाविष्ट झाली असावी. कथापीठलंबक रचनेचा काल मौर्य राज्याच्या प्रारंभाचा असावा, असे आमचे मत आहे.'' (पृ. ११, १२)

ते पुढे म्हणतात, ''महाराष्ट्र हा शब्द व भाषा वररुचीच्या काळी होती आणि वररुचीच्या काली ही भाषा संवर्धित झाली होती आणि वररुचीचा काल खिस्तपूर्व ८०० पासून ६०० पर्यंत केव्हातरी असा धरला तर महाराष्ट्राची स्वतंत्र भाषा अगोदर दोनतीनशे वर्षे तरी विकसित होत असली पाहिजे म्हणजे खिस्तपूर्व पहिल्या सहस्रकांच्या पूर्वीच म्हणजे खिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात महाराष्ट्राचा आद्यविकासाचा काल जातो. आणि या भाषेच्या नावास कारण झालेले जे महार आणि रट्ठ यांचे एकराष्ट्रीकरण जे खिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात झाले असावे असे दिसते. अश्मक राजा कुरू युद्धात पडला आणि कुरू युद्धापासून अश्मकांचे सातत्य आहे तर महार आणि रट्ठ यांचे एकराष्ट्रीकरण आणि अश्मक राजाचे सातत्य याची संगती लावण्याचा प्रयत्न अवश्य होतो. ...अश्मक राज्य सुरू होण्यापूर्वीच महारांच्या देशात रट्ठांचा प्रसार होऊन महाराष्ट्र बनले असावे आणि त्यांच्या संयुक्त जनतेत अश्मक राजकुल उत्पन्न झाले असावे असाच इतिहास असावा असे दिसते.'' (पृ.१३)

डॉ. केतकर हालांच्या सप्तशतीबद्दल म्हणतात, ''महाराष्ट्रातील अत्यंत प्राचीन वाङ्मय म्हणजे हालांची सप्तशती होय. तीवरून असे दिसते की, त्या वेळेस प्रमुख जानपद हलिक होते. गोदातट आणि विंध्य पर्वत हे दोन्ही प्रदेश वाङ्मयात येत होते. भाषेला नाव प्राकृत हेच अधिक प्रिय होते.'' (पृ. २९) केतकरांचे अनुमान आहे की, शातवाहनांच्या काळात अपभ्रंश भाषेचा उदय झाला असेल, कारण शातवाहनांच्या काळी अपभ्रंशाचे अस्तित्व होते अशी साक्ष बृहत्कथा देते.

'राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक साहित्य' दुर्गा भागवत यांनी संपादित केले असून, त्याचा पहिला खंड ''मऱ्हाठ्यासंबंधाने चार उद्‌गार'' हा या विषयावर महत्त्वाचा प्रकाशझोत टाकतो. राजारामशास्त्री भागवत म्हणतात, ''महाराष्ट्र हा शब्द बराच जुनाट आहे. नंदाचे राज्य मगध देशावर असता म्हणजे शालिवाहन शकाचे पूर्वी सुमारे सव्वा चारशे वर्षे, वररुचि नावाचा विद्वान झाला. त्याने 'प्राकृत प्रकाश' नावाचे प्राकृत भाषेचे म्हणजे संस्कृत नाटकातील बालभाषेचे व्याकरण केले आहे. त्या व्याकरणाचे अगदी शेवटचे सूत्र 'शेषं माहाराष्ट्रीवत्' हे होय. अशोकाने महाराष्ट्र देशात धर्मोपदेश करण्यासाठी काही बौद्ध भिक्षुंस पाठविले, अशी बौद्ध लोकांतही दंतकथा आहे. नंदाच्या नंतर चंद्रगुप्ताने राज्य केले. चंद्रगुप्ताच्या पाठीमागे त्याचा मुलगा बिंदुसार गादीवर बसला व बिंदुसाराच्या मागून त्याचा मुलगा प्रियदर्शी किंवा अशोक यांस गादी मिळाली. तेव्हा चांगला बावी-सशे वर्षांचा 'मरहट्ठ' किंवा 'महाराष्ट्र' शब्द आहे असे म्हणण्यास हरकत नाही.'' (पृ. ७ व ८) ते पुढे म्हणतात, ''बाकी सर्व मऱ्हाठी भाषेप्रमाणे शौरसेनी भाषेचे नियम आहेत असे समजावे.'' हा सूत्राचा अर्थ ज्यास आपण बालभाषा म्हणतो त्यात पूर्वीच्या काळी शौरसेनीही होती. शूरसेना म्हणजे मथुरामंडळ या प्रांताची जी पूर्वीची भाषा ती शौरसेनी. उंच जातीच्या व कुलीन बायका जी भाषा प्राचीन काळी नाटकात बोलत ती हीच, 'शौरसेनी' नाटक म्हटले म्हणजे लोकस्थितीचे हुबेहुब चित्र होय. तेव्हा संस्कृतात नाटके ज्यावेळी होऊ लागली त्यावेळी कुलीन व वरिष्ठ जातींच्या बायकांची भाषा 'शौरसेनी' होती, याविषयी काही संशय नको. या 'शौरसेनी' भाषेची एक प्रकृती जशी संस्कृत तशीच दुसरी प्रकृती माहाराष्ट्री ऊर्फ अतिप्राचीन मऱ्हाठी, असे कात्यायन म्हणतो. शौरसेनीपासून मागधी व पैशाची नावाच्या बालभाषा निघाल्या. मगध म्हणजे गयेच्या व पाटणाच्या आसपासचा मुलूख या देशाची जी पूर्वीची भाषा ती मागधी. पंजाब वगैरे प्रांतातील रहाणाऱ्या लोकांचे 'पिशाच' हे प्राचीन नाव दिसते. बाल्हीक म्हणजे बल्क, बुखारा व समरकंद वगैरे ठिकाणचे लोक सर्व पिशाचांची संतती, असे कर्णपर्वात लिहिले आहे. या लोकांची पूर्वीची भाषा पैशाची. शौरसेनीपासून मागधी व पैशाची निघाल्या व शौरसेनेची प्रकृती जशी संस्कृत तशीच मऱ्हाठी असे कात्यायन म्हणतो. तर मग सर्व बालभाषांचे मूळ प्राचीन मराठी असा सिद्धान्त केल्यास काहीच प्रत्यवाय नाही. 'गाथांची भाषा महाराष्ट्री' असे अलंकारिक म्हणतात. गाथा शब्द आलेला 'गै' धातूपासून. 'गाथा' शब्दाने प्राय: आर्या किंवा गीति संस्कृतात समजली जाते. या अलंकारिकांच्या नियमावरून गाण्याची भाषा प्राचीन काळी 'माहाराष्ट्रीय'च होती असे म्हणावे लागते. तेव्हा सर्व बालभाषांची प्रकृती व गाणी प्राचीन काळची ज्या भाषेत, अशी एक प्राचीन 'मऱ्हाठी' भाषा होय... शौरसेनीची प्रकृती संस्कृत हे तर कात्यायनाने प्रकरणाच्या आरंभीच सांगितले आहे. असे असता अखेरीस 'शेषं माहाराष्ट्रीवत्' असे कात्यायन पुन: म्हणतो, त्यापक्षी 'महाराष्ट्री' व संस्कृत या दोहोंची परस्परनिरपेक्षता त्यास इष्ट होती असे दिसते. मूळचा शब्द पाहू गेले असता 'पाअड' होय. 'पाअड' शब्दाच्या जवळजवळ संस्कृतात 'प्रकट' हा शब्द येतो. 'पाअड' भाषा='प्रकट' भाषा. म्हणजे अर्थात सर्व लोकांचा व्यवहार व दळणवळण जीत चालते ती. संस्कृत भाषा पडली धर्माची, अर्थात धर्मप्रसार करणे ज्यांच्या हातात असल्या ब्राह्मणांची. ती काही सर्वसाधारण भाषा नव्हती. पण, पाअड भाषा पडली वाहत्या पाण्याप्रमाणे. ते सर्वांचे जीवन तेव्हा सर्वांचाच संबंध तिच्याबरोबर. सहजच तीस 'पाअड' म्हणजे सर्वांस समजण्यासारखी असे अन्वर्थक नाव मिळाले, व धर्मभाषेचे 'संस्कृत' म्हणजे थोड्याशा विद्वान ब्राह्मणांनी मिळून आपल्या बुद्धीप्रभावाने 'तकतकी आणलेली' असे ब्राह्मणांनीच नाव पाडले. काही काळाने 'संस्कृत' या शब्दाबरोबर मेळ दिसावा म्हणून 'पाअड' शब्दाचे प्रकट रूप न करता 'प्राकृत' असे रूपांतर केलेले दिसते. त्यामुळे प्राकृत हा शब्द संस्कृतात दररोज पाहण्यात येणारे, अर्थात 'क्षुल्लक' या अर्थाचा वाचक झाला. 'शिक्षा' म्हणून वेदाचे एक अंग आहे. त्यात 'प्राकृते संस्कृते चापि' (प्राकृत भाषेत व संस्कृत भाषेत) असा लेख आला आहे. त्यापक्षी प्राचीन काळीही 'प्राकृत' ही स्वतंत्र भाषा समजण्याचा संप्रदाय पुष्कळ दिवसापासून होता हे उघड होय. तेव्हा 'माहाराष्ट्री', शौरसेनी, मागधी व पैशाची या सर्व जितक्या 'पाअड' भाषा होत्या तितक्या 'प्राकृत' झाल्या व या प्राकृत भाषांचे 'प्राकृतप्रकाश' नावाचे सूत्रमय व्याकरण कात्यायनाने पहिल्याने लिहिले. वर लिहिलेल्या पाचही भाषा 'पाअड' भाषा इतकेच की सर्वांत प्राचीन व सर्वांची प्रकृती 'माहाराष्ट्री' ऊर्फ प्राचीन मऱ्हाठी. महाराष्ट्रीपासून निघाली शौरसेनी व शौरसेनीपासून कालांतराने मागधी व पैशाची या दोन भाषा निघाल्या. तेव्हा मागधी व पैशाची ही दोन्ही प्राचीन मराठीची नातवंडे होत. शौरसेनीची खरी

आई म्हटले म्हणजे एकटी प्राचीन मऱ्हाठी भाषा.'' (पृ. १२, १३)

प्राचीन मराठीतील १) गाथा सप्तशती, २) प्रवरसेनाचे 'सेतुकाव्य', ३) गौडवध, ४) राजशेखराची 'कर्पुरमंजिरी' हे ग्रंथ आणि गुणाढ्याचे पैशाची भाषेतील बृहत्कथा ग्रंथ हे फारच महत्त्वाचा पुरावा होत. नंदाच्या वेळच्या शालिवाहनाचा गुणाढ्य हा प्रधान होता. त्या ग्रंथाची हल्ली संस्कृतात दोन श्लोकमय भाषांतरे विद्यमान आहेत. श्रीलंकेतील महावंश या पाली भाषेतील सिंहली लिपीतील ग्रंथात अशोकाने बौद्ध भिक्षू महाराष्ट्रात पाठविल्याचा उल्लेख आहे. भवभूतीच्यानंतर दोनशे वर्षांनी राजशेखर झाला. तो महेंद्रपाल राजाकडे आश्रयाला होता. तो स्वत:ला 'महाराष्ट्र चुडामणी' म्हणवून घेत असे.

इरावती कर्वे आपल्या 'मराठी लोकांची संस्कृती' या ग्रंथात म्हणतात, ''पश्चिमेकडील शक व महाराष्ट्रातील शातवाहन येण्याचे आधीच महाराष्ट्राच्या भूमीत संस्कृत वा संस्कृतोद्‌भव भाषा दृढमूल झाली होती व म्हणून बाहेरून आलेल्या राजांनी द्राविड भाषा न उचलता महाराष्ट्री (संस्कृत प्राकृत अवतार) आत्मसात केली.'' (पृ. २०३) त्या पुढे म्हणतात, ''सर्व भारताची संस्कृती ज्या काव्यामध्ये साकारली ते वैदर्भी रीतीत होते, म्हणजे विदर्भाचे संस्कृत परंपरेमधील स्थान लक्षात येते. जसा अपरान्त त्याचप्रमाणे विदर्भ ही अति प्राचीन आर्य (संस्कृत बोलणाराची) वसाहत होती. दोन्हीही वसाहती वन्यांच्या प्रदेशात झाल्या. संस्कृत द्राविडांशी लढा करून नव्हे. पहिल्या प्रख्यात वैदर्भीचे नाव लोपमुद्रा आहे. हे नाव आर्य नव्हे. ते लोपामुंडा ह्याचे तर रूप नव्हे ना? मुंड लोकांची राजकन्या लोपा असा त्याचा अर्थ होईल. मुंडांचा नागांशी संबंध होता, त्याबद्दल बौद्ध वाङ्‌मयात पुरावा सापडतो. कोसलाचा राजा पसेनदी याचे मनात गौतम बुद्धाच्या घराण्यात लग्न करून बुद्धाचे नातेवाईक व्हावे असे होते. वासभखत्तिया यांच्या विवाहातून जन्मलेल्या विडुडभ याने सर्व शाक्य कुळाचा नाश केला. ही कथा पाली वाङ्‌मयात सांगितली आहे. इ.स. पूर्व ५०० ते ६०० वर्षांची ती कथा आहे. म्हणजे त्यावेळी नाग व मुंड एक असावेत असे दिसते.'' (पृ. २१३ व १४)

इरावती कर्वे यांनी पुढे या संदर्भात अधिक माहिती देताना म्हटले आहे की, ''महाराष्ट्राचे राजे सातवाहन यांनी प्रतिष्ठान ऊर्फ पैठण येथे राज्य केले. प्राकृत भाषेला उत्तेजन दिले व पर्यायाने मराठीच्या जन्माला मदत केली. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व संतकवीचा जन्म मध्य महाराष्ट्रात झाला व हल्लीच्या मराठीचे स्वरूप त्यांनी निश्चित केले. ह्या प्रदेशाला जुने नाव अश्मक असे आहे. ...अश्मकाचे सर्वांत प्रसिद्ध राजे म्हणजे प्रतिष्ठानचे शातवाहन. त्यांचे आधी प्रतिष्ठानला नरसिंह नावाचा राजा होता. असा उल्लेख सोमस्वामीच्या कथा सरित्सागरात सापडतो. त्या कथेबद्दल कै. श्री. व्यं. केतकरांनी प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात लिहिले आहे... शातवाहनांना संस्कृत माहीत नव्हते, त्यांनी प्राकृताला आश्रय दिला, महारठी नावाच्या मांडलिक राजांशी लग्नसंबंध जोडला असे दंतकथा व शिलालेखांवरून दिसते. ...शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव ह्या घराण्यांनी महाराष्ट्रावर एकामागून एक राज्य केले. महाराष्ट्रातील बुद्ध लेणी शातवाहनांच्या व वाकाटक आणि चालुक्यांच्या कारकिर्दीतील आहेत. त्यातील सर्व लेख प्राकृतातील आहेत. 'लिलावती' ह्या अपभ्रंश भाषेत लिहिलेल्या काव्यात सुप्रसिद्ध बौद्ध पंडित नागार्जुन हा हालाचा मित्र व हितोपदेशक होता असे म्हटले आहे. ...त्यांच्या संबंधी रट्ठ आणि महारठ ह्यांची नावे शिलालेखात येतात. ह्यांचे प्रमुख शिलालेख पश्चिम महाराष्ट्रातच आहेत. ...आंध्र व कर्नाटक अशा दोन संस्कृतीसंपन्न राष्ट्रांशी बरोबरी करून मराठीने आपल्या दक्षिण सीमा पक्क्या केल्या; एवढेच नाही, तर मराठी भाषा कर्नाटकाच्या गाभ्यापर्यंत पोचली, ह्याला अनेक सांस्कृतिक कारणे आहेत. प्रख्यात सूत्रकार बौद्धायन व आपस्तंभ दाक्षिणात्य होते. बृहत्कथेत अपाणिनीय अशा ऐन्द्रादी व्याकरणांचा उल्लेख येतो ती दक्षिणात्यांनी रचिलेली होती असे दिसते. ...चालुक्य व राष्ट्रकूट दोघेही जैनानुयायी होते, व त्यांच्या आश्रयाखाली पुष्कळ महत्त्वाचे जैन ग्रंथ महाराष्ट्रात लिहिले गेले. पुष्पदंताचे 'हरिवंशपुराण' राष्ट्रकूट राजांच्या अमदानीत मान्यखेड (मालखेड) येथे रचले गेले. कर्नाटकाच्या गाभ्यात महाराष्ट्री भाषेत ग्रंथनिष्पत्ती राजाश्रयाने होत होती असे स्पष्ट दिसते. ...श्रवणबेळगोळचा हा शिलालेख मराठ्यांच्या आक्रमक राजसत्तेचे प्रतीक नसून जैनांच्या धर्मप्रसाराचे आहे. ...मध्ययुगातही भाषेच्या बाबतीत मराठीची आई जी महाराष्ट्री, तिचे वर्चस्व दक्षिणेत होते व तीत उत्तम ग्रंथांची उत्पत्ती होत होती. कोऊहल कवीने रचलेल्या 'लिलावती' काव्यात तो स्वत:चे काव्य 'मरहठ्ठ देशी' लिहिल्याचे सांगतो. काव्याचा काळ सुमारे ख्रिस्ताब्द ८०० असावा असे तज्ज्ञांचे मत आहे. ...शातवाहन हे राजाचे नाव ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून तो थेट सत्पशती हालापर्यंत आढळते. ह्यातील एका शातवाहनाची (ख्रिस्तपूर्वीच्या शातवाहनाची) राणी पंडिता होती. ती राजाजवळ विनोदाने जे संस्कृत बोलली ते राजाला कळले नाही. म्हणून ती हसली व राजा अपमानित होऊन निघून गेला. राजाने सहा महिन्यांत भाषा शिकण्याचा निश्चय केला व तो जी भाषा शिकला ती प्राकृत, हा कथाभाग बृहत्कथेच्या आरंभी येतो. व त्यात वररुचीचे नाव प्रामुख्याने येते. ...मराठी वाङ्‌मयाच्या प्रौढत्त्वाची, स्वयंसिद्धतेची बीजे ही ह्या प्राकृत वाङ्‌मयात आहेत. बृहत्कथेला जगातील कथावाङ्‌मयात तोड नाही. ...हालाच्या सप्तशतीतील काव्यही लोकवाङ्‌मय आहे. कुठल्यातरी राज्याच्या राजकवीने केलेले ते काव्य नसून महाराष्ट्रात प्रचलीत असलेल्या लोकप्रिय काव्याचे ते संकलन आहे. त्यात राज्यांच्या दरबाराचे चित्रण नसून गावगाड्याचे, पाटलाचे, पाटलाच्या सुनेचे म्हणजेच महाराष्ट्राच्या साध्या ग्रामीण जीवनाचे चित्र पाहावयास सापडते. लिलावती ही अद्‌भुतरम्य कथा हाल राजाबद्दल आहे. त्यातही महाराष्ट्राचा प्राण जे प्रतिष्ठान नगर व तेथील गोला ऊर्फ गोदावरी नदी व तीत नहाणाऱ्या, अंगाला हळद फासणाऱ्या महाराष्ट्र सुंदरीचे वर्णन आढळते. हा कवी आपल्या भाषेला 'मरहठ्ठ देसी भाषा' असे नाव देतो.'' (पृ. २२३-२६)

दुर्गा भागवतांनी राजारामशास्त्री भागवतांच्या संशोधनाचा निष्कर्ष सांगताना म्हटले आहे की, ''जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे हे त्यांनी दाखवले आहे.'' (पृ.२)

थोर संशोधक श्री. व्यं. केतकर, राजारामशास्त्री भागवत, वि. का. राजवाडे, इरावती कर्वे, कृ. पां. कुलकर्णी, दत्तो वामन पोतदार, वि. ल. भावे, रा. भि. जोशी आदींच्या उपरोक्त संशोधनाच्या आधारे माहाराष्ट्री (मराठी) भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. माहाराष्ट्री, मऱ्हाठी, मराठी भाषेचा हा अडीच हजार वर्षांचा प्रवास साधार उलगडला म्हणजे मराठी भाषा ही अभिजात भाषा असल्याचे निर्विवादपणे सिद्ध होते.

**('लोकराज्य' ऑक्टोबर २०११ मधून पुनर्मुद्रित)**

**भ्रमणध्वनी : ९४२१०८१२१४**

# ज्ञानपीठ त्रिवेणी

**प्रा. डॉ. रेखा देशपांडे**

'ज्ञानपीठ पुरस्कार' हा भारतीय भाषेतील साहित्याला मिळणारा सर्वोच्च पुरस्कार आहे. मराठी साहित्यात हा पुरस्कार आतापर्यंत केवळ तीन साहित्यिकांना मिळाला आहे. या पुरस्काराच्या निमित्ताने भारतीय साहित्याच्या संदर्भात मराठी साहित्याचा अभ्यास झाला. मराठी साहित्य व्यापक पातळीवर पोचले हे तीन साहित्यिक मराठीतले सामाजिक विचारवंत व प्रतिभावंत होते. वि. स. खांडेकर हे कादंबरीकार, कथाकार व लघुनिबंधकार व समीक्षक होते. १९५९ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'ययाती' या कादंबरीला त्यांना १९७४ साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. दुसरा ज्ञानपीठ पुरस्कार कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांना 'नटसम्राट' या नाटकासाठी १९८७ साली मिळाला. वि. वा. शिरवाडकर हे कवी, नाटककार, कादंबरीकार होते. तिसरा पुरस्कार विंदा करंदीकर यांना 'अष्टदर्शने' या २००३ साली प्रसिद्ध झालेल्या अभंगात्मक लेखनासाठी मिळाला. करंदीकर कवी तसेच लघुनिबंधकार, समीक्षक होते.

'ययाती', 'विशाखा', 'अष्टदर्शने' या तिन्ही साहित्यकृती वेगवेगळ्या वर्षी प्रसिद्ध झाल्या आहेत. तरी तिन्ही लेखकांचा जडणघडणीचा काळ साधारणपणे समान आहे. १९३०/३५ च्या सुमारास लिहिती झालेली ही तरुण पिढी आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सुशिक्षित मध्यमवर्गाचे तिघेही प्रतिनिधी आहेत. एकाच काळाचे, परिस्थितीचे संस्कार त्यांच्यावर आहेत. या काळात भारतीय स्वातंत्र्यांसाठी विराट जनआंदोलन सुरू होते. सुशिक्षित व विचारी तरुण मार्क्सवादी व गांधीवादी यांच्यातील समता व श्रमप्रतिष्ठेने भारावलेला होता. यामुळेच कष्टकरी कामगार वर्ग तसेच हरिजन यांच्याविषयी प्रचंड कळवळा वाटत होता. स्वातंत्र्य व वर्गभेद, वर्णभेद समूळ नष्ट करणारी समानता हे त्या काळातील साहित्यिकांचे स्वप्न होते. नवीन समाजनिर्मितीच्या कल्पनेत स्वातंत्र्याचे रंग भरलेले होते. क्रांती, संघर्ष, बलिदान, हौतात्म्य या शब्दांमधे असणारे रौद्र आव्हान आणि उत्कटता यांना उधाण आलेले होते. या काळातील कविता, कादंबरी, कथा इ.मध्ये या वातावणाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते.

खांडेकरांच्या कादंबऱ्यांतील नायक अन्यायाच्या, शोषणाच्या विरुद्ध चळवळी उभारणारे, मोर्चे काढणारे सामान्यांचे कैवारी आहेत. पददलितांविषयी, गरिबांविषयी वाटणारी सहानुभूती ही त्यांच्या नायकाची महत्त्वाची खूण आहे. कुसुमाग्रजांचा विशाखा हा संपूर्ण काव्यसंग्रह संघर्षाने भारावलेल्या तरुणाईची वाणी ठरला. प्रकाश, यज्ञ, स्थंडिल, अग्नी, निखारे, समिधा या प्रतिमांमुळे त्या वातावरणात तरुण मने पेटून उठत होती. यातून 'स्थंडिल संप्रदाय' किंवा 'अग्निसंप्रदाय' असा वेगळा संप्रदाय निर्माण झाला. करंदीकरांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे शीर्षक 'स्वेदगंगा' असे आहे. साम्यवाद विचारसरणीच्या प्रभावातून समता व मानवता यांचा आग्रह आहे,



वक्तृत्वपूर्ण शैलीत वाचकांना आवाहन आहे.

वि. स. खांडेकर हे मराठीतले सामाजिक विचारसरणीचे कादंबरीकार व कथाकार होते. त्यांचे लिखाण मार्क्सवादी आणि गांधीवादी यातील तत्त्वांचा प्रचार करणारे आहे. सत्ताधारी, श्रीमंत यांच्याविरुद्ध ते गरिबांचा कैवार घेतात. त्यांच्या गरिबीचे उदात्तीकरण खांडेकर करतात. त्यांची पहिली कादंबरी 'हृदयाची हाक' प्रसिद्ध झाली. त्यानंतर कांचनमृग, उल्का, दोन ध्रुव, हिरवा चाफा, अश्रू, कौचवध, अमृतवेल, ययाती इ. त्यांच्या अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. या सर्व कादंबऱ्यांमधील संदेश काव्यमय भाषेत सुभाषितांप्रमाणे आलेला आहे. त्यांच्या लेखनात शब्दालंकार व अर्थालंकार तेज डोळे दीपवीत असते. अनेक भावपूर्ण, चमकदार कल्पना, शाब्दिक कोट्या यांच्याशिवाय त्यांचे लेखन अपूर्ण ठरेल. गरिबी-श्रीमंती, बुद्धी-भावना, व्यक्ती-समाज, जीवन-कला, पराक्रम-करुणा, भोग-त्याग अशी अनेक द्वंद्वे ते रंगवीत. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात असे द्वंद्व निर्माण होते तेव्हा यातील एकाची निवड करावी लागते. व्यक्तीने हा निर्णय विचारपूर्वक घ्यावा यासाठी ते प्रयत्नशील असतात. विचार करून श्रेयस्कर निर्णय घेण्यासाठी समाजमनाचे पोषण ते करीत असतात. समाजातील विषमता दूर करण्यासाठी तसेच समाजात सुख शांतता, स्थैर्य यांची प्रस्तावना करण्यासाठी मानवतावादाची मूल्ये ते मांडतात.

'ययाती' या त्यांच्या ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या कादंबरीतही सुख आणि आनंद, त्याग आणि भोग असाच मूल्यांचा संघर्ष त्यांनी मांडला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन सुखकर झाले. भौतिक सुखे मिळाली तरी समाधान, आनंद मिळाला नाही. जुनी आत्मीक मूल्ये उद्ध्वस्त झाली पण नवी मूल्ये निर्माण झाली नाहीत. अशा परिस्थितीतल्या सामान्य माणसाचा समानधर्म (ययाती) त्यांना पुराणकाळातल्या कथेत सापडला. पण, ही पौराणिक कादंबरीच्या रूपात वाचकांपुढे आली नाही. शर्मिष्ठा, कच, देवयानी, ययाती ह्या व्यक्तिरेखा शुद्ध पौराणिक असल्या तरी त्यांच्यातला संघर्ष सार्वकालीन आहे. कारण, मुळातच तो सुख व आनंद त्याग आणि भोग अशा मूलभूत मानवी प्रवृत्तीचा संघर्ष आहे. ती त्यामुळे पौराणिक कथातून वासना व विकार यांच्यावर नियंत्रण ठेवणारा किंवा त्यांचे उदात्तीकरण करणारा मानव 'कच' या व्यक्तिरेखेतून ते मांडतात. देवयानीवर असणारे त्याचे प्रेम विफल झाले तरी वैफल्यग्रस्त न होता त्याने आपले प्रेम विशाल मानव प्रेमात रूपांतरित केले आहे. खांडेकरांनी मांडलेली 'कच' ही व्यक्ती परिपूर्ण, विकसित मानवाची व म्हणूनच लेखकाच्या

विचारसरणीतल्या आवडत्या नायकाची आहे. त्या पार्श्वभूमीवर ययाती हा भोगावती व समृद्धीतही अतृप्त असलेला आधुनिक तरुणांचा प्रतिनिधी ठरतो. विविध सुखे मिळूनही तो सदैव नव्या सुखाच्या मागे धावणारा आहे. अर्थातच खांडेकर या ययातीचे नकार चित्रण करतात. 'ययाती' कादंबरीतले लिखाण हे त्यांच्या एकंदर कादंबरीविश्वाला समांतरच आहे. अनेक वर्षे त्यांच्या अंत:करणात घर केले या पौराणिक कथेची व त्यांच्या सामाजिक दु:खाची ते सांगड घालतात व त्यातून 'ययाती'सारखी अजरामर व दिशादर्शक कादंबरी तयार झाली. 'ययाती' कादंबरीच्या शेवटी 'पार्श्वभूमी'त ते लिहितात– आकाशातले दीप माळवले. देवळातले तारे विझले म्हणून हरकत नाही. जोपर्यंत मनुष्याच्या अंत:करणातली माणुसकीची ज्योत प्रकाशित राहील तोपर्यंत त्याचे डोळे ध्येयाच्या धृवताऱ्याच्या शोध करीत राहतील.


सामाजिक व नैतिक मूल्यांच्या घसरगुंडीच्या पार्श्वभूमीवर आपल्या अंत:करणाच्या साथीने मानवतावादी मार्ग काढायला सांगतात. हा विश्वास कादंबरीला आशावादी बनवितो. विश्वभरातील मानवाला ही, परिस्थिती अनुभवाला येत असल्यामुळेच खांडेकरांची ही कांदबरी 'अक्षर' अविनाशी अनुभव, वाङ्‌मय ठरली. त्यांच्या २५/३० आवृत्त्या निघाल्या. अनेक भाषांतरे झाली.

१९८७ साली मराठीतले दुसरे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर हे नाटककार, कादंबरीकारही होते. कुसुमाग्रज हे मानवतावादी कवी होते. वर्गभेद व वर्णभेद यातून निर्माण झालेल्या सामाजिक असंतोषाचा ज्वालामुखीच्या कवितातून अग्निरस वर्षाव करतो. १९४२ सालचे असंतोषाचे वातावरण त्यांची कविता त्यांच्या मुखर करते 'क्रान्तीचा जयजयकार' ही त्यांची कविता देशाचे राष्ट्रगीत ठरावी अशा योग्यतेची आहे. पु. ल. देशपांडे त्या काळातील तरुणाचे प्रातिनिधिक काढता माझे जन्मनक्षत्र मला ठाऊक नाही परंतु माझे तारुण्य जन्माला आले ते कुसुमाग्रजांनी मराठी साहित्याच्या आकाशात सोडलेल्या विशाखा नक्षत्रावर त्याकाळात प्रेयसीविषयी वाटणारी ओढ असो की मातेविषयीची काळजी, पारतंत्र्याविषयी वाटणारा संताप असो की राष्ट्रप्रेम सर्वकाही कुसुमाग्रजांच्याच ओळींमधून व्यक्त होते.

'नटसम्राट'हे मराठी रंगभूमीवरील एक अत्यंत



लोकप्रिय नाटक आहे. या नाटकाचा पहिला प्रयोग 'दि गोवा हिंदू असोसिएशन, कला विभाग' या संस्थेने दि. २३ डिसेंबर १९७० रोजी बिर्ला मातोश्री सभागृह, मुंबई येथे सादर केला. 'नटसम्राट'ही एक शोकांतिका आहे. एक महान कलावंताची त्याच्या मुलांकडून होणारी परवड यात मांडण्यात आली आहे. यातील आप्पासाहेब बेलवलकर ही मध्यवर्ती भूमिका साकारण्यात आजही मराठी नाट्यसृष्टीतील कलावंत धन्यता मानतात.



२००३ साली मराठी साहित्यात तिसरा ज्ञानपीठ पुरस्कार कविवर्य विंदा करंदीकर यांच्या अष्टदर्शने या अभंगात्मक लिखाणाला मिळाला. विंदा करंदीकर हे इंग्रजीचे व्यासंगी प्राध्यापक होते. ३९ वा ज्ञानपीठ पुरस्कार स्वीकारताना केलेल्या भाषणात त्यांनी खांडेकर व कुसुमाग्रज यांचा माझ्या काव्यदृष्टीवर प्रभाव होता, असे त्यांनी कबूल केले होते. सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता असलेल्या समाजनिर्मितीचं स्वप्न हे या तिन्ही साहित्यिकांचं स्वप्न होतं. स्वेदगंगा या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांची चिंतनशील वृत्ती व धारदार वैचारिकता तरुण वर्गाचे प्रतिनिधित्व करते. विरुपिला या संग्रहापर्यंत ही सामाजिक जाणीव तेवढी तीव्र व उत्कट राहिली नाही.

अष्टदर्शने या ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त लेखनात कवी सामाजिकतेकडून तत्त्वज्ञानाकडे पोचल्याचे जाणवते. कवीच्या वाढत्या वयाबरोबरच चिंतन, अभ्यास यातून वृत्ती सहजपणे तत्त्वज्ञानाकडे वळली आहे. युरोपियन तत्त्वज्ञ व एक भारतीय तत्त्वचिंतक यांच्या तत्त्वज्ञानातील सूत्रांचा परिचय ते अभंग छंदात करून देतात. मुळात करंदीकरांना अभंग लिहिण्याचा अनुभव आहे व ते भारतीय परंपरेला धरून आहे. सात युरोपिय तत्त्वचिंतकाचा देकार्त, स्पिनोझा, कान्ट, हेगेल, शोपेनहौर, नित्शे बर्गसा परिचय त्यांच्या चरित्र व तत्त्वज्ञानासकट करून दिलेला आहे. त्यानिमित्ताने युरोपिय तात्त्विक क्षेत्राचा साडेचार शतकांचा परिचय आपल्याला होतो. हे सर्व तत्त्वज्ञ बुद्धिवादी तर चार्वाक अनुभववादी आहे. तो नास्तिक, इहवादी व सुखवादी आहे. कान्टची नीती व सौंदर्य याविषयीची भूमिका करंदीकरांना महत्त्वाची वाटते. बर्गसाँ आणि शोपेनहौर यांच्या तत्त्वज्ञानात व्यक्तीजीवनेच्छा केंद्रस्थानी मानणे करंदीकरांना महत्त्वाचे वाटते. या सर्व तत्त्वज्ञांची निवड ही त्यांच्या चिंतनाचे प्रतिबिंब आहे.

मराठीतील हे तीन साहित्यिक आता भारती साहित्यिकांच्या बरोबरीने सन्माननीय ठरलेले आहेत. त्यांचे साहित्य भारतातील सर्व भाषांमार्फत वाचकांना वाचायला मिळेल. पुरस्काराने लेखक मोठा ठरत नसला तरी त्यांचे साहित्य व्यापक पातळीवर पोचले यात शंका नाही. जोपर्यंत मानवी समाज अस्तित्वात आहे तोपर्यंत यांचे लिखाण मानवाला ऊर्जा देईल, कुठल्याही काळातील मानवाला त्यात आपल्याच संघर्षाचे प्रतिबिंब दिसेल हीच वाङ्‌मयाच्या जिवंतपणाची खूण असते. मानवाचे आत्मिक पोषण करण्यासाठीच वाङ्‌मयाची गरज असते. मराठी साहित्य वैश्विक पातळीवर पोचावे हीच आपली मराठी माणसांची सदिच्छा !

**संपर्क : ९४२३५७४३१६**



# साहित्यपालखीचे भोई

मराठी साहित्य संमेलन म्हणजे मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या, मराठी भाषेवर श्रद्धा असणाऱ्या आणि मराठमोळ्या संस्कृतीचा वसा जपणाऱ्या अशा सर्व साहित्यप्रेमींचा, रसिकांचा आनंद सोहळा असतो. तालुका पातळीवरील छोटा साहित्य मेळा असो की अगदी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन असो त्यात साहित्यिक, संपादक, प्रकाशक, लेखक आणि साहित्याचे आस्वादक उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. म्हणूनच साहित्य संमेलन हे केवळ साहित्यिकांपुरते मर्यादित न राहता समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारे साहित्याचे, संस्कृतीचे आणि विचारांचे व्यासपीठ ठरते.

साहित्य संमेलनाच्या आयोजनात आणि यशस्वितेसाठी जसे साहित्यिकांचे योगदान असते, तद्वतच समाजातील सामान्य नागरिकांचे, कार्यकर्त्यांचेही महत्त्वपूर्ण योगदान असते; किंबहुना साहित्याची आणि साहित्यिकांची पालखी सामान्यजन, रसिक आणि कार्यकर्तेच वाहून नेत असतात. त्याचे कारण साहित्य संमेलन हा त्यांच्या रसिकतेचा, श्रद्धेचा, अभिमानाचा, निष्ठेचा विषय असतो. यासाठी संमेलनाच्या आयोजनासाठी रात्रंदिवस खपणारे, तन-मन-धनपूर्वक राबणारे, अनामिकपणे संमेलनासाठी सतत जगणारे असंख्य कार्यकर्ते हेच साहित्याचे उपासक असतात. म्हणून गेली ८५ वर्षे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन चांद्यापासून बांद्यापर्यंत उत्साहाने केले जात आहे.

अंमळनेर येथे १९९५ साली 'प्रतिभासंगम' या राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात प्राचार्य राम शेवाळकर म्हणाले होते, "साहित्याची निर्मिती जरी साहित्यिकाच्या कुशीतून होत असली तरी त्या साहित्यकृतीचे पालन-पोषण, संगोपन वाचकांच्या, रसिकांच्या मांडीवरच होते. रसिक हा मुका साहित्यिकच असतो. म्हणून साहित्य संमेलनात बोलके, लिहिते साहित्यिक मोजकेच असतात, ते व्यासपीठावर बसतात; मुके साहित्यिक असंख्य असतात. त्यांच्या उपस्थितीने सभामंडप भरलेला असतो."

एकूणच साहित्य संमेलनात आणि साहित्य संमेलनाच्या आयोजनात भाषेवर प्रेम करणाऱ्या सामान्य वाचकांपासून ते धडाडीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या उत्साहाचा महत्त्वपूर्ण सहभाग आणि योगदान असते.

महामंडळाकडून साहित्य संमेलन मिळविण्यापासून ते संमेलनाच्या मांडव परतावणीपर्यंत तसेच निधी संकलनापासून पारदर्शकतेने हिशेब जाहीर करेपर्यंत आयोजक प्रयत्नांची शर्थ करीत असतात. संमेलन आयोजनाचे पाच-सहा महिने कार्यकर्त्यांसाठी 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असेच असतात. कधी हार कधी प्रहार, कधी मान कधी अपमान, कधी जय कधी पराजय, कधी कौतुकाची थाप नाहीतर पाठीवर लात असं सगळं त्या पाच-सहा महिन्यांत कार्यकर्त्यांच्या नशिबी असतं. आयोजक कार्यकर्ते हे सगळं आनंदानं पचवत असतात ते साहित्याच्या, भाषेच्या अभिमानासाठी आणि त्यावरील श्रद्धेमुळेच.

प्रा. नरेंद्र पाठक

**आयोजकांचे योगदान**

साहित्य संमेलनाचे निमंत्रण मिळाल्यापासून संमेलनाच्या आयोजन समितीचे कार्यकर्ते आपल्याला मिळालेलं हे साहित्य संमेलन वैशिष्ट्यपूर्ण कसं होईल? गुणवत्तापूर्ण व आगळंवेगळं कसं होईल? यासाठी प्रयत्न करीत असतात. कार्यकर्ते आपल्या कल्पकतेच्या साहाय्याने कार्यक्रमात विविधता आणण्याचा, साहित्य सोहळा वैशिष्ट्यपूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. या सांघिक प्रयत्नातून काही कायमस्वरूपी सकारात्मक बदल, उपक्रम शोधून ते साहित्य संमेलनाचे मानदंड म्हणून महामंडळाकडून स्वीकारले जातात. अशा सांघिक प्रयत्नातून साहित्य संमेलनाच्या उद्दिष्टांच्या परिपूर्णतेच्या दिशेने वाटचाल होत असते.

विविध स्वभाव विशेष असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नांचं त्यांच्या भावभावनांचं मनुष्य स्वभावाचं जाहीर प्रगटीकरण अशा साहित्य संमेलनातून होत असतं.

साहित्य महामंडळ, कार्यक्रम समिती आणि आयोजक यांच्यात योग्य समन्वय व सहकार्यातून संमेलनाच्या आयोजनात सकारात्मक बदल घडविले जातात. काही नवीन पायंडे पाडले जातात. याचं उत्तम उदाहरण म्हणजे ठाणे येथे झालेले ८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अनेक चांगल्या गोष्टी कार्यकर्त्यांच्या चिंतनातून आणि सांघिक प्रयत्नाने घडून आल्या. वानगी दाखल काही उदाहरणे खालीलप्रमाणे:-

१. प्रकाशन मंच : तीन दिवस पुस्तक प्रकाशनांसाठी खुले व्यासपीठ. या प्रकाशन मंचावरून सन्मानाने १२२ पुस्तकांची प्रकाशने मान्यवरांच्या हस्ते झाली.


२. संमेलनपूर्व संमेलनं : अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन खेडापाड्यांपर्यंत पोहोचलं. आदिवासी, कोळी, ग्रामीण, महानुभाव, महिला, बालसाहित्य अशी विविध संमेलनं ही संपूर्ण ठाणे जिल्ह्यांत संमेलनपूर्व संमेलनातून पोहोचविली गेलीत.

३. राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलन : मुख्य संमेलनाला जोडून राज्यस्तरीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे एक दिवसाचे साहित्य संमेलन आयोजित केले गेले. ४०० महाविद्यालयीन विद्यार्थी साहित्यिक या संमेलनात उपस्थित होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात महाविद्यालयीन युवकांचा असा सर्वांगीण विचार प्रथमच झाला.

४. मराठी अभिमान गीत : सर्वसाधारण साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याच्या प्रारंभी स्वागत गीत, स्वागत वंदना अथवा ईशस्तवनाने प्रारंभ होतो. मात्र, या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन मराठी साहित्य संमेलनाची उंची वाढविणाऱ्या कवीवर्य सुरेश भटांच्या मराठी अभिमान गीताचा अनोखा प्रयोग झाला. 'जाहलो खरेच धन्य, बोलतो मराठी' या मराठी अभिमान गीताला साहित्य संमेलन गीत म्हणून मान्यता मिळाली, त्या मराठी अभिमान गीताचा सन्मान झाला.

५) ज्येष्ठ कवी जगदीश खेबूडकरांची मुलाखत ऐतिहासिक, लक्ष्यवेधी आणि एका ज्येष्ठ कवीचा गौरव करणारी ठरली. जी त्यांच्या आयुष्यातील अखेरची मुलाखत ठरली.

६) आर्थिक पारदर्शकता - ८४ व्या संमेलनाच्या अनेक जमेच्या बाबींमध्ये आर्थिक पारदर्शकता ही अनुकरणीय ठरली. अन्यथा संमेलनात किंवा



संमेलनावर आर्थिक विषयांवर वादळं उठली जातात; मात्र, ८४ व्या साहित्य संमेलनाच्या आयोजकांनी प्रथमपासूनच आर्थिक व्यवहार पारदर्शक ठेवून संमेलनानंतर दोन महिन्यांच्या आत जमाखर्चाचे ऑडिट करून हिशेब जाहीर केले. सध्या समाजात होत असलेल्या आर्थिक घोटाळ्यांच्या वातावरणात ही गोष्ट खरोखरच अनुकरणीय आहे.

७) महामंडळाच्या महाकोषात आयोजकांकडून संमेलनानंतर रुपये ३ लाखांची देणगी. साहित्य संमेलन व महामंडळ स्वयंपूर्ण झालं पाहिजे, महाकोष वाढवला पाहिजे केवळ असं न म्हणता कृतिशील संस्कार हा एक चांगला पायंडा पाडला गेला.

वरील गोष्टी म्हणजे कार्यकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नांच्या सकारात्मक हुंकार आहे. अशा अनेक गोष्टी महाराष्ट्रात जिथे जिथे साहित्य संमेलन झालीत त्या त्या ठिकाणी अशा प्रकारच्या चांगल्या उपलब्धती आहेत. असतीलही त्याची नोंद घेतली गेली पाहिजे. दस्तऐवज म्हणून लिखित स्वरूपात अशा बाबी संकलित झाल्या पाहिजेत. कारण, अशा बदलांमागे कार्यकर्त्यांचे कष्ट, प्रामाणिक प्रयत्न आणि धडपड असते. सामान्य रसिक आणि कार्यकर्ते, आयोजक साहित्य संमेलनाचे वैभव असतात.

आर्थिक नियोजन, कार्यक्रम याशिवाय संमेलन व्यवस्था उभारणी हेसुद्धा कार्यकर्त्यांसाठी आव्हानच असते. एका मोकळ्या मैदानावर छोटंसं गाव वसवणं म्हणजे एखाद्या वास्तुविशारद किंवा विश्वकर्माचं काम करण्याचा तो अनुभव असतो. विद्युतव्यवस्था, ध्वनिव्यवस्था स्वच्छता, पाणी, भोजन, मंडप, बैठक, व्यासपीठ, पुस्तकांची दालनं, स्टॉल्स, खाद्यपदार्थ, सुरक्षा इ. सर्व व्यवस्था चोखपणे उभाराव्या लागतात. त्यासाठी जरी पैसे देऊन ठेकेदारांकडून काम करून घ्यायची असली तरी मूळ कल्पना, आराखडा, आखणी, कल्पकता आणि योग्य वेळेत ठेकेदारांकडून उभारणी पूर्ण करून घेणे हे महाकठीण असतं. हे शिवधनुष्य आयोजक कार्यकर्ते लीलया पेलतात व संमेलन यशस्वी होतं.

या समित्यांशिवाय आयोजक संस्थेची कार्यकारिणी, ज्या शहरात संमेलन होणर आहे त्या शहरातील किंवा जिल्ह्यातील मान्यवरांची स्वागत समिती असा हा आयोजन समितीच्या कामाचा प्रचंड व्याप अन् म्हटलं तर ताप. अशा धावपळीत उद्घाटन सोहळ्याची घटिका येऊन ठेपते. दिमाखदार पद्धतीने उत्सवी वातावरणात साहित्य संमेलनाचे उद्घाटन होते, मान्यवर साहित्यिक व्यासपीठावर विराजमान होतात, वाहिन्यांवरून संपूर्ण महाराष्ट्र मराठी साहित्य संमेलनाचं हे वैभव याची देही याची डोळा अनुभवत असतो. तीन दिवसांत भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना,

## पूर्वतयारीसाठी...

* ५००० ते १०००० आसनक्षमतेचा एक सभामंडप व त्या प्रमाणात मोठे व्यासपीठ.
* संमेलन स्थळाच्या जवळपास मोठी १००० ते २००० आसनक्षमतेची दोन सभागृहे. अशी दोन सभागृह उपलब्ध नसतील तर आणखी दोन सभामंडप व व्यासपीठांची उभारणी.
* मोठे प्रवेशद्वार
* प्रदर्शनी मंडप
* सर्व सभामंडपासाठी आवश्यकतेप्रमाणे प्रवेशद्वार
* सभामंडप, व्यासपीठ, संमेलनस्थळ प्रवेशद्वार यांची नामकरणं
* पुस्तक विक्रेते, वितरक, प्रकाशकांसाठी अंदाजे २०० ते २५० ग्रंथ स्टॉल्स.
* भोजन मंडप, भोजन भांडार गृह, पाकखाना.
* स्वच्छता गृह, पाणी व्यवस्था
* प्रतिनिधी निवास व्यवस्था, महामंडळ सदस्य निवास व्यवस्था, साहित्यिक-निमंत्रितांची निवास व्यवस्था.
* स्वागत कक्ष, पत्रकार कक्ष
* कार्यालय उभारणी, Fax, Telephone, Internet कनेक्शन
* वाहनतळ
* संमेलन मंडप व परिसराचे सुशोभीकरण
* विद्युतप्रवाह खंडित होणार हे गृहीत धरून जनरेटर व्यवस्था
* प्राथमिक दवाखाना.
* फायर ब्रिगेड व्यवस्था.
* आपत्कालीन कक्ष.
* प्रसारमाध्यमांसाठी स्वतंत्र विद्युत केबल व्यवस्था.
* या सर्व उभारणीसाठी स्थानिक प्रशासन व शासकीय यंत्रणेच्या परवानग्या व परवाने.

याशिवाय संमेलनाच्या आयोजनासाठी खालील प्रमाणे अनेक समित्या कार्यरत असतात.

## ...आणि या समित्या

१. कार्यालयीन समिती
२. ध्वनिचित्र मुद्रण समिती
३. प्रसिद्धी समिती
४. मंडप समिती
५. स्मरणिका समिती
६. ग्रंथदिंडी समिती
७. भोजन समिती
८. सुरक्षा समिती
९. स्पर्धा समिती
१०. निवास समिती
११. वैद्यकीय मदत समिती
१२. कायदा सुव्यवस्था समिती
१३. स्वागत कक्ष समिती
१४. सूत्रसंचालन-निवेदन समिती
१५. ग्रंथ प्रदर्शन समिती
१६. निधी समिती
१७. स्वयंसेवक समिती
१८. कार्यक्रम शिष्टाचार समिती
१९. संपर्क-निरोप-निमंत्रण समिती
२०. व्यासपीठ व्यवस्था समिती
२१. वेबसाईट समिती
२२. परिवहन समिती
२३. जिल्हा कार्यक्रम सहभाग समिती
२४. पर्यावरण समिती
२५. छपाई कामकाज समिती
२६. सांस्कृतिक कार्यक्रम समिती
२७. प्रकाशन मंच समिती
२८. आपत्कालीन व्यवस्थापन समिती
२९. परवाने-परवानग्या समिती
३०. कोश समिती
३१. आवश्यकतेप्रमाणे स्थानिक कार्यक्रम, स्थानिक गरजा लक्षात घेऊन अन्य समित्या.

या सर्व समित्यांमध्ये १ प्रमुख, २ सहप्रमुख व अंदाजे १०-१५ कार्यकर्ते कार्यरत असतात.



साहित्यिकांना मिळत असते. संमेलन सोहळा दिवसेंदिवस रंगत असतो, त्या वेळी असंख्य रसिक आणि कार्यकर्त्यांनी अनामिकपणे हा गोवर्धन खालून आपल्या असंख्य हातांनी उचललेला असतो. संमेलन पेलणारे आणि उचलून धरणारे हात त्या वेळी कुठेही दिसत नसतात. त्या हातांची तशी अपेक्षाही नसते.

संमेलनाचे आयोजन करणाऱ्या महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या कार्यकर्त्यांसाठी त्यांच्या मानसिकतेचं वर्णन होऊ शकेल अशी एक कविता आठवते. त्या कवितेत कार्यकर्त्यांविषयी लिहिलं आहे.

असू आम्ही सुखाने पत्थर पायातील
मंदिर उभविणे, हेच आमुचे शील,
असू आम्ही सुखाने पत्थर पायातील...

ताजमहल बांधणारे, अंजिठा-वेरुळची लेणी कोरणारे, उंच कुतुबमिनार उभारणारे 'हात' आजही अनामिकच आहेत.

मला वाटतं अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचं गेल्या ८५ वर्षांचं हे यश आहे. यातूनच मराठी साहित्य संमेलनाची आवश्यकता, यश व जनसामान्यांना सहभाग या बाबी अधोरेखित होतात. गेली ८५ वर्षे अ. भा. मराठी साहित्य संमेलनाची साहित्य पालखी वाहून नेण्याचं काम संपूर्ण भारत देशामध्ये असंख्य मराठीप्रेमी कार्यकर्त्यांनी, आयोजकांनी मोठ्या श्रद्धेने केलं आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'लोकराज्य'ने प्रकाशित केलेल्या संमेलन विशेषांकाच्या निमित्ताने लिहिलेला हा लेख अशा असंख्य कार्यकर्त्यांचा आणि लाखो सामान्य रसिक जनांचा गौरवलेख ठरो.

**संपर्क : ९८६९६८४०८६**

## नीती-अनितीचा नवा विचार

अलीकडच्या काळात बराच वादग्रस्त झालेला अश्लीलतेचा प्रश्नही आपल्याला वाङ्मयीन अनुभवाच्या अनुरोधानेच तपासून पाहायला हवा. अश्लीलतेचा प्रश्न सामाजिक बंधनाचा आहे त्याप्रमाणेच अनुभवविषयक प्रामाणिकतेचाही आहे. एखादे लेखन समाजाचे संघटन उद्ध्वस्त करणारे अथवा करू पाहणारे आहे असे ठरले तर त्या लेखनाच्या प्रसारास मनाई करण्याचा अधिकार समाजाला, म्हणजे त्या समाजाच्या शासनसत्तेला असतो हे तत्त्वत: आणि व्यवहारातही वादातीत आहे. जगात असे कोणतेही सरकार नाही की ज्याने अश्लीलतेसंबंधी कायदे केलेले नाहीत. तेव्हा सरकारला नियंत्रणाचा अधिकार नाही या मुद्द्यावर भांडत बसण्यात अर्थ नाही. हे नियंत्रणाचे स्वरूप कोणते असावे याबाबतीत आपण सरकारला काही सांगू शकतो व साहित्याच्या प्रचलित गरजा आणि नैतिक कल्पनांत होणारे बदल यांची चिकित्सा करून सरकारही आपल्या प्रस्थापित भूमिकेचा फेरविचार करू शकते. पूर्वी आपल्याकडे राजसत्तेचे शासन होते. तेव्हा हा विचार शासकीय कक्षेतील मानला जात होता असे दिसत नाही. राजसत्तेच्या अगदी अधिष्ठानाजवळ असलेल्या संस्कृत लेखकांनी आणि मराठी शाहिरांनी श्लील अश्लीलाचे बंधन कोठे पाळलेले नाही. इंग्रजांच्या आमदानीत सरकारी कारभार, लोकशाहीच्या तत्त्वानुसार, सर्वव्यापी झाला आणि ही नियंत्रणे आपल्याकडे आली. ती आता कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अटळ आहेत हे ध्यानात घ्यायला हवे. पण, त्याचबरोबर आपण सरकारला हेही सांगायला हवे की, नीती-अनितीच्या रूढ परंपरागत समजुती (आणि त्याही इंग्रजांनी इकडे आणलेल्या) आता बदलत आहेत आणि या नवीन विचारांच्या अनुषंगाने कायद्याची सुधारणा व अंमलबजावणी व्हायला हवी. सामाजिक जीवनात नीती-अनितीचे इलाखे नेमके कोणते आहेत याचा नव्याने शोध घ्यायला हवा. प्रणयसंबंध, मद्यपान, जुगार या किंवा अशा अन्य गोष्टींच्या संबंधातच हातात कुऱ्हाड घेऊन उभी असलेली नीती हे नीतीचे केवळ विकृतच नव्हे, तर अत्यंत दांभिक असे स्वरूप असते. नीती-अनितीच्या आजच्या कल्पना सोळाव्या शतकातील पापाच्या कल्पनेवर नव्हे, तर न्याय-अन्यायाच्या मूलगामी विचारावर उभारणे आवश्यक झाले आहे.

**– वि. वा. शिरवाडकर**

**(मडगाव – १९६४, अध्यक्षीय भाषणातून)**





# 'ऐश्वर्या राय गर्भावस्थेत'

माधुरी पुरंदरे ही आमची मैत्रीण. ती जी गोष्ट करते ती मनापासून करते. तिनं लहान मुलांसाठी लिहिलेली पुस्तकं आणि त्यांवर स्वत:च काढलेली गोड चित्रं, ही तिची कामगिरी फार मोलाची आहे. बाल-वाङ्मयाच्या क्षेत्रात तिचं नाव भारतभर फार आदरानं आणि कौतुकानं घेतलं जातं. तिनं लहान मुलांना वाचायची गोडी लागावी म्हणून 'वाचू आनंदे'चे खंड संपादित केले. इथल्या मुलांना मराठी नेटकं लिहिता यावं म्हणून तिनं 'लिहावे नेटके' हे खंड प्रसिद्ध केले. साहजिकच जे लिहिलं जातं ते नेटकं असावं, ही तिची अपेक्षा असते. इंग्रजी भाषा लिहिताना स्पेलिंगविषयी जागरूक असणारा सुशिक्षित मराठी माणूस प्रमाण मराठीत लिहिताना मात्र त्या भाषेचं व्याकरण, नियम शिकून घेण्याचा कंटाळा करतो. याबाबत मराठी वर्तमानपत्रं, त्यांचे संपादक, त्यांचे बातमीदार त्याचप्रमाणे टीव्हीच्या विविध वाहिन्यांवर रतीब घालणारे लेखक, वृत्तनिवेदक, मालिकेत काम करणारे आणि स्वत:ला मराठी म्हणवून घेणारे कलाकार या साऱ्यांची उदासीनता इतकी टोकाची आहे की, अखेरीस कंटाळून तिकडे दुर्लक्षच करण्याचा सोपा पर्याय आपण निवडतो.

पण कधी कधी हे सारंच असह्य होतं आणि मग माधुरीसारख्या लेखिकेचा संताप अनावर होतो. तिचे राग-लोभ तसेही तीव्र आहेतच. पुण्यातल्या एका बड्या मराठी वर्तमानपत्रानं एके दिवशी पहिल्या पानावर सर्वांत वर उजव्या कोपऱ्यात चौकटीत ऐश्वर्या रायचा पूर्ण फोटो टाकून आतल्या बातमीची घोषणा केली होती. त्या बातमीचा मथळा होता- 'ऐश्वर्या राय गर्भावस्थेत'. त्या वेळी ऐश्वर्या गरोदर होती, अजून बाळंत व्हायची होती. ऐश्वर्याच्या फोटोत मात्र ती गरोदर दिसत नव्हती. तिचा सिनेमातला असातसाच एक फोटो उचलून सोबत टाकून दिलेला होता. आतसुद्धा बातमीत तोच फोटो आणि सविस्तर बातमी-'ऐश्वर्या राय गर्भावस्थेत'. बातमीदार गरोदरपणाच्या अवस्थेला उगाचच जरा भारदस्त पण धादांत चुकीचा शब्द वापरत होता- 'गर्भावस्था'.

माधुरीला हे काही सहन झालं नाही. तिनं थेट त्या दैनिकाच्या संपादक महोदयांना फोन लावला. पलीकडे संपादक होते. त्यांनी माधुरीचं नाव बहुदा ऐकलं असावं. त्यामुळे ते ऐकून घेण्याच्या तरी मन:स्थितीत असावेत. अलीकडे वर्तमानपत्रातल्या मंडळींची कुणाचं ऐकून घेण्याची सवय तशीही कमी झालेली (किंवा नष्टच झालेली) आहे. माधुरीनं संपादकांना विचारलं,

''अहो, हे काय? 'ऐश्वर्या गर्भावस्थेत' ही बातमी तुम्ही पाहिली नाही का?''

''पाहिली ना... पण गडबडीत अशा चुका राहून जातात. आणि आम्हाला प्रत्येक बातमी नजरेखालून घालायला वेळच नसतो. खरं तर हे काम पुरवणीच्या संपादकाचं आहे; पण त्यानं नीट केलं नाही. त्यामुळे आमची पंचाईत झाली.''

**मुकुंद टाकसाळे**

''मला त्या संपादकांचा फोन देता का?'' तिनं विचारलं. बहुधा आपली सुटका करून घेण्यासाठी मुख्य संपादकांनी तातडीनं त्या संपादकाला फोन लावला.

''हॅलो... मी माधुरी पुरंदरे.''

''बोला -''

तिनं ती बातमी वाचून दाखवली आणि नंतर विचारलं, ''अहो, हे कुठलं मराठी ? 'ऐश्वर्या राय गर्भावस्थेत'?''

''त्याचं काय आहे... ती बातमी आमच्या इथल्या एका मुलीनं लिहिली. तुम्हाला ठाऊक आहेच, या नव्या पिढीचं मराठी किती कच्चं असतं ते. आणि आमचा कामाचा धबडगा एवढा असतो की, आम्हाला प्रत्येक गोष्ट पाहायला जमत नाही.''

''मला तिचा फोन नंबर मिळेल का?''

''अं ... पण कशाला हवा आहे तुम्हाला?''

'' मला त्या मुलीशी बोलायचं आहे.''

खरं तर वर्तमानपत्राच्या रोजच्या कामात अशी ढवळाढवळ करणाऱ्याचे फारसे लाड चालवून घेण्याची पुण्यात परंपरा नाही. त्यातून कुणी एक वेडी बाई कुठल्या तरी बातमीसाठी चार-चार जणांना फोन करते, हे म्हणजे फारच झालं. तिचं नाव त्या वर्तमानपत्राच्या 'काळ्या यादी'त घालून टाकण्याचं फरमान मुख्य संपादकांनी तातडीनं कसं काढलं नाही, हेच आश्चर्य वाटावं अशी परिस्थिती. पण तो पुरवणीचा संपादक म्हणाला,

''तुम्ही तिच्याशीच बोला. तिचा नंबर मी तुम्हाला देतो.'' हे करून बहुधा त्यानंही माधुरीपासून स्वत:ची सुटका करून घेतली असावी. अखेर त्या मुलीला फोनवर गाठण्यात माधुरीला यश आलं.

माधुरीनं तिला तिच्या वर्तमानपत्रातली ती बातमी उघडून समोर टेबलावर ठेवायला लावली. 'ऐश्वर्या राय गर्भावस्थेत' ही बातमी वाचून दाखवून ती म्हणाली, ''या बातमीत तुम्हाला काही चूक नाही वाटत?''

ती शरमली. म्हणाली, ''सॉरी सॉरी. 'ऐश्वर्या राय गर्भावस्थेत' असं त्या बातमीत म्हटलं खरं, पण काय झालं, मॅडम, आमच्या छायाचित्रकाराला ऐश्वर्याचा गर्भावस्थेतला फोटोच नाही मिळाला. मग आम्ही साधाच फोटो टाकला. तुमच्या ते लक्षात आलं, पण बाकी कुणाला काही विशेष खटकलं नाही. पण चूक ती चूकच! सॉरी.''

''अहो बाई, तुमच्या छायाचित्रकारालाच काय, पण कुणालाच ऐश्वर्याचा गर्भावस्थेतला फोटो काढता येणार नाही. किंबहुना कुणाच्याच गर्भावस्थेतला फोटो काढता येणार नाही, हे तुमच्या लक्षात आलेलं आहे का?''

मग माधुरीनं तिला तिची काय चूक झाली आहे ते समजावून दिलं. तिला ते कितपत उमगलं ठाऊक नाही. पण माधुरी तिला शेवटी म्हणाली, ''एक नक्की आहे. उद्यापासून 'तुमचं वर्तमानपत्र टाकू नकोस' असं मी माझ्या पेपर टाकणाऱ्या मुलाला सांगणार आहे.''

हा सारा एपिसोड मनोरंजक होता, हे नक्की. पण तरीही माधुरीची शेवटची कृती ही जरा आततायीपणाचीच

झाली. कारण अशा 'छोट्या' कारणानं जर एखादा वाचक एकदम पेपर बंद करणार असेल तर त्यात त्या संपादक मंडळींचं काहीच नुकसान नाही; पण माधुरी असे किती पेपर बंद करणार? मग तिला वाचायला मराठी वर्तमानपत्रच उरणार नाही. नुकसान तिचंच आहे. तिला रोजच्या 'अशा' स्वस्तातल्या करमणुकीला मुकावं लागेल.

**('आपले वाङ्मय वृत्त' जानेवारी २०१२ मधून साभार)**

**संपर्क : मुकुंद टाकसाळे : ९८५०८१७२१०**
**माधुरी पुरंदरे** ०२० - २५४६७८९५



# संमेलनाला जाण्यात गैर काय?

मराठी भाषेत आणि मराठी साहित्य व्यवहारात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे विशेष महत्व आहे. या संबंधाला १३२ वर्षांचा संस्थात्मक इतिहास आहे. या इतिहासाच्या तपशीलात जाऊन विचार करणे खूप विस्ताराचे आहे. तूर्तास, या संमेलनाच्या प्रारंभी सन १८७८ महादेव गोविंद रानडे यांनी ग्रंथकारसभेच्या मराठी ग्रंथकार सभा सहयोगाने मराठी ग्रंथकारसंमेलनाचा आरंभ केला. या ग्रंथकारसभेच्या दुसऱ्या सभेसाठी १८८५ मध्ये न्यायमूर्ती रानडे यांनी महात्मा जोतिबा फुले यांना पत्र पाठवून आमंत्रण दिले. या आमंत्रणाचा स्वीकार करण्यास महात्मा जोतिबा फुल्यांचा विरोध होता. त्या संदर्भातले त्यांचे पूर्ण पत्र याच अंकात इतरत्र दिले आहे. या पुस्तकाचा आधार घेत आजही काही मित्रांना या संमेलनात आपण सहभागी होऊ नये असे वाटत आहे.

या वर्षी चंद्रपूर येथे ८५ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन होत आहे. म्हणजे हा प्रवास जवळपास १३३ वर्षांचा आहे. महात्मा फुल्यांनी आपली भूमिका मांडताना जे विचार मांडले होते ते १८८५ साली त्या वेळचे ग्रंथकार संमेलनाचे आयोजक यांची मर्यादित संख्या आणि त्यावेळचा मराठी भाषा व्यवहारात गुंतलेला मर्यादित वाचक वर्ग विचारात घेता योग्य होता. पण आज आयोजकांचीही संख्या वाढलेली आहे आणि वाचणाऱ्यांमध्ये बहुजनांचा प्रभाव टाकू शकेल इतकी संख्यात्मक ताकद आहे. गेल्या शंभर-दीडशे वर्षांत मराठी समाज आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात याचे प्रमाण पाहता येईल. समाजाने मोठ्या प्रमाणावर साहित्य संमेलनाचा स्वीकार केलेला दिसतो. त्यामुळे प्रातिनिधीक झालेले हे बदल आपण विचार करणे गरजेचे आहे. याला आणखी एक बाजू आहे. मधल्या काळात मराठी ग्रंथकार सभा विसर्जित होऊन मराठी साहित्य मंडळाची स्थापना झाली आहे. आणि त्याला महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्रा बाहेरील साहित्य संस्थांचा काही एक पाठिंबा आहे. लोकमानसाचा पाठिंबा आणि सहभाग तसेच साहित्य व्यवहारात गुंतलेल्या बहुसंख्य लोकांचा पाठिंबाही आपण विचारात घ्यायला हवा. हा पाठिंबा विचारात घेतला तर ज्यांना ही भूमिका काही प्रमाणात मान्य नसेल त्यांनाही हस्तक्षेप करण्याची संधी मिळायला हवी आणि त्यांनी ती घ्यायला हवी. साहित्य महामंडळाचे काम काही प्रमाणात लोकशाही व्यवहाराचा आधार आहे. तो पुरेसा आहे आणि योग्य आहे, असे मलाही वाटत नाही. हे लक्षात घेऊनही काहीएक भलीबुरी लोकशाही व्यवस्था निदान साहित्य व्यवहारात लोकांपुरती तिथे कार्यरत आहे असे म्हणत यावे. सुधारणांना खूप वाव आहे. अनेकानेक समाजघटकांना लिहिणाऱ्यांना, लिहिलेले प्रकाशात आणणाऱ्यांना आणि लिहिलेले

**सतीश काळसेकर**

वाचणाऱ्यांना अधिक योग्य प्रमाणात समाविष्ट करून घेण्याचे प्रयत्न व्हायला हवेत, याविषयीही जराही दुमत नाही. परंतु ज्या राज्यघटनेच्या आधाराने भारतीय प्रजासत्ताक आणि भारतीय लोकशाही आपली वाटचाल करीत आहे आणि ज्या तऱ्हेचे संघर्ष या लोकशाहीत सुधारणा व्हावी यासाठी करावे लागत आहेत तेच थांबलेले नाहीत.

साहित्य व्यवहारातही अशाच वर्तनाची अपेक्षा करायला हरकत नाही. लोकशाही हस्तक्षेप आवश्यकच असतो. बहिष्काराने हस्तक्षेप थांबतो. दुर्लक्षित होतो आणि लोकशाही बळकट करण्यासाठी करावयाच्या प्रयत्नात खंड पडतो. मराठीत साहित्याच्या आरंभाशीच ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे यांना बहिष्कृत करण्याचे, वाळीत टाकण्याचे कुकर्म त्यावेळच्या अभिजनवर्गाने केले होते. अभिजनवर्गाचा हा चुकीचा पायंडा आज बहुजनातल्या बहुसंख्येने वारसा म्हणून स्वीकारू नये. तसा तो स्वीकारल्याने आपल्याला यात येणारा हस्तक्षेप थांबतो. ज्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची आणि आधीची ८४ संमेलने पार पाडली आहेत त्या संमेलनांच्या निवडीचा इतिहास पाहणेसुद्धा गरजेचे आहे. महादेव गोविंद रानडे, कृष्णशास्त्री राजवाडे, रघुनाथ पांडुरंग करंदीकर, विष्णु मोरेश्वर महाजनी, चिंतामण विनायक वैद्य असा आरंभ होता होता नि.भि.कोलते, शंकरराव खरात, नारायण सुर्वे, केशव मेश्राम, उत्तम कांबळे हे बहुजनांसाठी लढणाऱ्या साहित्यिक आणि महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, या संमेलनाच्या निवडप्रक्रियेत अध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. काहींचा पहिल्या वेळी पराभव झाला आहे. आणि तो पराभवही लोकशाही प्रक्रियेचा भाग म्हणून त्यांनी स्वीकारला आहे. आणि पुन्हा ते निवडूनही आले आहेत. दया पवार हे त्या सगळ्या निवड प्रक्रियेच्या दगदगीत कामी आले नसते तर तेही नक्कीच अध्यक्ष झाले असते. बाबूराव बागूल यांनाही नंतर संधी घेता आली नाही, नाहीतर तेही अध्यक्षस्थानी गेले असते. पुरोगामी विचारवंत गं.भा. सरदार, भा. वि. वरेरकर, य.दि. फडके हेही या विचारपीठावरून आपले विचार लोकांपर्यंत विनाअडथळा नेऊ शकले. या पार्श्वभूमीवरच विचार करता आजही या विचारपीठावर जाणे किंवा संमेलनाच्या उत्सवात सहभागी होणे यात कोणताही समाजद्रोह किंवा वैचारिक द्रोह होत नाही. आदरणीय दुर्गा भागवत यांनी तर या विचारपीठाचा उपयोग आपल्या प्रखर विद्रोही भूमिकेसाठी केल्याचे पाहता येते. मा.अण्णाभाऊ साठे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, रा.चि.ढेरे, विं.दा.करंदीकर, शरत् चंद्र मुक्ती बोध, भाऊ पाध्ये, बाबूराव बागूल, दि.पु.चित्रे, कमल देसाई यांच्याही वाट्याला हा सन्मान यायला हवा होता पण काही घटनात्मक तरतुदींमुळे तो आला नाही याही गोष्टीचा विचार करून अध्यक्षीय निवडणूक अधिकाधिक लोकाभिमुख, निरोगी आणि सन्मानाने कशी होईल यासाठीचे प्रयत्न करणे गरजेचे आहे. या प्रयत्नांसाठीही आपणासर्वांच्या लोकशाही हस्तक्षेपाची निर्विवाद गरज आहे.

उपरोक्त तपशीलाचा विचार करता अध्यक्ष निवडीत लोकशाही पद्धतीने सहभागी होणे, त्यात सुधारणा होण्यासाठी आग्रही असणे आपल्या स्वभावाचा, आपल्या मताचा आग्रह धरणे, प्रसंगी समाजाला कटू वाटेल असे विचारही मांडणे हे या संमेलनाच्या आयोजनात शक्य आहे आणि शक्य असल्याचे सिद्धही झाले आहे.

आणखी एक प्रश्न आहे, संमेलनाच्या उत्सवी आयोजनाचा. या उत्सवी आयोजनात काहीही गैर नाही, जिथे लाखो रसिक एकत्र येतात तिथे सैद्धांतिक चर्चा आणि विद्यापीठीय परिसंवाद यांना अवकाश कमी असतो हे मान्य आहे. तो अन्य



आयोजनात शक्य आहे. पण अशा तऱ्हेचा एक मोठा उत्सव भाषेच्या आधारे होणे हे आता सर्वांची गरज आहे. आणि ती पूर्ण करण्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन काही प्रमाणात मदतच करते. त्यात कोणते बदल व्हावेत ते आपणही लोकशाहीपद्धतीने सांगू शकतो, अंमलात आणू शकतो. अगदी एक वर्ष आधी मी आसाम साहित्य सभेच्या एका अशाच उत्सवाला उपस्थित होतो. तो उत्सव असामी भाषेचा उत्सव होता. प्रचंड मोठ्या मैदानात जत्रा भरावी तशी लोकं फिरत होती. कुटुंबच्या कुटुंब आपल्या मुलाबाळांसहित जत्रेत वावरावी तशीच वावरत होती. आणि या उत्सवाच्या निमित्त निघालेल्या पदयात्रेत विविध धर्मांचे, विविध पंथांचे, विविध प्रकारच्या बौद्धिक व्यवसायाचे कष्टकरी लोक केवळ असामी भाषेच्या प्रेमाचा धागा घट्ट ठेवून प्रचंड उत्साहात नाचत गात जात होते. इथे केंद्रस्थानी होती ती फक्त असामी भाषा. समाजाचे सगळे स्तर निरपवादपणे त्यात सहभागी होते. त्यात लिहिणारे असतीलच पण न लिहिणारे अधिक होते. वाचणारे असतील पण न वाचणारे अधिक होते. एकच सूत्र होते त्यांची बोलीभाषा असामी होती. अशा तऱ्हेचा प्रचंड जनाधार असलेली उत्सवी जत्रा मला त्या क्षणी आणि आजही अद्‌भूतच वाटली. अखिल भारतीय साहित्य संमेलन हे असे समाजाच्या सर्व स्तरांना सामावून घेणारे करण्यासाठी आपण प्रयत्न करावेत, तसे झाले तर आपल्यालाही आजच्या समाज जीवनाशी जुळते मराठी भाषेचे उत्सवी संमेलन शक्य आहे !

अखिल भारतीय साहित्य संमेलनासोबतच आज महाराष्ट्रात विविध संमेलने होत आहेत गुराखी संमेलन, समांतर संमेलन, सम्यक संमेलन, विद्रोही संमेलन, मी तू संमेलन शिवाय जिल्हा पातळीवरती अनेक संमेलने, साहित्य परिषदांची विभागीय संमेलने होत आहेत. वर्ग, जाती, धर्म, पंथ, स्त्री-पुरूष, व्यवसायनिहाय संमेलने होत आहेत, एकूणच मोठ्या प्रमाणात जनता साहित्य विचारात गुंतून आहे. महाराष्ट्राच्या साहित्य व्यवहाराचा विस्तारणारा भूगोल पाहता आणि विविध सामाजिक स्तरांचा अस्थिरतेचा उभार पाहता हे सहज आहे. यातल्या बऱ्या वाईटाचा विचार व्हायला हरकत नाही पण जे घडत आहे त्याकडे आपण स्वागतशील भूमिकेने पाहायला हवे. आणखी पुढे जाऊन असे म्हणता येईल की या सारख्या विविध साहित्य संमेलनात काही पातळ्यांवर शासकीय सहभाग आहे पण तो पुरेसा आहे असे म्हणता येत नाही. तरीही २०११-१२ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र शासनाने विविध जिल्ह्यांचे ग्रंथोत्सव आयोजित केले. काही ठिकाणी त्यांना अति उत्तम प्रतिसाद मिळाल्याचे मी अनुभवले आहे. याही आयोजनात पुढल्या काळात अधिक चांगले बदल करता येण्याची पूर्ण शक्यता आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या सांस्कृतिक विभागाने यात पुरेसे लक्ष द्यावे हे ही मला आवश्यक वाटते. शासकीय व्यवहाराला औपचारिकपणा टाळून इथेही खूप मोकळेपणाने साहित्य व्यवहारात सर्वांनी गुंतवून जुळवून घेता येणे शक्य आहे.

**संपर्क : ९४२२६८९५५९**

# प्रतिभेचा तिसरा डोळा?

**डॉ. किशोर सानप**

साहित्य-संस्कृती समाजाचा आरसा असतो. समाजाचं दर्शन घडवून समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीत साहित्याचं योगदान असतं. साहित्यात समाज परिवर्तनाची ऊर्जा असते. प्रतिभेचा तिसरा डोळा कवी-लेखकाला लाभलेला असतो. व्यास-वाल्मिकीनं रामायण-महाभारताची निर्मिती करून मानवी समाजासमोर जगण्याचे आदर्श ठेवले. हजारो वर्षांपासून मानवी समाजाला घडवलं. राष्ट्राचा स्वभाव आणि संस्कृतिची जगाला ओळख करून दिली. तसं आधुनिक मराठी साहित्यानं काही केलं का? जो न देखे रवि, वो देखे कवी! हे कवींचं ब्रिद आधुनिक मराठी कवितेनं सिद्ध केलं? आधुनिक मराठी कवितेचे जनक लाडके कवी केशवसुतांनी म्हटलं होतं.

आम्ही कहोण म्हणून काय पुससी?

आम्ही असू लाडके देवाचे, दिधले असे जग तयें आम्हास खेळावया,

विश्वी या प्रतिभाबले विचारतो चोहीकडे लीलया,

दिक्कालांतुनी आरपार आमुची दृष्टी पहाया शके!...

आम्हाला वगळा-गतप्रभ झणी होतील तारांगणे,

आम्हाला वगळा- विकेल कवडीमोलावरी हे जिणें!

दोनशे वर्षांपूर्वी केशवसुतांनी कवी-लेखकांबद्दल जे भाकीत केलं, तसं अजूनही आधुनिक मराठी कवितेच्या इतिहासात काहीही घडलेलं नाही. कवी बोलून गेले पण अजूनही आमच्या कुण्या कवींनं शब्दांना सामाजिक परिवर्तनाचे अर्थ दिल्याचं उदाहरण देता येतच नाही. आधुनिक काळात जरी समाजाला कवी-लेखकाचा तिसरा डोळा दिसला नाही. तरी ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळसं! हे मराठी साहित्याचं-कवितेचं प्रतिभेचं लेणं अजूनही चिरंतनत्वाचा वारसा टिकवूनच आहे. महानुभव आणि संतांचं साहित्य, मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतिची उर्जितावस्था आजही अधोरेखितच करते. अजूनही ज्ञानोबा-तुकोबाएवढे कवी असणे कुणी सिद्धच केलेले नाही. मान्य आहे, की आमचे कवी ज्ञानोबा-तुकोबा बनू शकत. पण ना. धों. महानोर, श्रीकृष्ण राऊतसारखे अस्सल देशीय आधुनिक मराठी कवी तर बनू शकतात ना? किमान कवी म्हणून कवितेसारखी कविता तरी लिहू शकतील की नाही?

मराठीत कवींची किती गर्दी! इंद्रपूरी अमरावतीत विंचू टेकडी आहे. दगड उचलला की विंचूच! आमच्या मराठी मायबोलीच्या महाराष्ट्रात घरोघरी कवी आहेत. धोपटीत खुद्द छापून घेतलेले दहापाच कविता संग्रह रोजचे लोकांना फुकट वाटत, रस्तोरस्तीच्या कवी लोकांना कविता ऐकवत किंवा साहित्य संमेलनातही सन्माननीय कवीचा किताब मिळवून, वरून न विकल्या गेलेल्या आणि न वाचलेल्या कवितासंग्रहांना, साहित्य अकादमी ते शासकीय वैगेरे प्रतिष्ठित पुरस्कार मिळाल्यावर किंवा मिळवून घेतल्यावर, प्रसिद्धीच्या झोतातच कायम राहून किंवा मंचावरच कायम मुक्काम करीत, आमचे बापुडे कवी किंवा देशीवादी मुळात असलेले आणि नसलेलेही कवी मंचीय कवितेच्याच भरवशावर आपल्या कवितेचं आयुष्य काढतात. खरंतर असं कवी म्हणून सन्मानानं जगणं आमच्या मुक्तछंदी कवी

लोकांच्या वाट्याला कधी आलं नाही, त्याविषयी आमचे गंभीर कवी मंचकवितेला कविंसह निकालात काढण्याच्या उद्योगातच एवढे गुंतून पडले की त्यांना कविता केव्हा सोडून गेली, तेही कळत नाही.

दिलीप चित्रे संत तुकारामांच्या कवितेनं भारावून ओवी-छंदातच लिहायला लागले. खरंतर ते मुक्तछंद कवितेचे बाप किंवा काकाही म्हणता येईल. नारायण सुर्वे जरी गंगाराम सुर्व्यांना रस्त्यावर सापडले तरी त्यांनी अस्सल देशीय मराठी कवितेला लयबद्ध मुक्तछंद दिला. मुक्तछंद हा कवितेला पोषक नसला तरी प्रतिभावंत कवीच केवळ मुक्तछंदात कविता लिहू शकतो, हेही मान्यच करावं लागलं.

कवी असलेले लोक मुक्तछंदातही गद्य असली तरी कविताच लिहितात. परंतु माधव पटवर्धन जे माधव जुलियन म्हणून मराठीत कविता लिहित होते. केवळ छंद कवितेचेच आयुष्यभर कवितेच्या प्रयोगशाळेत निरनिराळे प्रयोग करीत होते, ते कवितेचे आणि कवितेच्या छंदशास्त्राचे गाढे विद्वान होते. त्यांनी छन्दोरचना नावानं सन १९३७ मध्येच डायरेक्ट जाडजूड पुस्तक किंवा ग्रंथ वगैरे लिहून, मुक्तछंदात कविता लिहिणाऱ्यांना कानपिचक्या दिल्या. पद्य म्हणजे लयबद्ध अक्षररचना होय. लयमुक्त पद्य म्हणजे निष्कारण विकृत केलेले गद्य होय. ज्यांच्या प्रतिभेला कोणतेही बंधन सहन होत नाही त्यांनी गद्याचीच योजना करावी. आता आमच्या माधवरावांनी लयमुक्त पद्य लिहिणाऱ्यांनी सरळ गद्यलेखन करावं किंवा मुक्तछंदात कविता लिहून निष्कारण गद्याला विकृत का करावं? असा प्रश्न कवितेच्याच प्रेमापोटी केला होता. तरीसुद्धा कवितेचं गाजर गवत काही कमी झालं नाही.

केशवसुतांनी कवीचं मायावी वलय निर्माण करून, त्यात छंदासह मुक्तछंद लिहिणारे कवी गुंतवूण टाकले. बिचारे जे मोठे मोठे कवी आहेत-होते-होतीलही, त्यांना कविता केवळ प्रतिभेच्या भरवशावरच लिहिता येत नाही. त्यांना कवी असणे आणि कविता लिहिणे या दोन्हींसाठी कठोर साधना, अभ्यास, रेखेची वगैरे वाहणी आणि शैली किंवा लयवगैरे छंदवगैरे किंवा अक्षररचना वगैरेचीही गरज असते. हे कधी जाणवत नाही. आमच्या कविलोकांना!

मुक्तछंद कविता लिहिणाऱ्या कवींसह, ज्या मर्ढेकरांना नवकवितेचे जनक मानून, आधुनिक कवितेत दुसरे केशवसूत आणि नारायण सुर्व्यांना तिसरे केशवसूत ठरवून, केशवसुतांचीच माळ मराठी कवितेत गुफण्यात आयुष्य वेचणारे आमचे मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतिवर टीका करणारे टीकाकार बिचारे, केशवसुतांच्या पुढे मराठी कविताच गेली नाही, असं सांगत चांगल्या चांगल्या कवींनाही हुलकावण्या देत राहतात. मर्ढेकरांनी मुक्तछंदात कधीच कविता लिहिल्या नाहीत. माधवरावांसारखे तेही कविता केवळ लयबद्ध आणि छंदबद्ध असू शकते. या विचारांनीच कविता लिहिणारे कवी होते. परंतु मर्ढेकर हे अस्सल संतछंद-लोकछंद-ओवी-अभंग-अष्ठाक्षरी वगैरे छंदांत-वृत्तांत कविता लिहिणारे देशी कवी होते. परंतु मर्ढेकरांच्या विदेशी पेहरावामुळे जरी अंत:करण देशी असले किंवा प्रतिभा देशी असली तरी त्यांना देशी-विदेशी प्रभावात कविता लिहिणारे आणि विदेशी सौंदर्यशास्त्रीय लेखनाला देशी ठरवून, जाडजूड ग्रंथ लिहिणाऱ्या टीकाकारांना मर्ढेकरांवर अन्यायच केला.

मर्ढेकरांनी मुक्तछंदात मीही कविता लिहू शकतो आणि कवितेची ऐशीतैशी करू शकतो, असं जरी म्हटलं, तरीमात्रा मर्ढेकरांनी खूप कमी लिहूनही केवळ कविताच लिहिल्यात. कवितेचं पाप करणं त्यांच्या मनाला कधी पटलंच नाही. मुक्तछंदात कविता लिहिणाऱ्यांनीही मर्ढेकरांना कधी समजून घेतले नाही किंवा टीकाकारांना तर कवी मर्ढेकर कळण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. ते बिचारे आपले सौंदर्यशास्त्री बनूनच धन्य धन्य झाले.

मराठी कवितेची ही शोकांतिका म्हणावी की काय? परंतु बाकीही मराठी साहित्याच्या विविध प्रांतात जसे, कथा कादंबरी, नाटक वगैरेतही प्रगती आणि परिवर्तन वगैरे काही झालं आहे काय? का. बा. मराठे आणि इतिहासाचार्य राजवाडे यांनी राष्ट्राच्या स्वभावाला आकार देणाऱ्या रामायण-महाभारतासारख्या कथा-कादंबऱ्याच आधुनिक मराठीत निर्माण झाल्या नाही, असं खेदानं म्हटलं. मग निर्माण काय झालं? तर वास्तववादी आणि मनोरंजनाची रद्दड प्रजाच! अद्‌भूत वास्तवाला स्पर्श करणारी मयासुराची करणी कोणी केलीच नाही. एका समकालीन कादंबरीच्या चर्चासत्रात मराठीत कादंबरीचं शिखर कुणी निर्माण केलंच नाही, असं रा. रा. भालचंद्र नेमाडेंनी कोसला वगैरे कादंबरीच्या चर्चासत्रात म्हटलं होतं. आता हिंदू: जगण्याची समृद्ध अडगळ लिहिली तरी त्यांच्या उपरोक्त विधानात त्यांनी बदल केला नाही. नेमाडे काहीही म्हणोत, तरी श्याम मनोहर खूप लोक आहेत असं पाहून, उत्सुकतेने मी झोपलो, असंही म्हणतातच. रंगनाथ पाठारेही ताम्रपटाचं वास्तव मांडून नामुष्कीचे स्वगत सांगतातच. राजन गवस तणकट उपटून फेकतात. आता तुम्ही असंही हणाल की, ज्यांच्या कथा-कविता- कादंबरी आणि नाटकंफाटकं वगैरेंना साहित्य अकादमी किंवा राज्यपुरस्कार किंवा महाराष्ट्र फाऊंडेशन किंवा अनंत लाभसेटवार किंवा आणखीही नागपूर भूषण किंवा पुणे भूषण किंवा चंद्रपूर भूषण किंवा ज्ञानपीठही मिळतं त्यांच्या साहित्याबद्दल काय म्हणावं. तर आपण मान्य करूया की हे सर्व पुरस्कार वगैरे किंवा भूषण वगैरे गुणवत्तेलाच मिळतात. खरंही आहे. परंतु त्यासाठी आमच्या साहित्यिकांना बहुतांशवेळ राजकारण करावं लागतं किंवा लॉबिंग करावं लागतं.

आयुष्यात ज्यांना कधीच कोणता पुरस्कार मिळाला नाही तरी किंवा ज्यांनी लेखन व्रतस्थपणे केलं किंवा ज्यांनी तुकोबांच्या साहित्य परंपरेत, सत्यासाठी माझी शब्दविवंचना, न भे मी विठ्ठला कळीकाळाशी किंवा सत्य आम्हा मनी नव्हो गबाळचे धनी किंवा बुडती हे जन न देखवे डोळा किंवा देतो तिक्ष्ण उत्तरे पुढे व्हावयासी बरे, सात्विक प्रेमळ दृष्टांतांच्या मते, बोलिलो बहुत कळावयासाठी लिहिलं. अशा लेखक-कविंनीच समाज घडविला आणि परिर्वनाची ऊर्जाही समाजाला बहाल केली. त्यांना कशाला हवेत पुरस्कार? साहित्यसंमेलन अध्यक्षपद? अकादमी किंवा ज्ञानपीठ? बरं, राजकारण्यांनी मतांच राजकारण करणं, निवडून येणं, पराभूत होणं, डावपेच खेळणं, भेटीगाठी घेणं आणि आपलाच प्रचार करणं आणि प्रचाराची यंत्रणा राबवणं समजण्यासारखं आहे. खुर्चीसाठी राजकारण केल्याशिवाय आणि आळशी राजकारण्यांना - धनदांडग्या राजकारण्यांना जिवंत राहण्यासाठी राजकारण करावंच लागतं. त्यात समाजाला काही गैर वाटत नाही. परंतु साहित्यिकालाही साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाला पटकावण्यासाठी शुद्ध राजकारण करावं लागतं आणि अमरावतीच्या किंवा चंद्रपूरच्या किंवा कु ठल्याही ठिकाणी जन्मलेल्या आणि वास्तव्य करणाऱ्या बिचाऱ्या कविवर्य वसंत आबाजींच्या कविताकर्तृत्वाला आणि टीकाकारकर्तृत्वाला सांगलीच्या डहाळीवर उभं करून विश्राम बागेतल्या वयोवृद्ध ज्येष्ठ टीकाकार मित्र म. द. हातकणंगलेकरांना अध्यक्षपदी विराजमान करण्याचंही असाहित्यिक कार्य शेवटी आमच्याच साहित्यिकांच्या असाहित्यिक लोकांनी



चालविलेल्या साहित्यसंस्थांना आणि असाहित्यिक मतदारांसह साहित्यिक मतदारांना दुर्दैवानं करावं लागतं. हे मराठी साहित्य आणि संस्कृतिच्या पतनाचं लक्षण आहे की काय? असो. शेवटी आमचे कमी असलेले आणि टीकाही करणारे टीकाकार साहित्यिक मित्र चंद्रपूरच्या भव्यदिव्य आणि धनदांडग्या राजकारणी लोकांनी आणि साहित्यिक आणि असाहित्यिक आणि प्रकाशक मित्रांनी परिश्रमपूर्वक आणि शांततेनं रामराम हणत पोटही न दुखू देता, गौरवशाली आणि ऐतिहासिक अशा विशाल आयोजनाचं कौतुक होत असलेल्या, साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद भूषविल्याबद्दल, त्यांच्यासह सर्वांचंच अभिनंदन करायला हवं.

टागोरांना साहित्याचं नोबेल मिळालं. खांडेकर-कुसुमाग्रज विंदांना ज्ञानपीठ मिळालं. व्यास-वाल्मिकी-महानुभव-संत काळात पुरस्काराचं फॅडच नव्हतं. तरी ह्या लोकांनी बिना माना सन्मानानं केवळ समाजाचं प्रबोधन करण्यासाठीच लिहिलं. शिवाय त्यांना साहित्यिक होण्याची किंमतही चुकवावी लागली. कवी नरेन्द्र तर राज्यत्याग करूनच आपल्या कवितेच्या अस्तित्वाला जपण्यासाठी फरार झाला. सलमान रश्दीसाठी तर अयातुल्ला खोमेनीनं सोडलेल्या मृत्यूचं फर्मान चुकवत, मृत्यूच्या भितीनं देशोदेशी लपून लिहित राहिला. तस्लिमा नसरिनलाही लेखक असण्याची किंमत चुकवावी लागली. हाच खरंतर मुद्दा आहे. कबिर-तुकोबांना काय दिलं समाजानं? सालोमालो कवी मणून मिरवले आणि तुकोबांच्या कवितेच्या वह्या इंद्रायणीत बुडविल्या? तरी तुकोबांसह सर्वच हे अस्सल लेखक लोक जगाच्या हृदयावर आजही राज्यच करीत आहोत ना? सर्वज्ञ म्हणितले आणि माझा मराठीचा बोलू कवतिके, हीच आमची आजही मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीची अस्सल देशीय परंपरा आहेच! ह्याच परंपरेत लिहिणारे लेखक- कवीही आजच्या आधुनिक काळात आणि एकविसाव्या शतकातल्या ग्लोबल व्हिलेजमध्ये नाहीतच असेही नाही.

साहित्य संमेलन कोणतेही असो, ग्रामीण, दलित, प्रवाही, जिल्हा-तालुका-प्रादेशिक ते अभापर्यंत पूर्वीपासूनच ती उत्सवी स्वरूपाचीच राहिली आहेत. आम्ही आहोत, आम्हाला विसरू नका, आमची भांडणं श्रोत्यांनी विचारांसह ऐकावी, आम्हीच आमच्या उखाळ्या-पाखाळ्या काढून तुमचं मनोरंजन करतो. सृजनाचं काही होत नाही. सृजन तर आम्ही घरात कोंडून करीतच असतो. साहित्याची बाळे जन्माला घालणं आमचं कर्तव्यच आहे. हवापालट, प्रवास, तोकडं का होईना मानधन, चविष्ट किंवा अचविष्ट जेवण, लग्नसमारंभात सजावं तसं आम्ही सजवून घेतो देहाला. म्हातारपणी तारुण्याच्या उर्मी आणतो आही संमेलनात. भेटीगाठी होतात. मीच कसा श्रेष्ठ आहो आणि बाकी जगातले लेखक किती तुच्छ आहेत, गटबाजी आणि मठात सभासद नोंदणी करणं, शहरभर आम्ही असू देवाचे लाडके, दिधले या आविर्भावात आम्ही फिरतो. नेमेचि येतो पावसाळा आणि दरवर्षी येते दिपावली. तसंच असतं आमच्यासाठी साहित्य संमेलनही. आमची दिवाळी आणि तुमचा दसरा. आम्हीही सर्वच सीमांचं उल्लंघन करतोच की. आमची कातडी गेंड्यापेक्षाही मजबूत असते. उदा. प्रबोधनकार ठाकरेंचे चिरंजीव बाळासाहेबांनी एका अभा साहित्य संमेलनात साहित्यिकांना बैलोबा म्हटले होते. संमेलन आम्ही शांततेत पार पाडलं. कारण आयोजक आणि आश्रयदात्यांना हक्कच असतो साहित्यिकांना बोलण्याचा. त्यांचा दोष नसतो. तेही बिचारे लाखो करोडो रुपये खर्च करतात आमच्या उत्सवांवर, तर त्यांनी आम्हाला बैल म्हटलं तर काय बिघडतं? बिघडलंच तर बैलांना वाटू शकतं की, आमच्यासारख्या आयुष्यभर समाजासाठी इमानदारीनं काम करणाऱ्यांवर बाळासाहेबांनी अन्याय तरी का करावा?

सहकारमहर्षी-राजकारणमहर्षी-साखरमहर्षी शरदाचं चांदणं आमच्या साहित्यिकांना वाटत फिरतातच सदानकदा. आम्हाला ते हवंच असतं. कुणाला अध्यक्षपद, पुरस्कार, साहित्य संस्कृती मंडळ, मराठी भाषा विकास मंडळ, महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी मुद्रांचा पद्न्यास, आमदारकी किंवा राजकीय कुरण वगैरे, आणखीही बरंच काही अवाङ्.मयीन परंतु सुवर्ण मुद्रांचा मन लुभावणारा टणत्कार! हवंच असतं जगण्यासाठी. हे सर्व घ्यायचं आणि संमेलन वगैरे कामं झालं की आमच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचविणाऱ्या राजकारण्यांच्या आणि तीव्र बोलणाऱ्यांच्या निषेधाचं पश्चात वादळ उठवायचं. अर्थात हे सुनामीसारखं नसतं, तर ते चहाच्या पेल्यातलं असतं.

अखंड काव्यरचना समाजाच्या भल्यासाठी लिहिणाऱ्या कविवर्य महात्मा फुल्यांनी, अभाची सुरुवात पुण्याच्या ज्या मराठी ग्रंथकारांच्या संमेलनाने झाली, त्यावेळच्या ग्रंथकार सभेचे न्या. रानडे आणि लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी. दि. १३ मे १८८५ मध्ये ग्रंथकार संमेलनाला निमंत्रित साहित्यिक म्हणून उपस्थित राहण्याची विनंती केली होती. अस्सल देशीय लेखक असलेल्या फुल्यांनी दिलेले उत्तर आजही सर्वच अभादी वगैरे साहित्य संमेलनात सहभागी होणाऱ्या लेखकांना तंतोतंत लागू होतं.

साहित्यची निर्मिती ही समाजाच्या जागरासाठी असते. समाज प्रबोधनासाठी असते. साहित्याचा-कवितेचा-कवितेचा-कीर्तनाचा व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध तुकोबांनी बंड पुकारले होते. तसे अलेखकांविरुद्ध बंड पुकारण्याची आता गरज वाटू लागली आहे. तुकोबांची काठी किंवा फडा घेवूनच साहित्याचे प्रदेश आणि साहित्यिकांची घरे, रस्ते साफ करण्याची गरज वाटू लागली आहे. हे काम लेखक असणाऱ्यांनाच करावं लागणार आहे. ते शब्दांचं माध्यम वापरूनच करता येईल. कारण शब्द हेच लेखकाचं धन आणि शब्द हेच लेखकाचं ब्रह्मास्त्रही.

आपुल्या पोटासाठी। करी लोकांचिया गोष्टी॥
तुका म्हणे सिंदळीच्या। व्यर्थ श्रमविली वाचा॥
स्वये आपणचि मस्ती। रडे पुढिलाच्या हिता॥
अंगी ज्ञानपणाची मस्ती। बोलणे तितुके वाया गेले॥
तुका म्हणे गाढव लेखा। जेथे भेटेल तेथे ठोका॥

अशी दंड संहिताही तुकोबांनी, लेखक नसलेल्या परंतु लेखक बनणाऱ्यांसाठी शासन म्हणून समाजाला सांगितली आहे. शेवटी महात्मा फुल्यांच्या ग्रंथकार सभेस लिहिलेल्या पत्रातील उपदेश जसाच्या तसा करणं आजही गरजेचं वाटतं.

**संपर्क : ९३२६८८०५२३**

**१ मे नव्हे, १ नोव्हेंबर**

डिसेंबर २०११ चा विदर्भ विशेषांक हा अत्यंत वाचनीय, माहितीपूर्ण आणि संग्राह्य झाला आहे.

त्यातील दोन लेखांत (सुरेश द्वादशीवर आणि हेमंत देसाई यांचे लेख) १ मे १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाली असा उल्लेख आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना १ नोव्हेंबर १९५६ रोजी झाली.

हेमंत देसाई यांच्या लेखात राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचा विदर्भ कन्या म्हणून उल्लेख आहे. वास्तविक त्या खानदेश कन्या आणि विदर्भाच्या स्नुषा आहेत.

**– वसंत वासुदेव देशपांडे,** मुंबई






# साहित्य अकादमीवरील मराठी मुद्रा

भारतीय भाषांमध्ये उत्कृष्ट लिखाण करणाऱ्या साहित्यिकांना साहित्य अकादमीतर्फे साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात येते. सन १९५४ पासून देण्यात येणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप रुपये एक लाख रोख व मानचिन्ह असे आहे. भारतीय साहित्य अधिकाधिक आशयसंपन्न व्हावे तसेच लेखनाच्या क्षेत्रातील नव्या प्रयोगांना चालना मिळावी या अनुषंगाने दरवर्षी प्रत्येक भाषेसाठी एक याप्रमाणे साहित्य अकादमी पुरस्कार दिले जातात.

## साहित्य अकादमी पुरस्कार विजेते

| क्र. | सन | नाव |
|---|---|---|
| १. | १९५५ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| २. | १९५६ | श्री. बाळ सीताराम मर्ढेकर |
| ३. | १९५८ | श्री. चिंतामण गणेश कोल्हटकर |
| ४. | १९५९ | श्री. गजानन त्र्यंबक देशपांडे |
| ५. | १९६० | श्री. विष्णू सखाराम खांडेकर |
| ६. | १९६१ | श्री. डी. एन. गोखले |
| ७. | १९६२ | श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे |
| ८. | १९६३ | श्री. श्रीपाद नारायण पेंडसे |
| ९. | १९६४ | श्री. रणजीत देसाई |
| १०. | १९६५ | श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे |
| ११. | १९६६ | श्री. त्र्यंबक शंकर शेजवळकर |
| १२. | १९६७ | श्री. नारायण गोविंद कालेलकर |
| १३. | १९६८ | श्रीमती इरावती कर्वे |
| १४. | १९६९ | श्री. श्रीनिवास नारायण बनहट्टी |
| १५. | १९७० | श्री. नरहर रघुनाथ फाटक |
| १६. | १९७१ | श्रीमती दुर्गा भागवत |
| १७. | १९७२ | श्रीमती गोदावरी परुळेकर |
| १८. | १९७३ | श्री. गुरुनाथ आबाजी कुलकर्णी |
| १९. | १९७४ | श्री. विष्णू वामन शिरवाडकर |
| २०. | १९७५ | श्री. रा. भा. पाटणकर |
| २१. | १९७६ | श्री. गोपाळ नीलकंठ दांडेकर |
| २२. | १९७७ | श्री. आत्माराम रावजी देशपांडे |
| २३. | १९७८ | श्री. चिंतामणी त्र्यंबक खानोलकर |
| २४. | १९७९ | श्री. शरतचंद्र मुक्तीबोध |
| २५. | १९८० | श्री. मंगेश पाडगावकर |
| २६. | १९८१ | श्री. लक्ष्मण माने |
| २७. | १९८२ | श्री. प्रभाकर पाध्ये |
| २८. | १९८३ | श्री. व्यंकटेश माडगूळकर |
| २९. | १९८४ | श्री. इंदिरा संत |
| ३०. | १९८५ | श्री. विश्राम बेडेकर |
| ३१. | १९८६ | श्री. नागोराव घनश्याम देशपांडे |
| ३२. | १९८७ | श्री. रामचंद्र चिंतामणी ढेरे |
| ३३. | १९८८ | श्री. लक्ष्मण गायकवाड |
| ३४. | १९८९ | श्री. प्रभाकर ऊर्ध्वरेषे |
| ३५. | १९९० | श्री. आनंद रतन यादव |
| ३६. | १९९१ | श्री. भालचंद्र नेमाडे |
| ३७. | १९९२ | श्री. विश्वास पाटील |
| ३८. | १९९३ | श्री. विजया राजाध्यक्ष |
| ३९. | १९९४ | श्री. दिलीप चित्रे |
| ४०. | १९९५ | श्री. नामदेव कांबळे |
| ४१. | १९९६ | श्री. गंगाधर गाडगीळ |
| ४२. | १९९७ | श्री. मधुकर वासुदेव धोंड |
| ४३. | १९९८ | श्री. सदानंद श्रीधर मोरे |
| ४४. | १९९९ | श्री. रंगनाथ पठारे |
| ४५. | २००० | श्री. नामदेव धोंडो महानोर |
| ४६. | २००१ | श्री. राजन गवस |
| ४७. | २००२ | श्री. महेश एलकुंचवार |
| ४८. | २००३ | श्री. त्र्यं. वि. सरदेशमुख |
| ४९. | २००४ | श्री. सदानंद नामदेवराव देशमुख |
| ५०. | २००५ | श्री. अरुण बाळकृष्ण कोलटकर |
| ५१. | २००६ | श्री. आशा बगे |
| ५२. | २००७ | श्री. गो. म. पवार |
| ५३. | २००८ | श्री. श्याम मनोहर |
| ५४. | २००९ | श्री. वसंत आबाजी डहाके |
| ५५. | २०१० | अशोक केळकर |
| ५६. | २०११ | कवी ग्रेस |

## ज्ञानपीठ



भारतातील विविध भाषिक साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी केलेल्या मान्यवरांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. 'भारतीय ज्ञानपीठ ट्रस्ट'मार्फत सन १९६५ पासून देण्यात येणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप रु. ७ लाखांचा धनादेश, मानपत्र व सन्मानचिन्ह (सरस्वती देवीची कांस्य प्रतिमा) असे आहे.

वि. स. खांडेकर-१९७४-ययाती

वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज)-१९८७-नटसम्राट

विंदा करंदीकर-२००३- अष्टदर्शने

* भारतरत्न डॉ. पां. वा. काणे यांना सन १९५६ मध्ये History of Dharmashastra (इंग्रजी)साठी साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

*१९५७ साली साहित्य अकादमी पुरस्कार कोणत्याही लेखकाला प्रदान करण्यात आला नाही.

# साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक (१९५५ ते २०११)



लक्ष्मणशास्त्री जोशी
१९५५



बा. सी. मर्ढेकर
१९५६



चिंतामण गणेश कोल्हटकर
१९५८



गजानन त्र्यंबक देशपांडे
१९५९



श्री. वि. स. खांडेकर
१९६०




द. न. गोखले
१९६१



पुरुषोत्तम यशवंत देशपांडे
१९६२



श्रीपाद नारायण पेंडसे
१९६३



श्री. रणजित देसाई
१९६४




पु. ल. देशपांडे
१९६५



त्र्यंबक शंकर शेजवळकर
१९६६




नारायण गोविंद कालेलकर
१९६७



श्रीमती इरावती कर्वे
१९६८



श्रीनिवास नारायण बनहट्टी
१९६९




नरहर रघुनाथ फाटक
१९७०



श्रीमती दुर्गा भागवत
१९७१



श्रीमती गोदावरी परुळेकर
१९७२




गुरुनाथ आबाजी कुलकर्णी
१९७३



विष्णू वामन शिरवाडकर
१९७४



रा.भा. पाटणकर
१९७५



गोपाळ नीलकंठ दांडेकर
१९७६



आत्माराम रावजी देशपांडे
१९७७




चिंतामणी त्र्यंबक खानोलकर
१९७८




शरतचंद्र मुक्तीबोध
१९७९



मंगेश पाडगावकर
१९८०



लक्ष्मण माने
१९८१




प्रभाकर पाध्ये
१९८२



व्यंकटेश माडगुळकर
१९८३




इंदिरा संत
१९८४



विश्राम बेडेकर
१९८५




नागोराव घन:श्याम देशपांडे
१९८६



रामचंद्र चिंतामणी ढेरे
१९८७



लक्ष्मण गायकवाड
१९८८



प्रभाकर ऊर्ध्वरेषे
१९८९



आनंद रतन यादव
१९९०



भालचंद्र नेमाडे
१९९१



विश्वास पाटील
१९९२



विजया राजाध्यक्ष
१९९३



दिलीप चित्रे
१९९४



नामदेव कांबळे
१९९५




गंगाधर गाडगीळ
१९९६



मधुकर वासुदेव धोंड
१९९७



सदानंद श्रीधर मोरे
१९९८




रंगनाथ पठारे
१९९९



नामदेव धोंडो महानोर
२०००



राजन गवस
२००१



महेश एलकुंचवार
२००२



त्र्यं. वि. सरदेशमुख
२००३




सदानंद नामदेवराव देशमुख
२००४



अरुण बाळकृष्ण कोलटकर
२००५



आशा बगे
२००६



गो. मा. पवार
२००७



श्याम मनोहर
२००८



वसंत आबाजी डहाके
२००९



अशोक केळकर
२०१०



नामदेव ढसाळ
२००४

विख्यात कवी पद्मश्री नामदेव ढसाळ यांना साहित्य अकादमीने २००४ साली जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविले आहे.



कवी ग्रेस,२०११

२०११ सालचा मराठी अनुवादाचा साहित्य अकादमी पुरस्कार सरोज देशपांडे यांना मिळाला आहे. 'अ मॅटर ऑफ टाईम' या इंग्रजी पुस्तकाच्या 'अशी काळवेळ' या मराठी अनुवादासाठी हा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला.



सरोज देशपांडे
२०११

# स्वागताध्यक्षपद

कऱ्हाड येथे २००३ साली झालेल्या ७६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं स्वागताध्यक्षपद माझ्याकडं यावं हे मला अनपेक्षितच होतं.

मी तेव्हा मुंबईत कांदिवलीला मंदाकिनीकडं - माझ्या बहिणीकडं होतो. सकाळी सकाळीच मी झोपेत असतानाच तिनं मला हाक मारली.. म्हणाली, ''हे बघ महाराष्ट्र टाइम्समध्ये काय आलंय. तुझा फोटो, तुझं नाव.'' मी उठून पाहिलं. शेवटी कऱ्हाडकरांनी संमेलनाचं स्वागताध्यक्षपद माझ्याकडं सोपवलं होतं.

## श्रीनिवास विनायक कुलकर्णी

मी क्षणभर विचलित झालो. या संमेलनाचे संयोजक आनंद परांजपे कऱ्हाडला घरी आले होते. मी हे स्वागताध्यक्षपद स्वीकारावं असा जोराचा आग्रह करून गेले होते. दीक्षितसरांनी (म्हणजे प्रकाश नारायण संत यांनी) त्यांना माझं नाव सुचवलं होतं, असं म्हणाले. खरंतर, संतांनीच ते स्वीकारायला हवं होतं. मी आनंदानं सूचक झालो असतो.

एवढ्यात कऱ्हाडहून प्रकाश संतांचा टेलिफोन आला. ''तुम्ही पेपरमध्ये पाहिलंच असेल. तुमच्या संमतीशिवाय मी हे तुमचं नाव निश्चित करायला संयोजकांना सांगितलं होतं. बोलावलेल्या सभेत तुमचे मित्र प्रा. विद्याधर गोखले यांनी तुमच्या नावाच्या ठरावाला अनुमोदन दिलं. आणि एकमतानं तो ठराव संमत झाला.''

मी त्यांना म्हटलं, ''अहो ही मोठी जबाबदारी मला नको होती. अशी जबाबदारी पेलू शकतील अशी पुष्कळ कर्तृत्ववान माणसं कऱ्हाडात आहेत. या जबाबदारीनं माझं स्वत:चं चाललेलं कामही काही काळ खंडित होईल.''

''पण स्वीकारा,'' संत म्हणाले. श्री. पु. भागवत यांच्याशी मी बोललो. ते म्हणाले, ''मोठी जबाबदारी पडलीच तर ती स्वीकारून पाहायला हरकत नाही. बोरकर म्हणतातच ना, लेखकाला बरा-वाईट, लहान-मोठा अनुभव वर्ज्य नाही. त्या अनुभवाचं त्याला भांडवलच होत. Writer is never at a lost. स्वीकारा. तुम्हाला काही अडचण येणार नाही. सगळ्या थरांत तुमच्यावर लोभ करणारी माणसं आहेत. आपल्या कामाचं पाहता येईल.'' तेव्हा मी भागवतांच्या बरोबर मौज प्रकाशनचं काम करीत होतो.



ना. यशवंतराव यांच्या उजव्या बाजूला श्रीनिवास विनायक कुलकर्णी, वसंतराव वराडकर आणि डाव्या बाजूला शंकरराव करंबेळकर (कार्याध्यक्ष) प्रा. विद्याधर गोखले (समाज भूषण कृ. पां. गोखले यांचे चिरंजीव) आणि आमदार संभाजी बाबा थोरात.

स्थळ : ५१ व्या साहित्य संमेलनाचे कऱ्हाड येथील कार्यालय.

कऱ्हाडला आल्यावर पी. डी. पाटील यांना भेटावं वाटलं. कऱ्हाडातल्या कोणत्याही पक्षनिरपेक्ष विधायक कार्यात ते अग्रेसर असत. सलग चाळीसहून अधिक वर्षे ते कऱ्हाडचे नगराध्यक्ष होते. त्यांचा मजवरला लोभ मला महत्त्वाचा वाटे. पीडीसाहेबांना मी म्हटलं, ''आपणासारख्या व्यक्ती असताना माझ्याकडं हे काम यावं हे मला उचित वाटत नाही, असली जबाबदारी पेलावी असा माझा पिंडही नाही.''

पीडीसाहेब म्हणाले, ''हे गावाचं काम आहे. त्यांना लेखकानं लेखकांचं आणि सर्वांचं स्वागत करावं असं वाटतं म्हणून त्यांनी स्वागताध्यक्षपदासाठी तुमचं नाव निवडलं, हे योग्यच आहे. तुम्ही हे स्वीकारा. आम्ही आहोतच.''

कऱ्हाडला १९७५ साली झालेल्या ५१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष नामदार यशवंतराव चव्हाण होते, हे सतत आठवत होतं. त्यांच्याबरोबर तेव्हा काम करीत राहिल्याची आठवण मनात सतत जागी होत होती.

संपर्क : ९८९०९१८४३८

# सर्वात्मका शिवसुंदरा

सर्वात्मका शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना
तिमिरातूनी तेजाकडे प्रभू अमुच्या ने जीवना ॥धृ॥

सुमनांत तू, गगनांत तू
ताऱ्यांमध्ये फुलतोस तू
सद्धर्म जे जगतामध्ये
सर्वांत त्या वसतोस तू
चोहीकडे रूपे तुझी जाणीव ही माझ्या मना ॥१॥

श्रमतोस तू शेतामध्ये
तू राबसी श्रमिकांसवे
जे रंजले अन गांजले
पुसतोस त्यांची आसवे
स्वार्थाविना सेवा जिथे तेथे तुझे पद पावना ॥२॥

करुणाकरा करुणा तुझी
असता मला भय कोठले?
मार्गावरी पुढती सदा
पाहीन मी तव पाउले
सृजनत्व या हृदयामध्ये नित जागवी भीतीविना॥३॥

– कुसुमाग्रज

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, January-February 2012. (Combined Issue)
Date of Publication : 10th of every Month




# लोकराज्य

५.३० लाख खप

५० लाख वाचक

प्रती / To :

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद नलावडे, महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीड्या लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी.
इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे–बेलापूर रोड, नवी मंबई – ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,
मुंबई –४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद नलावडे